मा
२६१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
(जिल्हा वाचनालय)

अंड
2

मासिकाचे नांव — ग्रंथमाला

संपादक —

मासिक क्रमांक — सन — नो. १९००

अंक —

(महिने)

मराठी ग्रंथ संग्रहालय

[illegible] 校 [illegible]

[illegible]

[illegible]

[illegible] 校 [illegible]

[illegible] प्रत
[illegible]

वडी. (वसई.)

मराठी ... ठाणे.

# ग्रंथमाला

मासिक पुस्तकांत छापून प्रसिद्ध झालेलें प्रकरण.

खंड २ रा.

# पेशव्यांची शकावली.

—*Chronology is the eye of history.*—

विश्वनाथ काशीनाथ राजवाडे, बी. ए.

यानीं शोधिली

ती,

विष्णु गोविंद विजापूरकर, एम्. ए.

यांनीं छापून प्रसिद्ध केली.

कोल्हापूर 'श्रीसमर्थप्रसाद' छा. छा.

नोव्हेंबर १९००.

किंमत १८.

...फ्तर खु... ..,,
...नें इतक्या थोड्या कां
...याला उत्तर असें आहे कीं,

से.गा. ३०/२

# प्रस्तावना.

१. प्रस्तुत शकावलींत खमसअशर सालापासून ह्मणजे इ० स० १७१४ च्या मेपासून इहिदेसितैनच्या जमादिलाखरापर्यंत ह्मणजे १७६१ च्या जानेवारीपर्यंत घडलेल्या ठळक ठळक प्रसंगांच्या मित्या दिल्या आहेत. शिवाय प्रथमारंभीं १७१४ च्या आधींच्या कांहीं प्रसंगांचाही क्वचित् धरसोडीचा उल्लेख केला आहे.

२. ह्या शकावलींत प्रायः पेशव्यांच्या मोहिमांचाच तेवढा निर्देश केला असल्यामुळें, इतर सरदारांच्या मोहिमांची माहिती हींत फारशी सांपडावयाची नाहीं. पेशव्यांच्या देखील सर्व मोहिमांच्या मित्या हींत दिल्या आहेत असें नाहीं. बाळाजी विश्वनाथाची बहुतेक कारकीर्द बिन मित्यांचीच ह्या शकावलींत सांपडेल. आतां इतकें खरें आहे कीं, बाळाजी विश्वनाथाच्या कांहीं हालचालींच्या मित्या ह्या शकावलींत दिल्या आहेत; परंतु ह्या मित्या इतक्या थोड्या आहेत कीं, सबंध महिनेच्या महिने बाळाजी विश्वनाथ कोठें होता व काय करीत होता, ह्यांचा नक्की पत्ता अद्यापि लागावयाचाच आहे. समाधान एवढेंच मानावयाचें कीं, आतांपर्यंत ग्रांटडफादि बखरकारांच्या ग्रंथांत जेथें जेथें मुळींच कांहीं माहिती नव्हती, किंवा जी कांहीं थोडीबहुत माहिती दिलेली आहे, ती जेथें जेथें असंबद्ध, परस्परविरोधी व अपूर्ती होती, तेथें तेथें ह्या शकावलींतील मित्यांच्या साहाय्यानें जास्त तपशिलवार, संगतवार व निश्चयात्मक माहिती मिळण्याचा संभव उत्पन्न झाला आहे. बाळाजी विश्वनाथाच्या कारकीर्दीतील मित्यांना ज्या टीपा दिल्या आहेत, त्यांच्याकडे लक्ष पोहोंचविलें असतां माझ्या ह्मणण्याचा अर्थ उघड होईल.

३. शकावलीच्या कर्त्याला पेशव्यांचें सर्व दफ्तर खुलें असून, बाळाजी विश्वनाथाच्या कारकीर्दीतील मित्या त्यानें इतक्या थोड्या कां दिल्या असा प्रश्न साहजिक उद्भवतो. त्याला उत्तर असें आहे कीं,

पेशव्यांच्या दफ्तरांतील जीं दफातीं शकावलीकर्त्याला पहावयाला मिळालीं, त्यांतच मुळीं बाळाजी विश्वनाथाच्या कारकीर्दीच्या मित्या थोड्या आहेत, अथवा खरें ह्मटलें असतां, मुळींच नाहींत. एक तर बाळाजी विश्वनाथाच्या वेळीं दफातीं ठेवण्याची वहिवाट मुदलांतच नव्हती असें तरी ह्मटलें पाहिजे; किंवा दफातीं ठेवण्याची वहिवाट होती असें समजल्यास—आवकजावकचें दफातें ठेविल्याशिवाय कोणताही कारखाना व विशेषतः राजकीय कारखाना चालणें अशक्य आहे, ही गोष्ट लक्षांत घेतली असतां हाच समज जास्त संभवनीय ठरतो. तीं दफातीं कोणत्या तरी कारणानें नाहींशीं झालीं असावीं असें ह्मणणें अवश्य होतें. कसेंही असो, ह्या शकावलींत बाळाजी विश्वनाथाच्या कारकीर्दींतील मित्या फारच थोड्या व अपूर्त्या आहेत ह्यांत बिलकुल शंका नाहीं. ह्यास दहापांच प्रत्यंतरें देतां येण्यासारखीं आहेत. तिसऱ्या खंडांतील ४९३ व्या लेखांकांत "इसलामपुरास बाळाजी विश्वनाथ होते" असें लिहून; नंतर पुढें "थोरले पंतप्रधान दिल्लीहून सातारेस आलेवर महाराजांनीं दक्षिणप्रांतीं मोहीम सांगितली," वगैरे मजकूर दिला आहे. ह्या लेखांकांत कोल्हापूरच्या संभाजीच्या व सातारच्या शाहूच्या कांहीं झटापटींचें वर्णन आहे व त्यांत बाळाजी विश्वनाथाच्या हालचालींचाही सहजासहजीं उल्लेख केला आहे. त्या उल्लेखावरून असें दिसतें कीं १७१७ त सय्यदांशीं तह केल्यावर बाळाजी इसलामपूर व वाळव्याकडे कांहीं वेळ होता. आणि तेथून १७१८ त तो दिल्लीस गेला व दिल्लीहून परत आल्यावर पुन्हां कोल्हापूरकरांवरील मोहिमेंत तो सामील झाला. शकावलींत सय्यदांशीं तह होण्यापूर्वींच्या बाळाजी विश्वनाथाच्या कोल्हापुरावरील मोहिमांचा बिलकुल उल्लेख नाहीं; दिल्लीहून परत आल्यावरच्या मोहिमेचा मात्र लहानसा उल्लेख आहे. शकावलीच्या ३८ व्या पृष्ठावर 'बेहे येथें स्वारी करून' इतकाच अपूर्ण उल्लेख आहे. शकावलीकर्त्याला मिळालेलीं दफातीं अपूर्तीं होतीं ह्याला दुसरा पुरावा तिसऱ्या खंडांतील १३९ व्या लेखांकाचा आहे. ह्या लेखांकांत १७१९ त सुमंत पदावर महादाजी गदा-

धर व न्यायाधिकारी सखो विठ्ठल होते असा उल्लेख आहे. प्रधान मंडळांत वेळोवेळीं झालेल्या फेरबदलाचा निर्देश शकावलींत तर केला नाहींच; इतकेंच नव्हे तर विशेषनामांचाही नीट निर्देश केला नाहीं. शकावलीच्या २१ व्या पृष्ठावर महादाजी गदाधर ह्या नांवाबद्दल महादाजी गंगाधर व सखो विठ्ठल ह्या नांवाबद्दल शिवो विठ्ठल असें लिहिलें आहे व तें अर्थात् चुकलें आहे. दफात्यांच्या अपूर्णतेची तिसरी साक्ष तिसऱ्या खंडांतील लेखांकाची आहे. ह्या लेखांकांत ' फत्तेसिंग बाबा भोंसले तुळजापुराजवळ भारी फौजेनिशीं " १७१७त " होते " ह्मणून लिहिलें आहे. १७१७ त फत्तेसिंग भोंसले लहान पोर असावा अशी शकावलीकर्त्याची, इतर सर्व लेखकांप्रमाणें समजूत असल्यामुळें, त्याचा उल्लेख त्यानें १७२६ तील कर्नाटकच्या स्वारीच्या आधीं केव्हांही केला नाहीं. परंतु लेखांक ४९३ वरून १७१७ त फत्तेसिंग भारी फौजेचें सेनापतित्व करण्यास योग्य होता असें स्पष्ट दिसत असल्यामुळें, त्याच्या नांवाचा अनुल्लेख शकावलीकर्त्याला मिळालेल्या साधनांच्या अपूर्तेपणाचाच परिणाम होय असें ह्मणावें लागतें. सारांश, बाळाजी विश्वनाथाच्या कारकीर्दीसंबंधीं शकावलीकर्त्याची माहिती बरीच अपूर्ती आहे ह्यांत संशय नाहीं. ग्रांटडफच्या माहितीपेक्षां ती जास्त आहे. परंतु आधुनिक जिज्ञासूला जितकी विस्तृत माहिती मिळावी अशी अपेक्षा आहे तितकी ती नाहीं हें स्पष्ट आहे.

४. शकावलींतील अपूर्णता केवळ दफात्यांच्या अभावाचा किंवा अपूर्तेपणाचाच परिणाम आहे असें नाहीं. तत्कालीन कर्त्या पुरुषांच्या वरिष्ठकनिष्ठतेसंबंधींही ह्या लेखकांची कल्पना कोती होती असें दिसतें. तिसऱ्या खंडांतील ४९३ व्या लेखांकावरून १७०७ पासून १७२०पर्यंत शाहूमहाराजांनीं स्वतः बऱ्याच मोहिमा कोल्हापूरच्या संभाजीवर केलेल्या असाव्या असें स्पष्ट सिद्ध होतें; परंतु शाहूचें नांव शकावलीकर्त्यानें मोहिमेसंबंधीं कोठेंही काढिलेलें नाहीं. संभाजीवर शाहूनें स्वतः स्वाऱ्या केल्या; परंतु मोंगलावरती शाहू स्वतः कां गेला नाहीं, ह्याचाही उल्लेख

त्यानें केला नाहीं. शाहू पातशहाचा व पातशहाच्या अंमलदारांचा मिंधा होता व त्यामुळें मोंगलावर स्वतः जाण्यापेक्षां सरदारांना पाठविणें त्याला योग्य दिसलें, वगैरे संबंध शकावलीच्या लेखकाला समजलेले नव्हते. तसेंच, इतिहासाची व्याप्ति मोहिमांच्या पलीकडे नाहीं अशीही ह्या लेखकांची समजूत असावी असें वाटतें. प्रत्येक मोहिमेंतील निरनिराळ्या प्रसंगांच्या मित्या ह्या लेखकानें दिल्या असत्या तरी-देखील त्याच्या उद्योगाचें चीज झालें असतें; परंतु आकुंचित अशा दृष्टीनें इतिहासाचें अवलोकन करण्याचें त्याच्या नशीबीं आल्यामुळें प्रस्तुत शकावली नानाप्रकारें अपूर्ण उतरली आहे.

५. ग्रंथकर्त्याचें ज्ञान अत्यंत विस्तृत असल्यानें जितके वाचक बुचकळ्यांत पडतात तितकेच त्याचें ज्ञान आकुंचित असल्यानेंही तोच चमत्कार होतो. ‘ मोहरम महिन्यांत बारामतीवर लढाई झाली ’ असें ४४ व्या पृष्ठावर, ‘ भडबुंज्या मोंगलाचा पराजय केला, ” व ‘ करीम-बेगाशीं युद्ध जुन्नर मुक्कामीं झालें ’ असें ४६ व्या पृष्ठावर लिहिलें आहे. बारामतीवर कोणाशीं लढाई झाली, भडबुंज्या व करीमबेग हे कोण होते, ह्यांचा निर्देश लेखकानें केला नाहीं. पुढें जेव्हां केव्हां एखादें अस्सल पत्र सांपडेल व त्यांत ह्या नांवांचा उल्लेख येईल, तेव्हां ह्या तीन प्रसंगांचा साद्यन्त अर्थ कळेल. तोंपर्यंत साशंक स्थितींतच वाचकानें राहिलें पाहिजे. सारांश, वाचकांचीं मनें शंकाकुल करणाऱ्या अशा मित्या ह्या शकावलींत बऱ्याच आहेत.

६. कोणत्याही शकावलींत मित्यांचाच समूह तेवढा देण्याचा परि-पाठ असल्यामुळें, सांगोपांग इतिहासाशीं तिची तुलना करणें बरोबर होणार नाहीं. काल, स्थल व व्यक्ति ह्या तीन घटकांच्या संमेलनानें ऐतिहासिक प्रसंगाची निष्पत्ति होते. पैकीं कालाचा प्रामुख्यानें निर्देश करणें कोणत्याही शकावलीचें मुख्य प्रयोजन असतें. ह्या दृष्टीनें पाहिलें ह्मणजे, प्रस्तुत शकावली इतिहासकाराला फारच उपयोगाची वाटेल. दफात्यांत निरनिराळ्या सालाखालीं जी जी मिति ग्रंथकर्त्याला

सि-भा ३०/२८



महत्वाची अशीं दिसली ती ती त्यानें ह्या शकावलींत उतरून घेतली आहे. दसऱ्यापासून आगोठीपर्यंत प्रत्येक वर्षी पेशवे कोठें कोठें केव्हां केव्हां होते ह्याचा तपशील देण्याचा ह्या शकावलींत प्रयत्न केला आहे. हा प्रयत्न बाळाजी विश्वनाथाच्या व कारकीर्दीसंबंधानें फारच तुटपुंजा आहे. परंतु बाजीराव बल्लाळाच्या व बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दींतील मित्या बऱ्याच भरपूर अशा दिल्या आहेत. ह्या मित्यांवरून, व ह्या मित्यांशीं स्वतंत्र पत्रांतील मित्यांची सांगड घातली असतां असें दिसून येतें कीं, ग्रांट डफनें बाजीराव बल्लाळाच्या व बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दींतील बऱ्याच मित्यांचा घोटाळा केला आहे. मित्यांचा घोटाळा झाला ह्मणजे प्रसंगांच्या पौर्वापर्याचा घोटाळा होतो; व येथून तेथून सर्व हकीकत चिताड होऊन जाते. एक मिति चुकली असतां ती चार प्रकारची अडचण करते. [ १ ] जेथें ती मिति हवी असते तेथें ती नसते: [ २ ] जेथें ती नको असते तेथें ती येते; [ ३ ] जेथें ती चुकून आणलेली असते तेथील खऱ्या प्रसंगाचें उच्चाटण ती करते; [ ४ ] व जेथून ती आणलेली असते तें स्थल रिकामें टाकावें लागतें किंवा एखाद्या निराळ्याच प्रसंगानें भरून काढावें लागतें. येणेप्रमाणें एका मितीच्या अव्यवस्थित मांडणीनें हा असा चतुर्विध घोटाळा होतो. बाळाजी विश्वनाथाच्या, बाजीराव बल्लाळाच्या व बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दींतील कोणत्या मित्यांसंबंधानें ग्रांट डफनें हा असा घोटाळा करून ठेविला आहे, तें ह्या तिन्ही पेशव्यांच्या कारकीर्दीचें नवीन माहितीप्रमाणें अत्यंत त्रोटक वर्णन देऊन स्पष्ट करून दाखवितों.

७. अवरंगझेब बादशाहा १७०७च्या फेब्रुवारीच्या २०व्या तारखेस वारला. ह्यावेळीं परसाजी भोसले नागपुराकडे, चिमणाजी दामोदर दक्षिणवऱ्हाडांत, कंठसिंग कदमराव खानदेशांत, खंडेराव दाभाडे गुजराथेंत, कान्होजी आंग्रे कोकणांत, उदाजी चव्हाण मिरजेकडे, हिंदूराव घोरपडे कर्नाटकांत, दमाजी थोरात बार्शीपानगांवकडे, धनाजी जाधव, हैबतराव निंबाळकर व मानसिंग मोरे उत्तर व दक्षिण पाईन

घाटांत व स्वराज्यांत, ताराबाईच्या ह्मणजे मराठ्यांच्या वतीनें मोंगलाच्या ह्मणजे अवरंगझेबाच्या विरुद्ध लढत होते. ह्याखेरीज प्रांतोप्रांतींचे बहुतेक सर्व मराठे एकजुटीनें मोंगलाची सत्ता हाणून पाडण्यास जिवापाड मेहनत करीत होते. ही जूट इतकी कांहीं बेमालूम जमली होती कीं, तिनें अवरंगझेबासारख्याहि मुत्सद्यांस हताश करून सोडिलें. तीस वर्षे सारखी मेहनत करून दक्षिण जिंकण्याचे अवरंगझेबाचे विचार जागच्या जागीं जिरून गेले; आणि दुःखानें, पराभवानें व चिंतेनें करपून जाऊन तो दुर्दैवी पातशाहा समाप्त झाला. समाप्तीच्या सुमारास मराठ्यांना जास्तच जोर आला व त्यांनीं पातशाही प्रतांत आपला अंमल बसविण्याचा जास्तच हुरूप धरला. हा हुरूप विझविण्यास मरठ्यांची एकजूट फोडणें एवढाच एक उपाय राहिला होता. तो तोडगा अवरंगझेबानें मरतां मरतां करून ठेविला. त्यानें शाहूला स्वराज्यांत जाण्यास परवानगी द्यावी असा बूट काढिला; व तो बूट त्याच्या मरणोत्तर अमलांत आला. शाहूच्या सुटकेनें मराठ्यांची एकजूट फुटली व त्यांच्या घरांत कलीनें प्रवेश केला.

८. १७०७ च्या मार्चांत शाहू माळव्यांतील अजमशहाच्या लष्करांतून निघाला व मेच्या सुमाराला खेडाजवळ आला. ताराबाईकडील मराठ्यांचा व शाहूचा त्या स्थळीं युद्धासारखा कांहीं प्रसंग झाला व त्यांत ताराबाईकडील बरेंच सैन्य शाहूला येऊन मिळालें. उत्तरेकडील परसोजी भोसले, चिमणाजी दामोदर व खंडेराव दाभाडे व दक्षिणेकडील धनाजी जाधव, हैबतराव निंबाळकर व मानसिंग मोरे असे प्रमुख प्रमुख सरदार खेडाजवळ एकत्र झाले. मोगलांची कांहीं कालपर्यंत मराठ्यांच्या उपद्व्यापी पराक्रमापासून सुटका झाली. महाराष्ट्राच्या उत्तरेस, पश्चिमेस व दक्षिणेस मराठ्यांनीं मोंगली प्रांत काबीज करण्याचा जो प्रयत्न चालविला होता, तो कांहींवेळ थंडा पडला व आपसाआपसांत यादवी करण्यास त्यांनीं आपली सर्व मेहनत खर्चीं घातली. अप्पाजी थोरात, दमाजी थोरात, शहाजी निंबाळकर, संताजी पांढरे,

रामचंद्र नीळकंठ अमात्य, खेम सावंत, उदाजी चव्हाण, कान्होजी आंग्रे, शंकराजी नारायण सचिव व परशरामपंत प्रतिनिधि ताराबाईच्या पक्षाला मिळाले; आणि परसोजी भोसले व धनाजी जाधव वगैरे सरदारांनीं शाहूचा पक्ष स्वीकारिला. ही मराठ्यांची यादवी १७३१ पर्यंत चालली व तोपर्यंत त्यांना मोंगलांच्या प्रांताकडे दृष्टि फेकण्यास फारशी फुरसत सांपडली नाहीं.

९. शाहु मोंगलांच्या लष्करांतून निघाला तो स्वतंत्र एकटा असा निघाला नाहीं; त्यानें आपल्या बरोबर एक पातशाहि सुदर्शन घेतलें. मोंगलाच्या लष्करांतून सुटतांना स्वराज्याची पातशाही सनद शाहु आपल्या बरोबर घेऊन आला. मुख्यतः ह्या सनदेच्या जोरावर ह्मणजे पादशहाचा मांडलिक ह्या नात्यानें शाहु स्वराज्याला हक्क सांगण्यास आला. वारस ह्या नात्यानें शाहूचा राज्यावर हक्क होताच. परंतु तो हक्क मराठमंडळांत कितपत मानला जातो ह्याचा त्याला संशय होता. वऱ्हाडांत आल्यावर, परसोजी भोसले, चिमणाजी दामोदर, नेमाजी शिंदे, अमृतराव कदमबांडे, खंडेराव दाभाडे वगैरे मराठे सरदारांस जहागिरीची लालुच दाखवून त्यानें वश करून घेतलें. ह्याच लालुचीला भुलून धनाजी जाधव, मानसिंग मोरे, हैबतराव निंबाळकर, वगैरे दक्षिणेकडील सरदार शाहूच्या पक्षाला मिळाले. १६८९ पासून १७०७ पर्यंतच्या धामधुमींत परसोजी भोसले, धनाजी जाधव, वगैरे सरदार पातशाहींतील काबीज केलेल्या प्रांतांतून स्वतंत्रपणें अधिकार करावयास व उत्पन्न खावयास शिकलेले होते. अवरंगझेब पातशहाच्या मरणानंतर ताराबाईचें राज्य निष्कंटक होऊन आपला स्वतंत्र अधिकार रहाणार नाहीं, अशी भीति ह्या सरदारांस वाटूं लागली व जहागिरी देऊं करणाऱ्या शाहूचा पक्ष स्वीकारणें त्यांस फायद्याचें दिसलें. येणेंप्रमाणें शाहूच्या येण्यापासून मराठ्यांच्या राज्यव्यवस्थेंत दोन नवीन तत्वें शिरलीं:— (१) भोसल्यांना दिल्लीच्या पातशहाचें

अंकितत्व प्राप्त झालें, व ( २ ) सरंजामी जहागिरीची पद्धत महाराष्ट्रांत व महत्तर राष्ट्रांत नव्यानेंच उद्भवली.

१०. दमाजी थोरात, शहाजी निंबाळकर, रामचंद्रपंत अमात्य व शंकाजी पंतसचिव वगैरे जे सरदार ताराबाईला धरून राहिले, त्यांना दिल्लीपतीचें अंकितत्व बिलकुल पसंत नव्हतें व जहागिरी मिळविण्याचीही विशेष हांव नव्हती. शिवाजीनें व राजारामानें घालून दिलेला कित्ता त्यांना सर्वस्वी गिरवावयाचा होता. ताराबाईला व तिच्या ह्या सरदारांना यश येतें, तर शिवाजीनें स्थापिलेल्या स्वराज्याचें फारच हित होतें. परंतु शाहूला मिळालेल्या बड्या बड्या सरदारांच्या पुढें, ताराबाईसारख्या स्त्रीचें व ह्या लहान सरदारांचें तेज फारसें पडलें नाहीं; व महाराष्ट्र राज्यव्यवस्थेंत बेबंदशाहीचें बीज अप्पलपोटेपणाच्या तडाक्यांत कायमचें पेरलें गेलें. ताराबाईच्या पक्षाला मिळणारे सरदार दुहेरी कचाटींत सांपडले. राज्याच्या खऱ्या वारसाविरुद्ध उठल्याचा एक आरोप त्यांच्यावर लादला जाई, व पातशाही सनदा न जुमानण्याचेंहि पाप त्यांच्या पदरीं पडे. शाहूचे बखरकार ह्या सरदारांना पुंड, बंडखोर वगैरे ज्या संज्ञा देतात, त्या ते ह्या पातशाही सनदांच्या जोरावर देतात.

११. धनाजी जाधव वगैरे सरदारांच्या साहाय्यानें १७०७ च्या जूनांत शाहू चंदनवंदनाखालीं येऊन उतरला; व तेथून त्यानें साताऱ्याच्या किल्ल्यावरील परशराम त्रिंबक प्रतिनिधि वगैरे ताराबाईकडील सरदारांशीं बोलणें लावलें. हे सरदार लवकर वश होतील असें दिसेना. सबब वाई येथील शेखमिरे ह्यांचा फितूर करून शाहूनें तो किल्ला १७०७ च्या डिसेंबरांत काबीज केला, व पुढें एका महिन्यानें ह्मणजे १७०७ च्या जानेवारींत तो राज्याभिषिक्त झाला. परशराम त्रिंबक कैदेंत असल्यामुळें गदाधर प्रल्हाद यास प्रतिनिधिपद मिळालें; बहिरोपंत पिंगळ्यास पेशवाई मिळाली; सखो विठ्ठलास न्यायाधिशी व होनो अनंत यास सेनाकर्तेपद प्राप्त झालें. धनाजी जाधव यास सेनापतिपद व हैबतराव निंबाळकरास सरलष्करपद मिळालें. सचिव, अमात्य वगैरे जे सरदार ताराबाईबरोबर साताऱ्याहून पन्हाळ्याकडे गेले त्यांचे हुद्दे अर्थात्च शाहूनें काढून घेतले.

१२. साताऱ्यास राज्यव्यवस्थेची अशी विल्हेवाट लाविल्यावर, शाहूनें बहिःशत्रूंकडे आपली दृष्टि फेकिली. शाहूचा पहिला शत्रु ह्मटला ह्मणजे कोल्हापुरचा शिवाजी व त्याचे सरदार हे होत. ह्या सरदारांनीं पुण्यापासून कोल्हापुरापर्यंतचा प्रदेश व सर्व कोंकणपट्टी अडवून टाकिली होती. ह्या प्रदेशांत दंगा करण्याचें व्रत त्यांनीं बरींच वर्षे पतकरलें होतें. शाहूचा दुसरा शत्रु ह्मटला ह्मणजे दक्षिणेंतील मोंगल अधिकारी होत. दिल्लीच्या पादशाहानें शाहूस सोडून दिलें खरें. परंतु पातशाहाच्या अंमलदारांनीं स्वराज्यांतील बराच प्रांत शाहूस घेऊं दिला नाहीं. तेव्हां स्वराज्यांतील जेवढा प्रांत मोगल अंमलदारांनीं बळेंच हाताखालीं घातला होता, तोही सोडविणें शाहूस भागच होतें. येणेंप्रमाणें १७०८च्या पावसाळ्यानंतर शाहूस चोंहोकडे शत्रूंना तोंड देणें प्राप्त झालें. १७०८ च्या आक्टोबरापासून १७१० च्या जूनापर्यंत शाहू पन्हाळा, रांगणा, कोल्हापूर, इसलामपूर, कऱ्हाड वगैरे ठिकाणीं छावणी देऊन होता. [ खंड ३, लेखांक ६४ ]. ह्या अवधींत धनाजी जाधवानें तुळजापुराकडे, परसोजी भोसले, नेमाजी शिंदे, चिमणाजी दामोदर, खंडराव दाभाडे ह्यांनीं वऱ्हाड, खानदेश, गुजराथ वगैरे प्रांतांत अंमल बसविण्याचा उद्योग चालविला होता; परंतु शाहूच्या राज्याची स्थिरता कोल्हापूरच्या शिवाजीला गप्प बसविण्यावर विशेष होती. शाहूचे सर्व सरदार मोंगलांच्या प्रांतांत मोहिमा करण्यास एका पायावर तयार असत. परंतु कोल्हापूरच्या शिवाजीवर व ताराबाईवर जाण्यास कोणीही सरदार धजत नसे. हे अलीकडील काम ते शाहूच्याच अंगावर लोटून देत. १७०८ पासून १७१० च्या जूनापर्यंत शाहू पन्हाळ्याकडे स्वतः छावणी करून बसला होता, ह्यांतील अर्थ हा आहे. १७१० च्या जूनांत धनाजी वारणातीरीं वारल्यावर शाहूनें सेनापतिपद त्याचा मुलगा चंद्रसेन जाधव यास दिलें; परंतु ह्या मनुष्याचें लक्ष शाहूकडे बिलकुल नव्हतें. त्यानें लवकरच ताराबाईकडे व मोंगलाकडे संधान बांधिलें, व शाहूचा पक्ष अगदीं दुर्बल करून सोडिला. १७१० च्या जूनापासून १७११च्या आगस्टापर्यंतचा शाहूचा काल फारच संकटाचा गेला. शाहूपाशीं ह्मण-

ण्यासारखें फारसें सैन्य राहिलें नाहीं. शाहूचें राज्य आधारहीन होतें कीं काय अशी भीति पडली. अशा वेळीं नवीन सैन्य तयार करून बाळाजी विश्वनाथानें शाहूची बाजू उत्तम राखिली. ह्या सेवेबद्दल होनो अनंताचे सेनाकर्तेपद शाहूनें बाळाजी विश्वनाथास दिलें.

१३. बाळाजी विश्वनाथास सेनाकर्तृत्व मिळाल्यापासून शाहूच्या सुदैवाला प्रारंभ झाला. १७११ त चंद्रसेन जाधवाचा हैबतराव निंबाळकरानें पराभव केला. १७१२ च्या मेंत कोल्हापूरचा शिवाजी वारला. १७१२ च्या नोव्हेंबरांत शंकराजीपंत सचिवानें जलसमाधि घेतली. सारांश १७१२ च्या शेवटीं व १७१३ च्या प्रारंभाला ताराबाईचा पक्ष अगदीं बुडल्यासारखा झाला. १७१३ त कृष्णराव खटावकर व कान्होजी आंग्रे साताऱ्यावर चाल करून आले. कृष्णरावावर प्रतिनिधि व आंग्र्यावर बहिरोपंत पिंगळे यांस शाहूनें पाठविलें. पेशव्यांच्या मदतीनें प्रतिनिधीनें कृष्णरावाची समजूत काढिली. आंग्र्यानें बहिरोपंत पिंगळ्यास कैद केलें. तेव्हां बाळाजी विश्वनाथानें आंग्र्यावर चालून जाऊन पिंगळ्याला सोडविलें व तह करून आंग्र्याला शाहूच्या बाजूला वळविलें. ह्या कामगिरीबद्दल बाळाजी विश्वनाथास शाहूनें मुख्य प्रधानकी किंवा पेशवाई १७१३ च्या नोव्हेंबराच्या १६ व्या तारखेस दिली. ह्याच वर्षी पेशव्यांचा दक्षिणेकडील प्रतिस्पर्धी जो निजामउल्मुलुख यास दक्षिणेची सुभेदारी मिळाली.

१४. बाळाजी विश्वनाथास पेशवाई मिळाली तेव्हां शाहूनें त्याला बऱ्याच कामगिऱ्या सांगितल्या. आंग्र्याशीं समेट केल्यानें कोकणांत स्वस्थता झाली. शंकराजीपंत सचिव वारल्यावर साताऱ्याच्या व पुण्याच्या मधील मावळ प्रांतांत कांहीं बखेडा उरला नाहीं. कृष्णराव खटावकराला इनाम देऊन कृष्णेच्या पलीकडील माण देशांत शांतता झाली. येणेप्रमाणें स्वराज्यांतील साताऱ्याभोंवतील कांहीं प्रांत अगदीं निर्धास्त झाला. ह्या निर्धास्त प्रांतांच्या पलीकडील टापूंत अंमल बसविण्याचें काम अद्याप राहिलें होतें. पुण्यापासून जुन्नरा-

पर्यंतच्या प्रदेश व कऱ्हाडापासून बेळगांवापर्यंतचा प्रदेश शत्रूच्या हातांतच होता. खानदेश, वऱ्हाड, गुजराथ, माळवा, पेडगांव, अक्कलकोट, तंजावर, कर्नाटक, कोल्हापूर, वगैरे प्रांतांत अद्याप अंमल बसवावयाचाच होता. सारांश साताऱ्याभोंवतील कांहीं तालुक्या पलीकडे शाहूचा अंमल बसवावयाचें काम अद्याप सबंद उरकावयाचें राहिलेंच होतें. हें काम १७१४ पासून १७२० पर्यंत बाळाजी विश्वनाथ करीत होता. त्यांत त्याला बरेंच यश आलें.

१५. १७०७ पासुन १७१४ पर्यंत ग्रांट डफनें दिलेला वृत्तांत व मी हा वर दिलेला त्रोटक वृत्तांत ह्यांत मित्यासंबंधानें व मजकुरासंबंधानें बरीच तफावत वाचकांस दिसून येईल. अमुक स्थलीं ग्रांट डफ चुकला आहे असें प्रत्येक स्थळीं ह्मणण्याचें विशेष प्रयोजन दिसलें नाहीं. १७१४ पासुन १७२० पर्यंतच्या वृत्तांतांतहि प्रायः हाच क्रम स्वीकारणें इष्ट दिसतें.

१६. १७१४ च्या मार्च एप्रिलापर्यंत कृष्णराव खटावकराची व्यवस्था लावण्यांत बाळाजीचा काळ गेला. गुदस्त सालीं आंग्र्याच्या तहांत शिद्याचा कांहीं प्रांत शाहूकडे आला, त्यामुळें आंग्र्याचें व शिद्याचें युद्ध लागलें. तेव्हां आंग्र्याचे कुमकेस बाळाजी विश्वनाथ जाऊन शिद्याशीं तह १७१५ च्या ३० जानेवारीस झाला. पुढें पुणें प्रांतांत अंम्मल बसवून बाळाजी साताऱ्यास आला, तों दमाजी थोरातानें नारो शंकर सचिव यास अटकेंत ठेविलें असें कळलें. सचिवाला सोडविण्याच्या खटपटींत पेशव्यांना पुरंदर किल्ला मिळाला. ह्याच अवधींत रावरंभाजी निंबाळकर फितून मोंगलांकडे गेला. त्या मोंगलांचा पराभव खंडेराव दाभाडे यानें बेदम केला. इतक्यांत १७१६ च्या सप्टंबरांत पेशवे स्वारीस निघाले असतां, दमाजी थोरातानें त्यांस पुरंधराखालीं जाधवाच्या वाडीस पकडलें. तेथून सुटून, १७१७ च्या आरंभीं खंडेराव दाभाडे यास सेनापतिपद देऊन खंडेरावानें पराजित केलेल्या सय्यदांशीं तहाचें बोलणें करण्यास बाळाजी गेला. तहाचें बोलणें कायम

केल्यावर बाळाजीनें दमाजी थोराताचें पारिपत्य केलें व १७१७ जूनमध्यें सचिवाची सुटका केली. १७१७ च्या आक्टोबरांत बाळाजी इसलामपुराकडे कोल्हापूरकरांवर गेला होता. [ खंड ३, लेखांक ४९३ ] तेथून १७१८ आक्टोबरापर्यंत देशाचा बंदोबस्त करून स्वारी सय्यदांच्या साहाय्यास दिल्लीस निघाली. तेथें नवीन पातशहा स्थापून १७१९ च्या जूनांत सातार्‍यास तो परत आला. १७१९ च्या आक्टोबरांत स्वारीस निघून इसलामपुराकडे गेला व बेहें येथें लढाई करून १७२० च्या २ एप्रिलास वारला.

१७. सय्यदांशीं तह करून शाहूचा दरारा वाढला. परंतु कोल्हापूरकरांच्या बाजूचे चंद्रसेन जाधव, रावरंभा निंबाळकर वगैरे सरदार जास्त जास्त प्रबळ होत चालले. त्यांनीं सय्यदांचा शत्रु जो निजामुन्मुलूख त्याचा पक्ष स्वीकारिला. शाहू, बाळाजी विश्वनाथ, खंडेराव दाभाडे, कंठाजी कदम बांडे, कान्होजी भोसले, चिमणाजी दामोदरजी, कान्होजी आंग्रे व सय्यद बंधू असा एकपक्ष झाला; व कोल्हापूरचा संभाजी, अमात्य, चंद्रसेन जाधव, निंबाळकर, चव्हाण व निजामुन्मुलूख असा दुसरा पक्ष झाला. ह्या दोन पक्षांची चढाओढ ह्मणजेच १७२० पासून १७३१ पर्यंतचा इतिहास होतो. त्यांत शाहूकडील बाजीराव हें पात्र प्रमुख आहे व दुसर्‍या पक्षाकडील निजामुन्मुलुख हें पात्र प्रमुख आहे. शाहू व बाजीराव ह्यांचे हितसंबंध अगदीं एक होते. संभाजीचे व निजामुन्मुलूखाचे हितसंबंध अगदीं भिन्न होते. संभाजीला आपला वांटा मिळावा एवढीच आकांक्षा होती. निजामुन्मुलुखाला दक्षिणेंत राज्य स्थापावयाचें होतें. हें कार्य साधण्याच्या हेतूनें निजामुन्मुलुखानें संभाजीस हातीं धरिलें होतें. जाधव व निंबाळकर हे जहागिरीच्या आशेनें निजामुन्मुलुखाला मिळाले. त्यांच्या ऐपतीजोगी जहागीर संभाजीकडून मिळणें अशक्य असल्यामुळें, ते निजामाचे पूर्ण हस्तक बनले. हूशा व बाजीराव यांच्या मनांत निजामुन्मुलुख, संभाजी, जाधव, निंबाळकर, सय्यद, दिल्लीचा पातशाहा ह्या सर्वांस संपुष्टांत आणून सर्वत्र महाराष्ट्र-

धर्माची व महाराष्ट्रराज्याची स्थापना करावयाची होती. शाहू राज्यावर येण्याचा वेळीं निरनिराळ्या सरदारांना ज्या जहागिरीच्या लालुची दाखविल्या होत्या, त्या सतत चालविण्याचा शाहूचा बेत नव्हता असें ह्मणण्यास पुरावा आहे. परसोजी भोसले, खंडेराव दाभाडे, कान्होजी आंग्रे यांच्या सरंजामी जहागिरींची पुढील ४० वर्षांत काय काय व्यवस्था झाली ही गोष्ट लक्षांत घेतली असतां वरील विधानाची सत्यता दिसून येईल. १७०७ त सरंजामी जहागिरींची मुसलमानी पद्धत शाहूस जी स्वीकारावी लागली. ती १७३१ पुढें हळूहळू सोडून देण्याचा, त्यानें व त्याचे प्रमुख मुत्सद्दी जे बाजीराव बल्लाळ व बाळाजी बाजीराव पेशवे यानीं प्रयत्न केला. दिलेल्या जहागिरी परत घेण्याची मुख्य सत्तेची इच्छा व मिळालेल्या आवाढव्य जहागिरी जाऊं न देण्याची सरदाराची मनीषा ह्या दोन प्रेरणाच्या हिसकाहिसकींत मराठ्यांच्या उत्कर्षाचीं व अपकर्षाचीं बीजें सांपडण्यासारखीं आहेत. ज्या सरदाराची जहागिरी परत घेण्याचा प्रयत्न करावा तो सरदार मुख्य सत्तेच्या विरुद्ध नानाप्रकारें उठे; शत्रूंच्या व इतर सरदारांच्या साहाय्यानें आपलें अस्तित्व कायम करी, व तें करण्यास फसल्यास क्वचित् नष्ट किंवा सामर्थ्यहीन होऊन जाई. नष्ट झाला, सामर्थ्यहीन झाला किंवा कायम राहिला तत्रापि त्याची स्थिति त्याला व इतर सरदारांना धड्यासारखी होई व मुख्य सत्ता दुर्बळ करण्याचा निदान विशेष प्रबळ न होऊं देण्याचा, प्रयत्न ते हमेषा करीत.

१८. १७२० च्या १७ एप्रिलास बाजीरावास प्रधानपद प्राप्त झालें. ह्या वेळीं तो खानदेशांत किंवा वऱ्हाडांत अलमअलीच्या साहाय्यास गेला होता, अथवा खरें ह्मटलें असतां, बाळाजी विश्वनाथानें त्यास पाठविलें होतें. बाळाजी विश्वनाथाच्या व शाहूच्या बहुतेक स्वाऱ्यांत बाजीराव हजर असे. बाळाजी विश्वनाथ दमाजी थोरातावर चाल करून गेला तेव्हां बाजीराव त्याच्या बरोबर होता. दमाजी थोरातानें दगा कसा केला, ह्याची आठवण शाहूनें बाजीरावाला एक

पत्रांत केली आहे ( शकावली पृष्ट ६६ ). बाळाजी विश्वनाथाबरोबर बाजीराव दिल्लीस गेला होता. तेथून परत आल्यावर बाळाजीपंत नानानीं त्याला खानदेशांत सय्यदांचा हस्तक जो अलमअलीखान त्याचें साहाय्य करण्यास ठेवून दिलें. १७२० च्या जुलैंत अलमअलीचा निजामुल्मुलुखानें बाळापूर येथें पराभव केला. ह्या लढाईंत बाजीराव होता किंवा नव्हता ह्याचा दाखला अद्याप मिळालेला नाहीं. १७२० पावसाळा छावणींत काढून त्या सालाच्या अक्टोबरांत निजामुल्मुलुखाच्या कोण्या एका हस्तकाचा बाजीरावानें बारामतीजवळ पराभव केला. हा पराक्रम करून १७२० च्या नोव्हेंबरांत बाजीरावानें सातान्यास पेशवाईचीं वस्त्रें महाराजांच्या हातून घेतलीं. बाजीराव उपेक्षणीय पुरुष नाहीं, अशी पक्की खात्री होऊन निजामानें बाजीरावाची भेट सावडिया येथें घेतली, परंतु तिच्या पासून विशेष कांहीं निष्पत्ति झाल्याचें आढळत नाहीं. १७२१ च्या अगस्टा पर्यंत बाजीराव विजापूर प्रांतांत होता. १७२१ च्या सप्टेंबर—अक्टोबरांत भडबुंज्या मोगलांशीं पुरंदरास लढाई झाली व नंतर १७२२ प्रारंभीं करीमबेगाशीं युद्ध झालें. निजामाच्या ह्या दोघांही सरदारांचा पराभव करून बाजीराव १७२२ मेंत सुप्यास व जुलैंत सातान्यास गेला. ह्या अवधींत निजामुल्मुलुख दिल्लीस जाऊन पातशाहींत ढवळाढवळ करूं लागला. १७२२ च्या सप्टेंबरांत निजामुल्मुलुखाचे सरदार अर्काटाकडे स्वारीस निघणार अशी बातमी आली. निजामाच्या पाठीवर शह देण्यास बाजीराव १७२२ च्या नोव्हेंबरांत अवरंगाबादेस गेला. तेथें ऐवजखामाचा पराभव करून स्वारी बऱ्हाणपुरास गेली. १७२३ च्या जानेवारींत बाजीरावाची हांडिया प्रांतांतील अनूपसिंगाशीं भेट जाहाली. १७२३ च्या फेब्रुवारींत खुद्द निजामुल्मुलुखाची मुलाखत करून स्वारी बाघेलखंडाकडे गेली. तेथून १७२३ जुलैंत सातान्यास येऊन, खंडेराव दाभाडे, फत्तेसिंग भोसले व चिमणाजी बल्लाळ ह्यांच्या साहाय्याला बाजीराव १७२३ च्या डिसेंबरांत गेला. १७२३ च्या डिसेंबरांत अंबाजीपंत पुरंधरे, मल्हारजी होळकर व राणोजी शिंदे व नंतर बाजीराव यांनीं

माळव्यांत व बुंदेलखंडांत स्वारी केली. हैदराबादकर मोगलांनीं उत्तर व दक्षिण पाईन घाटांत गडबड केली, ती बंद करण्या करितां १७२३ च्या सप्टेंबरापासून १७२४ च्या जुलैपर्यंत खंडेराव दाभाडे, फत्तेसिंग भोसले व चिमणाजी बल्लाळ गुंतले होते. हैदराबादकर मोंगल कंबरजखान व निजामुल्मुलूख ह्यांचा युद्धप्रसंग १७२४ च्या पावसाळ्यानंतर सुरू झाला. ह्या प्रसंगीं बाजीरावानें निजामाचें साहाय्य करून कंबरजखानाचा साखरखेडलें येथें पराभव १७२४ च्या आक्टोबरांत केला. तेथून बाजीराव माळव्यांत जाऊन १७२५ च्या एप्रिलास साताऱ्यास आला. १७२५ च्या सप्टंबरांत फत्तेसिंग भोसले, लिंबकराव दाभाडे, रघूजी भोसले, प्रतिनिधि व बाजीराव त्रिचनापलीपर्यंत कर्नाटकांत स्वारी करून १७२६ च्या मेंत परत आले. ह्या अवधींत चिमणाजी बल्लाळ व कान्होजी भोसले निजामावर चाल करून गेले. निजामानें शाहूच्या विरुद्ध संभाजी, प्रतिनिधि वगैरेंच्या मनांत विकल्प आणून युद्धाची तयारी केली होती. बाजीराव कर्नाटकांत गेला असें पाहून निजामानें हा डाव आरंभिला होता. परंतु शाहूनें माळव्यांतून उदाजी पवार, कंठाजी कदम, पिलाजी गायकवाड ह्यांस फत्तेसिंग भोसले व चिमणाजी बल्लाळ ह्यांच्या साहाय्यास बोलाविलें व बाजीरावासहि परत येण्यास पत्रें पाठविलीं. १७२६ च्या सप्टेंबरांत बाजीराव व खंडेराव दाभाडे पंढरपूरच्या रोखें निजामावर गेले. कान्होजी भोसल्याचा ऐवजखानानें बालाघाटांत पराभव केला. त्याच्या मदतीस चिमाजीअप्पा गेले. बाजीरावानें अवरंगाबादेकडून शह दिला. ( का० सं० १६७ व १६९. ) निजामावरील ही स्वारी संपवून बाजीराव १७२७ जुलैंत साताऱ्यास गेला. १७२७ च्या आगस्टांत बाजीराव पुन: निजामावर गेला निजामाला अनेक झुकांड्या देऊन त्याचा पराभव बाजीरावानें १७२८ च्या २५ फेब्रूवारीस पालखेड येथें केला. नंतर १७२८ च्या ६ मार्चास मुंगी येथें तह करून बाजीराव जुलैंत साताऱ्यास आला. ह्या तहांत निजामुल्मुलुखाची व कोल्हापूरच्या संभाजीची कायमची फारकत झाली. १७२८ च्या आक्टोबरांत बाजीराव तुळजापुराकडे व खानदेशांत स्वारीस

निघाला व चिमाजीअप्पा माळव्यांत दयाबहादरावर गेला. चिमाजीअप्पा माळव्यांतून १७२९ च्या मार्चांत परत आला व बाजीराव चिमाजीअप्पाच्या जागीं माळव्यांत गेला. बाजीरावानें अहमदखान बंगषाचा पराभव जैतपूरीं ३० मार्चास व कायमखा बंगष याचा पराभव ४ मे १७२९ रोजीं केला व १७२९ च्या जुलैंत साताऱ्यास परत आला. १७२९च्या आक्टोबरांत चिमाजी गुजराथेंत व माळव्यांत स्वारीस निघाला, तो १७३० च्या मार्चांत ढवळकें लुटून पायागड घेऊन जूनांत देशीं परत आला. १७२९ त खंडेराव दाभाडे वारला व सेनापतिपद त्रिंबकराव दाभाड्यास १७३० च्या जानेवारींत मिळालें. १७२९ च्या आगस्टापासून १७३० च्या फेब्रूवारीपर्यंत बाजीराव सुपें, पुणें वगैरे ठिकाणीं देशींच होता. १७३० च्या फेब्रूवारींत उंब्रजेस जाऊन कोल्हापूरकरांशीं लढाई वगैरे होऊन स्वारी आगस्टांत पुण्यास आली. १७३० च्या सप्टेंबरांत बाजीराव व चिमाजीअप्पा निजामुलमुलूख व त्रिंबकराव दाभाडे यांजवर चालून गेले. १७३१ च्या फेब्रूवारींत दाभाड्याचा डभईस पराभव करून एप्रिलांत बाजीराव देशीं परत आला. चिमाजीअप्पा ग्वालेरीपर्यंत हिंदुस्थानांत जाऊन मांडोगडची स्वारी करून जूनांत देशीं परत आले. १७३१ च्या एप्रिलांत संभाजीशीं तह झाला. १७३१ च्या डिसेंबरपर्यंत दोघे बंधू पुणें व सातारा येथें देशींच होते. १७३२ च्या जानेवारी—फेब्रूवारींत बाजीराव कुलाब्यास गेला होता. तेथून माळव्यांत जाऊन स्वारी आगोठीस देशीं आली. १७३२ च्या जानेवारीपासून जुलैपर्यंत फत्तेसिंग भोसले निजामीवर गेले होते. १७३२ च्या डिसेंबरांत बाजीराव निजामाच्या भेटीस गेला, तो १७३३ च्या मार्चांत परत आला. १७३२ च्या आक्टोबरांत चिमाजीअप्पा बुंदेलखंडांत जाऊन चापानेर सर करून, १७३३ च्या जुलैंत परत आला. १७३३ च्या मार्चांत बाजीराव व फत्तेसिंग भोसले कोंकणांत जंजिऱ्यावर गेले ते डिसेंबरांत परत आले. चिमाजीअप्पा १७३४ च्या मार्चांत कोंकणांतून परत आला. १७३४ च्या जानेवारींत बाजीराव खानडौरावर दिल्लीपर्यंत चालून जाऊन जुलैंत परत आला. चिमाजी १७३४ च्या

मार्चापासून जुलैपर्यंत वऱ्हाड खानदेशांत होता. १७३४ च्या नोव्हेंबरपासून १७३५ च्या जुलैपर्यंत पिलाजी जाधवाची स्वारी हिंदुस्थानांत कमरुद्दीन वजीरावर झाली. १७३४ च्या जुलैपासून १७३५ फेब्रूवारीपर्यंत पुणें, सातारा वगैरे स्थलीं राहून बाजीरावाची स्वारी १७३५च्या फेब्रूवारींत कुलाब्यास गेली. ह्याच स्वारीस गोवळकोटची स्वारी असें ह्मणतात. ह्या स्वारीहून पेशवे आगोठीस परत आले. १७३४ च्या जुलैपासून १७३६ च्या मार्चापर्यंत चिमाजी देशींच होता. १७३५च्या नोव्हेंबरांत बाजीराव हिंदुस्थानांत अजमीरपर्यंत. जाऊन १७३६ च्या जुलैंत परत आला. १७३६ च्या मार्चांत चिमाजी कोंकणांत जाऊन १७३६ च्या जूनांत परत आला. १७३६ च्या नोव्हेंबरांत बाजीराव पुनः हिंदुस्थानच्या स्वारीस निघाला तो १७३७ च्या जुलैंत परत आला. हीस भेळशाची स्वारी ह्मणतात. चिमाजीअप्पा १७३६च्या मार्चापासून जुलैपर्यंत कोंकणांत होते. बरोबर मल्हारजी होळकर, राणोजी शिंदे व पवार होते. १७३७ च्या आक्टोबरापासून १७३८ च्या जुलैपर्यंत बाजीरावानें भोपाळची स्वारी केली. १७३७ च्या नोव्हेंबरापासून १७३८ च्या जुलैपर्यंत चिमाजी तारापूर–साष्टीकडे होता. १७३८ च्या नोव्हेंबरांत चिमाजी व बाजीराव वसईच्या स्वारीस निघून १७३९च्या मार्चांत बाजीराव खानदेशांतून नागपुराकडे आवजी कवड्याचा सूड उगविण्याकरितां जात असतां नादीरशहानें दिल्ली लुटल्याची खबर आली. चिमाजी वसई सर करून व बाजीराव दिल्लीच्या पातशहाच्या मदतीची तयारी करण्याकरितां १७३९ च्या जुलैंत देशीं परत आले. बाजीराव व चिमाजी अप्पा नासरजंगावर १७३९ च्या नोव्हेंबरांत जाऊन त्याला १७४० च्या मार्चांत पक्का नरम आणून, बाजीराव अवरंगाबादेवरून खानदेशाकडे गेला व चिमाजी बाळाजी बाजीरावाला घेऊन कोंकणांत मानाजी आंग्र्याच्या साहाय्यास गेला. बाजीराव २८ एप्रिल १७४० त रघूजी भोसल्याचें पारपत्य केल्याशिवाय व हिंदुस्थानची निरवानिरव केल्याशिवाय वारला. ही बातमी चिमाजी अप्पास कोंकणांत कळली.

१९. बाजीरावाच्या स्वाऱ्यांचा वीस वर्षांचा नामनिर्देश वरील पारिग्राफांत केला आहे. ह्या स्वाऱ्या १ निजामुल्मुलुखानें बळकाविलेला प्रांत, २ नर्मदेच्या पलीकडील प्रांत, ३ गुजराथ, ४ साष्टी, ५ जंजिरा, ६ कोल्हापूरकरांचा प्रांत, व ७ कर्नाटक इतक्या प्रदेशांवर केलेल्या आहेत. ह्यांत १ शाहू, २ फत्तेसिंग, ३ बाजीराव, ४ चिमाजीअप्पा, ५ खंडेराव दाभाडे, ६ त्रिंबकराव दाभाडे, ७ पिलाजी गायकवाड, ८ दमाजी गायकवाड, ९ कंठाजी कदम बांडे, १० मल्हारराव-होळकर, ११ राणोजी शिंदे, १२ उदाजी पवार, १३ कान्होजी भोसले, १४ रघूजी भोसले, १५ दावळजी सोमवंशी १६ अंबाजी त्र्यंबक पुरंधरे, १७ बाजी भिवराव रेटरेकर, १८ पिलाजी जाधवराव, १९ आनंदराव सोमवंशी, २० श्रीनिवासराव प्रतिनिधि २१ कान्होजी आंग्रे, २२ मानाजी आंग्रे, २३ संभाजी आंग्रे, २४ तुळाजी आंग्रे, २५ यशवंतराव दाभाडे, २६ मुरारराव घोरपडे, २७ उदाजी चव्हाण, २८ राणोजी भोसले, २९ फोंड सावंत भोसले, ३० सवाई कटसिंग, ३१ कृष्णाजी पवार ३२ खंडोजी माणकर, ३३ रामचंद्र हरि पवटर्धन, ३४ गोविंद हरि पटवर्धन, ३५ आवजी कवडे ३६ शंभूसिंग जाधवराव, ३७ सयाजी गुजर, ३८ यशवंतराव पवार, व ३९ व्यंकटराव घोरपडे. ह्या इतक्या सरदारांनीं १७२० पासून १७४० पर्यंत स्वतंत्र अशा स्वाऱ्या केलेल्या आहेत. त्या प्रत्येकाच्या ह्या वीस वर्षांतील हालचालींचा सालवारीनें निर्देश करतां येण्यास जितकी माहिती पाहिजे तितकी अद्याप मिळाली नाहीं. बाजीराव, चिमाजीअप्पा, फत्तेसिंग, मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे खंडेराव दाभाडे, कान्होजी आंग्रे, पिलाजी जाधवराव, वगैरे अत्यंत प्रमुख अशा सरदारांच्यादेखील हालचालींचा नकाशा सालवारीनें देतां येणें शक्य नाहीं. त्यांतल्यात्यांत बाजीराव, चिमाजीअप्पा फत्तेसिंग भोसले ' त्यांच्या संबंधी ह्या शकावलींत व इतरत्र इतरापेक्षां बरींच माहिती सांपडते. त्यावरून वरील पारिग्राफांत ह्या तीन सरदारांच्या

मोहिमांचा निर्देश केला आहे. निर्देशावरून ग्रांट डफ कोठें कोठें चुकला आहे तें कळून येईल. विशेष ठोकळ अशा चुका १७२० पासून १७४० पर्यंतचा इतिहास लिहितांना डफनें कोठें कोठें केल्या आहेत तें पुढें सांगतों.

२०. [ १ ] दिल्लीहून आल्यानंतर बाळाजी विश्वनाथ सासवडास कांहीं महिनें स्वस्थ बसला व नंतर वारला असें ग्रांट डफ ह्मणतो [ Duff, Chap. 13, P. 209 ]. परंतु तिसऱ्या खंडांतील लेखांक ४९३वरून व ह्या शकावलीच्या ३८व्या पृष्ठावरून बेहे येथें स्वारी करून आल्यावर तो वारला हें स्पष्ट आहे. [ २ ] खंडेराव दाभाडे १७२१च्या सुमारास वारला ह्मणून डफ ह्मणतो [ Duff, Chap. 13, P. 209 ] परंतु ह्या शकावलीच्या ६०व्या पृष्ठावर त्र्यंबकराव दाभाडे यास सेनापतिपदाचीं वस्त्रें १७३०च्या जानेवारीस झालीं असें लिहिलें आहे. १७२१च्या सुमारास खंडेराव दाभाडे वारला असता तर त्याच सुमारास त्र्यंबकराव दाभाड्यास वस्त्रें मिळालीं पाहिजे होतीं. शिवाय १७३०पर्यंतच्या स्वाऱ्यांत खंडेराव दाभाड्याचें नांव वारंवार येतें. ग्रांट डफनें खंडेरावाची समाप्ति १७२१त केल्यामुळें, १७३०पर्यंतच्या त्याच्या सर्व हालचाली त्यास गाळाव्या लागल्या. १७२६तील श्रीरंगपट्टणावरील स्वारींत व १७२७तील निजामावरील स्वारींत खंडेराव होता. [ ३ ] १७२०च्या एप्रिलपासून नोव्हेंबरपर्यंत बाजीराव कोठें होता ह्याचा पत्ता ग्रांट डफला नव्हता ( Duff, Chap. 13, P. 209 ); त्याचा उलगडा प्रस्तुत प्रस्तावनेंत मी केला आहे. [ ४ ] १७२०तील बारामतीवरील लढाई व १७२१तील पुरंदर व जुन्नर येथील लढाया, डफला माहीत नव्हत्या. [ ५ ] १७२१तील बाजीरावाची विजापुराकडील स्वारी डफच्या पुस्तकांत नाहीं. विजापुराकडे दंगा झाला होता ह्मणून तो लिहितो [ Duff, 210 ]. परंतु बाजीरावाच्या स्वारीमुळें ही गडबड झाली होती हें त्यास माहीत नव्हतें. [ ६ ] निजामाच्या सरदारांची १७२२तील अर्काटावरील स्वारी डफच्या पुस्तकांत नाहीं. [ ७ ]

१७२२तलि ऐत्रजखानचा पराभव, १७२३ तील अनूपशिंगाची भेट, व बाघेलखंडांतील बाजीरावाची स्वारी डफला माहीत नव्हती. [ ८ ] १७२३तलि मल्हारराव होळकराच्या बुंदेलखंडांतील स्वारीचा पत्ता डफला नव्हता. [ ९ ] हैदराबादेंतील कंबरजखानावरील फत्तेशिंग भोसल्याच्या स्वारीचा वृत्तांत डफच्या ग्रंथांत नाहीं. [ १० ] १७२६च्या श्रीरंपट्टणच्या स्वारीचा वृत्तांत डफ बहुतेक मुळींच देत नाहीं, तो ह्या शकावलींत बराच दिला आहे. ( ११ ) १७२६च्या नोव्हेंबरच्या १७२८तील पालखेडच्या लढाईपर्यंतच्या उलाढालीची हकीकत डफ देत नाहीं, तिचा ह्या प्रस्तावनेंत निर्देश केला आहे. [ १२ ] चिमाजीअप्पा १७२८ च्या नोव्हेंबरांत गुजराथेंत गेला ह्मणून डफ ह्मणतो. परंतु तसा प्रकार नसून त्यावेळीं चिमाजी दयाबहादरावर माळव्यांत गेला होता. [ १३ ] अहमदखान बंगष व कायमखा बंगष यांचा पराभव बाजीरावानें १७२९ मेंत केला. ग्रांट डफनें बंगषांचा पराभव १७३३ त करविला आहे [ Duff, 227 ]. १७२८ पासून १७३४ पर्यंतचा डफचा सर्व वृत्तांत येथूनतेथून चुकला आहे. [ १४ ] छत्रसालाची पहिली भेट १७२९ त झाली असून ती ग्रांट डफनें १७३३ त घातली आहे ( १५ ) १७३० तील चिमाजी अप्पाच्या पायागडच्या स्वारीचा पत्ता डफला बिलकुल नव्हता. ( १६ ) १७३१ तील मांडोगडची चिमाजीची स्वारी डफला माहीत नव्हती. ( १७ ) १७३२ त बाजीराव कोकणांत गेला होता ह्या गोष्टीचा उल्लेख डफ करीत नाहीं. [ १८ ] १७३३ च्या एप्रिलांत बाजीरावानें छत्रसालाची दुसऱ्यांदा भेट घेतली. हीच पहिली भेट असें ग्रांट डफ समजतो. ह्याच भेटींत छत्रसालानें बाजीरावाला तृतीयांश राज्य व मस्तानी दिली असावी. मस्तानीला पहिला पुत्र केव्हां झाला ह्याची मिति कळली असतां, छत्रसालानेंच मस्तानीला बाजीरावाला दिली ह्याचा निश्चय होईल. ( १९ ) कान्होजी आंग्रे १७२८ च्या सुमारास वारला ह्मणून डफ ह्मणतो ( Duff, 230 ) परंतु कान्होजी १७२९ च्या जुलैंत वारला हें निश्चित आहे ( खंड ३, लेखांक ३२७ व ३२८ ). ( २० ) शेखोजी आंग्र्याला ग्रांट डफ

सखाजी ह्मणतो व तो कान्होजीनंतर लवकरच वारला ह्मणून लिहितो, परंतु शेखोजी १७३३ च्या सप्टंबरांत वारला ( शकावली पृ० ६९ ). ( २१ ) १७३४ जानेवारीपासून जुलैपर्यंत बाजीरावानें खानडौरावर हिंदुस्थानांत स्वारी केली. ही स्वारी ग्रांट डफनें १७३६ सालांत घातली आहे. ( २२ ) १७३४ च्या नोव्हेंबरापासून १७३५ च्या जुलैपर्यंत पिलाजी जाधवानें कमरुद्दीन वजिरावर स्वारी केली. ह्या स्वारीचा पत्ताच ग्रांट डफला नव्हता. ( २३ ) १७३५ च्या फेब्रूवारींत बाजीराव कोकणांत गोवळकोटच्या स्वारीस गेला होता. १७३२ पासून १७३५ पर्यंत तीन वर्षे जंजिऱ्यावर मोहीम चालली होती. तींत बाजीराव दोनदां गेला व तींतून परत आला. ह्याचा नीट उलगडा डफला करतां आला नाहीं. हा उलगडा नीट न करतां आल्यामुळें १७३४ तील खानडौरावरील स्वारी १७३६ त न्यावी लागली व १७३६ तील स्वारी अजीबात गाळावी लागली. ( २४ ) १७३५ नोव्हेंबरापासून १७३६ जुलैपर्यंत बाजीरावानें अजमीर—पुष्करावर स्वारी केली. ही स्वारी डफनें गाळली आहे. ( २५ ) १७३६ च्या नोव्हेंबरापासून १७३७ जुलैपर्यंत बाजीरावानें भेलशावर स्वारी केली. हिचा वृत्तांत डफनें दिला नाहीं. ( २६ ) फत्तेसिंग भोसल्यानेंही १७१७ पासून १७४२ पर्यंत निजामावर, चंद्रसेन जाधवावर, कोल्हापूरकरांवर, कर्नाटकांत व कोकणांत एकसारख्या २५ वर्षे स्वाऱ्या केलेल्या आहेत. त्यांचाही निर्देश डफनें फारसा व सालवार कोठें केला नाहीं. ( २७ ) दमाजी व पिलाजी गायकवाड, कंठाजी कदम बांडे, मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे, उदाजी पवार, कान्होजी भोसले व रघोजी भोसले यांच्याही १७४० पर्यंतच्या स्वाऱ्यांचा सालवार निर्देश डफनें केला नाहीं. ( २८ ) कान्होजी आंग्र्याच्या समुद्रावरील युद्धांचाही १७०७ पासून १७२९ पर्यंतचा इतिहास डफनें बहुतेक बिलकुल दिला नाहीं.

२१. १७२० पासून १७४० पर्यंत ग्रांट डफनें काय काय ढोबळ चुका करून ठेविल्या आहेत व कोणकोणत्या प्रसंगाचा वृत्तांत अजीबात

गाळला आहे त्याचा तपशील हा असा आहे. धावडशीकर स्वामींचीं पत्रें, पेशव्यांच्या रोजनिशा, पेशव्यांचीं चिटणिशी पत्रें, सुमारें २५ बखरी व कित्येक तवारिखा इतकी सामुग्री जवळ असून डफनें ह्या अशा चुका कशा केल्या ह्याचें आश्चर्य वाटतें. मिळालेल्या पत्रांच्या मित्यांकडे नीट व बारीक लक्ष न दिल्यामुळें, रोजनिशांचा जितका चोख अभ्यास करावा तितका न केल्यामुळें व बखरी व तवारिखा ह्यांवर फाजील विश्वास ठेविल्यामुळें, डफच्या हातून हा गोंधळ झाला आहे. मराठ्यांच्या इतिहासांत शिवाजीच्या पराक्रमांच्या खालोखाल, कदाचित् कित्येक बाबतींत शिवाजीच्या पराक्रमाच्या तोडीचीं, अद्भुत कृत्यें बाजीराव बल्लाळाच्या हातून घडलेलीं आहेत. ह्या महापुरुषाच्या अचाट व अद्भुत कृत्यांचें रसभरित वर्णन देण्यास प्रासादिकच इतिहासकार पाहिजे, व साद्यंत वर्णन देतां येण्यास मुबलक जागा पाहिजे; परंतु बिनचुक वर्णन देण्यास ह्या दोन्ही गोष्टींची अपेक्षा नाहीं. पहिले दोन गुण तर डफच्या ग्रंथांत नाहींत ही सर्वमान्य गोष्ट आहे; परंतु तिसराही गुण ह्या ग्रंथांत नाहीं हें वर दाखविलेल्या चुकांवरून निश्चयानें ह्मणण्यास बिलकुल शंका वाटत नाहीं. १७५० पासून १७६१ पर्यंतच्या इतिहासासंबंधानें ग्रांट डफ विशेष विश्वास ठेवण्यालायक लेखक नाहीं हें मी पहिल्या खंडांत सिद्ध करून दाखविलें आहे. १७२० पासून १७४० पर्यंतच्या इतिहासासंबंधानें तर डफवर फारच थोडा विश्वास ठेविला पाहिजे असें आतां ह्या खंडांत ह्मणण्याची पाळी आली आहे. १७०७ पासून १७२० पर्यंतच्या महाराष्ट्रांतील यादवीचाही डफला यथातथ्य अंदाज झाला नाहीं. शाहूचे व ताराबाईचे डावपेंच, निरनिराळ्या सरदारांचे लपंडाव, कित्येकांचा अप्पलपोटेपणा, कित्येकांची एकनिष्ठा, मोंगलांचे दुटप्पी बेत, त्यावर बाळाजी विश्वनाथाचे व धनाजी जाधवाचे शहप्रतिशह ह्या सर्वांचें वर्णन देतांना अलंकारदृष्ट्या अशा एखाद्या साध्या लेखकाचाही लेख प्रसंगानें चमत्कृतिजनक व्हावा; परंतु अंगीकृत विषयाचें रहस्य यथास्थित न कळल्यामुळें, डफचें लिहिणें येथून तेथून सारखेंच नीरस असें वठलें आहे. कालाचा चोख

निर्णय न केल्यामुळें, कार्यकारणसंबंध व प्रसंगांचें पौर्वापर्य ह्या लेखकाच्या जसें ध्यानांत यावें तसें आलें नाहीं. त्याचें सर्व लिहिणें तुटक, व हीनसत्व असें भासूं लागलें आहे. जोंपर्यंत मूळ अस्सल लेखांचा अभ्यास आपल्या इकडे सुरू झाला नव्हता, तोंपर्यंत ग्रांटडफची खरी किंमत करतां येणें शक्यच नव्हतें. परंतु नीळकंठराव कीर्तन्यांच्या टीकेपासून व काव्येतिहाससंग्रहकारांच्या यत्नापासून त्या ग्रंथाची खरी किंमत व खरी परीक्षा हळू हळू होत चालली आहे. मराठ्यांच्या इतिहासाची रचना नवीन पद्धतीनें करणें जरूर आहे असा परिणाम ह्या परीक्षेपासून झाला आहे.

२२. बाजीराव, चिमाजीअप्पा व फत्तेसिंग भोसले यांच्या स्वाऱ्या व त्यांच्यासंबंधानें ग्रांटडफनें केलेल्या चुका ह्यांचें स्पष्टीकरण येथपर्यंत झालें. आतां हे तीन पुरुष १७२० पासून १७४० पर्यंत कोठकोठें होते ह्याचे तक्ते पुढें देतों, ह्मणजे हें स्पष्टीकरण जास्त पूर्ण होईल.

## तक्ता पहिला.

### बाजीराव बल्लाळाच्या हालचालींचा तक्ता.

| साल | महिना | स्थल. |
|---|---|---|
| १७२० | एप्रिल ते जून .... .... | वऱ्हाड खानदेश. |
| | जुलै .... .... | बाळापूर. |
| | सप्टंबर .... .... | सासवड. |
| | अक्टोबर .... .... | बारामती. |
| | नोव्हेंबर .... .... | सातारा. |
| | डिसेंबर .... .... | मोगलाई. |
| १७२१ | जानेवारी .... .... | सावर्डिया. |
| | फेब्रूवारी ते आगष्ट.... .... | विजापूर. |
| | सप्टंबर-आक्टोबर .... .... | सातारा. |
| | नोव्हेंबर .... .... | पिंपरी, पुरंदर. |
| | डिसेंबर .... .... | जुन्नर. |

| साल | महिना | स्थल |
|---|---|---|
| १७२२ | जानेवारी .... | .... जुन्नर. |
| | फेब्रूवारी ते मे .... | .... मोगलाई, कुरकुंब, सुपें. |
| | जुलै ते सप्टेंबर .... | .... सातारा. |
| | अक्टोबर .... | .... सासवड, सुपें. |
| | डिसेंबर .... | .... मोगलाई. |
| १७२३ | जानेवारी .... | .... बऱ्हाणपूर, हांडे, पिंपळोद. |
| | फेब्रूवारी .... | .... बदकशा, झावाब. |
| | मार्च .... | .... बोरगांव, अशेर. |
| | एप्रिल ते जून .... | .... बाघेलखंड. |
| | जुलै ते आक्टोबर .... | .... सातारा. |
| | नोव्हेंबर .... | .... वांई, धोम, महाबळेश्वर, प्रतापगड, सातारा. |
| | डिसेंबर .... | .... माळवा. |
| १७२४ | जानेवारी ते जुलै .... | .... उज्जैन, बुंदेलखंड. |
| | जुलै ते आगष्ट .... | .... सातारा. |
| | सप्टेंबर ते आक्टोबर.... | .... मोगलाई, साखरखेडलें. |
| | नोव्हेंबर ते डिसेंबर.... | .... बऱ्हाणपूर, माळवा. |
| १७२५ | जानेवारी ते मार्च .... | .... माळवा. |
| | एप्रिल ते सप्टेंबर .... | .... सातारा, माहुली, अपशिंगें, सातारा, पुणें. |
| | सप्टेंबर ते डिसेंबर .... | .... कर्नाटक, सुरापूर, चित्रदुर्ग, गदग, लखमेश्वर. |
| १७२६ | जानेवारी ते फेब्रूवारी.... | .... वेदवटी. |
| | फेब्रूवारी-मे .... | .... श्रीरंगपट्टण, तिचनापल्ली, अर्काट. |
| | जून-सप्टेंबर .... | .... सातारा, पुणें. |
| | सप्टेंबर-डिसेंबर .... | .... पंढरपूर, विजापूर. |

| साल | महिना | स्थल. |
|---|---|---|
| १७२७ | जानेवारी-जुलै .... .... | मोगलाई. |
| | जुलै-आगष्ट .... .... | सातारा. |
| | आगष्ट डिसेंबर .... .... | औरंगाबाद, खानदेश, गुजराथ. |
| १७२८ | फेब्रूवारी .... .... | पालखेड. |
| | मार्च .... .... | मुंगी. |
| १७२८ | जुलै ते सप्टेंबर .... .... | सातारा. |
| | आक्टोबर ते डिसेंबर .... | तुळजापूर, खानदेश. |
| १७२९ | जानेवारी-फेब्रूवारी .... .... | खानदेश, नेमाड-बऱ्हाणपूर. |
| | मार्च ते जुलै .... .... | माळवा, जैतपूर, धामोरा. |
| | जुलै ते डिसेंबर .... .... | सातारा, सुपें, फलटण, पुणें. |
| १७३० | जानेवारी .... .... | पुणें. |
| | फेब्रूवारी ते जुलै .... .... | उंबरज. |
| | जुलै ते आक्टोबर .... .... | उंबरज, सातारा, पुणें. |
| | आक्टोबर-डिसेंबर .... .... | खानदेश. |
| १७३१ | जानेवारी ते मार्च .... .... | गुजराथ, डभई. |
| | एप्रिल .... .... | सातारा. |
| | मे .... .... | सातारा. |
| | जून ते डिसेंबर .... .... | सातारा, पुणें. |
| १७३२ | जानेवारी ते मार्च .... .... | कुलाबा. |
| | मार्च ते जुलै .... .... | माळवा. |
| | जुलै ते आक्टोबर .... .... | सातारा. |
| | नोव्हेंबर-डिसेंबर .... .... | मोंगलाई. |
| १७३३ | जानेवारी ते मार्च .... .... | मोंगलाई, निजामाशीं भेट. |
| | मार्च ते डिसेंबर .... .... | कुलाबा, जंजिरा. |
| १७३४ | जानेवारी ते जुलै .... .... | माळवा, दिल्ली, आग्रा. |
| | जुलै ते डिसेंबर .... .... | सातारा, पुणें. |

| साल | महिना | | स्थल. |
|---|---|---|---|
| १७३५ | फेब्रूवारी ते जुलै .... | .... | जंजिरा, गोवळकट. |
| | जुलै ते आक्टोबर .... | .... | सातारा, पुणें. |
| | नोव्हेंबर-डिसेंबर .... | .... | खानदेश, माळवा. |
| १७३६ | जानेवारी ते जुलै .... | .... | अजमीर, पुष्कर. |
| | जुलै ते आक्टोबर .... | .... | सातारा, पुणें. |
| | नोव्हेंबर-डिसेंबर .... | .... | खानदेश, माळवा. |
| १७३७ | जानेवारी ते जुलै .... | .... | भेळशाची स्वारी. |
| | जुलै ते सप्टेंबर .... | .... | सातारा, पुणें. |
| | आक्टोबर ते डिसेंबर | .... | खानदेश, माळवा. |
| १७३८ | जानेवारी ते जुलै .... | .... | भोपाळचीस्वारी. |
| | जुलै ते सप्टेंबर .... | .... | सातारा, पुणें. |
| | नोव्हेंबर डिसेंबर .... | .... | उत्तरकोंकण. |
| १७३९ | जानेवारी ते मार्च .... | .... | ठाणें, वसई, तारापूर. |
| | एप्रिल ते जुलै .... | .... | खानदेश, वऱ्हाड. |
| | जुलै ते आक्टोबर .... | .... | सातारा, पुणें. |
| | नोव्हेंबर डिसेंबर .... | .... | खानदेश. |
| १७४० | जानेवारी ते एप्रिल.... | .... | खानदेश. |
| | २८ एप्रिल .... | .... | समाप्ती. |

---

## तक्ता दुसरा.

### चिमणाजी बल्लाळाच्या हालचालीचा तक्ता.

| | | | |
|---|---|---|---|
| १७२० | एप्रिल .... | .... | सातारा. |
| १७२३ | सप्टेंबर ते डिसेंबर .... | .... | कंबरखानावर स्वारी, हैदराबाद, पंढरपूर, तुळजापूर. |
| १७२४ | जानेवारी ते जुलै .... | .... | कंबरखानावर स्वारी. |
| | नोव्हेंबर ते डिसेंबर .... | .... | निजामावर स्वारी. |

| साल | महिना | स्थल. |
|---|---|---|
| १७२५ | नोव्हेंबर ते डिसेंबर | .... निजामावर स्वारी. |
| १७२६ | जानेवारी ते जुलै | .... निजामावर स्वारी. |
| | सप्टेंबर ते डिसेंबर | .... निजामावर स्वारी. |
| १७२७ | जानेवारी ते जुलै | .... निजामावर स्वारी. |
| १७२८ | अक्टोबर ते डिसेंबर | .... माळवा. |
| १७२९ | जानेवारी ते एप्रिल | .... माळवा दयाबहादूरावर [illegible] |
| | आक्टोबर ते डिसेंबर | .... खानदेश, गुजराथ. |
| १७३० | जानेवारी ते जुलै | .... ढवळकें, पायागड. |
| | सप्टेंबर ते डिसेंबर | .... खानदेश, माळवा. |
| १७३१ | जानेवारी ते जुलै | .... माळवा, ग्वालेर. |
| | जुलै ते डिसेंबर | .... उंब्रज, सातारा, पुणें. |
| १७३२ | अक्टोबर ते जुलै | .... माळवा, चांपानेरची स्वारी. |
| १७३३ | | |
| | सप्टेंबर ते डिसेंबर | .... कोंकण, जंजिरा. |
| १७३४ | जानेवारी ते मार्च | कोंकण, जंजिरा. |
| | मार्च ते जुलै | .... खानदेश, वऱ्हाड. |
| १७३५ | | .... देशीं. |
| १७३६ | मार्च ते जुलै | .... कोंकण. |
| १७३७ | मार्च ते जुलै | .... कोंकण. |
| | नोव्हेंबर ते डिसेंबर | .... ठाणें, तारापूर. |
| १७३८ | जानेवारी ते जुलै | .... साष्टी. |
| | नोव्हेंबर—डिसेंबर | .... साष्टी. |
| १७३९ | जानेवारी—जुलै | .... साष्टी. |
| | नोव्हेंबर—डिसेंबर | .... खानदेश. |
| १७४० | जानेवारी—एप्रिल | .... कोंकण, साष्टी. |

## तक्ता तिसरा.

### फत्तेसिंग भोसल्याच्या हालचालींचा तक्ता.

| साल | महिना | | स्थल. |
| --- | --- | --- | --- |
| १७१७ पासून १७२५ | .... | .... | चंद्रसेन जाधव, कंब्रजखान व निजामुन्मुलूख ह्यांच्या प्रांतांत. |
| १७२६ | .... | .... | कर्नाटक. |
| १७२७ ते १७३२ | .... | .... | निजाम व संभाजी. |
| १७३३ ते १७३६ | .... | .... | जंजिरा. |
| १७३७ ते १७४० | .... | .... | चंद्रसेन जाधव व निजाम यांचा प्रांत. |
| १७४० | .... | .... | श्रीरंगपट्टणची स्वारी. |

---

२३. ह्या तीन तक्त्यांपैकीं बाजीराव बल्लाळाच्या हालचालींचा तक्ता १७२० पासून १७४० पर्यंत सबंध भरला आहे. कोणत्याही वर्षाच्या सप्टंबरापासून जुलईपर्यंत बाजीराव कोठें होता हें ह्या तक्त्यावरून स्पष्ट कळून येतें. चिमाजी अप्पाची १७२३ पासूनची हालचाल दुसऱ्या तक्त्यांत दिली आहे, व तिसऱ्या तक्त्यांत फत्तेसिंगाच्या हालचालींचा नुसता सालावारीनें निर्देश केला आहे. बाकी राहिलेल्या सरदारांच्या हालचालींचा पत्ता अद्याप संगतवार तर लागला नाहींच; परंतु कांहीं अपवाद खेरीज-करून अमुक सरदार अमक्या स्थळीं अमुक वर्षी होता असें निश्चयानें ह्मणण्यापुरतीही माहिती मिळालेली नाहीं. ह्या शकावलीपासून फायदा एवढाच झाला आहे कीं, १७२० पासून १७४० पर्यंतच्या पेशव्यांच्या

हालचालींच्या मित्या तेवढ्या बिनचुक मिळाल्या आहेत. अमुक मोहिम अमुक महिन्यांत सुरू झाली एवढें ह्या मित्यांपासून समजतें. ह्यापेक्षां जास्त माहिती ह्या शकावलीपासून मिळणार नाहीं. मोहिमांचीं विशिष्ट कारणें, मोहिमांवर गेलेल्या सैन्याची संख्या, मोहिमांचे टप्पे, मोहिमांत झालेल्या युद्धांच्या स्थलांचीं नांवें, युद्धांची तपशीलवार हकीकत, मोहिमा संपल्यावर झालेल्या तहनाम्यांच्या नकला वगैरे बाबींची उपलब्धि अद्यापि व्हावयाचीच आहे. ग्रांट डफच्या ग्रंथांतही ही माहिती बहुतेक बिलकुल नाहीं. हें शेवटलें विधान किंचित् जास्त खुलें करून दाखवितों. १७२६ तील श्रीरंगपट्टणच्या स्वारीच्या माहितीचा आदि, मध्य व अंत्य डफनें येणेंप्रमाणें केला आहे :—In 1726 the पेशवा was with a very large army under फत्तेसिंग भोसले, which proceeded into the Carnatic, plundered the Districts, and levied a contribution from श्रीरंगपट्टण. ह्या वर्णनांत खालील दोष आहेत. [ १ ] ह्या स्वारीला कारण काय झालें तें दिलें नाहीं. [ २ ] ह्या स्वारीला मुळीं कारणच कांहीं नसावें असा एकंदर वाक्याचा बोध होतो. [ ३ ] मोठें सैन्य ह्मणजे किती मोठें ह्याचा कांहीं एक अंदाज होत नाहीं. [ ४ ] कर्नाटकांत पूर्वेस कीं पश्चिमेस सैन्य गेलें ह्याचा पत्ता नाहीं. [ ५ ] लुटणें हा शब्द वापरून मराठ्यांच्या संबंधीं तिरस्कार व्यक्त केला आहे. [ ६ ] Districts ह्मणजे प्रांत कीं संस्थानें ह्याचा निर्णय केला नाहीं. [ ७ ] Levy शब्द घालून मराठ्यांचा जुलूम व्यक्त केला आहे. [ ८ ] १७२६ हा आंकडा घालून स्वारीची खरी मिति चुकविली आहे. आतां ह्या स्वारीचें खरें कारण असें आहे. १७२० पासून निजामावर मराठ्यांच्या स्वाऱ्या एकसारख्या चालल्याच होत्या. त्यांत १७२२ त व १७२३ त निजामुल्मुलुख किंवा त्याचे सरदार कर्नाटकांत अर्काट, त्रिचनापल्लीवर जाणार अशी बातमी आली. त्रिचनापल्लीस मुराराव घोरपडे व तंजावरास तुळजाजी राजे असल्यामुळें त्यांना मदत करणें जरूर होतें. १७२४त निजामाशीं बाजीरावाचें किंचित् सख्य होणार तों १७२५ त त्याशीं

मराठ्यांचें पुन: वांकडें आलें व चोहोंकडून युद्धाला सुरुवात झाली. कान्होजी भोसले उत्तरेकडून, कंठाजी कदम बांडे व गायकवाड पश्चिमकडून, चिमाजीअप्पा भागानगराकडून असा चोहोंबाजूंनीं निजामावर मराठ्यांनीं अगदीं दंगा उसळून दिला. निजामाच्या सुभेदारींत कर्नाटकचाही प्रांत अवरंगझेबाच्या स्वारीपासून होताच. तेव्हां त्या प्रांतांत जाऊन निजामाला शह देण्याचा मराठ्यांनीं बेत केला व त्या बेताचा परिणाम ही स्वारी झाली. शिवाय सोंधें, बिदनूर, सुरापूर, गदग, लखमेश्वर, श्रीरंगपट्टण वगैरे संस्थानिकांकडून मराठ्यांच्या खंडण्या आज कित्येक वर्षेंपर्यंत राहिल्या होत्या, त्या उगविण्याचाही ह्या मोहिमेंतील एक हेतु होता. फत्तेसिंगाला १७१३ त जहागीर दिली त्यावेळीं कर्नाटकचा अधिकारही त्याला सोंपिला होता. ह्या कारणाकरितां मोहिमेचें आधिपत्य वरकरणी तरी त्याच्याकडे आलें होतें. नाहींतर तें निःसंशय बाजीरावाकडे आलें असतें. ह्या स्वारीची कांहीं हकीकत शकावलीच्या ९३ व्या पृष्ठावर दिली आहे. त्यावरून बाकीच्या दोषांचें निरसन करण्याचें थोडेंबहुत साधन मिळण्यासारखें आहे. ह्या स्वारीचा परिणाम काय झाला, स्वारीच्या शेवटीं संस्थानिकांशीं तह काय काय झाले, वगैरे हकीकत डफनें न दिल्यामुळें, १७२६ पासून १७४० पर्यंत पुढें कर्नाटकाकडे मराठ्यांनीं ढुंकूनसुद्धां कां पाहिलें नाहीं तें समजेनासें होतें. १७२६ पासून १७४० पर्यंत मराठ्यांनीं कर्नाटकाकडे ढुंकूनसुद्धां कां पाहिलें नाहीं त्याचें खरें कारण येणेंप्रमाणें आहे. फत्तेसिंग भोसले, श्रीनिवासराव प्रतिनिधि, बाबूजी नाईक बारामतीकर व रघोजी भोसले ही सर्व मंडळी बाजीरावाच्या विरुद्ध होती. १७२९ च्या सुमाराला हा विरोध इतका कांहीं विकोपाला गेला कीं, शाहूमहाराजांना मध्यें पडून प्रतिनिधींचें व पेशव्यांचें एकसूत्र जुळवून देणें भाग पडलें. पुढें १७२५ च्या आगोठीनंतर श्रीरंगपट्टणावर जेव्हां मोहीम करावयाचें ठरलें, तेव्हां केवळ महाराजांच्या आग्रहास्तव बाजीरावाला फत्तेसिंगाच्या आधिपत्याखालीं ह्या मोहिमेस जावें लागलें. मोहिमेचें कार्य जसें निवटावें तसेंच बहुतेक निवटलें; परंतु मराठ्यांच्या

सैन्याचे ह्या स्वारींत अतोनात हाल झाले. त्याचें सर्व अपेश, अर्थात्, फत्तेसिंग भोसले, श्रीनिवासराव प्रतिनिधि व रघोजी भोसले ह्यांच्या माथ्यावर फुटलें. शाहूला ह्या लोकांच्या कर्तृत्वाचा व ऐपतीचा अंदाज कळला, व बाजीरावावर त्याचा विश्वास व लोभ जास्तच बसला. यद्यपि असा प्रकार झाला, तत्रापि शाहूनें ह्या अपेशी लोकांना अजीबात सोडून दिलें असा प्रकार झाला नाहीं. फत्तेसिंग तर शाहूचा मानीव पुत्र होता व त्याच्यावर त्याचा अत्यंत लोभ असे. प्रतिनिधि व रघोजी भोसले फत्तेसिंगाच्या विश्वासांतले पडले, त्यामुळें त्यांचीही बाजू बरीच सांवरली गेली. ह्या सर्व गोष्टी बाजीराव पूर्णपणें जाणून होता. फत्तेसिंगाला दुखवावयाचें नाहीं व त्याच्या कामांत पडावयाचें नाहीं असा बाजीरावानें पुढें बेत केला. बाजीरावानें १७२६ च्या नंतर कर्नाटकाचें नांव काढलें नाहीं त्याचें कारण हें असें आहे. कर्नाटकच्या स्वारीचीं सुखें फत्तेसिंगाला पक्कीं कळून चुकलीं होतीं. ह्मणून तोही तिकडील स्वारीच्या छंदांत पुनः १७४० पर्यंत पडला नाहीं. ह्या दोन कारणांनीं १७२६ च्या पुढें कर्नाटकावर मराठ्यांची स्वारी झाली नाहीं. स्वारी न होण्याचें तिसरेंही एक कारण आहे. कर्नाटकची मुख्य किल्ली निजामाच्या हातांत होती. त्यालाच वटणीस आणिलें ह्मणजे कर्नाटक जिंकल्यासारखेंच झालें. ह्या समजुतीवर भिस्त ठेवून बाजीरावानें १७२६ च्या पुढें निजामावर ज्या स्वाऱ्या केल्या त्या सर्व खानदेशांत व माळव्यांत केल्या. बाजीरावाची ही क्लृप्ति कांहीं वावगी नव्हती; परंतु तिच्यापासून एक तोटा झाला. एकसारखें चवदा वर्षेपर्यंत कर्नाटकाकडे कोणी ढुंकूनही न पाहिल्यामुळें, निजामुन्मुलुखाला त्या प्रांतांत आपली सत्ता जास्त स्थिर करतां आली, व मराठ्यांना त्या प्रांतांत कोणी ओळखीनासें झालें. १७३९ त मराठ्यांच्या नर्मदेपलीकडील उपद्यापाला कंटाळून, निजामुन्मुलुखानें त्यांची खोड मोडण्याकरितां जेव्हां नादिरशहाला दिल्लीस आणिलें, तेव्हां बाजीरावानें निजामावर एकंदर तीन स्वाऱ्या काढिल्या. एक स्वारी निजामाच्या प्रांतावर खानदेशांतून चिमाजी अप्पाच्या हातून करविली. दुसरी स्वतः हिंदु-

स्थानांत करण्याचा बेत केला, व तिसरी फत्तेसिंग व रघोजी भोसले यांच्याकडून निजामाच्या कर्नाटक प्रांतांत करविली. १४७० तील कर्नाटकांतील स्वारीचें हें मुख्य कारण आहे. ही स्वारी चिमाजी अप्पाच्या हातूनही झाली असती. परंतु फत्तेसिंगाच्या कामांत पडावयाचें नाहीं हा बाजीरावाचा कृतसंकल्प होता. १७४० पुढें कर्नाटकची व्यवस्था शाहूनें रघोजी भोसल्याकडे सांगितली. रघोजीचें व बाळाजी बाजीरावाचें फारसें नीट नव्हतें. १७४४ त रघोजीची बाळाजीनें व्यवस्था लाविली. नंतर इतरत्र स्थिरस्थावर झाल्यावर बाळाजी बाजीरावानें आपल्या प्रख्यात अशा कर्नाटकच्या स्वाऱ्या सुरू केल्या. सदाशिव चिमणाजीनें बहादूरभेंड्यावर स्वारी १७४६ च्या हिंवाळ्यांत केली. तीच कर्नाटकावरील १७६० पर्यंतच्या स्वाऱ्यांचा श्रीगणेशायनमः होय. बाजीरावाच्या कारकीर्दींत कर्नाटकावर एकापेक्षां जास्त स्वाऱ्या कां झाल्या नाहींत, व बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दींत कर्नाटकावर एकसारख्या स्वाऱ्यावर स्वाऱ्या कां झाल्या, ह्याची कारणपरंपरा ही अशी आहे. मराठ्यांच्या मोहिमांना कारणांची बिलकुल जरूर लागत नसे, प्रांतांची लुटालूट करणें हें एकच कारण त्यांच्या प्रयत्नांना बस्स असे, अशी जेथें भावना, तेथें ऐतिहासिक कार्यकारणांची मूळपीठिका शोधीत बसण्याची उठाठेव करण्याचें प्रयोजनच रहात नाहीं; परंतु ही उठाठेव केल्याशिवाय मराठ्यांच्या इतिहासाची फोड यथास्थित होणें अशक्य आहे. १७२६ च्या श्रीरंगपट्टणच्या स्वारीनंतर बाजीरावानें किंवा चिमाजीअप्पानें कर्नाटकांत स्वाऱ्या केल्या असत्या तर, [ १ ] निजामुन्मुलुखाची सत्ता त्या प्रांतांत स्थिर झाली नसती, [ २ ] निजामुन्मुलुखाचे हस्तक जे अर्काटचे नवाब ते पार नाहींसे झाले असते, [ ३ ] तंजावरच्या मराठ्यांना जोर आला असता, [ ४ ] मद्रासेंतील इंग्रजांना व पांडिचेरींतील फ्रेंचांना अर्काटच्या नवाबांच्या द्वारा कर्नाटकांत ढवळाढवळ बहुशः करतां आली नसती, व [ ५ ] श्रीरंगपट्टणचें राज्य नष्ट होऊन हैदरासारखा नवीन शत्रु उद्भवला नसता. अकिलिसाच्या रागानें ग्रीस देशावर जशी संकटपरंपरा ओढवली, त्याप्रमाणें बाजीरावाच्या फत्तेसिंगा-

वरील व प्रतिनिधीवरील रागानें कर्नाटकांत ही नवीन कार्यपरंपरा उद्भवून महाराष्ट्रावर पुढें संकटपरंपरा कोसळली. बाजीरावाच्या व फत्तेसिंगाच्या दुहीचा हा असा परिणाम झाला.

२४. बाजीराव व फत्तेसिंग ह्यांच्या मनांत एकमेकांविषयीं यद्यपि विकल्प आलेला होता, तत्रापि त्यांनीं एकमेकांविरुद्ध झुंझण्याचा उद्योग आरंभिला नाहीं. बाजीरावाच्या इतर प्रतिस्पर्ध्यांची गोष्ट याहून निराळी होती. कोंकणांतील आंग्र्यांनीं, गुजराथेंतील दाभाड्यांनीं, वऱ्हाडांतील भोसल्यांनीं व कोल्हापूरच्या राजांनीं शाहूच्या व बाजीरावाच्या विरुद्ध युद्धप्रसंग केलेले इतिहासांत विदितच आहेत. ह्या युद्धप्रसंगांचीं मूळकारणें, व जवळचे व दूरवरचे परिणाम, ग्रांट डफनें आपल्या इतिहासांत दिले नाहींत. कारणें व परिणाम ह्यांचे खुलासे सुज्ञ वाचकांनीं आपले आपणच करून घ्यावे अशी डफची प्रतिज्ञाच आहे (Duff's History, preface). डफची दुसरी प्रतिज्ञा अशी आहे कीं, इतिहासांतील प्रसंगांचे खरेखुरे, तपशील देण्याला मात्र आपल्याकडून कसूर होणार नाहीं. पैकीं ह्या दुसऱ्या प्रतिज्ञेंत कितपत अर्थ आहे ह्याचा खुलासा मी वारंवार करीत आलों आहें. ग्रांट डफचा तपशील अनेक ठिकाणीं विश्वसनीय व प्रमाण-बद्ध नसतो ह्या विधानाची सत्यता सिद्ध होऊन चुकली आहे. कारणें व कार्यें ह्यांची जी ही ग्रांट डफनें ताडातोड केली, तीच त्याच्या विपत्तीच्या मूळाशीं आहे. कारण व कार्य ह्यांचा घटस्फोट करून इतिहास लिहूं पहाणें अशास्त्र आहे इतकेंच नव्हे, तर तें अशक्य आहे. अनेक कार्यें पुढें आलीं व त्यांतून आधींचीं कोणतीं, मागूनचीं कोणतीं व समकालीन कोणतीं ह्याचा उलगडा करण्याचा प्रसंग आला, ह्मणजे मग कारणांचें महत्व कळूं लागतें. अशा प्रसंगीं कारणांकडे पाहिलेंच नाहीं, ह्मणजे डफच्या इतिहासासारखा इतिहास तयार होतो. कारणाशिवाय कार्याचें वर्णन देईन हें ह्मणणेंच मुळीं असंबद्ध आहे. आश्चर्य हेंच कीं, तें जगापुढें मांडण्यास हा लेखक तयार झाला.

२५. कार्यकारणांची ताडातोड केल्यामुळें ग्रांट डफला मराठ्यांच्या इतिहासाचें रहस्य बिलकुल कळलें नाहीं व कालाचा निर्णय बराबर न

केल्यामुळें सामान्य अशी गोष्ट जी कालाचें पौर्वापर्य तेंही समजलें नाहीं, ह्या प्रकरणाचा विचार येथपर्यंत केला. आतां ह्यापुढें १७४० पासून १७६१ पर्यंतच्या मित्यांसंबंधानें माझें ह्मणणें काय आहे तें सांगतों. १७५० पासून १७६१ पर्यंतचे तक्ते पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेंत मी दिले आहेत. तिसऱ्या खंडांतील पत्रांचा विचार करतांना १७४० पासून १७५० पर्यंतच्या अवधींतील प्रसंगांचा उहापोह करावयाचा आहे, त्यावेळीं ह्या अवधींतील मित्यांचाही छडा लावतां येईल.

---

श्री.

# मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें.

## खंड २ रा.

### उपोद्घात.

" पुढील दहा वीस वर्षांतील इतिहासजिज्ञासूंचें पहिलें काम ह्मटलें ह्मणजे अस्सल कागदपत्रें शोधून काढून तीं छापण्याचें आहे ", असें विधान " मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें " ह्या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत दहा पांच महिन्यापूर्वीं मीं केलें होतें. त्याच्या अनुरोधानें **ग्रंथमालेच्या** ह्या महिन्याच्या अंकापासून मजजवळ जमा झालेले कांहीं ऐतिहासिक लेख छापून काढण्याचा उपक्रम मी आज करीत आहे. कोणताहि ऐतिहासिक लेख छापून काढण्यांत, माझ्या मतें, खालील दोन मुद्यांकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे. प्रत्येक लेख पूर्णपणें शुद्ध असा छापून निघाला पाहिजे, हा पहिला मुद्दा आहे. व प्रत्येक लेखांतून जेवढी ह्मणून ऐतिहासिक माहिती, साक्षात् व परंपरेनें, निघण्यासारखी असेल तेवढी चोपून काढून घेतली पाहिजे, हा दुसरा मुद्दा आहे. हे दोन मुद्दे इतके महत्वाचे आहेत कीं, जो कोणी त्यांकडे दुर्लक्ष्य करून आपलें काम चालवील त्याला, इतिहासक्षेत्रांत प्रवेश करण्याचादेखील परवाना देतां कामा नये. पहिल्या मुद्याविरुद्ध जो काम करितो, तो स्वतःचा हलगर्जीपणा लोकांना दाखवितो, इतकेंच नव्हे; तर त्यांना संशयांत पाडून एका प्रकारें फसविण्याचेंही महापातक करितो. दुसरा मुद्दा तर, ऐतिहासिक लेख छापून काढण्याचा प्रधान हेतु आहे. हे दोन मुद्दे ध्यानांत धरून मीं आपलें काम चालविणार आहे. ह्या अंकांत पेशव्यांच्या एका शकावलीस प्रारंभ केला आहे. काव्येतिहाससंग्रहांत तीन व भारतवर्षांत एक मिळून आजपर्यंत पेशव्यांच्या एकंदर चार लहान मोठ्या शकावली प्रसिद्ध झाल्या आहेत. ह्या चारींपैकीं पूर्णपणें विश्वसनीय अशी एकही

नाहीं. ह्मणून ही पांचवी शकावली प्रसिद्ध करण्याची विशेष जरूर भासली. ही शकावली काव्येतिहाससंग्रहकारांच्या दफ्तरांतील असून, तपशीलवार व विश्वसनीय अशी आहे. शकावलींतील प्रत्येक तिथीची व तारखेची इंग्रजी तारीख दिली असून ग्रांट डफच्या ग्रंथाहून जास्त किंवा निराळी माहिती जेथें दिलेली असेल, तेथें खुलासेवार टिपा दिल्या आहेत. प्रस्तुत शकावली पेशव्यांच्या बारानिशींतून व दफात्यांतून जुळवलेली असून जुळवणारा मोठा प्रामाणिक लेखक असावा असें वाटतें. शकावली रचणाऱ्यानें अव्वल इंग्रजींत आपलें काम केलें, असें डफच्या इतिहासाचा पांच चार वेळा त्यानें उल्लेख केला आहे, त्यांवरून दिसतें. पेशव्यांच्या दफ्तरांची बरीच माहिती असणारे प्रसिद्ध पेणसे हे ह्या शकावलीचे कर्ते असावेत, असा माझा तर्क आहे. पेशव्यांच्या दफ्तराची बरीच माहिती असणारे दुसरे वृद्ध गृहस्थ जे रा. हडपसरकर त्यांच्या येथें ह्याच शकावलीची मी एक प्रत पाहिली होती. ~~दहा-वीस~~ वर्षांपूर्वी नगरास असतांना काव्येतिहाससंग्रहकारांनीं ही शकावली उतरून घेतली. ती माझ्या हातीं चार सहा महिन्यांपूर्वी आली. बाळाजी विश्वनाथाच्या कारकीर्दीच्या प्रारंभापासून बाळाजी बाजीरावाच्या अखेरीपर्यंत हींत तारखा दिल्या आहेत. टिपा देतांना पुराव्याच्या उणिवा कोणत्या असतात तेंही सांगितलें आहे.

ग्रं. भां ३०/२

# पेशव्यांची शकावली.

इ० स० १७६१ पर्यंत.

## बाळाजी विश्वनाथाची हकीकत.

१ बाळाजी विश्वनाथ व जानो विश्वनाथ हे दोघे सख्खे बंधु, कोकणस्थ ब्राह्मण, उपनांव भट. राजपुरी प्रांतांत जंजीरकर हपशी यांचे मुलखांत श्रीवर्धन परगण्याचे हे वतनदार देशमुख. जानोजी विश्वनाथ यांस कोणे एके दिवशीं हिशेबाकरितां जंजिऱ्यांत हपशी अधिकारी यांनीं बोलावून नेऊन एकाएकीं गोणत्यांत घालून समुद्रांत बुडविलें. हें वर्तमान बाळाजी विश्वनाथ यांस श्रीवर्धन गांवीं कळतांच त्या दहशतीनें एकदम सहकुटुंब, दोघे पुत्र, वडील बाजीराव, व धाकटे चिमाजी अप्पा, यासुद्धां सर्व घरादाराचा त्याग करून, श्रीवर्धनानजीक वेळास येथें रामाजीपंत व बाळाजीपंत भानु यांच्या येथें पूर्वीच्या ओळखीनें मुक्कामास येऊन राहिले. झालेली हकीकत सांगितली. रोजगारास सातारे प्रांतीं जावयाचें आहे ह्मणून सांगितलें. भानूही बरोबर रोजगारास निघतो ह्मणून ह्मणाले. ईश्वरकृपेनें जी भार्जाभाकर मिळेल, त्यांतील चतकोर भानूंस देण्याचें अभिवचन देऊन, बाळाजी विश्वनाथ भट साताऱ्यास जाण्याकरितां निघून पुरंदर किल्ल्यानजीक सासवडास आले. त्या गांवचे कुळकर्णी व देशपांडे अंबाजीपंत पुरंधरे प्रसिद्ध होते. त्यांचें घरीं मुक्कामास उतरले. त्यांस पुरंदरे यांनीं आपले घरीं कांहीं दिवस ठेवून घेऊन काय निमित्त आला ह्मणून विचारिलें. रोजगारास निघालों वगैरे हकीकत कळविली. सातारा राजधानींत धनाजी जाधवराव वगैरे मोठमोठे नामांकित सरदारांच्या आश्रयानें रोजगार लागेल असें मनांत आणून, भटांच्या बरोबर पुरंधरेही साताऱ्यास दाखल झाले. रामाजीपंत भानु व बाळाजीपंत भानु या उभयतांची ओळख साताऱ्यास रहाणाऱ्या

महादाजी कृष्ण जोशी यांशीं होती. त्यांस ते भेटले. ते व जोशी शंकराजी नारायण पंतसचिव यांजकडे कारकुनीवर राहिले. सचिव हे ताराबाईचे कारभारांत प्रमुख होते. बाळाजी विश्वनाथ व अंबाजीपंत पुरंधरे यांची विशेष ओळख कोणाची नव्हती. धनाजी जाधवराव सेनापति मोठे सरदार, यांची त्या राजधानींत मान्यता मोठी असा लौकिक ऐकिवांत होता. सबब त्यांची भेट घेऊन आपली सर्व हकीकत त्यांस कळविली. त्यावरून त्यांणीं यांची बोलण्याची वगैरे हुशारी पाहून आपले पदरीं दौलतसंबंधीं लिहिण्याचे कामावर उभयतांस ठेविलें व तेहि हुशारीनें कामकाज बघत आले. यामुळें जाधवराव यांचाहि विश्वास व लोभ विशेष झाला. ही सर्व हकीकत १७०७ इसवीच्या अगोदर झाली.

---

१ बाळाजी विश्वनाथाची इसवी सन १७०७पर्यंतची हकीकत नक्की काय होती त्याचा निर्णय करणें जरूर आहे. बाळाजी विश्वनाथ, बाजीराव बल्लाळ व चिमाजीअप्पा ह्यांचे जन्मकाल अद्यापपर्यंत कोठें पहाण्यांत आले नाहींत. बाळाजी विश्वनाथासंबंधानें अत्यंत जुना असा लेखी उल्लेख ह्मटला ह्मणजे परशरामाजवळील पेढें गांवच्या बाळ गवळ्याच्या सांगण्यावरून ब्रह्मेंद्रस्वामींच्या व बाळाजी विश्वनाथाच्या भेटीसंबंधीचा होय. ही भेट समान तिसैन अलफ सालाच्या ह्मणजे इ० स० १६९७ सालाच्या सुमारास चिपळूण येथें झाली. [ ब्रह्मेंद्रस्वामींचें चारित्र पृष्ठ ४ ]. ब्रह्मेंद्रस्वामीच्या चरित्रांत समान तिसैनांत शक १६२७ होता ह्मणून ह्मटलें आहे ती चूक आहे. धावडशी येथील दफ्तर तपासतांना ब्रह्मेंद्रस्वामीच्या हालचालींची एक याद मला सांपडली, तींत समान तिसैनांत स्वामी चिपळुणास होते ह्मणून स्पष्ट लिहिलेलें आहे. बाळ गवळ्यानें ब्रह्मेंद्रस्वामीस पाठविलेलें एक पत्रही सांपडलें आहे. त्यावरून बाळ गवळी हा काल्पित पुरुष नसून वास्तविक व्यक्ति होता हें उघड आहे. ज्या अर्थी स्वामींची व बाळाजी विश्वनाथाची भेट १६९७च्या सुमारास चिपळुणास झाली, त्या अर्थी बाळाजी विश्वनाथ १६९७च्या सुमारास चिपळुणास रहात असावा असा साहजिक तर्क होतो. ह्या तर्काचें पुष्टीकरण काव्येतिहाससंग्रहांतील ४९४व्या यादीवरून बरेंच होतें. बाळाजी विश्वनाथ मूळचा राहणार श्रीवर्धनचा. परंतु मीठबंदरचा हवाला [ ब्रह्मेंद्र-

दिल्लीचा पातशाहा औरंगझेब यार्णे संभाजी महाराजांस तुळापुरीं ठार करून, त्यांची बायको येसूबाई व मुलगा ह्यांस इ० स० १६९० त धरिलें. त्यावेळेस शिवाजीचें वय ६ वर्षांचें होतें. औरंगझेबाची मुलगी बेगम इणें शिवाजीस आपला मुलगा समजून त्याचें व येसूबाईचें पालण उत्तम प्रकारें केलें. संभाजी आपल्याकरतां मेला, सबब लग्न करणें नाहीं, असा निश्चय बेगमेनें केला होता. औरंगझेबाचा मृत्युकाल समीप आल्यावेळीं बेगमेनें विनंति शाहूस मुक्त करण्याविषयीं केली. तेव्हां पातशाहानें उत्तर दिल्हें कीं मजला हल्लीं तीन पुत्र आहेत व

---

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू. ]

स्वामींचें चरित्र ] व चिपळूणची जकात (का. पत्रें, यादी ४९४) घेतल्याकारणानें बाळाजीला प्राय: चिपळुणास रहावें लागे व त्याचा भाऊ जानोजी श्रीवर्धनास राहून जंजिऱ्याच्या हपशाकडे हिशेब वगैरे गुजरून देई असें दिसतें. हें हवाल्याचें व जकातीचें काम करीत असतांना शके १६२१ त बाजीरावाचा जन्म झाला असावा. काव्येतिहाससंग्रहांतील ४९६व्या यादींत बाजीरावाचा जन्म शक १६४१ दिला आहे तो शक १६२१ असावा असें वाटतें. इ० स० १६९७च्या पुढें, तसेंच बाजीरावाच्या व चिमाजीआपाच्या जन्मानंतर ह्मणजे इ० स० १६९९ व सुमारें १७०१ नंतर जानोजीला हपशानें गोणत्यांत बुडवून ठार मारिलें असावें. हें भयंकर कृत्य, राजाराम महाराज १७००त वारल्यावर जी मोंगलांनीं धुंडाई केली, तिच्या भरांत झालें असावें हें स्पष्ट आहे. इ० स० १७०२च्या सुमारास बाळाजी, शंकराजी नारायण सचिव यांजकडे भोरास चाकरीस राहिला. तेथें बाळाजीची व अंबाजीपंत पुरंधऱ्यांची ओळख झाली. सचिवाकडे दोन चार वर्षे राहिल्यावर बाळाजी धनाजी जाधवाकडे नोकरीस इ. स. १७०६ च्या सुमारास राहिला असावा. बाळाजी कोकणांतून देशावर ब्रह्मेंद्रस्वामींच्याच उपदेशावरून आला, हें ब्रह्मेंद्रस्वामीला, चिमणाजी दामोदरानें एक पत्र पाठविलें आहे त्यावरून संभाव्य वाटतें. हीं सर्व अस्सल पत्रें ह्या शकावलीच्या नंतर छापिलीं जातील. १७०६ पासून १७१० पर्यंत ह्मणजे धनाजी जाधवांच्या मृत्यूनंतर कांहीं दिवसांपर्यंत बाळाजी, जाधवांच्या बरोबर होता. ज्या अर्थी चिमणाजी दामोदराचें व ब्रह्मेंद्रस्वामींचें सख्य होतें, त्या अर्थी बाळाजी विश्वनाथानें खेडाजवळ भीमेच्या कांठीं

एक कन्या तूं आहेस. तुझा चौथा वांटा तुझे पुत्रास ह्मणजे शाहूस दिला व याशिवाय सहा सुभे दक्षणची सरदेशमुखी वतन दिल्हें. असें

---

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू. ]

१७०७ त जी लढाई झाली तींत शाहूचें साहाय्य धनाजीकडून करविलें असावें, असें गोविंद खंडेराव चिटणीस ह्मणतो, तें ग्राह्य ठरतें. देशावर येतांना कृष्णाजी विश्वनाथाची सून गोदूबाई हीस बाळाजीनें आपल्या बरोबर आणिली असें ज्या अर्थी काव्येतिहाससंग्रहांतील ४९६ व्या यादींत लिहिलें आहे, त्या अर्थी कृष्णाजी विश्वनाथ व बाळाजी विश्वनाथ ह्यांच्या वयांत बापलेकांइतकें अंतर होतें. गोदूबाई विधवा होती, व कृष्णाजी विश्वनाथ त्यावेळीं बहुश: वारले होते, असें दिसतें. देशावर येतांना बाजीरावाचें वय फार तर ९ वर्षांचें असावें. अर्थात् श्रीवर्धनच्या वाळवंटांत मुसलमानांच्या पोराशीं बाजीरावानें मारलेल्या कुस्त्या केवळ काल्पित होत! १६९७ त बाजीरावाच्या जन्मशकीं बाळाजी विश्वनाथाचें वय २५ वर्षांचें धरल्यास बाळाजी विश्वनाथ इ. स. १६७२ च्या सुमारास जन्मला असावा. बाळाजी विश्वनाथ मरणसमयीं सुमारें ५० वर्षांचा असावा. बाजीराव ४३, चिमाजीआप्पा ४१, बाळाजी बाजीराव ४०, माधवराव बल्लाळ २८, सदाशिव चिमणाजी ३०, विश्वासराव १८, नारायणराव १७, माधवराव नारायण २१, रघुनाथ बाजीराव ५०, आणि बाजीराव रघुनाथ ७६ वर्षं प्रत्येकीं जगले. पेशव्याच्या घराण्यांतील पुरुष जात्या दीर्घायुषी होते. लढायांच्या वगैरे सपाट्यांत जे सांपडले तेच लवकर वारले आहेत. बाळाजी विश्वनाथाची बायको राधाबाई ८० च्या वर वर्षे जगलीं होती व बाजीराव ८० च्या जवळ जवळ आला होता, ह्यावरून वरील विधानाला बळकटी येते. बाळाजी विश्वनाथ व कृष्णाजी विश्वनाथ ह्या दोन भावांत वयाचें अंतर बापलेकांइतकें होतें, त्या अर्थी बाळाजी विश्वनाथाचा बापही फार वयस्क होऊन वारला असावा, हें उघड आहे. ( उणीव १ ) बाळाजी विश्वनाथानें देशमुखीचें, जकातीचें व मीठबंदरचें अशीं ३ सार्वजनिक कामें देशावर येण्याच्या पूर्वी केलीं होतीं. तेव्हां त्यांपैकीं जंजिऱ्यापासून ५।५० मैलांच्या आंत कोठें तरी त्यासंबंधीं एखादुसरें पत्र सापडावें. ( उणीव २ ). देशावर आल्यावर सेनाकर्ते पद मिळवीतोंपर्यंतचाही पत्रव्यवहार शोधिला पाहिजे. तो सचिव, पुरंधरे, जोशी, थोरात यांजकडे सांपडावा.

सांगून सनदा तयार करून मुदबखांतून एक भाकर आणून त्यातून अर्धी भाकर व सनदा शाहूचे ओट्यांत घातल्या आणि मस्तकीं हात ठेऊन बहुत दिवस राज्य करशील असा आशीर्वाद दिल्हा. आणि आह्मीं असतां यास सोडिलें असतां आमचे नेमांत अंतर पडेल याजकरितां आमचे पश्चात् यास सोडावें असें बेगमेस बोलून शके १६२८ मार्गशीर्ष व० ३० शनिवारीं निवर्तले, नगर मुकामीं त्यांची कबर रोज्यास नेऊन केली. ती मोकळी आहे. तिजवर घुमट नाहीं. त्या कबरीवर बेगमेनें आपल्या हातें जाईचा वेल लाविला तो अद्याप कायम असून

---

२ औरंगजेब कधीं वारला याविषयीं वरकरणी मतभेद आहे. ( १ ) जुलुसी सन ५१, जिलकाद २८, हिजरी सन १११७ भृगुवारीं दोनप्रहरीं मृत्यू पावले, ह्मणून शहाजोंच्या कैफियतींत लिहिलें आहे. ( का. पत्रें, यादी ४३८. ) ( २ ) शके १६२८ व्ययनामसंवत्सरे सन सबा मया व अलफ ह्मणून थोरल्या शाहूच्या चरित्रांत ह्मटलें आहे ( थो. शा. च. पृ. ६. ) ( ३ ) शके १६२८ व्ययनामसंवत्सरीं माघ वद्य अमावास्येस वारले असें विधान थोरल्या राजारामाचें चरित्रांत सांपडतें. ( पृष्ठ ७३. ) ( ४ ) आपल्या कारकीर्दीच्या ५० व्या वर्षी, इ. स. १७०७ फेब्रुवारी २१ स औरंगझेब मेला, ह्मणून रा. सरदेसाई मुसलमान रियासतींत लिहितात, [ पृष्ठ ६१५. ] ( ५ ) ही शेवटली तारीख ग्रांट डफचीच आहे. ह्यांपैकीं खरी तारीख कोणती? हिजरी सन १११७च्या जिलकादच्या २८ तारखेला भृगुवार नसल्यामुळें पहिला सन खोटा आहे. शके १६२८ च्या माघ वद्य अमावास्येस जिल्काद महिना नसल्यामुळें तिसरी मित्ती विश्वसनीय नाहीं. बाकी राहिलेल्या मित्त्या खऱ्या आहेत. शके १६२८, सन सबा मया व अलफ, हिजरी सन १११८, जुलुसी सन ५० च्या जिल्कादच्या २८ व्या तारखेस, फाल्गुन वद्य १४ स, मुसलमानांच्या भृगुवारीं व हिंदूंच्या गुरुवारीं रात्रौ औरंगझेब वारला. अर्थात् वरती मूळ शकावलींत दिलेली शके १६२८, मार्गशीर्ष वद्य ३० रविवार, ही मित्ती बरोबर नाहीं. कांकीं मार्गशीर्षांत जिल्काद महिना नव्हता. मुसलमान लोक शुक्रवारीं मरण्यांत मोठें पुण्य समजतात. ग्रांट डफनें जुनी जंत्री उपयोजिल्यामुळें त्याची इंग्रजी तारीख एकाच्या आंकड्यानें चुकली आहे. खरी तारीख २० फेब्रुवारी १७०७, गुरुवार इंग्रजी आहे.

बारमाही फुलें येऊन कबरीवर पडत असतात. ग्रांट डफचे बखरींत ता० २१ फेब्रुवारी सन १७०७ इसवींत मयत झाल्याची तारीख लिहिली आहे तींत व वरील मित्तींत अजमासें दोन महिन्याचें अंतर आहे.

औरंगझेबास तीन पुत्र होते, वडील सुलतान माजूम, दुसरा अजीमशा व तिसरा कामबक्ष. त्यांमध्यें तक्ताविषयीं भांडण लागलें. सुलतान माजूम व अजीमशा यांची लढाई झाली. तींत अजीमशा पुत्रासहित मरण पावला. कामबक्ष याजवर सुलतान माजूम याणें झुलफिकरखानास पाठविलें. त्या लढाईत कामबक्ष मरण पावला. मग माजूम तक्ताधीश झाला. सुलतान माजूम यानें झुलफिकरखानास दक्षिण प्रांतांचा अधिकार दिला. औरंगझेब मरतेसमयीं जवळ एक पुत्र अजीमशा होता. त्यानें मराठ्यांचे उपद्रवामुळें शाहूची आई व भाऊ व बायको ओलीस ठेऊन शाहूस मुक्त केलें. तेव्हां शाहूमहाराजांनीं त्यांशीं करार केला होता कीं मला राज्यपद मिळाल्यास मी तुमचे आज्ञेंत वागेन. त्याजवर अजीमशानें उत्तर केलें कीं, जर तूं नीट वागलास तर तुझे बापानें घेतलेला मुलूख व भीमा आणि गोदा या दरम्यानच्या मुलूखांपैकीं कांहीं देऊं. सुलतान माजूम पातशाहा औरंगजेबाचे जागीं स्थापन झाल्यावर झुलफिकरखानास हैदराबादेकडे लढाईस पाठविलें. तेव्हां शाहूमहाराजांनीं त्यास मदत केली. तेव्हां त्यानें पातशाहास सांगितलें कीं तुह्मीं शाहूस अनुकूळ करून घेतल्यास तुमचें हित होईल. त्यावरून शाहूस दक्षिणेंतील सरदेशमुखीची सनद देण्यास सिद्ध झाला. परंतु तेव्हां ताराबाईचे वकीलांनीं तक्रार केल्यावरून, राज्याचा मालक वास्तविक कोण हें ठरेंपर्यंत सनद देण्याचें तहकूब ठेविलें. सनदा ताराबाईचे पुत्र शिवाजी यांच्या नांवें तयार झाल्या होत्या. इकडे शाहूमहाराज दिल्लीहून येतांना त्यांणीं वऱ्हाड व खानदेशांतील दोन सरदार वश केले व हैबतराव निंबाळकर व नेमाजी शिंदा वगैरे सरदार अनुकूळ करून एकंदर १५००० फौज जमवून साताऱ्यास येत असतां ताराबाईकडील धनाजी जाधवराव व प्रतिनिधि

फौजसुद्धां शाहूमहाराजावर चालून आले. त्यांशीं लढाई पुण्यानजीक कसबें खेड येथें होतांना धनाजी जाधवराव शाहूमहाराजास मिळाला. प्रतिनिधि पळून गेले. पुढें त्यास कैद केलें. शाहूमहाराज साताऱ्यास आले. गादीवर बसल्यावर परशराम त्रिंबक प्रतिनिधि यास कैद करून गदाधर प्रल्हाद प्रतिनिधी केला, व बहिरोपंत पिंगळे यास कायम पूर्वीप्रमाणें केलें. सेनापती धनाजी जाधवराव पूर्वीचें यांजकडे असलेले प्रांताचे वसुलाचें काम सांगितलें. त्या कामावर धनाजीनें दोन कारकून ठेविले, एक अंबाजी त्र्यंबक पुरंधरे व बाळाजी विश्वनाथ; व त्यांची व महाराजांची भेट करविली. पुढ कांहीं दिवसांनीं इ० स० १७१० सालीं धनाजी जाधवराव यांस पायावर जखम झाली होती त्यायोगें वारणातीरीं वारले. त्यांजबरोबर बाळाजी विश्वनाथ; होते. धनाजी जाधव विद्यमान अजारी असतांच त्यांचा सर्व कारभार बाळाजी विश्वनाथच चालवीत असत. ह्मणून महाराज यांचीहि प्रीति त्यांजवर बसली होती. धनाजीराव वारल्यावर बाळाजी विश्वनाथ यास सेनाकर्ते असा किताब महाराजांनीं दिला. याजमुळें धनाजीराव यांचे पुत्र चंद्रसेन जाधव याणीं बाळाजी विश्वनाथाविषयीं द्वेष करण्यास आरंभ केला. सेनाकर्ते हें पद बाळाजी विश्वनाथास इसन्ne अशर मया व अलफ छ १७ रजब रोजीं मिळालें.[३]

---

३ इसन्ने अशर मया व अलफ छ १७ रजब ह्मणजे २० आगस्ट १७११ पर्यंत व औरंगझेबाच्या मृत्यूपासून ह्मणजे २० फेब्रुवारी १७०७ पासून शाहूचा काल कसा गेला तें मित्तीवार समजल्यावांचून शाहूच्या व बाळाजी विश्वनाथाच्या चरित्रांतील पुष्कळ गोष्टींचा उलगडा होणार नाहीं. औरंगझेबाच्या मृत्यूनंतर अजीमशहा दिल्लीस निघाला त्याच्या बरोबर बेगमांच्या गोटांत शाहूहि गेला हें उघड आहे. अजीमशहा व सुलतान माजूम ह्यांची लढाई आग्रयाजवळ जाजव येथें ३१ मे १७०७त झाली. ह्या अवधींत ताराबाईकडील लोकांनीं चाकण वगैरे मोंगलांचीं ठाणीं घेतलीं. तेव्हां आग्रयाकडे जात असतांना किंवा आग्रयाच्या आसपास असतांना अजीमशहानें शाहूस दक्षिणेकडे जाण्याची परवानगी १७०७ च्या मार्च महिन्याच्या

सुलतान माजूम पातशहा इ० स० १७१२ त मयत झाला. त्याचे पुत्र तक्ताविषयीं भांडूं लागले. त्या समयीं पातशाही दरबारांत शेख

---

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू. ]

अखेरीस दिली असावी. सबंद एप्रिल महिना आग्रयापासून खेडापर्यंत येण्यास शाहूनें घेतला असावा. वऱ्हाडांतील परसोजी भोसले व चिमणाजी दामोदर हे येऊन शाहूला मिळाले. नंतर नंदरबारचा मोहनसिंग येऊन मिळाला. पुढें अमृतराव कदम बांडे आला. ह्या अमृतराव कदम बांड्याला काफीखान, अंबू पांडे ह्या नावानें संबोधितो. बे आणि पे फारशींत दिसण्यांत सारखींच अक्षरें दिसतात त्यामुळें बांडे ह्याच्या बद्दल पांडे अशी काफीखानाची बखर वाचणाऱ्याची चूक आहे. अमृतराव ह्याचें ऱ्हस्वरूप अंबू असें होण्यासारखें आहे. मुसलमान लोक त्यावेळच्या मराठ्यांना मगरूरीनें ऱ्हस्व नावानेंच प्राय: संबोधीत असत. औरंगझेबानें शिवाजी, संभाजी, ह्या नांवाच्या ऐवजीं आपल्या पत्रांत शिवा, संता, संभू अगर संभा अशीं ऱ्हस्व रूपेंच बहुधा उपयोजिलीं आहेत. शाहू आग्रयाहून किंवा त्या शहराच्या जवळून जो निघाला तो हांडिया, बऱ्हाणपूर, नंदूरबार, औरंगाबाद, कायगांवटोकें, अंहमदनगर, पारद, व खेड, अशा रस्त्यानें साहजिकच भीमानदीवर आला. येतांना औरंगाबादेजवळ रोजास औरंगझेबाच्या थडग्याची त्यानें पूजा केली. ही मुत्सद्दीपणाची वर्तणूक करून त्यानें गंगानदी ह्मणजे गोदावरी नदी कायगांव टोक्यासच उतरली असावी. औरंगाबादेपासून दौंडापर्यंत भोसल्यांच्या कुळांतील निरनिराळ्या शाखा पसरलेल्या होत्या, त्यांचीही जान पछान शाहूच्या बहुत उपयोगी पडली असावी. खेडची लढाई मे महिन्यांत झाली. मल्हार खंडेराव चिटणीस खेडच्या लढाईची मित्ती शके १६२९ सर्वजित्नामसंवत्सर सन समान मया व अलफ ह्मणजे इ० स० १७०७ मे देतो. खेडाहून चाकण, पुणें, जेजुरी, वीरवाल्हे, दहींगाव ह्या रोखानें शाहू चंदनवंदनाखालीं येऊन राहिला. चंदन वंदन किल्ले कदाचित् शेखमिऱ्याच्या व बहुश: प्रतिनिधीच्या ताब्यांत असावे. तेथें सबंद पावसाळा काढून १७०७च्या सप्टेंबरांत साताऱ्याच्या किल्याला शाहूनें शह दिला. शाहू शके १६२९च्या माघमासाच्या शुद्धपक्षीं ह्मणजे १७०८च्या जानेवारींत साताऱ्यास जाऊन राज्याभिषिक्त झाला. १७०७च्या जानेवारीपासून अक्टोबरापर्यंत शाहू काय करीत होता तें माहीत नाहीं. १७०८च्या

अब्दुलखान व हुसेनखान हे दोघे सय्यद प्रमुख होते. त्यांनीं सुलतान माजुमाचे पुत्राचा पुत्र फरोजसर यास पातशाही तक्तावर इ० स०

---

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू. ]

अक्टोबरांत शाहू पन्हाळ्याकडे गेला तो १७०९च्या जूनपर्यंत तेथें असावा. १७०९चा पावसाळा शाहूनें सातान्यास काढिला असावा. १७०९च्या अक्टोबरापासून १७१०च्या जूनापर्यंत शाहू कोल्हापुराकडे होता. १७१०च्या मे जूनांत धनाजी जाधराव कोल्हापुराहून येतांना वारणातीरीं वारला. शाहू साताराप्रांतीं आला ह्मणजे ताराबाई व तिचे सांथीदार. कोल्हापूरप्रांतीं दंगा करीत व तो कोल्हापूर प्रांतीं गेला ह्मणजे ते सातारप्रांतीं दंगा करीत. हा खेळ १७०८ पासून १७१०च्या जूनापर्यंत एकसारखा चालला होता. आप्पाजी थोरात, दमाजी थोरात, शहाजी निंबाळकर, संताजी पांढरे, रामचंद्र नीळकंठ अमात्य, खेम सावंत, उदाजी चव्हाण, कान्होजी आंग्रे व शंकराजी नारायण सचीव ह्यांनीं पुण्यापासून कोल्हापुरापर्यंत ताराबाईच्या वतीनें दंगा चालविला होता. धनाजी जाधव सेनापति, हैबतराव निंबाळकर सरलष्कर, खंडेराव दाभाडे, मानसिंग मोरे, परसोजी भोंसले, चिमणाजी दामोदर, खंडो बल्लाळ, बहिरोपंत पिंगळे, वगैरे मंडळी शाहूकडे होती. शाहूच्या हातांत साक्षात् मुलूख ह्मटला ह्मणजे सातान्याच्या भोंवतालील पांचपंचवीस मैलांपेक्षां जास्त नव्हता. सुप्याकडे दमाजी थोरात, भोराकडे शंकराजी नारायण सचिव, फलटणाकडे शहाजी निंबाळकर, उदाजी चव्हाण मिरजेकडे, खेम सावंत दक्षिणकोंकणांत व कान्होजी आंग्रे उत्तरकोंकणांत, ताराबाईच्या वतीनें भांडत होते. मोंगलाच्या तर्फेनें उगाच ढोंग करून कृष्णराव खटावकरानें कृष्णेच्या पलीकडील सगळा माणदेश आटोपला होता. परशरामपंत प्रतिनिधि अटकेंत असून त्याच्या औंध वगैरे प्रांतांत शाहूच्या विरुद्धच खटपट चालू होती. १७१०त शाहूची अशी भयंकर स्थिति होती. १७०७ पासून १७१० पर्यंत लढून शाहूची सत्ता पांचपंचवीस मैलांपलीकडे फारशी पसरली नव्हती; परंतु ताराबाईचा व शिवाजीचा पक्ष दिवसेंदिवस बळावतच चालला होता. १७१०त त्यांनीं कोल्हापुरास आपली कायमची राहण्याची जागा केली. १७१०च्या मे जूनांत धनाजी जाधव वारल्यावर तर ताराबाईच्या पक्षाला फारच जोर आला. धनाजी जाधवाचा पुत्र जो चंद्रसेन जाधव त्याचा कल धनाजी

१७१३ त कायम केलें. दक्षणचा अधिकारी दाऊदखान पन्नी याचे जागेवर चिनकुलिचखान यास नेमिलें. चिनकुलिचखानाचें पूर्वीचें नांव कमरुद्दीन असें होतें. त्यास निजामुन्मुलुख असा किताब देऊन १७१३ त दक्षिणेंत पाठविलें.

---

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू. ]

असतांना देखील ताराबाईकडेच होता. धनाजी मेल्यावर तर तो राजरोस ताराबाईला जाऊन मिळण्याच्या रंगांत आला. ह्याचवेळीं चंद्रसेनाचा व बाळाजी विश्वनाथाचा हरिणासंबंधानें तंटा झाला. तंटा होण्याचें मुख्य कारण, हरिण नसून, पक्षभेद होता. चंद्रसेनानें ताराबाईची बाजू उचलली होती, व बाळाजी विश्वनाथ शाहूच्या पक्षाला पूर्वीपासून ह्मणजे १७०७ पासूनच धरून होता. शिवाय ब्रह्मेंद्रस्वामीचेंहि लक्ष शाहूकडे असल्यामुळें बाळाजीला शाहूराजाच विशेष प्रिय होता. १७१०च्या जून पासून १७११ आगस्टापर्यंत ह्मणजे बाळाजी विश्वनाथाला सेनाकर्ते हें पद मिळे तोंपर्यंत शाहूचा काल अत्यंत भयंकर अशा संकटांचा गेला. ह्या चौदा महिन्यांत शाहूजवळ ह्मणण्यासारखें सैन्य नव्हतें. परसोजी भोसले व चिमणाजी दामोदर आपापल्या सैन्यासह वऱ्हाडांत व खानदेशांत होते. अमृतराव बांडे नाशीकनंदुरबाराकडे होता. चंद्रसेन जाधव फितल्यामुळें मुख्य सैन्य शाहूराजाच्या विरुद्धच होतें. फक्त बाळाजी विश्वनाथाबरोबर जाधवाच्या सैन्यांतून फुटून आलेले होनोपंत वरेकर, नारोराम शेणवी, जीवनराव सुमंत औरंगाबादकर, कोकाटे व जाधव अशा शिलेदारांची दोन हजार फौज मात्र शाहूजवळ साताऱ्यास १७११च्या सुमारास जमली. ( अमात्य बावडेकर यांची कैफियत, पृष्ठ १४. भारतवर्ष. ) हैबतराव निंबाळकर ह्यावेळीं गोदावरी तीराला वसूल करण्याच्या खटपटींत गुंतला होता. सैन्यबलासंबंधानें शाहूची ह्यावेळींही अशी स्थिती होती. शाहूची ही दैन्यावस्था पाहून ताराबाईनें व शिवाजीनें आपलें काम जास्तच नेटानें चालविलें. त्यांनीं खंडेराव दाभाडे, मानसिंग मोरे, परशरामपंत प्रतिनिधी, व हैबतराव निंबाळकर या सर्वांच्या बुद्धीला भ्रंश पाडून आपल्या बाजूला येण्याविषयीं त्यांचीं मनें वळविलीं. (भारतवर्ष, पत्रें, यादी वगैरे ५०). हा बुद्धिभ्रंश करण्याच्या कामीं चंद्रसेन जाधव मुख्य होता, हें भारतवर्षांतील ५० व्या पत्रावरून उघड आहे. सदरहू पत्र पराकाष्टेच्या महत्वाचें आहे. त्याचें जितकें इतिहास-

म-III-३०/२८



रामचंद्रपंत अमात्य याचे पदरचा दमाजी थोरात हिंगणगावचे गढींत राहून आसपास वीस कोस मुलूख लुटीत असे. त्याचे पारपत्यास बाळाजी विश्वनाथ यास महाराजांनीं नेमिलें. त्यावरून फौज बरोबर घेऊन अंबाजी त्रिंबक व स्त्री राधाबाई व उभयता पुत्र बाजीराव व चिमाजी

---

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू. ]

दृष्टया महत्व आहे, तितक्याच काळजीनें जर तें छापलें गेलें असतें, तर दोन चार शंकांना जागा राहिली नसती. ह्या पत्रांत चंद्रसेन जाधवराव ह्या नांवाबद्दल जयसिंग जाधवराव, असें नांव आहे तें बरोबर आहे; परंतु एका ठिकाणीं रामसिंग मोरे व दुसऱ्या ठिकाणीं मानसिंग मोरे, राजश्री थोरात व राजश्री रावजी थोरात अशी विशेषनामांची गफलत झालेली आहे, ती मात्र अक्षम्य आहे. जर मूळ पत्रांत रामसिंग मोरे व मानसिंग मोरे अशीं दोन नांवें खरोखरींच निराळीं स्पष्ट असलीं तर मग कांहीं शंकेला जागाच नाहीं; परंतु संपादकांच्या हलगर्जीपणानें जर वाचनाच्या चुकीनें हा पाठभेद झाला असेल तर मात्र संपादकांनीं ऐतिहासिक कागद छापण्याच्या कामीं ह्याहून विशेष खबरदारी घेतली पाहिजे, अशी इशारत करणें जरूर दिसतें. हें पत्र २७ आगस्ट १७११ला लिहिलेलें आहे. त्यांत १७११ च्या अगोदर वर सांगितलेले सर्व सरदार ताराबाईला मिळण्यास तयार आहेत, असा स्पष्ट व विस्तीर्ण खुलासा आहे. हा फितवा फलद्रूप होण्याचा ऐन रंग एकट्या बाळाजी विश्वनाथाच्या शहाणपणानें बिनसला. चंद्रसेन जाधव व हैबतराव निंबाळकर हे दोघे यद्यपि फितून गेले, व शाहूजवळ सैन्य बिलकुल राहिलें नाहीं; तथापि बाळाजी विश्वनाथानें आपल्या जवळची दोन हजार व बाहेरची तसलमातीची कांहीं फौज ( अमात्य बावडेकर यांची कैफियत, पृष्ठ १९ ) जमवून शाहूचें सैन्य पुन्हां नव्यानें निर्माण करून दिलें. ह्या कर्तबगारीबद्दल बाळाजी विश्वनाथाला सेनाकर्ते ही पदवी शाहूनें दिली. सेनाकर्ते ह्मणजे सेना बनविणारे, नवीन निर्माण करणारे असा अर्थ ह्या शब्दाचा आहे. ह्या शब्दाचा अर्थ व महत्व ग्रांट डफच्या ध्यानांत न आल्यामुळें हरिणाच्या तंट्याची व सेनाकर्ते पद मिळाल्याची हकीकत त्यानें इ० स० १७१३ सालांत घातली आहे; परंतु सेनाकर्ते हें पद १७११च्या २० आगस्टाला मिळालें व जाधवरावाचा फितवा १७११च्या २७ आगस्टाच्या अगोदर झाला, हें अस्सल लेखी पुराव्यानें सिद्ध झालें असल्यामुळें,

अप्पा असे बरोबर घेऊन हिंगणगावास आले. ती फौज पाहून दमाजी थोरात यानें बाह्यात्कारी गरीबी दाखवून, तहाचें बोलणें लावून, भेटीकरितां बाळाजी विश्वनाथ वगैरे मंडळीस बेलभंडाराचे इमानशफत देऊन विश्वासानें बोलावून गढींत येण्याबरोबर त्यांस कैद केलें. तेव्हां त्यास बेलभंडार इमान दिल्याची ओळख देतां, त्यानें उत्तर दिलें कीं, बेल ह्मणजे झाडपाला व भंडार आह्मी नित्य पदार्थांत खातच असतो.

---

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू. ]

ग्रांटडफचा १७१० पासून १७१३ पर्यंतचा वृत्तांत गफलतीचा आहे ह्यांत बिलकुल संशय नाहीं. सेनाकर्ते ह्मणजे Agent in charge of the army असा ग्रांट डफ अर्थ करतो, तो सपशेल चुकलेला आहे. धनाजी जाधवाच्या मृत्यूनंतर, व १७१०च्या पावसाळ्यानंतर, व हरिणाचा तंटा झाल्यानंतर बाळाजी विश्वनाथाची व चंद्रसेन जाधवाची नीरेवर लढाई झाली, बाळाजी पांडवगडावरून साताऱ्यास शाहूकडे आला व चंद्रसेन फितून १७११ च्या प्रारंभीं कोल्हापूरास जाण्याच्या बेतांत होता. इतक्यांत शाहूच्या आज्ञेवरून हैबतराव निंबाळकर चंद्रसेनावर चालून आला व त्या दोघांची लढाई आंदरकीच्या घाटाखालीं १७११ च्या मार्च एप्रिलांत झाली. इतक्यांत शाहूच्या सर्व सरदारांनीं त्यास सोडिलें आहे, अशी हैबतराव निंबाळकरास बातमी लागल्यावरून तो शाहूस सोडून ताराबाईस मिळण्याच्या बेतांत होता. ही सर्व हकीकत १७११ च्या आंत झाली. १७१३ सालाशीं ह्या प्रसंगांचा संबंध बिलकुल नाहीं. शाहूच्या सरदारांत ताराबाईनें हा जो फितवा केला तो तिच्या फारसा उपयोगीं पडला नाहीं. कारण, ज्याच्या जोरावर ताराबाईनें हें कारस्थान रचिलें होतें तो धाकटा शिवाजी १७१२च्या मे महिन्यांत वारला. धाकटा शिवाजी १७१२च्या जानेवारींत वारला ह्मणून डफ ह्मणतो [ Duff's History, Chap.XII ] परंतु काव्येतिहाससंग्रहांतील ४०९वें पत्र धाकट्या शिवाजीनें राज्याभिषेक शके ३८ नंदननामसंवत्सरे चैत्रबहुल त्रयोदशी भौमवासरे ह्मणजे १७१२च्या एप्रिलच्या १४ तारखेस लिहिलें असल्यामुळें डफचा जानेवारी चुकला आहे हें स्पष्ट आहे. धाकटा शिवाजी वारल्याबरोबर ताराबाईचे सर्व बेत फसले व शाहूचें दैव पुन्हां सांवरलें. शिवाजी वारल्यावर थोड्याच दिवसांनीं। शके १६३४, सल्लास अशर मया व अलफांत [ थो. शा. च. १८।१९ ]

असें सांगून त्यांजपुढें ऊनऊन राखेचे तोबरे ठेवून मनस्वी खंडणी मागूं लागला. खंडणी आल्याशिवाय सोडणार नाहीं असा त्याचा निग्रह पाहून, त्याजपाशीं ओलीकरितां राधाबाई स्त्री व बाजीराव व चिमाजी आप्पा पुत्र असे ठेवून पुरंदरे व आपण परत येऊन महाराजास झालेला मजकूर कळविला. त्यानंतर महाराजांनीं त्याचे कराराप्रमाणें भूर्दंड भरून बाळाजी विश्वनाथ यांचीं मुलें माणसें सोडवून आणिलीं. नंतर आणखी थोरातावर पंतसचिव यास जावयाविषयीं आज्ञा झाली. त्याप्रमाणें ते गेले असतां त्यासहि कैद केलें. कान्होजी आंग्रे बिन तुकाजी आंग्रे यांनीं संभाजीचा पक्ष धरून महाराजाकडील सुवर्णदुर्ग विजयदुर्ग वगैरे कोंकणप्रांतीचे किल्ले घेऊन पेशवे पिंगळे यांचा कल्याण प्रांतहि घेतला, त्याचे पारपत्यास प्रथम बहिरोपंत पिंगळे पेशवे गेले असतां

---

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू. ]

ह्मणजे १७१२ च्या पावसाळ्यानंतर ह्मणजे कार्तिकांत ह्मणजे आक्टोबर नोव्हेंबरांत शंकराजी नारायण सचिवानें जलसमाध घेतली. शंकराजी नारायण १७११त वारला, ह्मणून डफ ह्मणतो तें अर्थात् चुकलेलें आहे. येणेप्रमाणें १७०७ पासून १७१२च्या पावसाळ्यापर्यंतच्या कांहीं प्रसंगांची हकीकत आहे. ह्या पांच सालांची ग्रांट डफनें जी गफलत केली आहे, ती केवळ अवर्णनीय आहे. मल्हार खंडेरावावर सर्वस्वीं विश्वास ठेविल्यामुळें ग्रांट डफ बहुश: ह्या घोटाळ्यांत पडला. डफनें स्वत:जवळ असलेल्या अस्सल कागदपत्रांच्या मिल्यांकडे लक्ष दिलें असतें तर तो बचावला असता.

४ थोरातावर १७१२ त स्वारी बाळाजी विश्वनाथानें केली नसावी. कारण सेनाकर्ते पद मिळाल्यावर जी पहिली स्वारी बाळाजीनें केली तींत त्याचा पराजय झाला असता तर त्याचें वजन बिलकुल रहातेंना. शिवाय १७१६त थोरातावर बाळाजीनें स्वारी केली होती असें शकावलींत ह्मटलें आहे. तेव्हां ही स्वारी १७१२ व १७१३त झाली नाहीं हें खचित आहे. १७१२च्या पावसाळ्यांत शंकराजी नारायण सचिव वारल्यावर त्याचा मुलगा नारो शंकर यास सचिव पद देण्याचें अभिवचन देऊन त्याच्याकडे ह्मणजे त्याच्या आईकडे व मुत्सद्यांकडे थोरातावर स्वारी करण्याचें काम सांगितलें व त्या कामावर सचिव गेला असतां थोरातानें त्यास कैद केलें. ह्याच सुमारास

त्यास आंग्रे यांनीं कैद केल्याचें वर्तमान समजतांच बाळाजी विश्वनाथ यांस आंग्र्यावर स्वारीस पाठविलें. त्यांनीं आंग्रे यांचा पराक्रम जाणून युद्धापेक्षां तह करावा असें मनांत आणून महाराजाकडील अवघड किल्ले १ खांदेरी, २ कुलाबा, ३ सुवर्णदुर्ग, ४ विजयदुर्ग, ५ जयगड, ६ देवदुर्ग, ७ कनकदुर्ग, फत्तेगड, ९ अचितगड, १० यशवंतगड, असे दहा किल्ले व सागरगड व त्या खालील मुलूख सरंजामी गांव वगैरे होते, त्यासुद्धां आंग्रे याजकडे ठेविले. त्यास गलबतांचा अधिकारी करून सरखेल पद कायम केलें, आंग्रे यांनीं पिंगळे यास सोडावें व राजमाची खेरीज शाहूचे किल्ले घेतले ते द्यावे, शाहू महाराजाचा पक्ष धरावा, व संभाजीचा पक्ष धरू नये, असें ठरवून बाळाजी विश्वनाथ यांनीं पिंगळे यांस आंग्रे याजकडून सोडवून आणिल्यावर त्यास बरोबर घेऊन सातान्यास आले.

---

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू. ]

ह्मणजे १७१३ त प्रतिनिधीला कृष्णराव खटावकरावर व पिंगळ्याला आंग्र्यावर शाहूनें पाठविलें. प्रतिनिधींचा मुलगा श्रीपतराव यानें कृष्णरावाला शाहूच्या पक्षास आणून मिळविलें व आंग्र्यानें पिंगळ्यास जिंकिल्यामुळें बाळाजी विश्वनाथास आंग्र्यावर पाठवावें लागलें. दमाजी थोरात, शहाजी निंबाळकर, उदाजी चव्हाण, सर्जेराव घाटगे, कान्होजी आंग्रे, वगैरे गृहस्थांना पुंड ह्मणून संज्ञा बखरकारांनीं दिली आहे तिचा अर्थ बराबर ध्यानांत आणिला पाहिजे. हे गृहस्थ पुंड नसून ताराबाईचे पक्षाभिमानी सरदार होते. १७०० पासून १७०८ पर्यंत ताराबाईच्या अमदानींत ह्या सरदारांनीं मराठ्यांची बाजू मोठ्या शौर्यानें संभाळिली होती. ग्रांट डफनें आपल्या इतिहासाच्या ११ व्या भागांत एका टीपेंत पदाजी घाटगे, परशरामपंत प्रतिनिधींचा भाऊ माधवराव, तुकोजी मल्हार, संताजी नांदेडे, लिंगोजी माने भालेराव वाडगे, व शहाजी निंबाळकर ह्यांस कृष्णराव खटावकरानें ज्यांत चोर ह्मणून ह्मटलें आहे अशा अर्थाचें एक पत्र छापिलें आहे. त्या पत्रांत जो शहाजी निंबाळकर येतो तोच भारतवर्षांतील ५० व्या पत्रांतील शहाजी निंबाळकर होय. वर सांगितलेले गृहस्थ ताराबाईचे कट्टे अभिमानी होते व

असाच एक बंड करणारा शंभु महादेवाचे डोंगराजवळ कृष्णराव खटावकर नामेंकरून होता. त्याजला मोंगलांकडून राजा असा किताब होता. त्याचे पारिपत्यास बाळाजी विश्वनाथास पाठविलें, व त्याचे मदतीस परशराम त्र्यंबक प्रतिनिधी याचा दुसरा मुलगा श्रीपतराव यास पाठविलें. त्यानें खटावकर यास जिंकिलें. या कामीं त्याणीं बहुत शौर्य केलें, सबब महाराज प्रसन्न होऊन परशराम त्र्यंबक प्रतिनिधि कैदेंत होते, त्यांस मुक्त करून प्रतिनिधिपद वंशपरंपरेनें दिलें. राजशक ४० जयनामसंवत्सरे वैशाख शु० ९, अर्बा अशर मया व अलफ, छ ४ रबिलाखर, ( ८ एप्रिल १७१४ ) या दिवशीं प्रतिनिधीला सनद दिली. खटावकर यांस गांव वंशपरंपरेनें इनाम दिला.

---

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू. ]

ते शाहूच्या विरुद्ध लढत असल्यामुळें पेशव्यांच्या व शाहूच्या तर्फेच्या बखरनविसांनीं त्यांस पुंड ह्मटलें आहे. ह्या सरदारांचा ताराबाईच्या पक्षानें भांडण्यांत दुसरा एक मुद्दा होता. राजाराम महाराजांच्या वेळेस ह्या सर्व सरदारांना इनामें मिळालेलीं होतीं व तीं शाहू थोरल्या शिवाजीचें अनुकरण करून काढून घेईल, अशी त्यांस भीति होती.

येथें एका गोष्टीचा सविस्तर उल्लेख करणें जरूर आहे. जहागीरदारी पद्धत महाराष्ट्रांत कधीं सुरू झाली? जहागिरी कोणाला द्यावयाच्या नाहींत, असा शिवाजीचा संकल्पच होता. देशमुख देशपांड्याचे हक्क काढून घेण्याच्या कामीं शिवाजीचा हातखंडा असे. शिवाजीच्या पुढें संभाजीच्या कारकीर्दींतही कोणाला जहागीर दिल्याचा उल्लेख आढळत नाहीं. राजाराम महाराज चंदीस गेल्यावर मात्र महाराष्ट्रांतील कर्त्या व पुढारी लोकांना इनामांच्या सनदा देण्याचा सपाटा सुरू झाला. औरंगझेबानें सगळें महाराष्ट्र जेव्हां जिंकून टाकिलें, तेव्हां महाराष्ट्रधर्माच्या वर्तीनें व स्वराज्याच्या संरक्षणार्थ जे कोणी कर्ते पुरुष चंदीस जाऊन औरंगझेबाच्या विरुद्ध लढण्याचें वचन देतील त्यांस इनामें देण्यास राजारामानें व त्याच्या मुत्सद्यांनीं बिलकुल कसर केली नाहीं. वाई येथील श्री० तात्यासाहेब पंत राजाज्ञा यांचे दफ्तर तपासतांना चंदीहून राजारामानें औरंगझेबाच्या विरुद्ध श्रमसाहस करण्याकरितां दिलेलीं वंशपरंपरा इनामें व पदव्या ज्या मला आढळल्या, त्या वाचून मी अगदीं थक्क

अशीं मोठीं कामें बाळाजी विश्वनाथ यांनीं केलीं, हे यशस्वी व फौजेचे व मुत्सद्दीपणाचे कामायोग्य, मर्द माणूस, सबब बहिरोपंत पिंगळे यांजकडील पेशवेपद दूर करून छ ९ जिलकाद, अर्बा अशर मया व अलफ सालीं ( १६ नोव्हेंबर १७१३ ) बाळाजी विश्वनाथांस मौजे मांजरी, प्रांत पुणें या मुक्कामीं पेशवेपद दिलें. इतमाम साहेबनौबत, जरीपटका, बादली, पांच सनगें, जवाहीरकंठी, ढालतलवार, शिक्केकटार, असा शके १६३५ सालीं दिला. खानदेश, माळवा व बागलाण सुभा सांगितला. पुढें हिंदुस्थानचा अंमल साधेल तो व गंगातीरीं मोंगलाईंतील सुभा दिला. कर्नाटक, चंदीचंदावर, त्रिचनापल्ली अंमल गेला, तो बसवावा. संस्थानिकांकडून खंडण्या येत ना त्या घ्याव्या. नौबतखाना

---

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू. ]

झालों. पदव्या व इनामें यांची लालूच दाखविल्यावांचून त्यावेळीं स्वराज्याची पुनः स्थापना खरोखर झाली नसती. मोंगलांची अवाढव्य सत्ता झुगारून देण्यास माणसांची प्रवृत्ति दुसऱ्या कोणत्याही लालूचीनें झाली नसती. वतनें, इनामें, देवस्थानें, अग्रहार, महाराष्ट्रांतील लोकांच्या फार पुरातन काळापासून आंगवळणीं पडलेलीं आहेत. देवगिरीच्या यादवानंतर झालेल्या दक्षिणेंतील मुसलमान पातशहांनींही, देशमुख, देशपांडे, पीर, फकीर, सरदार, दरखदार यांस सढकून इनामें व पदव्या दिल्या होत्या. तो क्रम शिवाजीनें बंद पाडला. इनामें मिळविण्याच्या इच्छेहूनही प्रबलतर जी महाराष्ट्रधर्म राखण्याची इच्छा तिचा पगडा शिवाजीच्या वेळीं महाराष्ट्रांतील लोकांच्या मनावर अतिच असल्यामुळें शिवाजीचा हा क्रम त्यावेळच्या मराठ्यांनीं कसा तरी सोशिला. पुढें राजारामाच्या कारकीर्दीत मराठ्यांना अत्यंत प्रिय जो इनामें, वतनें, वगैरे वंशपरंपरा मिळकत मिळविण्याचा हव्यास त्याचें संतर्पण करून मोंगलांची सत्ता झुगारून देतां आली. मोंगलांची सत्ता अन्य रीतीनें ह्यावेळीं झुगारून देतांच आली नसती. सारांश, पदव्या व इनामें देणेंच ह्यावेळीं रास्त होतें. शिवाजीनें जहागिरी देण्याचें बंद केलें हें अत्यंत शहाणपणाचें कृत्य त्यानें केलें असें न्यायमूर्ती रानड्यांच्या प्रमाणें माझेंही अंशतः मत आहे; परंतु शिवाजीच्या पुढील राजांनीं हा स्तुत्य क्रम सोडिला ही मोठी चूक झाली असें जें

महाराज असतील त्या मुलुखापासून दहा कोस आंत बंद असावा, ह्मणजे वाजवूं नये. शिवाय पेशवेपदास सरंजाम महाल वगैरे दिले. बाळाजी विश्वनाथ यांनीं आपल्या बरोबर रोजगाराकरितां सोबतीस आणिलेले अंबाजी त्र्यंबक पुरंधरे यांस आपली मुतालिकी, व रामाजीपंत भानू यांस फडनिशी अशी महाराजास विनंति करून देवविली. बाळाजी विश्वनाथ पेशवे झाले, त्या वेळेस अष्टप्रधान होते ते:—१ प्रतिनिधी, परशराम त्र्यंबक, २ अमात्य, अंबूराव बापू हणमंते. ३ सचिव, नारो शंकर, ४ मंत्री, नारोराम शेणवी, ५ सेनापति, मानसिंग मोरे, ६ सुमंत, आनंदराव, ७ न्यायाधीश, होनो अनंत ८ पंडितराव, मुद्गलभट उपाध्ये व ९ पेशवे, बाळाजी विश्वनाथ.

---

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू. ]

न्यायमूर्तींचें ह्मणणें आहे, तें मला प्राह्य दिसत नाहीं. राजारामानें इनामें देण्याचा क्रम सुरू केला ही चूक नसून त्या वेळच्या परिस्थितीला व राजकारणाला हा क्रम अत्यंत उपयोगी पडला. हा उपयोग दुसरा तिसरा कोणताही नसून स्वराज्याचें संरक्षण हाच होता. राजारामानें सढळ हातानें इनामें दिलीं ह्मणून मराठ्यांचें राज्य त्यावेळीं वाचलें: दाभाडे, आंग्रे, शिरके घोरपडे, घाटगे, चव्हाण, थोरात, ढमढेरे, भोंसले, वगैरे शेकडों मराठ्यांच्या इनामांचा प्रारंभ स्वराज्यसंरक्षणाचें महत्कृत्य करूनच झालेला आहे. शिवाजीच्यावेळीं जहागिरी न देणें जितकें शहाणपणाचें होतें तितकेंच राजारामाच्या वेळीं इनामें देणें शहाणपणाचें झालें. तात्पर्य, राजारामानें इनामें देण्याचा क्रम सुरू केला, ह्मणून त्याला दोष देणें योग्य नव्हे. शिवाय, हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, मराठेशाही १८००च्या पुढें बुडाली, ती राजारामानें उत्पन्न केलेल्या लहान लहान मराठे व ब्राह्मण इनामदारांच्या हातून बुडाली नसून पेशव्यांनीं उत्पन्न केलेल्या शिंदे, होळकर, पटवर्धन, वगैरे मोठमोठ्या राजासारख्या सरदारांच्या स्वतंत्र होण्याच्या इच्छेनें बुडाली. पेशव्यांची अवाढव्य जहागिरी पद्धत अत्यंत दुष्ट होती, हें मला कबूल आहे. परंतु राजारामाची लहान लहान इनामें देण्याची पद्धत केवळ स्तुत्य होती' असेंच ह्मणणें मला रास्त दिसतें. ह्यासंबंधीं आणखीही बरेंच खुलासेवार लिहिण्यासारखें आहे. परंतु हें स्थल त्या कामाला अपुरें असल्यामुळें त्याचा विचार अन्यत्र करणें इष्ट दिसतें.

पुणें सुभ्यांत पेशवे यांचा अमल झाला. पेशवे यांजकडील अंमलास व्यंकोजी ढमढेरे पुण्यास आले; रंभाजीराव निंबाळकर यांजडील बाजी कदम, याप्रमाणें पुण्यांत दोन अंमल झालें. पुणें प्रांत मोंगलाकडून जहागिर रंभाजी निंबाळकर याजकडे होता. शके मजकुरीं पेशवे यांचा अंमल बसला तो स्वराज्यापुरता बसला. किल्ले लोहोगडची सबनिशी रामाजी महादेव भानू याजकडे व नाणे मावळची मजमू हरी महादेव याजकडे पेशवे यांनीं सांगितली. त्या कामावर भिकाजी नारायण व अंताजी नारायण परचुरे होते.

---

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू. ]

शाहूच्या विरुद्ध ताराबाईच्या वतीनें खटपट करणारे थोरात वगैरे गृहस्थ पुंड नसून कट्टे देशभक्त होते हा सांगण्याचा मुख्य मुद्दा आहे. थोरात, आंग्रे, ~~[illegible]~~, यांना ताराबाईच्या वतीनें भांडण्यास दुसरें एक कारण झालें होतें तें हें कीं, औरंगझेबाच्या तडाक्यांतून महाराष्ट्र राज्य वाचविण्याचें महत्कृत्य राजाराम, ताराबाई व धाकटा शिवाजी ह्यांच्या पुढारीपणाखालीं ह्या सरदारांनीं सारखे २० वर्षे केलें होतें. आतां मध्येंच शाहू येऊन राज्यांत दुही माजवू लागला. शाहू २० वर्षे औरंगजेबाच्या छावणींत राहिलेला असून महाराष्ट्र राज्यसंरक्षणाच्या कामीं त्यानें बिलकुल खटपट केलेली नव्हती. त्याला दिल्लीच्या पातशाहांचा १७०७ पासून १७१२ पर्यंत पाठिंबा होता व तो राज्याचा धाकट्या शिवाजीप्रमाणें वारसही होता ह्मणून त्याला ५ वर्षे टिकाव धरून राहतां आलें. १७१२ त धाकटा शिवाजी वारला नसता व १७१३ च्या अगोदर निजामुन्मुलूख ताराबाईला मदत करण्यास आला असतां तर शाहू गादीवर खात्रीनें टिकला नसतां, असें जरी साफ ह्मणतां येत नाहीं, तरी त्याला आपली वांटणी घेण्यास बराच प्रयास पडला असतां ह्यांत संशय नाहीं. येथें एका शंकेचें निरसन करणें जरूर आहे. मराठी राज्यावर राजाच्या मृत्यूनंतर वडील मुलाचाच तेवढा हक्क असे असा कित्येकांचा ग्रह झालेला दिसतो; परंतु ही गोष्ट हिंदुधर्मशास्त्राच्या व रूढीच्या विरुद्ध आहे. शहाजीच्या हयातींत व नंतर शहाजीच्या इस्टेटीचे शिवाजी व व्यंकोजी असे दोघे सारखे वांटेकरी झाले. शिवाजीचें राज्य स्वोपार्जित असल्यामुळें व्यंकोजीला त्यांतील वांटा कायदेशीर रीतीनें मागतांच येत नव्हता. शिवा-

प्रतिनिधीस महाराजाकडून प्रतिनिधिपद दिल्याबद्दल राजाची सनद झाली ती अशी:—स्वतिश्री राज्याभिषेक शक ४० विजयनाम संवत्सरे वैशाख शु० ९ गुरुवासर क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी याणीं समस्त-राजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री परशराम त्र्यंबक प्रतिनिधि यांसी आज्ञा केली ऐसीजे:—तुह्मी स्वामी सन्निध विनंति केली ती तीर्थस्वरूप महाराज राजाराम काकासाहेब कैलासवासी यांचे कारकीर्दीत राज्यांत बहुत श्रमसाहस केले. यास्तव प्रतिनिधिपद अजरामरामत वतनी आपणास करून दिल्हें आहे. तें पत्र पाहून नवीन पत्र करून द्यावें ह्मणोन. त्याजवरून तें पत्र पाहून

---

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू. ]

जीच्या राज्यावर संभाजीचा व राजारामाचा सारखाच हक्क होता; परंतु संभाजीनें राजारामाला अटकेंत ठेवून त्याला आपला हक्क भोगूं दिला नाहीं. संभाजी नंतर शाहू व राजाराम असे दोघे राज्याचे वांटेकरी राहिले. पैकीं शाहू मोंगलाच्या अटकेंत राहिल्यामुळें राजारामाच्याच शिरावर राज्याचें ओझें पडलें. राजारामाला दोन पुत्र शिवाजी व संभाजी असे झाले. संभाजीला ताराबाईनें वर डोकें करूं न देतां शिवाजीच्याच नांवानें १७०० पासून १७०८ पर्यंत मराठ्यांचें आधिपत्य चालविलें. १७०८त मराठी राज्याला तीन वांटेकरी होते:—१ शाहू, २ शिवाजी व ३ संभाजी. पैकीं प्रत्येकानें आपापला हिस्सा आपापल्या सामर्थ्याप्रमाणें वाटून घ्यावयाचा होता. १७०७ पासून १७१२ पर्यंत हिश्शाबद्दल भांडण चांगलें खडाजंगी झालें. पुढें शिवाजी १७१२ त वारल्यावर भांडण संभाजी व शाहू ह्या दोघांत राहिलें. ताराबाईला भांडण्यास कांहीं कारणच राहिलें नाहीं. तिला एक नातू व्हावयाचा होता. तो होईपर्यंत ती स्वस्थ बसली व तिच्या हातचा डाव संभाजीची आई राजसबाई हिनें उचलला तो कायमचा उचलला. शाहू व संभाजी ह्यांचे राज्यावर हक्क सारखे असल्यामुळें तें त्यांनीं बहुतेक सारखें वांटून घेतलें. सारखें ह्या शब्दाची व्याख्या बलिष्ठानें वांटून दिलेलें व धर्मशास्त्राच्या पुण्याईनें अजीबात न बुडालेलें, अशी घ्यावयाची आहे. छत्रपति व क्षत्रियकुलावतंस हीं दोन्ही शिवाजीचीं बिरुदें कोल्हापूरचा संभाजी व सातारचा शाहू सारख्याच हक्कानें आपल्या नांवाला लावीत असत.

९ शाहू हें नांव कसें पडलें यासंबंधीं ग्रांटफडनें फारच विचित्र माहिती दिली आहे व तीच सध्या सर्वत्र प्रचलित झाली आहे. शाहूचें पाळण्यांतील

मनास आणितां पूर्वी राज्यावर औरंगझेब बादशाहा दक्षिणेंत येऊन सातारा, परळी, व विशाळगड, पन्हाळा या किल्यांस वेढा घालून बसले. ते समयीं तुह्मी झुंझण्याची शर्त केली. आणि पुन्हां बादशाहा माघारा फिरतांच श्रम जातीनिशी करून किल्ले घेतले. चंदीस महाराज गेले होते. तेथें धन्याचे साहित्याची सीमा केली. तेथून साहेब देशीं आल्यावर राज्य स्वाधीन केलें आणि आज्ञेप्रमाणें वर्तून एकनिष्ठपणें सेवा केली. अशीं महत्कार्यें करून राज्यरक्षण केलें. यास्तव तुह्मावर कृपाळू होऊन प्रतिनिधीचें पद तुह्मास वंशपरंपरेनें वतनी करून दिल्हे असे. भोसले यांचे राज्याचे वंशीं जो राज्य करील त्यानें तुमचे

---

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू. ]

नांव शिवाजी होतें व तें नांव औरंगझेबानें बदलून साव Shao असें ठेविलें ह्मणून ग्रांटफडचें ह्मणणें आहे. परंतु डफचें हें ह्मणणें निराधार आहे हें खालील पुराव्यावरून दिसून येईल. शाहू हा शब्द Shao, साव ह्या शब्दाचा अपभ्रंश आहे व हा शब्द प्रथम औरंगझेबानें प्रचारांत आणिला असा ग्रांटफडचा आशय दिसतो. परंतु शाहू हा शब्द सोळाव्या शतकांत प्रचारांत होता हें खालील श्लोकावरून दिसून येईल:—

यस्यातिप्रथितौजसो रणमुखे सेनाभटैरुद्भटै-
स्साटोपाहतसैंधवद्विपघटाशस्त्रातपत्रादिमः ।
निर्विण्णो मलिकीभरामतनुभूत्संप्राप्य गेहं महै-
र्मंदस्सन्महमंदशाहुरयते सार्थाभिदामन्वहम् ॥ २५ ॥

हा श्लोक ‘ एपिग्राफिका इंडिका ’ च्या १८९६ च्या डिसेंबराच्या अंकांत छापलेल्या विळापाक ताम्रशासनांतील आहे. ह्या श्लोकांत मलिक इभ्राईम व महमद शाहा ह्या गोवळकोंडा येथें इ० स० १५८१ पासून १६११ पर्यंत राज्य करणाऱ्या सुलतानांचीं नांवें आलेलीं आहेत. ह्यांत महमदशाहा ह्या शब्दाबद्दल महमंदशाहु असें रूप योजिलें आहे. फारशींत वाव हा प्रत्यय लागून कोणत्याही शब्दाचें ऱ्हस्व रूप साधितां येतें. तदनुरूप शाह ह्या शब्दाचे ऱ्हस्व रूप शाहू हें आहे. शाहू ह्मणजे लहान राजा असा अर्थ होतो. मराठींत शहाजी ह्मणून जें विशेषनाम आहे त्याचेंहि ममतादर्शक व ऱ्हस्वत्वदर्शक रूप शाहू असेंच होतें. शहाशरीफ ह्या नांवावरून शहाजी हें नांव ठेविलें गेलें हें सर्वत्र महशूर आहे. शहाजी हें रूप

वंशाचे ठायीं ममतापुरस्सर विश्वास ठेवून वंशी पद चालवावें. यासी अंतर करील त्याचे राज्यास श्रेयस्कर होणार नाहीं. छ ४ रविलाखर सु॥ अर्बा.

पंडितराव श्रीकराचार्य आईसाहेबाकडे गेले, सबब तें पद मुद्गलभट यांस दिलें. मंत्रीपद रामचंद्रपंत पुंडे याजकडून काढून नारोराम याजकडे सांगितलें. न्यायाधीशपद शिवो विठ्ठल याजकडून काढून होनो अनंत याजकडे सांगितलें. सुमंतपद महादाजी गंगाधर हणमंते याजकडून दूर करून आनंदराव वकीलीस योग्य सबब आनंदरावाकडे

---

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू. ]

शहा ह्या शद्बाचें महत्वदर्शक रूप आहे. सारांश फारशी शाह व मराठी शहाजी ह्या दोन्ही शद्बांचें ऱ्हस्व रूप शाहू असें आहे. तेव्हां शाहू हा शद्ब Shao, साव ह्या शद्बांचा अपभ्रंश नाहीं हें निश्चित आहे व ग्रांटफड तशी समजूत करून घेण्यांत चुकला आहे हें स्पष्ट आहे. शहाजी ह्या शद्बाचा अपभ्रंश शाहू असा होतो, हें ग्रांटफडनें दिलेल्या एका पत्रावरून चांगलें दिसून येतें. डफनें आपल्या इतिहासाच्या अकराव्या भागांत कृष्णराव खटावकराचें एक पत्र टिपेंत दिलें आहे. त्यांत एका ओळींत शहाजी निंबाळकर हें नांव दिलें असून दुसऱ्या ओळींत शाहू निंबाळकर असें त्याच पुरुषाचें नांव दिलें आहे. ह्यावरून असें उघड दिसतें कीं, शहाजी ह्या शब्दाचें शाहू असें रूप त्यावेळीं फारच प्रचलित होतें. शहाजी निंबाळकराला शाहू निंबाळकर ह्मणून ह्मणण्यांत सावपणाचा कांहीं एक संबंध नाहीं. शिवाजी चोर व त्याचा नातू साव असें औरंगजेबानें ह्मटलें असेल, अशी कल्पना केली तरी शहाजी निंबाळकराला शाहू निंबाळकर तो साव होता ह्मणून ह्मटलें असेल असें बिलकुल ह्मणतां येत नाहीं. खरी गोष्ट अशी आहे कीं, शहाजी ह्या शब्दाचें अल्पत्वदर्शक रूप शाहू असें मराठींत होतें. शिवाजीच्या नातवाचें व संभाजीच्या मुलाचें पाळण्यांतील नांव शहा होतें. शहा ह्या मूळ नावाचें सन्मानदर्शक रूप शहाजी व ममतादर्शक रूप शाहू असें नियमानें होतेंच. येसूबाई आपल्या लहान मुलाला शाहू ह्मणून हाका मारीत असल्यामुळें बेगमसाहेब वगैरे इतर मंडळींही त्याला शाहू ह्मणून हाका मारूं लागली. १७०७ तला येसूबाईचा एक शिक्का रॉयल ऐशियाटिक सोसायटीच्या लेखमालेच्या १९ व्या खंडांतील नवव्या निबंधांत दिलेला आहे, त्यांत खालील फारशी अक्षरें आहेत:—

सांगितलें. सरलष्करपद हैबतराव निंबाळकर याजकडून काढून दाव-ळजी सोमवंशी याजकडे करार केले. पारसनीस बुवाजी नीळकंठ होते, ते आईसाहेबाकडे गेले, सबब यादव बाळाजी परभू याजकडे सांगितलें. पुढें त्यास दिल्लीस सय्यदांकडे वकिलीस पाठविलें. तोफखान्याचे दरोगे नागोराव मेघश्याम नेमिले, व त्याजकडे राजाज्ञांची मुतालिकी सांगितली. पंतसचिव यांजकडे स्वदेशसुभा व कांहीं कोकणचे महाल दिले. व जो सरंजाम दिल्हा तो खाऊन महाराज याजकडील पीलखान्याचा खर्च चाल-वीत जावा असें ठरविलें.

---

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू. ]

( फारशी ) येसूबाई वालिदा इ शाहू राजा, सन अहद.
( मराठी ) शाहूराजाची आई येसूबाई, वर्ष पहिलें.

ह्यावरून येसूबाई आपल्या मुलाला शाहू ह्मणून ह्मणत असे हें स्पष्ट आहे. घरांतील वडील मंडळी व पातशाहाकडील कांहीं मंडळी येसूबाईच्या मुलाला शाहू या नांवानें हाका मारीत, तें रास्तच होतें. हें नांव उपयो-जिण्याची इतर मंडळीला पहिल्या पहिल्यांदा मोठी अडचण पडत असे, हें खालील शिक्यांवरून ध्यानांत येईल.

( १ ) श्रीराजा शाह छत्रपति स्वामिचरणीं तत्पर ।
दावलजी सोमवंशी सरलष्कर निरंतर ॥

( २ ) श्रीराजा शाहचरणीं तत्पर ।
आनंदराव सोमवंशीं सरलष्कर ॥

ममता दाखविणारें, सलगी दाखविणारें व अल्पत्व दाखविणारें शाहू हें रूप न योजितां शाह हें रूप ह्या दोघा सरलष्करांनीं योजिलेलें लक्षांत ठेवण्या-सारखें आहे. शाहू हें विकृत रूप न योजितां मूळचें शाह हेंच रूप ह्यांनीं योजिलें आहे. अर्थात् येसूबाईच्या मुलाचें पाळण्यांतील नांव शाह, शहा होतें हें निश्चित आहे. ह्या एवढ्या पुराव्याच्या पुढें संभाजी व येसूबाई ह्यांच्या मुलाचें पाळण्यांतील नांव शिवाजी होतें असें जें बखरकार व ग्रांटडफ ह्मणतात तें केवळ निराधार व फिकें पडतें. शाहूचें मूळचें नांव शिवाजी नव्हतें, ह्याला आणखी दुसरा पुरावा आहे. संभाजीच्या मुलाचें नांव जर शिवाजी ठेविलेलें प्रसिद्ध होतें, तर राजारामानें आपल्या मुलाचेंही नांव

**सु ॥ खमस अशर मया व अलफ, सन ११२४ फसली, अव्वल साल छ २३ जमादिलावल २६, मे १७१४, ज्येष्ठ वद्य ९ शके १६३६.**

आंग्रे याचा तह सालगुदस्त जाहाला. त्यांत कांहीं मुलूख आंग्र्यानें शाहूमहाराजास दिला. त्यांत आंग्र्याबरोबर कांहीं मुलूख शिद्यानें घेतला होता. तो शाहूकडे गेला. यामुळें आंग्र्याशीं शिद्दी लढूं

---

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू. ]

शिवाजी ह्मणून ठेविलें नसतें. दोघा भावांनीं आपापल्या मुलांना एकच नांव ठेवूं नये अशी महाराष्ट्रांत पूर्वापार रूढि आहे व राजघराण्यांत तर अशी गोष्ट होणें सर्वथा अशक्य आहे. शाहू व शिव ह्या नांवाचा विरोध किती होता हें खालील शिक्क्यावरून कळून येईल.

श्रीशिवशंभुस्वामिनि शाहूभूपे पार्थिवोत्तंसे ।
परिपतु चेतोह्तः फत्तेसिंहस्य मुद्रेयम् ॥

शिक्क्यावरून अक्षरें उतरून घेणाऱ्यानें मूळाची बरोबर नक्कल घेतली नाहीं, त्यामुळें अर्थ लागण्यास पंचाईत पडते. डा० भांडारकर हा श्लोक खालीं लिहिल्याप्रमाणें असावा असें ह्मणतात:—

श्रीशिवशंभुस्वामिनि शाहूभूपे ( च ) पार्थिवोत्तंसे ।
परिसर्पतु चेतोवृतः फत्तेसिंहस्य मुद्रेयम् ॥

परंतु मूळ डा० भांडारकरांच्या ह्मणण्याप्रमाणें असेल अशी कल्पना केली तरी देखील अर्थ लागण्यास पंचाईत पडते ती पडतेच. माझ्या मतें शिक्क्यांतील मूळ अक्षरें येणेंप्रमाणें असावीं.

श्रीशिवशंभुस्वामिनि शाहूभूपेशपार्थिवोत्तंसे ।
परिपततु चेतोह्तः फत्तेसिंहस्य मुद्रेयम् ।

अर्थ:— कोल्हापूर येथील शिवाजी व संभाजी ह्यांचा स्वामी जो शाहू राजा त्याला मनोहर असा जो फत्तेसिंग त्याची मुद्रा अर्पण असो.

कोल्हापूरचा शिवाजी जिवंत असतांना व फत्तेसिंग लहान असतांना ह्मणजे इ० स० १७१२च्या अगोदर हा शिक्का फत्तेसिंगाच्या नांवानें काढिलेला आहे. कोल्हापूरचा शिवाजी वारल्यावरही हा शिक्का काढिला असेल असेंही ह्मटलें तरी चालण्यासारखें आहे. ह्या शिक्क्यांत पहिली ओळ फार महत्वाची आहे. श्री हें अक्षर शिवशंभुस्वामिनि ह्या शाहूच्या विशे-

लागला. तेव्हां आंग्रयाचे कुमकेस बाळाजी विश्वनाथ जाऊन सिद्यांशीं तह छ ९ सफर ( ३० जानेवारी १७१५ ) रोजीं झाला. त्यांत असें ठरलें कीं, मामलत तळें व गोरेगांव, गोवेळ व निजामपूर इतके महालांवर आंग्रे यासी १००० रुपये मामले तळेपैकीं व शाहूकडे मामले तळेपैकीं ८००, गोरेगावपैकीं ६००, गोवळेपैकीं १०००, तर्फ निजामपूरपैकीं

---

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू. ]

षणाला लाविलें असून, भूपेश हें पद सहेतुक असें शाहूच्या नांवाला जोडलें आहे. शिवाजी आणि संभाजी राजांचा स्वामी व ईश जो क्षत्रियकुलावतंस महाराज शाहू छत्रपति, असा ह्या पहिल्या ओळीचा अर्थ आहे. तींत शाहु व शिव ह्या नांवाचा विरोध पूर्णपणें दर्शविलेला आहे. ह्यावरून शाहूचें नांव शिव नव्हतें हें अत्यंत स्पष्ट आहे. ग्रांटडफ मराठ्यांचा इतिहास लिहिण्यांत पदोपदीं घसरला आहे, हें सिद्ध करण्यास इतर शेकडों पुराव्याप्रमाणें हाहि पुरावा उत्तमोत्तम आहे. संभाजीनें आपल्या आज्याचें नांव आपल्या मुलाला ठेविलें अशी वास्तविक गोष्ट आहे. ती टाकून देऊन व बखरनविसांच्या एका क्षुद्र गप्पेवर विश्वास ठेवून, ग्रांट डफनें साव हें नांव येसूबाईच्या मुलाला औरंगझेबानें दिलें असें परमार्थानें कसें झटलें याचें आश्चर्य वाटतें. १७०७ पासून १७१२ पर्यंत ग्रांट डफ कसकसा चुटमळत गेला आहे, हें मागील टिपांत दाखविलेंच आहे. खुद्द शाहु ह्या नांवाची मीमांसा करण्यांतही तो कसा चुकला आहे, तें ह्या टिपेंत स्पष्टच झालें आहे. तेव्हां १७०७ पासून १७१२ पर्यंतचा इतिहास लिहिणाऱ्यांनीं ग्रांट डफचें अनुकरण जरा जपूनच करावें अशी इशारत देणें प्रासंगिक दिसतें. औरंगझेबानें शिवाजीला चोर व शाहूला साव, शाव असें नांव दिलें ही गप्प मुसलमान इतिहासकारांनीं क्षुद्रबुद्धीनें उठविली आहे, व ती ग्रांट डफनें इतर बखरनविसाप्रमाणेंच हलगर्जीपणानें आपल्या पुस्तकांत सामील केली आहे. ( उणीव ) ह्यासंबंधीं जास्त खुलासा करतां येण्यास व शाहूचें १६९०पासून १७०७पर्यंतचें चरित्र कळण्यास, जोत्याजी केसरकर, उद्धव योगदेव, राजाज्ञा, कृष्णाजी नाईक जोशी कोंकणस्थ सातारकर, गदाधरभट्ट नाशिककर, चिमणाजी दामोदर, परसोजी भोंसले, नेमाजी शिंदे, वगैरेंचीं दफ्तरें सांपडलीं पाहिजेत. जोत्याजी केसरकर व चिमणाजी दामोदर यांची प्रत्येकीं एक अशीं दोन पत्रें सध्यां मजजवळ आहेत तीं पुढें अवकाशानुसार छापिलीं जातील.

१७९, असे शाहूकडे २९७९ रुपये देणें. येणेंप्रमाणें एकंदर ३९७९ रुपये मराठ्यांत पेस्तर सालपासून पोंचतील; व तर्फ नागोठणें व अष्टमी व पाली व आश्रेधार पेटा व अंतोणें या महालांत दुतर्फे पहाणीदार फिरत जाऊन वसूल सुदामत निमेनिम होईल, वगैरे मजकूर तहांत आहे.[६]

बाळाजी महादेव याजकडे फडणिशी दिली. हरि महादेव जेजूर मुक्कामीं मेले. मुलकास कौल दिला. अधिकभाद्रपद साबान महिन्यांत आला होता.

### सु ॥ सीत अशर मया व अलफ, सन ११२५ फसली, अव्वल साल छ ४ जमादिलाखर, २८ मे १७१५, ज्येष्ठ शुद्ध ६ शके १६३७.

परसोजी भोसले मयत झाले. त्यांचा सरंजाम व सेनासाहेब किताब त्यांचे पुत्र कान्होजी यांस देऊन कटक व वऱ्हाड व हिंदुस्थानपैकीं

---

६. १७१२त पिंगळ्याला आंग्र्यानें धरिल्यावर १७१३च्या डिसेंबरांत बाळाजी विश्वनाथ आंग्र्यावर गेला. बाळाजी १७१३च्या डिसेंबरपर्यंत कृष्णराव खटावकराचें पारपत्य श्रीपतराव प्रतिनिधीच्या मदतीनें करीत होता. १७१४ जानेवारीपासून मेपर्यंत तो आंग्र्याची व्यवस्था लावीत होता. १७१४च्या पावसाळ्यानंतर दमाजी थोरातावर सचिवाला सोडविण्याकरितां बाळाजी गेला. परंतु तें काम तसेंच ठेवून त्यास आंग्र्याची व जंजिऱ्याच्या शिद्याची लठालठी तोडावी लागली. तें काम त्याला ३० जानेवारी १७१५पर्यंत पुरलें. शिद्याशीं १७१५च्या जानेवारींत झालेल्या तहासंबंधीं ग्रांट डफच्या ग्रंथांत एक अक्षर नाहीं. अर्थात् १७१४च्या सप्टेंबरपासून १७१५च्या फेब्रुवारी मार्चपर्यंत बाळाजी विश्वनाथ काय करीत होता ह्याचाही त्याला हिशोब देतां आला नाहीं. १७१५त झालेल्या शिद्याच्या तहावरून व सालगुदस्तां ह्मणजे १७१४त झालेल्या आंग्र्याच्या तहावरून शिद्याकडे ह्यावेळीं किती मुलूख होता व आंग्र्याकडे किती मुलूख होता हें कळण्यासारखें आहे. खांदेरी, कुलाबा, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, जयगड, देवदुर्ग, कनकदुर्ग, फतेगड, अवचितगड, व यशवंतगड, असे दहा किल्ले व बहिरवगड, कोटला, बिकडगड, माणिकदुर्ग, मीरगड, सागरगड, रसाळगड, पालगड, रामदुर्ग, खारेपाटण, राजापूर, अंबेड, सातवरें, कामटें, श्रीवर्धन व मनरंजन हे सोळा महाल आंग्र्याला शाहूनें १७१४त देऊन टाकिले. ह्मणजे मुंबई-

कांहीं भाग, महाल गोंडवण असा सुभा सांगितला. सेनापतिपद आपल्यास मिळालें नाहीं ह्मणून, हैबतराव निंबाळकर यांनीं महाराजाशीं कलह करून मोगलांकडे मिळून गोदावरीतीरीं राहिले. पुढें त्यांचें सख्य झालें नाहीं. या वेळेस पुणें प्रांताचा अंमल मोगलांकडून बाजी कदम मुख्य अधिकारी होता. त्यानें निंबाळकरास उपद्रव करणार नाहीं, असें पेशवे याजकडून कबूल करवून नंतर पेशवे याचा पक्ष धरला. तेव्हां सर्व अमल पेशवे याचा बसला. हैबतराव निंबाळकर मेले. त्याचें पद सरलष्करचें आपल्यास मिळावें असें त्याचा पुत्र रंभाजी याचें ह्मणणें होतें. तें शाहू महाराज याणीं कबूल केलें नाहीं. सबब शाहू-

---

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू. ]

पासून खारेपाटणापर्यंतचा सर्व मुलूख ह्या तहानें आंग्रयाच्या ताब्यांत शाहूनें दिला. ह्या मुलखांत इंग्रजांची मुंबई व हबशाचें हबसाण अंतर्भूत होतें. असें असून ज्या अर्थी कुलाबा व श्रीवर्धन शाहूनें आंग्रयास कागदोपत्रीं देऊन टाकिलें, त्या अर्थी इंग्रजांचा व हबशांचा कांहीं एक हक्क नाहीं, अशी शाहू राजाची समजूत होती असें दिसतें. बाकी साक्षात् इंग्रजांच्या हातीं मुंबई बेट ह्मणजे कुलाबा होतें, व हबशाच्या हातांत सबंद हबसाण व गोरेगांव गोवेळ, निजामपूर, नागोठाणें, अष्टमी, पाली, आश्रे व अंतोणें हे महाल होते. पैकीं कुलाबा ही जागा अतिच क्षुद्र असल्यामुळें ती घेतल्यासारखीच आंग्र्याला वाटत होती. १७१५ च्या तहांत गोरेगांव, गोवेळ, निजामपूर नागोठणें, अष्टमी, पाली, आश्रे व अंतोणें ह्या महालांचा निम्मा वसूल शाहू-कडील कमावीसदारांनीं घ्यावा असें ठरलें. हे महाल १७०२ पासून १७१४ पर्यंत जी धामधूम चालली होती, तिच्या अमलांत हबशानें दडपले असावे, असें दिसतें. ह्या महालांतील अर्धा भाग व हबसणांतील सर्व महाल ह्मणजे श्रीवर्धनापासून अलीबागेपर्यंतचे सर्व महाल हबशाच्या साक्षात् अमलाखालीं होते. सारांश हबशाचा मुलूख गाळून बाकी राहिलेलें खारेपाटणापासून राजमाची किंवा मनरंजनपर्यंतचें सर्व कोंकण आंग्रयाला शाहूनें देऊन टाकिलें, अथवा खरें ह्मटलें असतां, शाहूला देणें भाग पडलें. १७१३त ताराबाईचा पक्ष घेऊन आंग्रया जेव्हां साताऱ्यावर चाल करून आला, तेव्हां भिऊन जाऊन शाहूनें आंग्रयाला हा सबंध मुलूख जाहागीर देऊन टाकिला. मोठमोठ्या सरंजामी जहागीरदारांची उत्पत्ति प्रथम कशी व

चा पक्ष टाकून मोगलाईंत गेला. तिकडे रावरंभाजी असा किताब मिळून, मोठी योग्यता वाढून सरंजाम वगैरे मिळाला. तो अद्याप याचे वंशिकांकडे चालत आहे. सरलष्करपद निंबाळकराचें दावलजी सोमवंशी यास करार केले. पुरंदर किल्ला पेशवे यास अर्बा अशरांत पंतसचिव याणीं दिल्हा. त्यावर अंमल पेशवे यांचा अंबाजी त्र्यंबक पुरंधरे याणीं बसवून सासवडास आले.

**सु ॥ सबा अशर मया व अलफ, सन ११२६ फसली, अव्वल साल छ १५ जमादिलाखर, २८ मे १७१६, ज्येष्ठ वद्य १ शके १६३८.**

फेरोकशर बादशाहा सयदाचे आश्रयानें पदावर बसला. ते उभयता सय्यद आपल्यास डोईजड होतील तरी बळहीन करावे असे

---

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू. ]

केव्हां झाली, त्याचा अभ्यास करण्यास प्रस्तुत प्रसंग फार नामी आहे. १७१४ त आंग्रयाला शाहूच्या हस्तें बहुतेक सबंद कोकण जाहागीर मिळण्यापूर्वी तें त्याच्या स्वाधीन राजारामानें मोगलांच्या जुलमापासून जतन करण्याकरितां शिदोजी घोरपड्याच्या निसबतीनें दिलें होतें. राजारामाच्या कारकीर्दींत आंग्रयाकडे कोकणांतील कांहीं गावें - इनाम होतीं. तेवढ्यावर निर्वाह करून कोकणपट्टी स्वराज्य ह्मणून सांभाळावी, अशी राजारामाची चंदीहून आंग्रयाला आज्ञा होती. हें रखवालदारीचें काम करीत असतांना शाहू महाराजांची स्वारी आली, व त्यांनीं स्वतःची सत्ता स्थिर करण्याककरितां आंग्रयाला सबंध कोकण देऊन टाकिलें. स्वतःची सत्ता स्थापित करण्याकरितां जो कोणी जितकें मागेल तितकें त्यास देणें शाहूला जरूर दिसलें. ह्याच सुमाराला प्रतिनिधि, सचिव, परसोजी भोसले, खंडेराव दाभाडे वगैरे पुरुषांना शाहूनें मोठमोठे प्रांत सरंजामाकरितां दिले. येणेंप्रमाणें १७१४ त सरंजामी जाहागिरी देण्याची पद्धत महाराष्ट्रांत सुरू झाली. ती बाळाजी विश्वनाथाच्या कारकीर्दींत सुरू झाली, हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. ह्यासंबंधीं हेंही ध्यानांत ठेवण्यासारखें आहे कीं, मोंगलाकडे आपले सरदार फुटून जाऊं नयेत ह्मणून मोठमोठ्या जहागिरी देणें शाहूस आवश्यक झालें. जाधव, निंबाळकर वगैरे फितुरी सरदारांना ह्याचवेळीं मोंगलांनीं मोठमोठ्या जहागिरी दिल्यामुळें, शाहूलाहि जवळ राहिलेल्या सरदारांना तितक्याच महत्वाची लालूच दाखविणें भाग पडलें.

मनांत आणून त्यापैकीं सय्यद हुसेन यास दक्षणचा अधिकार देऊन पहिला अधिकारी यास गुप्त लिहून पाठविलें कीं याचे हवालीं अंमल करूं नये. त्यावरून दक्षणचा अधिकारी दाउदखान व सय्यद यांची लढाई होऊन दाऊदखान मयत झाला. तो दाऊदखान गुजराथचा यावेळीं अधिकारी होता. सय्यद हुसेन अली यास दक्षणसुभा प्राप्त झाल्यावर खंडेराव दाभाडे गुजराथप्रांतीं बंड करीत होतां. त्याचे पारपत्यास गेला तेथें त्याशीं लढाई होऊन सय्यदाचा पराभव झाला. त्याचीं वस्त्रें सुद्धां दाभाड्यानें लुटून घेतलीं. असा जय खंडेराव याणीं मिळवून साताऱ्यास शाहू महाराजास भेटला. तेव्हां शाहू महाराज संतोष पावून त्यास सेनापतिपद देऊन गुजराथचा व काठेवाडचा अंमल त्यांनीं बसविला, त्याचा सुभाहि त्याजकडे सांगून दरमहा व हुजूर खर्चास ऐवज देत जावा व फौज बाळगावी व थोरले महाराज धान्य व नक्त श्रावणमासीं धर्मादाय देत असत तो सेनापति यांनीं आपल्या तालुक्यापैकीं दोन चार लाख रुपये खर्चून कोटिलिंगें ब्राह्मणांकडून करवीत जावीं असें ठरलें. पहिला सेनापति मानसिंग मोरे त्या पदास योग्य नाहीं ह्मणून दूर केला. स्वारीस निघोन कुटुंब बरोबर असतां मूळा नदीवर गेले. तेथें मौजे

---

७. दाभाड्यांची सालवार हकीकत अद्यापपर्यंत कोठेंही दिलेली आढळली नाहीं. राजाराम महाराजाला चंदीस असतांना पुत्र झाला, त्यासमयीं राजशक २३ धातृनाम संवत्सरीं सु ॥ सबा तिसैन अलफांत ह्मणजे १६९६ च्या जूना-नंतर खंडेराव दाभाड्यास तळेगांवाजवळील इंदुरी गांव इनाम मिळालें. १६९८त चंदीहून परत आल्यावर राजशक २५ बहुधान्य संवत्सरीं आश्विन शु॥ ११ स ह्मणजे २८ आगस्ट १६९८ त दाभाड्यांना जुन्नर वगैरे प्रांताची सरपाटिलकी मिळाली. तेव्हांपासून १७०९ पर्यंत दाभाडे काय करीत होता, त्याचा पत्ता नाहीं. १७०७ त शाहूराजास भेटण्यास दाभाडे खेडास गेला होता. तेव्हांपासून १७१६ पर्यंत दाभाड्याचा पत्ता नाहीं. दाभाड्याचा शिलेदार गायकवाड ह्याचाही १७१६ पर्यंत पत्ता नाहीं. हा पत्ता काढण्यास दाभाडे, ढमढेरे, थांडे, पवार, जाधवराव वगैरेचीं दफ्तरें तपासलीं पाहिजेत.

हिंगणगांव ता० पाटस येथें दमाजी थोरात पुंड होता. त्यानें भेटीस ह्मणून बोलावून घेऊन कुटुंबासह अंबाजीपंत पुरंधरे यांस अटक करून बाळाजीपंतावर निकर्ष करूं लागले. तेव्हां अंबाजीपंतानें निकर्ष सोसून खंडाचें बोलणें केलें. द्रव्य द्यावयास नाहीं, तेव्हां सौभाग्यवती मातोश्री राधाबाई व पुत्र बाजीराव व चिमाजी अप्पा तेथें ठेवून खासे निघाले. तेथें मोरशेट करंज्या होता. तो लाह्यांचे लाडू करून देत होता. त्याचा पुत्र धनशेट करंज्या याचें सरकारांतून चालविलें. स्वारी २७ सात्रान.

## सु ॥ समान अशर मया व अलफ सन ११२७ फसली, अव्वल साल छ २६ जमादिलाखर, १६ मे १७१७, ज्येष्ठ वद्य ११ शके १६३९.

दाऊदखान मेल्यावर सय्यदांचे अनिष्टाविषयीं मराठ्यांस गुप्तपणें फरोकसेर लिहीत असे. व दाभाड्याचा जय झाल्यामुळें मराठे प्रबळ होऊं लागले. या कारणानें दाऊदखान यानें चौथाई दिली असतां सरदेशमुखी बळेंच घेऊं लागले. बादशहाचा कृत्रिमपणा व मराठे लोकांचा उपद्रव यांमुळें शेख हुसेन याचे मनांत शाहू महाराज यांशीं स्नेह करून

---

८. दमाजी थोरातानें बाळाजी विश्वनाथाच्या कारभाऱ्याला, बायकोला व मुलांना १७१६ त अटकेंत ठेविलें असें दिसतें. ह्यासंबंधीं पत्रें हिंगणगांव व सासवड येथें पाहिलीं पाहिजेत.

९. ही राधाबाई १७५२ त वारली. १७१४ पासून १७२० पर्यंत बाळाजी विश्वनाथाचें दफातें लिहिणाऱ्या कारकुनानें बाळाजी विश्वनाथाच्या बायकोस मातोश्री ह्मटलें तें रास्तच आहे. ह्या वेळचीं राधाबाईचीं पत्रें श्रीवर्धनास व वाजीराव याचीं पत्रें रेटरेकर यांचे घरीं अवश्य सांपडावीं. पुणें येथें सध्या असलेल्या दफ्तरांतील पोत्यांतूनही ह्या वेळचीं चिटोरीं असण्याचा संभव आहे. ह्या दफ्तरांतील पोत्यांतील प्रत्येक चिटोरें मोठ्या काळजीनें तपासलें पाहिजे. मराठ्यांच्या इतिहासांतील बहुतेक विशेषनामें ज्यास अवगत आहेत, त्याच्याखेरीज इतरांस हीं चिटोरीं क्षुल्लक वाटण्याचा संभव आहे.

असावें असें आलें. त्या वेळेस शंकराजी मल्हार, पूर्वी राजाराम महाराजांनीं सचिवपद करून दिल्हें तो काशीस गेला होता, तो कारभारावर सय्यदापाशीं होता, व त्याचा स्नेह साताऱ्यास बहुत लोकांशीं होता. सबब त्याला शाहूशीं बोलणें करण्यास पाठविला. तेव्हां शाहू महाराजाचें बोलणें पडलें कीं, सहा सुभे दक्षणची चौथ व सरदेशमुखी व हैदराबाद आणि विजापूर व कर्नाटक, म्हैसूर व त्रिचनापल्ली व तंजोर या संबंधीं मुलूख व खानदेश खेरीज करून दक्षणेंत जो शिवाजीनें मुलूख घेतला त्याच्या सनदा पातशाहाकडून मिळाव्या. व शिवाय गोंडवण व वऱ्हाड यांतील मुलूख कान्होजी भोंसले यांनीं घेतला आहे. तो व आपलीं मुलेंमाणसें दिल्लीस आहेत, तीं आह्माकडे पावतीं करावीं. हीं कामें झालीं असतां मोंगल पातशहास आपण वर्षास एक कोट खंडणी देऊं, व सरदेशमुखीबद्दल मुलखांत चोरी वगैरे होऊं देणार नाहीं. असा बंदोबस्त करून व कांहीं नजरहि देऊन चौथाईबद्दल १५००० पंधरा हजार फौजेनिशीं पातशाहाची चाकरी करूं व कोल्हापूरकर राजाराम महाराज यांचा पुत्र संभाजी याचा उपद्रव होऊं देणार नाहीं. असें बोलणें झालें तें बहुतकरून सैदांनीं मान्य केलें. हा तह झाल्यावर सालमजकुरीं दिल्लीस

---

१० हा उल्लेख शिवाजीच्या स्वराज्यासंबंधींचा आहे. 'भारतवर्ष' मासिकपुस्तकाच्या दुसऱ्या वर्षाच्या चौथ्या अंकांत एक शकावली छापली आहे. तिच्यांतील तिस्सा अशर सालाखालील मजकुरांत स्वराज्यांत मोडणाऱ्या प्रांतांचीं नांवें दिलीं आहेत. प्रांतांच्या नांवावर कांहीं आंकडे दिलेले आहेत. त्या आंकड्यावरून प्रथम माझा असा समज झाला कीं, येथें कांहीं तरी गूढ आहे, व तें उकललें असतां इतिहासाला माहीत नाहीं अशी एखादी अजब गोष्ट उघडकीस येईल. पुढें असें दिसून आलें कीं, हे आंकडे ग्रांट डफच्या इतिहासाच्या बाराव्या भागांत स्वराज्यांतील प्रांतांची याद दिली आहे, तीवरून उतरून घेतले आहेत, व उतारा करतांना आंकड्यांच्या चुका केल्या आहेत! 'भारतवर्षा' तील उतरलेल्या यादींत 'नाझरें' हें नांव चुकून 'अजरें' ह्याबद्दल पडलें आहे. अर्थात् 'भारतवर्षांत' दिलेली शकावली ग्रांट डफवरून अंशतः तयार केलेली आहे, हें उघड आहे.

पातशाहास कळला. त्यास ठीक वाटलें नाहीं. त्यावरून सय्यदास वाटलें कीं हा आपला द्वेष करतो यास्तव यास पदच्युत करावा. ह्मणून शाहूजवळ त्यानीं मदत मागितली. ती देणें आपलें हिताचेंच आहे असें समजून शाहू महाराज यानीं बाळाजी[11] विश्वनाथ पेशवे याजबरोबर खंडेराव दाभाडे व उदाजी पवार व कान्होजी भोसले यांस बलाविलें. ते न येतां आपले सख्खे चुलत बंधु संताजी व राणूजी भोसले यांस पाठविलें. ते व आणखी सरदार फौजसुद्धां बाळाजी विश्वनाथ यांनीं बराबर आपला पुत्र बाजीराव व बाळाजी महादेव भांनू फडणीस घेऊन

---

११ बाळाजी विश्वनाथाच्या कबिल्याला दमाजी थोरातानें १७१६त धरिलें. नंतर १७१७ शंकराजी मल्हाराच्या द्वारें सय्यदांशीं तह होत असतां, बाळाजी विश्वनाथानें सय्यदांची फौज कुमकेला आणून दमाजी थोराताला दस्त केलें व हिंगणगांवच्या गढीवरून नांगर फिरविला. नंतर १७१८च्या पावसाळ्यानंतर बाळाजी विश्वनाथ सय्यदांच्या साहाय्यास दिल्लीस निघाला. तेथें १७१९च्या फेब्रुवारींत व मार्चांत पातशाही सनदा करून घेऊन १७१९च्या जूनच्या सुमारास औरंगाबादेस येऊन पोहोंचला. १७१८च्या आगस्टांत बाळाजी विश्वनाथ साताऱ्याहून निघाला, तो ३१ डिसेंबरीं दिल्लीस जाऊन पोहोंचला. दिल्लीस दोन महिने ह्मणजे १७१९चा जानेवारी व फेब्रुवारी घालवून ७ रबिलाखरीं यमुनेच्या दक्षिणतीरीं बाळाजी येऊन बसला. यमुनेच्या दक्षिणतीरीं असतांना बाळाजीनें सनदा करून घेतल्या. १७१९त बाळाजी विश्वनाथानें शाहूच्या आईला, भावाला व कबिल्यांना साताऱ्यास आणिलें नाहीं. कारण १७२०त शाहूनें जी यादी बाजीरावापुढें टाकिली, तींत मातोश्री वगैरे मंडळी दिल्लीहून आणण्याची आज्ञा आहे. येसूबाई बहुश: कधींच साताऱ्यास आली नाहीं असें वाटतें. येसूबाई बहुश: १७२१च्या सुमारास दिल्लीसच वारली असावी. १६८९ पासून १७२१पर्यंत बत्तीस वर्षें ह्या दुर्दैवी बाईनें बंदीवासांत काढिलीं व १७२१त ती बहुश: बंदीवासांतच वारली. बाळाजी विश्वनाथाबरोबर जर येसूबाई साताऱ्यास आली असती, तर मोठा उत्सव झाला असता व त्याची प्रसिद्धिहि सर्वत्र झाली असती. येसूबाईचें थडगेंहि माहुलीस सध्यां कोठें असलेलें माहीत नाहीं.

दिल्लीस निघाले. निजामुन्मुल्ख याचीहि भेट घेऊन त्याजकडील फौजहि दर राऊतास एक रुपया करून १२००० लोक बराबर घेतले. निजामांनीं पेशवे यांस भाईचारा ह्मणजे मेजवानी केली. दिल्लीस निघते वेळीं आणखीहि शाहू महाराज यानीं पेशवे यांस सुचविलें कीं दौलताबाद व चांदा किल्ला कसेंहि करून घ्यावा, व गुजराथ व माळवा यांचीहि सनद करून घ्यावी. दिल्लीस सय्यदांसुद्धां फौज पोहोंचल्यावर उभयता सय्यदांनीं फेरोकेसर बादशहास डोळ्यांत सळई घालून डोळे फोडून ठार मारून टाकिलें. फेरोकसेर बादशहा वारल्यावर त्याचे जागीं दुसरा बादशहा पुढील सालीं बसला, ती हकीकत पुढील सालांत दाखल केली आहे. फतेसिंग भोसले यास मोकासे वगैरे अंमल सरंजाम या सालीं निराळा करून दिल्हा.

**सु॥ तिसा अशर मया व अलफ, सन ११२८ फसली, अव्वल साल छ ६ रजब, २९ मे १७१८, ज्येष्ठ शुद्ध ६ शके १६४०.**

फेरोकशेर पातशाहास सय्यदांनीं मारल्यानंतर त्याचे जाग्यावर रफीउद्दरजात या नांवाचा पातशाहा सन १७१९ त झाला. त्याचे कारकीर्दींत शाहूस दक्षिणेंतील सरदेशमुखी वगैरे अमलाविषयीं परवाने झाले होते; परंतु ते अमलांत न येतां, सदरहू पातशाहा क्षयरोग लागून लौकर पांच महिन्यांत मयत[१२] झाला. नंतर त्याचा भाऊ रफीउद्दवला यास तक्तावर बसविला; परंतु तोही दोन तीन महिन्यांतच मयत झाला. या कारणानें बाळाजी विश्वनाथ याचें रहाणें, सनदा वगैरे कार्याकरितां,

---

१२ फेरोकशेराच्या पाठीमागून तक्तावर बसलेल्या ह्या दोन दुर्दैवी पातशाहांचीं नांवें प्रस्तुत शकावलीच्या कर्त्यानें घेतलीं आहेत त्यावरून असें अनुमान निघतें कीं, ग्रांट डफच्या इतिहासाखेरीज इतर फारशी किंवा मराठी कागदपत्र शकावली कर्त्याला पहावयास मिळाले होते. ग्रांट डफच्या ग्रंथांत ह्या दोन पातशाहांचीं नांवें दिलेलीं नाहींत, त्यांचा नुसता निनावी मोघम उल्लेख केला आहे, ह्यावरून असें ह्मणावें लागतें कीं, दिल्लींतील मुसलमानी राजकारणांसंबंधीं लिहितांना शकावलीकर्त्यानें ग्रांट डफचाच केवळ अनुवाद केलेला नाहीं, स्वतंत्र आधारानें लिहिलें आहे.

दुसरा पातशाहा होईतोंपर्यंत दिल्लीस झालें. पुढें शहाअलम याचा नातू रोशन एकत्यार या नांवाचा उभयता सय्यदांनीं तक्तावर बसविला. त्याचें नांव महमदशहा असें ठेविलें. या सालीं दरबारांत त्या दोघा सय्यदांशिवाय कांहीं कार्य होत नसे. त्यांचें व निजाम उन्मुलुक याचें अंतर्याम शुद्ध नव्हतें. त्याशीं सख्य करण्याविषयीं सय्यदांनीं बराच प्रयत्न केला; परंतु तो मनापासून वश झाला नाहीं. कारण, त्याजकडे दक्षणचा अधिकार असतां पातशाहानें सय्यदास नेमिलें, आणि निजामुन्मुलुकास मुरादाबादेस पाठविलें. त्याणें तिकडे चांगला बंदोबस्त केल्यामुळें फेरोकशेर पातशाहानें दिल्लीस बोलावल्यावरून कितेक दिवस बेरोजमारी होता. पुढें त्यास माळवे प्रांताचा अधिकार देऊन पाठविला. त्याला पुढें अधिक योग्यतेस येण्याची आशा होती; परंतु पुढें लौकरच दुसरी मुद्रा होईल, अशी अटकळ करून तो समय येण्याची वाट पहात बसला होता. पुढें शाहू महाराज यांणीं करार केल्याप्रमाणें चौथाई व सरदेशमुखी व शिवाजीनें मुलूख संपादिला होता, त्याबद्दल वगैरे सनदापत्रें पातशाहाकडून करवून घेऊन, व फौजेचा खर्च सय्यदांकडून घेऊन, शाहू महाराज यांचीं मुलें, माणसें दिल्लीस ओलीस ठेविलीं होतीं, तीं घेऊन देशीं येण्याचा विचार ठरला. पुढें निजामुन्मुलुक यांणीं बाळाजी विश्वनाथ व अंबाजी त्र्यंबक यांची पातशाहापाशीं तारीफ केली. पातशाहापाशीं मेजवानीबद्दल द्रव्य घेऊन आपल्या-बरोबर देशीं औरंगाबादेस घेऊन आले. दरम्यान दिल्ली मुक्कामीं सरदेशमुखी चौथाई वगैरे मुलखाच्या सनदापत्रें शाहू महाराजास देण्याचा ठरलेला विचार दिल्ली दरबारांतील कितीक लोकांस न आवडून त्यांणीं असा बेत केला कीं, पेशवे दरबारांतून सनदापत्रें घेऊन निघाले ह्मणजे रस्त्यांत गाठून सनदा हिसकावून घेऊं. ही मसलत बाळाजी विश्वनाथ पेशवे यांस समजली. तेव्हां ह्याविषयीं काय करावें, असें बाळाजी महादेव भानूस विचारिलें असतां, त्यांणीं अशी सल्ला दिली कीं, आपण सनदा घेऊन दुसरे आडवाटेनें लष्करांत गोटांत जावें, मी पेशवे या थाटानें तुमचे पालखींत बसून मागून येतों. असा विचार ठरल्याप्रमाणें पेशवे सनदा घेऊन दुसरे आड-

वाटेनें निघाले व भानू इतमामानिशी भर रस्त्यानें येत असतां संकेताप्रमाणें तेथील लोकांनीं गर्दी केली. तेव्हां संताजी भोसले बरोबर होते, त्यांणीं बहुत पराक्रम करून त्या प्रसंगीं पार पडले. बाळाजी महादेव भानू फडणीस यास पेशवे असे समजून त्यावेळेस ठार मारिलें. बाळाजी विश्वनाथ दुसऱ्या मार्गानें गोटाकडे येतात तों इकडे असा प्रसंग झाला! तो पाहून पातशाहा यास निरोप सांगून देशी निघाले. त्यावेळेस संताजी भोंसले यांणीं पराक्रम केलेला ऐकून सवाई संताजीराव असा किताब राणोजी भोंसले यांस देऊन फौजेंतील सरदार वगैरेस पातशाहाकडून वस्त्रें मिळालीं. दक्षणचे सुभ्याची सर्व काळ कुमक राखून, लिहिलें जाईल तेव्हां फौज कुमकेस पाठवीत जावी; तळघाट, कोंकण व वरघाट, बालाघाट, दुतर्फादेखील बंदोबस्त किल्ले आणि सरदेशमुखी वतनी अंमल शिवाजीनीं बसविला त्याप्रमाणें सहा सुभ्यांत चालावें; व स्वराज्यांत पूर्वी शिवाजीनीं अंमल बसविला त्याचे फरमान करून दिले. तोफा मोंगलाईंत येतील त्याची चौथाई घ्यावी. चौथाई वगैरे स्वराज्य अंमलाबद्दल फरमान कान्होजी भोंसले यांणीं गोंडवण व वऱ्हाड व कटक अंमल बसविला त्याप्रमाणें चालावा. बल्लोलखान यासी ताकीद कर्नाटक सुभा फत्तेसिंग भोंसले यांसी देणें. येणेंप्रमाणें कागदपत्र घेऊन प्रधान व सेनापति व साहेबसुभा निघून येतांना जयपूर, जोधपूर, उदेपूर यांचीं कामें करून महाराजाशीं तहाप्रमाणें चालावयाचें कबूल करविलें. दरमाहाचे ऐवजांत महाराजाची चौथाई याप्रमाणें पुष्कळ खजिना घेऊन साताऱ्यास आले. महाराजाच्या भेटी झाल्या. मुलें माणसें भेटविलीं. बाळाजी विश्वनाथ यास कर्डेरांजणगांव वगैरे सरदेशमुखी वतन व इनाम गांव दिले. बाळाजीपंत भानू शस्त्रघातेंकरून दिल्लीस मरण पावले. त्यांचे पुत्र जनार्दन बल्लाळ व बंधू रामाजी महादेव भानू यांस पुण्यानजीक मावळप्रांतीं बसलाई ता॥ नाणेंमावळ हा गांव राजशक ४६, ॥ २० सवाल, श्रावण वद्य ३ रविवारीं ( २३ जुलै १७१९ ) इनाम दिल्हा. तो आजपर्यंत त्यांचे वंशजांकडे चालत आहे. बाळाजी महादेव भानू हे नाना फडणीस यांचे आजे होत.

दिल्लीस बाळाजीपंत भानू गेले होते, त्यांचे मागें फडणिशीचें काम नारो बचाजी परचुरे यांणीं चालविलें. औरंगाबादेस पेशवे आल्यावर फडणविशीचें काम रामाजी महादेव लोहगडावर सबनीस होते, त्यांस बोलावून आणून काम करण्यास सांगितलें. बहिरा आहे, याजवरून त्याजला दफ्तरचें काम सांगितलें, व फडणिशीचें काम जनार्दन बल्लाळ व बाबूराव राम मोठे होईपर्यंत अंताजी नारायण यांनीं करावें, व त्याची मजमूची असामी हरी महादेव यांचे कन्येचे पुत्र कृष्णाजीपंत यांस सांगितली. मुलखास कौल दिल्हा. मोगलाईकडील अम्मल पुण्यांतील उठला. पुणें येथें हरी महादेव सुभेदारीवर होते. मोगलाकडील अम्मलदार बाजी कदम गेला. भीमेअलीकडील सर्व स्वराज्यांत असावें, असा तह निजामानें केला. परशरामपंत प्रतिनिधि यांचा काल ज्येष्ठ शुद्ध ८ शके १६४० सोमवारीं विलंबी नाम संवत्सरीं झाला ( २७ मे १७१८ ). श्रीपतराव यांनाच श्रीनिवासराव प्रतिनिधि ह्मणतात. त्यांस पदाचीं वस्त्रें ज्येष्ठ वद्य ९ स [ ८ जून १७१८ ] झालीं. कान्होजी आंगरे शिमग्यांत येऊन भेटले. रंग वगैरे होऊन सुभ्याच्या सनदा दिल्या, शके १६४० ( ८ फेब्रुवारी १७१९ ). जाधवराव आपल्या महालांत अंमल उगविण्याबद्दल खटका करूं लागले. त्यावर सरलष्कर यांसी पाठवून लढाई झाली. महकूबसिंग व जाधवराव यांचा मोड झाला. धारराव परभू कळंबेकर कामास आले. त्याची सरदारी कनिष्ठ अप्पाराव यांस दिल्ही, व जहागीर दिल्ही. बाळाजी विश्वनाथ यांनीं दिल्लीहून सनदा आणिल्यावर वसुलाविषयीं वहिवाट कशी चालावी याजकरितां कायदा केला तो असा कीं, प्रथम सरदेशमुखी ह्मणजे कोठें शेकडा दहा रुपये व कोठें साडेबारा रुपयेप्रमाणें वहिवाट आहे, ती राजाचें वतन असें ठरविलें बाकी राहिले बेरजेपैकीं चौथाई, बाबती राजाचा हक्क ठरविला. बाकी तीन हिसे राहिले त्यास मोकासा असें नांव ठेविलें. याशिवाय साहोत्रा व नाडगौकी हे हक्क राजाचे होते, त्यापैकीं साहोत्रा पंतसचिव यास दिल्हा, नाडगौकी दुसरे कोणास दिल्ही. आतां चौथाई, मोकास वगैरे वजा होऊन बाकी राहिले यांत फौजदारी एक हिस्सा फौजदाराचा हक्क, बाकी दोन हिस्से पातशाही हक्क तो सर-

कारचा असें ठरविलें. तो जहागीर अंमल असें पुढें ह्मणू लागले. पुरंधर किल्यावर पंतसचिव याजकडून बापूजी श्रीपत होते, त्यांस पुण्याचे कारभारावर ठेविलें. संताजी भोसला दिल्लीवर ठार झाला. तो परसोजी भोसला याचा दासी पुत्र होता. छ २३ साबान रोजीं पुत्र बाजीराव सुद्धां साताऱ्यास निघाले [ ३० जून १७१९ ]. छ ७ रबिलाखर मुक्काम यमुना दक्षिणतीरास होता [ १६ फेब्रुवारी १७१९ ].

श्री. [ ११ आक्टोबर १७१८.

५४ म॥ अनाम देशमुख व देशपांडे प्रांत पुणें यांसी:—

बाळाजी पंडित प्रधान. सु॥ तिसा अयर मया व अलफ. दिल्हें अभयपत्र ऐसाजे:—तुह्मीं हुजूर येऊन विदित केलें कीं, दुतर्फा दिवाणाचे कसालियाकरितां तमाम मुलूख खराब पडला. तो आबाद करावयाविषयीं आज्ञा केली. त्यास तुह्मीं अर्ज केला कीं, पूर्वीं मोंगलाचे धामधुमीमुळें मुलूख पडला. अलीकडे थोरात, ढमढेरे, निंबाळकर व किरकोळ यांचे धामधुमीमुळें मुलुखाचा सत्यानाश जहाला. रयत देशांतरास गेली. मुलुखांत काठवण झालें. याउपरि साहेबीं मोंगलांचा तह केला, ते प्रसंगीं प्रांत मजकूर स्वराज्यांत घेतला. मुलूख महामूर करावयासी आज्ञा केली. तरी सात साला इस्ताव लागले ढेपेस उगवणी असा कौल दिल्हा. रयत देशांतरास गेली तेथें कौल पाठवून रयत आणवून गांवांवर वसाहत करूं ह्मणून अर्ज केला. बराय अर्ज खातरेस आणवून, महामुरीवर नजर देऊन सात साला लागले ढेपेस इस्ताव कौल दिल्हा असे. तरी तुह्मीं रयतेचा दिलदिलासा करून, मुलूख महामूर करणें आणि लागले ढेपेस सात साला तनखा उगवणें, बाबती देखील. जास्ती आकार लागणार नाहीं. अभय असें. जाणिजे. छ १७ जिल्हेज. आज्ञा प्रमाण. लेखन सीमा. सुरू रुद्र. चवथे वेळेस शिका.

श्री

| | |
|---|---|
| अजहत देशमुख बाळाजी गणेश धडफळे यांजवळ अस्सल असे. | शाहू नरपति हर्षनिधान बाळाजी विश्वनाथ मुख्य प्रधान. |

**सु ॥ अशरीन मया व अलफ, सन ११२९ फसली, अव्वल साल छ १७ रजब, २६ मे १७१९, ज्येष्ठ शुद्ध २ शके १६४१**

बाळाजी विश्वनाथ सासवड मुक्कामीं शके १६४२ शार्वरी संवत्सर चैत्र शुद्ध ६ शनवारीं, छ ९ जमादिलाखर, अशरीन मया व अलफ सालीं वारले ( २ एप्रिल १७२० ). बाळाजी कारभाराचे श्रमानें सन १७२२ सालीं मयत झाला असें ग्रांट डफनें बखरींत लिहिलें आहे, परंतु ती चूक[13] आहे.

यॆ[14] सालीं दुसऱ्या हकीकती किरकोळ झाल्या त्या:—

---

१३ ग्रांट डफ बाळाजी विश्वनाथ १७२२ च्या आक्टोबरांत वारला असें मुळींच ह्मणत नाहीं. बाळाजी विश्वनाथ १७२० त वारला असें डफ ह्मणतो. कांकीं आपल्या नित्याच्या नेमाप्रमाणें डफनें बाळाजी विश्वनाथाच्या मृत्यूची हकीकत १७२१ सालांतील हकीकतीला प्रारंभ करण्याच्या आधीं दिली आहे. आतां यद्यपि बाळाजी विश्वनाथाच्या मृत्यूचें साल १७२२ ह्मणून ग्रांट डफनें दिलेलें नाहीं, तत्रापि १७२० च्या आक्टोबरांत बाळाजी वारला ह्मणून जें तो ह्मणतो तें बराबर नाहीं. कांकीं प्रस्तुत शकावलींत बाळाजी १७२० च्या २ एप्रिलास वारला ह्मणून स्पष्ट लिहिलें असून, त्याला मुसुलमानी चंद्राचा व हिंदूंच्या वाराचा प्रत्यंतर पुरावा दिला आहे. “ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें ” ह्या ग्रंथाच्या प्रस्तावनेच्या ३६ व्या पृष्ठावर बाळाजी १७१९ त वारला असावा असें मी ह्मटलें होतें. असें ह्मणण्यास त्यावेळीं कारण होतें. कांकीं १७१८ पासून १७२० पर्यंत बाळाजी काय करीत होता ह्याचा मला पत्ता लागला नव्हता. ग्रांट डफचा १७२० चा आक्टोबर चुकला आहे ह्या विषयीं मात्र मला बिलकुल संशय नव्हता. प्रस्तुत शकापर्लाच्या साहाय्यानें १७१८ पासून १७२० च्या एप्रिलापर्यंत बाळाजी विश्वनाथाच्या हालचालीचा ठोकळ तपशील देतां येणें शक्य झालें असल्यामुळें, १७२० च्या एप्रिलची तारीख २ निःसंशय ग्राह्य ठरतें. १७१८ च्या अक्टोबरापासून १७२० एप्रिल पर्यंतच्या बाळाजी विश्वनाथाच्या हालचालीचा तपशील पुढील एका टिपेंत दिला आहे.

१४ ह्या शकावलींत बाळाजी विश्वनाथ, बाजीराव बल्लाळ व बाळाजी बाजीराव ह्या तीन पेशव्यांच्या कारकीर्दीतील प्रसंगांच्या मित्या दिल्या

औरंगाबादेहून साताऱ्यास येण्याकरितां निघाले ते छ २८ रजब रोजीं मुक्काम जयसिंगपुरा, औरंगाबादेनजीक होता (९ जून १७१९). छ १८ साबान रोजीं ( २९ जून १७१९ ) सासवडास दाखल झाले व छ २७ साबानीं ( ४ जुलै १७१९ ) साताऱ्यास भेट घेतली. छ १९ जिलकाद ( २२ सप्टेंबर १७१९ ) रामचंद्र महादेव चासकर यांणीं प्रांत कल्याणचा मुलूख हस्तगत केल्याचें पत्र आलें. छ २ जिल्हेज ( ९ अक्टोबर १७१९ ) नारायणरावजी व जानोजी ढमढेरे यांनीं पाबळचें ठाणें घेतलें. छ २३ मोहरम रोजीं ( ९ नोव्हेंबर १७१९ ) स्वार झाले. छ १९ जमादिलावल ( १९ मार्च १७२० ) रोजीं लग्न झालें. छ २० जमादिलावल रोजीं कोल्हापुरावर लढाई झाली ( २० मार्च १७२० ). बेहे येथें स्वारी करून, परत येऊन नंतर स्वामिदर्शन घेऊन सासवडास आले. छ २० जमादिलाखर ( १७ एप्रिल १७२० ). रोजीं बाजीराव बल्लाळ यांस पेशवेपदाचीं वस्त्रें झालीं, मसूर मुकामीं, शके १६४२ शार्वरी संवत्सर. नारायणदेव चिंचवडकर शांत जहाले, भाद्रपद शुद्ध ७ ( ३० आगष्ट १७२० ) महालाकडून दमाजी थोरात यांस

---

मागीलपानावरून पुढें चालू.

आहेत. पैकीं बाळाजी विश्वनाच्या कारकीर्दीची शकावली खमस अशर सालापासून सुरू होते. खमस अशर सालापूर्वीची जी हकीकत दिली आहे ती उपोद्घातरूप आहे. बाळाजी विश्वनाथाची शकावली छापतांना, पुनरुक्ति, प्रयोगभंग, वगैरे जे दोष दिसले ते मी काढून टाकिले आहेत. परंतू मूळांतील महत्वाचा एकहि शब्द सोडला नाहीं. मूळ शकावलींत मुसुलमानी इतिहासासंबंधें जी कांहीं थोडी माहिती दिली होती ती जेथें ग्रांटडफच्या माहिती सारखीच आहे असें वाटलें तेथें थोडीबहुत गाळली आहे. शकावली अर्वाचीन असल्यामुळें तिच्यांत योग्य ती छाटाछाट करणें योग्य वाटलें. मुसलमानी तारखा व हिंदू तिथी मात्र जशाच्या तशाच ठेविल्या आहेत. नक्कल करणाऱ्याच्या हस्तदोषामुळें झालेल्या चुका दुरुस्त केल्या आहेत.

सोडण्याविषयीं आग्रह पडल्यावरून राजाज्ञेनें पुरंदरावरून सोडून दिल्हा.

---

१५. ११ आक्टोबर १७१८त बाळाजी विश्वनाथानें पुणें प्रांतांतील देशमुखदेशपांड्यांना अभयपत्र दिलें. तेव्हां तो १७१८च्या आक्टोबरांत देशीं होता हें उघड आहे. १७१८च्या आक्टोबरानंतर बाळाजी हुसेन अल्लीबरोबर दिल्लीस गेला. तेथें ११३१च्या हिजरीच्या२२ रबिलाखरीं व ४ जमादिलावलीं ह्मणजे ३ मार्च १७१९ रोजीं बाळाजीनें पातशाही सनदा करून घेतल्या. ह्या वेळीं बाळाजीचें लष्कर यमुनेच्या दक्षिणतीरीं होतें. दिल्लीहून बाळाजी औरंगाबादेस येऊन१७१९च्या जूनच्या ५ तारखेस साताऱ्यास जाण्यास निघाला, तो २५ जूनला सासवडास व ४ जुलैला साताऱ्यास पोंहचला. १७१९ चा पावसाळा बाळाजीनें साताऱ्यास वसुलाची व्यवस्था करण्यांत व पातशाही सनदांतील शर्ती अमलांत आणण्यांत घालविला. १७१९च्या ५. नोव्हेंबराला बाळाजी विश्वनाथ प्रांतांत हिंडण्यास किंवा मोहीम करण्यास निघाला. १७२० च्या १९ मार्चाला मुलांपैकीं किंवा मुलींपैकीं कोणा एकाचें लग्न* करून बाळाजी १७२० च्या एप्रिलच्या दुसऱ्या तारखेस शनवारीं मृत्यू पावला; व पुढें पंधरा दिवसांनीं ह्मणजे१७२०च्या एप्रिलच्या १७ तारखेस बाजीरावाला पेशवेपद मिळालें. बाजीरावाला पेशवेपद मिळण्यास वर्ष सहा महिने लागले ह्मणून ग्रांटडफ ह्मणतो त्याचें कारण, बाळाजीच्या मृत्यूचा महिना त्यानें १७२० च्या आक्टोबरांत नेला व नंतर १७२१ च्या एप्रिलांत ह्मणजे बाळाजीच्या मृत्यूनतर सहा महिन्यांनीं बाजीरावाला पेशवाई मिळाली असें त्यानें गणित केलें हें होय. बाळाजी दिल्लीस असतांना परशरामपंत प्रतिनिधी वारला ह्मणून डफ ह्मणतो तें बराबर नाहीं. कां कीं, १७१८ च्या २० मेला परशरामपंत वारला व श्रीपतरावाला प्रतिनिधिपद १७१८ च्या ८ जूनला मिळालें हें निश्चित आहे. महमदशाहा तक्तावर बसे तोंपर्यंत बाळाजी दिल्लीस होता ह्मणून डफ ह्मणतो तें चूक आहे; व ह्या चुकीमुळेंच बाळाजीचा मृत्यु त्याला १७२०च्या आक्टोबरांत न्यावा लागला.येणेप्रमाणें१७१८च्या आक्टोबरापा-

[ मागील पृष्ठावरून पुढें चालूं. ]

सून १७२०च्या एप्रिलापर्यंत बाळाजीच्या हालचालींची ठोकळ हकीकत देतां येते. परंतु, १७१५च्या फेब्रुवारीपासून १७१८ च्या आक्टोबरापर्यंत बाळाजी नक्की काय करीत होता तें कळण्यास अद्याप साधन नाहीं. १७१५च्या फेब्रुवारीच्या पुढें, बहुशः १७१५ च्या आक्टोबरांत शंकराजी मल्हाराच्या हस्तें बाळाजीनें मोगलाशीं तह केला (थो. शा. च. पृ. ३९). तो तह झाल्यावर मोंगलांच्या मदतीनें बाळाजीनें दमाजी थोराताचें पारिपत्य १७१६ त केलें. ह्याच सुमारास रंभाजी निंबाळकर वगैरे लोकांचे दंगे मोडून १७१८ आक्टोबरापर्यंत मुलूख आबाद करण्यांत बाळाजीचीं दीड दोन वर्षें गेलीं असें वर छापलेल्या पत्रावरून दिसतें. येणेप्रमाणें १७०७ पासून १७२० एप्रिलापर्यंतची बाळाजी विश्वनाथाची ठोकळ हकीकत आहे. परंतु, ती इतकी त्रोटक आहे कीं, इतिहासरचनेस अनुक्रमणिकेच्या पलीकडे तिच्यापासून जास्त व विस्तृत माहिती मिळण्याचा संभव नाहीं. ग्रांट डफनें व इतर बखरकारांनीं प्रसंगांच्या सालांची व मित्यांची जी गफलत केली आहे तिची ह्या शकावलीच्या व टीपांच्या साहाय्यानें बरीच दुरुस्ती झाली आहे हें खरें आहे. परंतु, त्या प्रसंगांच्या व्यवस्थित व मुद्देसूद हकीकती देतां येण्यास अद्याप फारशीं साधनें उपलब्ध नाहींत. खरें पाहिलें तर हा १७०७ पासून १७२० पर्यंतचा काल मराठ्यांच्या इतिहासांत फारच महत्त्वाचा आहे. ह्या कालाची चोख व विस्तृत माहिती मिळाल्यावांचून १७२० पुढील अनेक ऐतिहासिक प्रसंगांचें महत्त्व यथास्थित कळण्यास मोठी पंचाईत पडणार आहे. तेव्हां ह्या कालाला अनुलक्षून असणारे लेख शोधून काढण्याकडे इतिहासज्ञांनीं विशेष लक्ष्य पुरविलें पाहिजे. ह्या कालचे लेख मुख्यत्वेंकरून, हैद्राबाद संस्थानांतील, जाधव, निंबाळकर वगैरे सरदारांच्या दप्तरांत बहुशः सांपडावे असें वाटतें. तसेंच, ह्या शकावलींत आलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या वंशजांकडेही कांहींना कांहीं तरी लेख ह्या कालावर प्रकाश पाडण्यासारखे मिळावे असा अंदाज आहे. १७०७ पासून

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू. ]

१७२० पर्यंत मराठ्यांच्या इतिहासांत ज्या हिंदू व मुसलमान गृहस्थांचीं नांवें आढळतात त्यांची मीं एक याद तयार केली आहे. परंतु, विस्तरभयास्तव ती येथें देणें अगत्याचें दिसत नाहीं. ही शकावली व इतर बखरी वाचून माझें असें मत झालें आहे कीं, ग्रांट डफनें बाळाजी विश्वनाथाच्या इतिहासाची जितकी फोड करावी तितकी केली नाहीं; इतकेंच नव्हे तर ह्या पुरुषाच्या कारकीर्दीचा जो थोडा बहुत इतिहास लिहिण्याचा त्यानें प्रयत्न केला आहे तोही अगदींच वरवरचा, तुटपुंजा व असमाधानकारक आहे. साताऱ्याच्या महाराजांच्या जवळील त्या वेळचे कागदपत्र ग्रांट डफला पहावयास सांपडले असून त्यानें त्यांचा करावा तसा उपयोग करून घेतला नाहीं. त्यावेळच्या कागदपत्रांपैकीं सुमारें पाऊणशें शंभर फारशी कागदपत्रें व सनदा साताऱ्यास एका पुरातन मुत्सद्दी घराण्याच्या दफ्तरांत मला पहावयास मिळाल्या होत्या. त्या लेखांवरून दक्षिणच्या सहा सुभ्यांचें भूज्ञान व मोंगल आणि मराठे ह्यांजमधील संबंध स्पष्ट कळून येईल अशी माझी अटकळ आहे. ह्या वेळचे कागदपत्र कोल्हापूरच्या व कोल्हापूरच्या सरदारांच्या दफ्तरांत अवश्य सांपडतील.

# पेशव्यांची शकावली.

### इ. स. १७२० पासून १७४० पर्यंत

## बाजीराव बल्लाळाची हकीकत.

**श्री॥ इहिदे अशरीन मया व अलफ, सन ११३० फसली, अवल साल छ २७ रजब, २५ मे १७२०, वैशाख वद्य १३ शके १६४२.**

खंडेराव दाभाड्या मेला. त्याचा पुत्र त्र्यंबकराव दाभाडे यांशीं सन १७२१ मे महिन्यांत सेनापतीपदाचीं वस्त्रें झालीं. उमाबाईचे मदतीनें चालविलें. गुजराथ, काठेवाड वगैरे अंमल सांगितले. खंडेराव मरण्याचे अगोदर त्याचा सरदार दमाजी गाइकवाड होता. त्यानें मोठें शौर्य केलें. ह्मणून खंडेराव याणें शाहू महाराजास सांगितलें. सबब शाहू महाराज यांणीं खंडेराव याचे हाताखालीं दुसरा अधिकार देऊन समशेर बहादूर असा किताब दिला. तो बडोद्याचे गायकवाडाचा मूळ पुरुष. तो दमाजी, खंडेराव दाभाडा मेला, त्याच सुमारास, मृत्यू पावला. याचे जागीं त्याचा पुतण्या पिलाजी गायकवाड यास बसविला. संस्थान जंजिरा •याचा अंमल शिद्दिसात याजकडे आहे. त्याणें दक्षिण कोंकणांत बहुत धामधुम केली. त्याचे पारपत्यास चिमणाजी बल्लाळ यास पाठविलें. त्याचे तैनातीस विठ्ठल शिवदेव विंचूरकर यास दिलें होतें. त्यांनीं लढाई करून त्याचे घोडे आपले हस्तगत करून

---

१६ विठ्ठल शिवदेव विंचूरकर या गृहस्थाचा अत्यंत जुना उल्लेख ह्मटला ह्मणजे हा येथें केलेला आहे. अर्थात विठ्ठल शिवदेवाच्या पराक्रमांचा हिशेब १७२० पासून पुढें ४० वर्षें देण्याची जबाबदारी इतिहासज्ञांवर येऊन पडते.

आणिले. छ ४ सफर रोजीं ( २५ नोव्हेंबर १७२० ) बाजीराव साहेब सातार्‍यास गेले. पुढें छ २५ सफर रोजीं ( १७ डिसेंबर १७२० ) निघून मोंगलाईंत गेले. नंतर सुप्यास येऊन दोन महिने होते. छ १६ रबिलावल रोजीं ( ६ जानेवारी १७२१ ) निजामउन्मुलुख याची भेट मु॥ सावर्डिया पे॥ उंदिरगांव येथें झाली. मोहरम ( आक्टोबर–नोव्हेंबर १७२० ) महिन्यांत बारामतीवर लढाई झाली. भाद्रपद मास ( सप्टेंबर–अक्टोबर १७२० ) मुक्काम सासवड. रमजान ( जून-जुलै १७२० ) महिना वर्‍हाड प्रांतीं होते.

---

१७. बाळाजी विश्वनाथ १७२० च्या २ एप्रिलास वारला. बाजीरावास पेशवाई १७२० च्या १७ एप्रिलास मिळाली. पुढें महिना पंधरा दिवसांनीं बाजीराव खानदेशाकडे गेला. सबंद रमजान् महिना ह्मणजे १७२० चे जून व जुलै हे दोन महिने बाजीराव खानदेशांत होता. खानदेशांत निजामुन्मुलुखाचा प्रतिस्पर्धी जो अलम अल्लीखान त्याची मदत करण्याकरितां बाजीराव खानदेशांत गेला होता. बाजीराव खानदेशांत असतांना १७२० च्या जुलैंत निजामुन्मुलुखाची व अलम अल्लीची बाळापुरास लढाई झाली. तींत चंद्रसेन जाधव, रावरंभा निंबाळकर वगैरे शाहूची प्रतिस्पर्धी मंडळी निजामुन्मुलुखाच्या पक्षानें लढत होती; व बाजीरावादि शाहूच्या पक्षाची मंडळी अलम अल्लीच्या बाजूनें साक्षात् लढत होती असें ह्मणण्याला जरी अधार नाहीं तरी अप्रत्यक्षरीतीनें बाजीरावाचा त्याला पाठिंबा होता असें दिसतें. १७२० च्या सप्टेंबर–आक्टोबरांत बाजीराव सासवडास होता. १७२० च्या आक्टोबर–नोव्हेंबरांत बाजीरावानें बारामतीस निजामुन्मुलखाच्या पक्षापैकीं कोणाशीं तरी लढाई मारिली. १७२० च्या नोव्हेंबरांत बाजीराव शाहूस भेटण्यास सातार्‍यास आला. बाळाजी विश्वनाथ वारल्यावर सात महिन्यांनीं बाजीरावानें सातार्‍यास येऊन वस्त्रें घेतलीं असें ग्रांट डफ ह्मणतो त्याला कारण बाजीराव सातार्‍यास १७२० च्या नोव्हेंबरास आला ह्याचा दाखला त्याला सांपडला व १७२० च्या १७ एप्रिलास बाजीरावास पेशवाई मिळाली ह्याचा दाखला त्याला

## सु॥ इसने अशरीन मया व अलफ, सन ११३१ फसली, अवल साल छ ८ साबान, २६ मे १७२१, वैशाख शुद्ध ९ शके १६४३.


महादाजी अंबाजी यास पोतनिशी सांगितली, छ ८ सवाल ( २४ जुलै १७२१ ). छ १२ जिलकाद रोजीं ( २६ आगस्ट १७२१) विजापुराहून निघून छ १४ जिलकाद रोजीं ( २८ आगस्ट १७२१) सातान्यास परत आले. छ २० मोहरम रोजीं ( ३१ अक्टोबर १७२१ )सातान्याहून निघून छ २१ माहे मजकुरीं (१ नोव्हेंबर १७२१) पिंपरीस आले. छ २८ सफर ऊर्फ मार्गशीर्ष वद्य १३ सह १४ मु॥ सातें त॥ नाणेमावळ येथें

---

[ मागील पृष्ठावरून पुढें चालूं. ]

सांपडला नाहीं हें होय. ह्या सात महिन्यांत ह्मणजे १७२०च्या एप्रिलापासून १७२० च्या नोव्हेंबरापर्यंत बाजीराव कोठें होता ह्याचा ग्रांट डफला विकल्पात्मक संशय होता (ग्रांडडफचा इतिहास, भाग १३.)ह्या संशयामुळें, अर्थात् १७२० एप्रिलापासून नोव्हेंबरापर्यंतचे दाखले न मिळाल्यामुळें ग्रांटडफनें बाजीरावाचा ह्या सात महिन्यांचा इतिहास सोडून दिला आहे. बारामतीवर आक्टोबर नोव्हेंबरांत लढाई झाल्यावर, बाजीराव डिसेंबरांत निजामास भेटण्यास मोंगलाईंत गेला. १७२१ च्या ६ जानेवारीस सावर्डिया येथें त्याची व निजामुन्मुलखाची भेट झाली. ह्या भेटींत काय बोलणें झालें तें समजण्यास दाखला नाहीं. बहुशः बाळापूरच्या लढाईंत शंकराजी मल्हार वारल्यामुळें निजामास बाजीरावाची मैत्री संपादणें जरूर पडलें असावें. ग्रांटडफच्या ग्रंथांत १७२० सालची बाजीरावाची किंवा शाहूची बिलकुल हकीकत नाहीं. ह्या सालची हकीकत त्यानें निजामुन्मुलुखाच्या व अलम अल्लीच्या तंटयानें भरून काढली आहे. ह्या तंटयांत शाहूच्या पक्षाच्या मराठयांनीं काय काम केलें हें डफनें सांगितलें असतें तर मोंगलांचा इतिहास त्यानें दिला तो यथायोग्य दिला असें ह्मणणें भाग पडलं असतें.

बाजीरावसाहेब पेशवे यांस पुत्र नानासे॥ ऊर्फ बाळाजी बाजीराव झाला. घटी ४१ पळें ५२ जेष्ठा नक्षत्र, प्रथम चरण लग्नकुंडली खालीं लिहिली आहे. खासा स्वारी पुरंदरपर्यंत जाऊन तेथें भडबुंज्या मोंगल जंगी सामान घेऊन आला होता. त्याशीं लढाई करून त्याचा पराजय करून त्यास लुटलें. मुलखास कौल दिल्या प्रे॥ चालून या सालीं भुजंगशेट जेष्ठ राशीनकर, व दर्यापा अदलकर व बाळापा जदंव वाणी यांस कौल देऊन आणविलें. पुण्यास अमदानी करण्याचे कारभारावर संभाजी जाधव यास मागें ठेविलें होतें. करीम बेग याशीं युद्ध जुन्नर मुक्कामीं झालें. नानासाहेब यांची जन्मकुंडली:—




| रवि | चंद्र | मंगल | बुध | गुरु | शुक्र | शनि | राहू | केतू | लग्न |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | ७ | ० | ७ | ७ | ७ | ७ | ८ | २ | ४ |
| ६ | १९ | १५ | २२ | ६ | ९ | २१ | २२ | २२ | २० |
| ११ | २७ | ५२ | १४ | २ | १३ | ५ | ५० | ५० | ४५ |

१८ भडबुज्या मोंगलाशीं व करीमबेगाशीं युद्ध कोणत्या महिन्यांत झालें तें ह्या तपशिलांत दिलें नाहीं. १७२० व १७२१ ह्या सालांतील आपल्याला माहीत नाहीं असा मजकूर बराच आहे असें दिसतें. १७२१ च्या आगस्टांत बाजीराव विजापूर प्रांतांत गेला होता. विजापूर प्रांतांत जाण्याचें कारण निजामुन्मुलुखाच्या प्रांतांतील लोकांस दंगा करण्यास प्रवृत्त करणें हें होय. बाजीराव विजापुराहून परत आल्यावर, निजामुन्मूलूख विजापुरांत स्थिरस्थावर करण्यास गेला, व तें काम आटोपून १७२२ च्या जानेवारींत दिल्लीस जाऊन पोहोंचला.

## सु॥ सलास अशरीन मयाव अलफ, सन ११३२ फसली अवलसाल छ १९ साबान, २४ मे १७२२, ज्येष्ठ वद्य ५ शके १६४४.

छ १९ साबान ( २४ मे १७२२ ) अवल साल रोजीं कुरकुंबाहून सुप्यास गेले. नंतर छ ६ सवाल ( ९ जुलै १७२२ ) रोजीं साताऱ्यास गेले. रमजान ( जून ) महिन्यांत श्रीमंतास सुपें मुक्कामीं पुत्र जाला. रविलावल ( डिसेंबर १७२२ ) महिन्यांत जावळ काढिलें. छ १२ मोहरम ( १२ आक्टोबर १७२२ ) रोजीं साताऱ्याहून निघाले ते सासवडास जाऊन सुप्यास गेले. नंतर अवरंगाबादेस गेले. छ ७ र॥ वल रोजीं ( ९ डिसेंबर १७२२ ) नबाब ऐवजखानाची भेट झाली. छ २३ रविलाखर ( २० जानेवारी १७२३ ) रोजीं बऱ्हाणपुरास गेले. छ २६ रविलाखर ( २३ जानेवारी १७२३ ) मुक्काम पिंपळोद ता॥ साजणी सरकार हांडें येथें अनुपसिंग याची भेट झाली. निजामउन्मुलूख आपले जाहागिरीचा बंदोबस्त करून दिल्लीस ( जानेवारी १७२२ ) वजीरीचे अधिकारावर गेला. याशीं व बादशहाशीं बनेना, ह्मणून बादशहानें अहमदाबाद सुभ्यावर कुलीखान अधिकारी होता, याणें कांहीं चूक केली सबब त्याचे पारपत्यास निजामास पाठविलें. तेव्हां निजामानें कुलीखानाकडील फौज बहुतेक वश केल्यामुळें कुलीखान वडाराचें सोंग घेऊन दिल्लीस पळून गेला. हें वर्तमान निजामउन्मुलूख याशीं कळतांच तो उज्जनीस राहून त्या गुजराथ प्रांतापैकीं १ ढवळक्या, १ भडोच, १ जंबुसर, १ मखबुदाबाद, १ बलसाड हे पांच महाल आपले जहागिरीस ठेऊन अहमदाबादचे अधिकारावर आपल्या पुतण्यास ठेऊन आपण सन १७२२ सालीं दिल्लीस आला. नंतर तेथें पातशहाचे व त्याचे स्वभावास जमेना. तेव्हां वजीरीचें काम टाकून वकीलमुतलक असा दुसरा अधिकार पतकरून राहिला. तत्राप तेंही त्यास आवडेना. सबब एके दिवशीं शिकारीचे निमित्तें बाहेर पडून आपले मुलखीं दक्षिणेंत आला. पुन्हां दिल्लीस गेला नाहीं. तेसमयीं नर्मदेच्या उत्तरेकडील मुलूख जितका मोंगलांनीं घेतला होता, तो सर्व निजामाचे हातीं लागला. श्रीमंतांची स्वारी हिंदुस्थानांत असतां

छ २४ जा॥ वल रोजीं ( १९ फेब्रूवारी १७२३ ) मु॥ बदक्शा प्रांत झाबाब येथें नबाब निजामउन्मुलूक याची भेट घेऊन दक्षिणेस परत निघाले. छ ७ जा॥खर ( ५ मार्च १७२३ ) मु॥ बोरगांव प्रा॥ अशर छ मजकुरीं नबाब याचा निरोप घेऊन बागेलखंडाकडे स्वारी केली. गोदू याचें पारपत्य केलें. रघोजी भोसल्यास देऊरगांव इनाम दिलें.

## सु॥ अर्बा अशरीन मयाव अलफ, सन ११३३ फसली, अव्वलसाल छ १ रमजान, २५ मे १७२३, ज्येष्ठ शुद्ध २ शके १६४५.

तुकाराम बोवा देहूकर याचे पुत्र नारायण गोसावी श्रावण शु॥ ४ स ( २६ जुलै १७२३ ) समाप्त झाले. छ २० सफर ( ९ नोव्हेंबर १७२३ ) श्रीमंत साताऱ्याहून निघून वांई, घोम, महाबळेश्वर, प्रतापगड वगैरे करून पुन्हां छ ८ रा॥ वल रोजीं ( २५ नोव्हेंबर १७२३ ) साताऱ्यास आले. अंबाजीपंत तात्या स्वारीस निघाले. छ १८ रा॥ वल ( ५ डिसेंबर १७२३ ) स्वारी हिंदुस्थानांत चालती झाली, तों माळव्यांत गेले. सैद बहादरशा बादशाहाकडील सुभा चालून आला. त्याशीं लढाई देऊन त्याचा मोड करून उज्जनीस गेले. तेथें ठाणीं बसवून अंमल सर केला. तमाम राजेरजवाडे बुंदेलखंडसुद्धां खंडणी घेतली. बुंदेल्याशीं स्नेह करून कांहीं दिवस छावणी केली. खानदेशांत मोकास अंमलाचा वसूल करूं लागले. या लढाईंत शिंदे, होळकर व पवार यांणीं बहुत शौर्य केलें होतें. मल्हारजी होळकर या वेळीं शिलेदारी करीत होता. तो जातीचा धनगर होता. नीरा नदीकांठीं होळ ह्मणून गांव आहे, तेथील चौगला आहे. दुसरा राणोजी शिंदा याचे पूर्वज साताऱ्याजवळ कन्हेरखेड येथें राहत असत. तो शिंदा पूर्वी मोंगलाईंत चाकरी करीत असतां, मोठे पदवीस चढला असतां, दरिद्रावस्थेंत येऊन बाळाजी विश्वनाथ यांजवळ बारगिरीवर होता. पुढें बाजीराव याजपाशीं जोडे उचलावयाची चाकरी करून हुजऱ्यांत राहिला होता. पुढें योग्यतेस चढत आला. त्याच सुमारास धारेचा पवार

योग्यतेस चढला. त्याचा मूळपुरूष उदाजी पवार विश्वासराव याचा बाप रामचंद्रपंत अमात्य यांणीं योग्यतेस चढविला होता. बावडेकराकडून आंग्रे याणीं सुवर्णदुर्ग तालुका घेतला. माळव्यांत बंदोबस्त राहण्याकरितां नेहमीं वीस हजार फौज असावी असें करून राणोजी शिंदे व मल्हारजी होळकर यांस पाठविलें. शिंद्याकडे उज्जन व होळकराकडे इंदूर व पवार यास माळवें प्रांतीं जो अंमल साधेल तो साधावा असें ठरवून पेशवे परत आले. हिंदुस्थानांत राजे रजवाडे यांस सोन्याच्या काठ्या व चौन्या सोन्याच्या दांड्याच्या असतात त्याप्रे॥ पेशवे यासही बहुमान दिल्हा.

## सु॥ खमस अशरीन मयाव अलफ, सन ११३४ फसली, अवल साल छ ११ रमजान, २४ मे १७२४, जेष्ठ शुद्ध ९ शके १६४६.

निजाममुन्मुलूक बाहेर गेल्यामुळें दिल्लीचे बादशाहास व त्याचे दरबारचे लोकांस घातशंका उत्पन्न होऊन हैदराबादचा सुभेदार कंबरजखान यास लिहिलें कीं, तुह्मी फौज घेऊन निजामुन्मुलूक यास त्याचे स्थानीं जाऊं देऊं नये. हें काम तुह्मी केल्यास साहा सुभा दक्षिणचा अधिकार मिळेल. असें पत्र लिहून व त्या अधिकाराची सनदही त्या पत्राबरोबर पाठविली. नंतर कंबरीजखानानें फौज तयार केली. तेव्हां निजामुन्मुलुकानें त्याशीं तह करावयाची खटपट बहुतप्रकारें केली, परंतु शेवटास गेली नाहीं. लढाईच व्हावी असें ठरल्यावर निजामुन्मुलूक याणीं पेशवे याशीं साहाय्य करण्याकरितां बोलाविल्यावरून त्याचे कुमकेस पेशवे यांची स्वारी फौजेसुद्धां जाऊन मोहरम महिन्यांत छ २३ रोजीं ( २ अक्टोबर १७२४ ) साकरखेडले येथें मोठा युद्धप्रसंग होऊन कंबरजखान व त्याचे दोघे पुत्र ठार झाले. अमानतखान दिल्लीहून सुभा आला होता तो व त्याजकडील सरदार इभ्राइमखान व अबदुलखान व खाजे अमानतखान वगैरे मयत झाले. १७ हत्ती अमानतखानाकडील पाडाव झाले. निजामुन्मुलूखानें कंबरजखान याचें शीर कापून दिल्लीस पाठवून बादशहास पत्र लिहिलें कीं, स्वामीच्या दैवयोगानें आह्मी हा बंडवाला

मारला. नंतर निजामुन्मुलूक हैदराबादेस गेला. तेथें कंबरीजखानाचा एक मुलगा ख्वाजा आदब किंवा आदप ह्मणून होता, त्याशीं सल्ला करून गोवळकोंडा व इतर किल्ले घेतले. हें वर्तमान ऐकून दिल्लीचे बादशहानें निजामुन्मुलूक याजकडील प्रांत गुजराथ व माळव्याचा अधिकार दूर करून माळव्याचे अधिकारावर राजा गिरिधर यास नेमिलें. त्यानें येथील अंमल, फौज त्या ठिकाणीं नव्हती, ह्मणून बसविला. परंतु गुजराथचे अधिकारावर सरबुलंदखान यास नेमिलें. परंतु पूर्वी निजामुन्मुलूक याचा पुतण्या अंमदखान त्या ठिकाणीं अधिकारावर होता. त्यानें शाहूकडील सरदार कंठाजी कदम बांडे त्या प्रांतीं होता, त्यास अंमदखानानें गुजराथचा चौथ कबूल करून आपले कुमकेस घेऊन अहमदाबादेजवळ सरबुलंदखान याचे लष्कराबरोबर लढून त्याचा पराजय केला. अहमदाबादेंत सरबुलंदखानानें आदम सजायतखान यास ठेविला होता, त्यासही ठार मारिलें. सजायतखानाचा भाऊ सुरतेस फौजदार होता. त्याणें पिलाजी गाइकवाड सुरतेजवळ होता, त्याशीं सख्य करून निश्चय केला कीं, आपण उभयता मिळून अंमदखानास मारूं. त्यावेळेस पिलाजीस निजामुन्मुलूकाचें सांगणें, माझे पुतण्याचें साहाय्य करावें, असें आलें. त्यावरून पिलाजी गाइकवाड यानें विचार केला कीं, जो पक्ष सबळ, त्याचें साहाय्य करूं. मग प्रथम सुरवात झाल्याबरोबर निघून माही नदीपलीकडे आरासा गांवीं पोहोंचला. तेथें अंमदखानाचे लष्कराची गांठ पडली. सुरतवाल्याजवळ तोफा फार होत्या. यामुळें अंमदखानाचा पराभव होऊं लागला. तेव्हां पिलाजीनें सुरतवाल्यास सांगितलें कीं, तुह्मी पाठीस लागा, मी तोफा सांभाळितों. त्याप्रमाणें तो पाठीस लागला. तेव्हां पिलाजी गाइकवाड याणीं तोफांचीं तोंडें उलटीं फिरवून अंमदखानाचा पक्ष धरल्यामुळें सुरतवाल्यावर दोन्हीं लष्करें पडलीं. त्याचे लोक फार मेले. बाकी राहिले लोकांसुद्धां पळण्यास अवसर सांपडेना, असें पाहून तो फौजदार आपले हातें आपल्यास तोडून घेऊन मरण पावला. नंतर कंठाजी कदम, पिलाजी गायकवाड दोघे मिळून गुजराथची चौथाई घेऊं लागले. परंतु दोघांत

मुख्यत्व कोणी करावें याविषयीं तंटा उत्पन्न होऊन दोघे लढूं लागले. तेव्हां अंमदखान यानें दोघांचीही समजूत काढून माही नदीचे आग्नेय दिशेकडील मुलखांत चौथाई पिलाजीनें घ्यावी व वायव्य दिशेस कंठाजीनें घेत जावी, असें ठरविलें. त्याप्रमाणें पिलाजी सुरतेकडे गेला व कंठाजी खानदेशांत आपले जहागिरीचे जागीं आला. असें अमेदखानाचें प्राबल्य झालेलें पाहून दिल्लीचे बादशहानें तें बंड मोडण्याकरितां सरबुलंदखानाबरोबर लष्कर देऊन पाठविलें. तेव्हां अमेदखानानें आपले कुमकेस मराठे सरदार बोलाविले. ते येण्यास कांहीं अवकाश लागल्यामुळें अमेदखानानें अहमदाबादेस कांहीं फौज ठेऊन मागें हटला. इतक्यांत मराठी फौज येऊन पोंहचली. नंतर माघारा उलटून मराठे सरदारासहीत सरबुलंदखानाचे बिनीवाल्यावर जाऊन पराभव केला. त्यांत मराठे लोक बहुत मेले. यामुळें मराठे लोक पुन्हां त्यास अनुकूल होईनातसे झाले. मग अंमदखान पेंढारी लोकांप्रेंाा वागूं लागला. त्याबरोबर मराठे सरदार कंठाजी कदम व पिलाजी गाइकवाडही पर्जन्यकालपर्यंत लुटीत होते. याप्रेंाा गुजराथचें वर्तमान असतां, व मोंगल लोकांत कलह लागला, ही संधी बाजीराव पेशवे यांनीं पाहून दोनवेळ माळव्यांत स्वाऱ्या करून द्रव्य बहुत नेलें. या स्वारीबरोबर अंबाजीपंत व अंताजीपंत भानू व अन्यात्रा ह्मणजे नारो गंगाधर मुजुमदार व आवजी चिटणीस होते, व बापूजी भीमसेन पारसनवीस वगैरे फौजेसुद्धां गेले होते.

---

१९. इ. स. १७२४ च्या पूर्वी बाजीराबानें तीन स्वाऱ्या माळव्यांत पाठविल्या ह्मणून डफ ह्मणतो परंतु स्वतः नर्मदा उतरून तो माळव्यांत गेला होता किंवा नाहीं ह्याबद्दल डफला संशय होता. ह्या शकावलीच्या सलास अशरीन सालाखालील मजकुरांत बाघेलखंडाकडे बाजीराव गेल्याचा उल्लेख आहे; अर्बा अशरीन सालाखालील मजकुरांत माळव्यांत उतरल्याचा वृत्तांत आहे; व खमस अशरीन सालाखालील मजकुरांतही असाच मजकूर आहे; ह्यावरून बाजीराव १७२४ पूर्वी माळव्यांत गेला होता हें निर्विवाद आहे. साखरखेडल्याची लढाई १७२४ च्या अक्टोबरांत झाली ह्मणून हा शकाव-

**सु॥ सीत अशरीन मयाव अलफ, सन ११३५ फसली, अवल साल २२ रमजान. २५ मे १७२५, अधिक ज्येष्ठ वद्य ९ शके १६४७.**

छ ९ जिलकाद रोजीं ( ७ जुलै १७२५ ) साताऱ्याहून निघून छ १४ पर्यंत ( १६ जुलै १७२५ ) माहुलीस होते. तेथून पुढें अपशिंग्यास होते. छ ७ जिल्हेज ( ८ आगष्ट १७२५ ) सुप्याकडून सासवडाहून पुण्यास आले. छ २३ जिल्हेज रोजीं ( २४ आगष्ट १७२५ ) पुन्हा साताऱ्यास गेले ते छ १ मोहरमपर्यंत ( २९ आगष्ट १७२५ ) फिरत फिरत छ मा॥ पुण्यास आले. छ १ सफर रोजीं ( २८ सप्टेंबर १७२५ ) मुक्काम पुण्यास होता. छ १ रविलावल

---

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू. ]

लिकर्ता लिहितो. ग्रांटडफ ही लढाई जुलैंत झाली ह्मणून ह्मणतो तें अर्थात् अविश्वसनीय ठरतें. १७२४ पूर्वी विजापूर, जुन्नर, औरंगाबाद, बऱ्हाणपूर, अशेर, हांडिया, माळवा, बाघेलखंड इतक्या प्रांतांत बाजीरावानें स्वाऱ्या केलेल्या आहेत. त्यांचा उल्लेख ह्या शकावलींत सांपडतो, परंतु त्यांचा तपशील कोठेंही आढळत नाहीं. १७२४ पूर्वींचीं बाजीरावाचीं पत्रें अद्यापपर्यंत उपलब्ध झालीं नाहींत. अंबाजीपंत पुरंदरे, अंताजीपंत भानू, अन्याबा मुजुमदार, चिटणीस, बापूजी भिवराव, पारसनीस, मल्हारजी होळकर, राणोजी शिंदे, उदाजी पवार, पिलाजी गायकवाड, कंठाजी कदम बांडे वगैरेचीं दफ्तरें ह्या वेळची तपशिलवार माहिती मिळविण्यास शोधिलीं पाहिजेत. बाजीरावासारख्या पराक्रमी पुरुषाच्या आयुष्याच्या ऐन उमेदींतील पहिल्या चार वर्षांचा इतिहास अगदीं अज्ञात रहावा हें मोठें आश्चर्य आहे. वीस वर्षें सर्व हिंदुस्थान हलवून सोडणाऱ्या व इराण तुराणापर्यंत प्रख्यात झालेल्या ह्या लोकोत्तर पुरुषाच्या आयुष्यांतील प्रत्येक दिवस इतका महत्वाचा आहे कीं त्याची तपशीलवार नोंद केल्याशिवाय स्वस्थ बसणें सोयीचें होणार नाहीं. इ. स. १७५० पासून १७९६ पर्यंतच्या मराठ्यांच्या इतिहासांतील राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांग्रामिक घडामोडींची तपशिलवार माहिती देतां येण्यास सामग्री उपलब्ध झालेली आहे. परंतु १७५० पूर्वींचा मराठ्यांचा इतिहास बहुतेक अज्ञातच आहे.

रोजीं ( २७ अक्टोबर १७२५ ) मौजे पिंपळेनजीकसासवडावरून साताऱ्यास जाण्याकरितां ता॥ २४ रोजीं ( २२ अक्टोबर १७२५ ) निघाले. साताऱ्यास गेल्यानंतर फत्तेसिंग भोसले यास कर्नाटकचे स्वारीस तुळजोजी राजे तिकडे होते त्याजकडे पाठविलें. त्याजबरोबर महाराजांनीं बाजीराव पेशवे व प्रतिनिधि, दाभाडे व रघूजी भोसले सेनासाहेब सुभा व सर लष्कर असे सरदार देऊन पन्नास हजार फौज पाठविली. संताजी घोरपडे पुरातन सेनापति याचे पुत्र संभाजीकडे गेले, ते तिकडेच राहिले. त्यांच्या घराण्यांतील पिराजी व मुराराव घोरपडे गुत्तीचें संस्थान रक्षून होते, त्यांस सेवा करून दाखवावी ह्मणून महाराजांनीं लिहिल्यावरून तेही फत्तेसिंग याजबरोबर कर्नाटकांत गेले. सुरापूर, चित्रदुर्ग, गदग, लखमेश्वरापासून पूर्वींच्या खंडण्या घेतल्या. सालाबाद घेण्याचा ठराव करून, शिवाय हुजूरचीं ठाणीं पूर्वींचीं होतीं तीं सोडविलीं. त्रिचनापल्लीस दादखान ह्मणून होता त्याशीं लढाई करून संस्थान घेतलें, नंतर परत आले. छ २२ जमादिलाखर ( १९ फेब्रूवारी १७२६ ) अबदुल गफर पठाण याची व पेशवे यांची भेट बेदवटी येथें झाली होती. कर्नाटकचे स्वारीहून श्रीमंत छ २६ रमजान ( १७ मे १७२६ ) रोजीं परत आले.[२०]

---

२०. १७२४ च्या २ अक्टोबरीं साखरखेडल्याची लढाई झाली. त्यापुढें १७२५ च्या जुलैपर्यंत बाजीराव काय करीत होता त्याचा ह्या शकावलींत किंवा ग्रांटडफच्या ग्रंथांत कोठें स्पष्ट पत्ता लागत नाहीं. ह्या नऊ महिन्यांतील हालचालींचा तपशील दाखवून देण्याची आवश्यकता शकावलिकर्त्याला किंवा ग्रांटडफला न वाटावी इतक्या त्या हालचाली क्षुल्लक होत्या असें समजण्यांत अर्थ नाहीं. बाजीरावासारख्या पराक्रमी व कार्यकर्त्या पुरुषाच्या आयुष्यांतील कोणतेही महिना पंधरा दिवस कांहीं महत्वाची हालचाल केल्याशिवाय गेले नाहींत ही केवळ गृहीत गोष्ट आहे. १७२४ अक्टोबरापासून १७२५ च्या जुलैपर्यंतचा काल निजामुन्मुलुखाशीं तहाचीं बोलणीं करण्यांत व नर्मदेच्या उत्तरप्रांतांत स्वारी करण्यांत बाजीरावानें घालविला असा माझा अंदाज आहे. ह्या शकावलीच्या खमस अशरीन

**सु॥ सबा अशरीन मयाव अलफ, सन ११३६ फसली, अवलसाल छ ३ माहे सवाल. २४ मे १७२६, ज्येष्ठ शुद्ध ४ शके १६४८.**

श्रीपतराव प्रतिनिधि यास सवाल (मे १७२६) महिन्यांत पुत्र झाला. छ ८ मोहरम रोजीं (२६ आगस्ट १७२६) साताऱ्याहून श्रीमंताची स्वारी पुण्यास दाखल झाली. व पुन्हां छ १२ माहे म॥ (३० आगष्ट १७२६) स्वारीस निघाले. खंडेराव बल्लाळ चिटणीस आश्विन शु॥ ९ स (२१ सप्टेंबर १७२६) वारले. पुत्र १ जिवाजी, १ बापूजी, १ गोविंदराव, १ बहिरराव याप्रमाणें असोन वडील जिवाजी खंडेराव यास चिटनिशीचीं वस्त्रें झालीं. दावळजी वाळके यास ममलकतमदार ह्मणोन किताब दिल्हा छ १९ रविलावल (३०अक्टोबर १७१६) रोजीं.

**सु॥ समान अशरीन मयाव अलफ, सन ११३७ फसली, अवल साल छ १४ माहे सवाल. २५ मे १७२७, ज्येष्ठ वद्य १ शके १६४९.**

छ ३० सवाल रोजीं (९ जून १७२७) श्रीमंत सासवडास होते. छ २६ जिलकाद रोजीं (४ जुलै १७२७) सासवडास साताऱ्याहून

---

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू. ]

सालांतील शेवटल्या मजकुरावरून माळव्यांतील स्वारीसंबंधीचा अंदाज रास्त ठरतो. सातारा येथील पिंगळ्यांच्या दफ्तरांतील कांहीं तहनाम्यांच्या तारखांवरून निजामाबरोबरील तहासंबंधींचा अंदाज बरोबर असावा असें वाटतें. १७२५ च्या जुलैपासून नोव्हेंबरापर्यंत बाजीराव महाराष्ट्रांत होता. १७२५ च्या नोव्हेंबरांत श्रीरंगपट्टणाची स्वारी सुरू झाली. ह्या स्वारीहून बाजीराव १७२६ च्या मेंत परत आला. आपल्या इतिहासाच्या १३ व्या भागाच्या शेवटीं डफनें ह्या स्वारीचा उल्लेख केला आहे. परंतु तिचा तपशील देण्यास सामुग्री सांपडली नाहीं अशी त्यानें तेथें तक्रार केली आहे. प्रस्तुत शकावलींत ह्या स्वारीसंबंधीं किंचित् व ग्रांटडफच्या मानानें बरीच माहिती दिलेली सांपडेल. ग्रंथमालेंत छापत असलेल्या पत्रेंयादीं-तील ९ वा लेखांक ह्या स्वारींतून रघोजी भोसल्यानें लिहिला आहे.

आले. निजाम यांनीं आपले हैदराबाद राजधानींत चौथाई मराठे घेतात, त्या ऐवजीं दुसरें उत्पन्न कांहीं देऊन मराठे यांचें येणें जाणें या मुलखीं बंद करावें, असें मनांत आणून प्रतिनिधि याचे विद्यमानें शाहू महाराज याशीं बोलणें करून कांहीं द्रव्य व इंदापुराजवळ कांहीं मुलूख मराठ्यांस द्यावा व प्रतिनिधि यासही वऱ्हाड प्रांतांत कांहीं जहागीर करून दिल्ही. हें वर्तमान बाजीराव यास कळतांच त्यास राग आला. निजामाचे मुलखांत आपला प्रवेश आहे तो नाहींसा न व्हावा असें असतां प्रतिनिधि यांनीं त्याविरुद्ध केलें, यामुळें प्रतिनिधीशीं वांकडें पडिलें. हें वर्तमान निजामुन्मुलूक यास कळतांच त्यानें चंद्रसेन जाधवराव व रंभाजी निंबाळकर व दाभाडे व पिलाजी गाइकवाड हे सरदार आपल्यास अनुकूल आहेतच, व कोल्हापूरचा मुख्य संभाजी तोही वश आहे. त्यास शाहू व संभाजी यांजमध्यें पुन्हां कलह उत्पन्न करावा यास हा वेळ चांगला आहे असें समजून संभाजीस निम्में हिस्सा मागावयास लावून तो कज्जा मोडावयाशी आपण मध्यस्थ होऊन न्याय मी करीन तोपर्यंत पैसा चौथाई व सरदेशमुखीचा शाहूस देण्याचा यास अटकाव केला. ही लबाडी बाजीरावानीं शाहूचे मनांत पक्की भरवून लढाईच करावी अशी शाहूमहाराजाची आज्ञा घेतली. नंतर छ १ सफर रोजीं ( २७ आगस्ट १७२७ ) बाजीराव सो निजामुन्मुलुकावर स्वारीस निघाले. तेव्हां प्रथम निजामाचे लष्कराची गांठ पडली. तेव्हां त्याशीं हलकी लढाई देऊन पळ काढण्याचा रबा आकार दाखवून खानदेशांत शिरला. निजाम आपलेजवळ आहे असें समजून कांहीं लोक बऱ्हाणपूरचे वाटेकडे त्यास ठकवावयाशी ठेऊन आपण फौजेसुद्धां गुजराथेंत शिरून मुलूख लुटला. आणि तेथील अधिकारी सरबुलंदखान यास असें समजाविलें कीं, आह्मी हें कृत्य निजामुन्मुलुकाचे मसलतीनें करितों. निजाम बऱ्हाणपुराकडे आला तेव्हां त्यास कळलें कीं, आह्मांस मराठ्यांनीं ठकविलें. नंतर तो माघारा फिरून पुणें जाळून टाकावें असा विचार करून तो अहमद-नगरास येईतोंपर्यंत अगोदरच त्यास कळलें कीं बाजीराव करवंदबारीनें येऊन मुलूख लुटला. तेव्हां निजाम माघारा फिरून गोदावरीपलीकडे

गेला. तेथें बाजीरावाची गांठ पडून प्रथम हलकी लढाई झाली. नंतर ज्या ठिकाणीं दाणापाणी नाहीं असे जागीं निजामास घुलवीत नेऊन अगदीं लढून जेर केलें. ही लढाई छ २९ रजब रोजीं ( २९ फेब्रुवारी १७२८) पालखेड येथें झाली. तेव्हां निजामास तह करणें भाग पडलें. नंतर तहाचें बोलणें चालतां बाजीराव पेशवे यानीं कोल्हापूरकर संभाजी राजे आमचे हातीं द्यावे व आमचे मराठे लोक वसूल जमा करणारे यांशीं हरकत न करावी. याकरितां त्या मुलुखांतील किल्ले आमचे स्वाधीन असावेत. तेव्हां निजामानें संभाजीशिवाय बाकी गोष्टी कबूल केल्या. संभाजीस आह्मीं पन्हाळ्यास पोंहचवितों असें निजामानें सांगितल्यावरून पेशवे याणीं मान्य करून छ ५ साबान रोजीं (६ मार्च १७२८)मुंगी पो॥ शेवगांव या मुक्कामीं तह ठरून परस्परांशीं भेटी झाल्या. संभाजीराजे दक्षिणेंत येऊन आपले स्वस्थळास गेले. आवजी कवडे यास छ २९ जिल्हेज रोजीं ( २९ जुलै १७२८ ) फोजेची सरदारी सांगून तैनात १५०० रुपये केली. नानासाहेब ह्मणजे बाळाजी बाजीराव पेशवे यांची मुंज माघ शु ॥ ११ दिवशीं झाली. दमाजी थोरात याणें पुन्हां बंड केलें होतें. त्याजवर स्वारी करून धरून आणून पुरंदरावर ठेविला, तो तेथें मयत झाला.

## सु॥ तिसा अशरीन मयाव अलफ, सन ११३८ फसली। अव्वलसाल छ २५ सवाल. २४ मे १७२८, वैशाख वद्य १२ शके १६५०.

छ १ रबिलाखर रोजीं (२४ आक्टोबर १७२८) श्रीमंत स्वारीस निघाले. बाजीरावसाहेब तुळजापुराकडे गेले व चिमाजी अप्पा हिंदुस्थानांत दया बहादर याजवर गेले. माळवे प्रांतीं दिल्लीचे बादशहाकडून राजा गिरिधर होता, त्यास उदाजी पवार व चिमणाजी दामोदर यांनीं युद्धांत ठार मारला होता. त्याचे जाग्यावर दिल्लीहून त्याचा आप्त दया बहादर ह्मणून आला. त्याजवर चिमाजी अप्पा व पिलाजी जाधव व मल्हारराव होळकरसुद्धां जाऊन लढाई केली व त्यास ठार मारिला. ही

खबर छ १६ व छ २९ रा।वल (९ व २२ अक्टोबर १७२८) महिन्यांत पुण्यास आली. लढाई उज्जनीवर झाली. दया बहादर मयत झाल्यावर त्याचे जाग्यावर दिल्लीचे बादशहाकडून महमदशहा बंगष याची नेमणूक झाली होती. त्यानें हिंदुस्थानांत येऊन बुंदेलखंडाचा राजा छत्रसाल याचे मुलखांत बहुत उपद्रव दिला. तो वयानें फार वृद्ध होता. त्याच्यानें त्याचा पराभव होईना. सबब त्यानें बाजीरावसाहेब यास माझें साहाय्य करावें ह्मणून पत्र पाठविलें. त्यावरून एकदम बाजीरावसाहेब हिंदुस्थानांत नर्मदा उतरून माळव्यांत आपलें लष्कर होतें, तें आपले स्वाधीन करून घेऊन चिमाजी अप्पा व पिलाजी जाधवराव यांस परत पाठवून कोंकण प्रांतांतील बंदोबस्त करण्यास सांगून छ २३ साबान (१३ मार्च १७२९) रोजीं छत्रसाल राजाची भेट मु॥ धामोरा नजीक मोहळ येथें घेऊन बंगष याजवर निघाले. छ १० रमजान रोजीं (३० मार्च १७२९) जेतपूर मुक्कामीं बाजीरावसाहेब याची व बंगष याची लढाई होऊन त्यास छत्रसाल राजानें बुंदेलखंडातून पार घालवून दिलें. या उपकाराबद्दल प्रथम त्या राजानें एक किल्ला व झांशीनजीक दोन अडीच लक्षांचा मुलूख दिला. पुढें त्या राजानें आपले मरणाचे वेळीं आपल्यास दोन पुत्र आहेत, असा बाजीराव पेशवे तिसरा पुत्र समजून आपले राज्याचा तिसरा हिस्सा बाजीराव यास दिला. छ ४ सवाल (२२ एप्रिल १७२९) बऱ्हाणपुराहून साताऱ्यास पत्रें आलीं कीं, श्रीमंतास पुत्र झाला. छ १६ सवाल रोजीं (४ मे १७२९) दया बहादरावर स्वारी करून चिमाजी अप्पा परत निघून छ १० जिल्हेज रोजीं (२६ जून १७२९) पुण्यास दाखल झाले. महमदखान बंगष याचा पराभव झाल्यावर याचाच कोणी कायमखान बंगष पुन्हां श्रीमंतावर लढण्यास आला. तेव्हां त्याशींही छ १० सवाल रोजीं (४ मे १७२९) लढाई होऊन त्याचें लष्कर लुटलें. हत्ती घेतले. खाशास मोर्चे लाविले असतां शंभर स्वारानिशीं पळून गेला. मु॥ जेतपूर कान्होजी आंग्रे मयत झाले. याचे पुत्रः— १ सेखोजी, १ संभाजी. नाटकशाळा २

होत्या. त्या तिघींचे ३ पुत्रः—१ तुकोजी, १ येसाजी, १ मानाजी असे होते. सेखोजीस पदाचीं वस्त्रें मिळालीं. श्रीधरस्वामी पैठणास वारले.

## सु॥ सलासीन मयाव अलफ, सन ११३९ फसली, अवल साल छ ७ जिल्काद २९ मे १७२९, ज्येष्ठ शुद्ध ९ शके १६५१.

छ १९ जिल्काद रोजीं ( १२ जून १७२९ ) पिलाजी जाधवराव याशी तगीर केले, मु॥ गदेकोटा. हिंदुस्थानचे स्वारीहून श्रीमंत बाजी-रावसाहेब पुण्यास आले. छ १ मोहरम ( १७ जुलै १७२९ ) पिलाजी जाधवराव याचा सरंजाम राणोजी शिंदे यास देऊन तेच वेळेस पालखी दिली. व पिलाजीची सरदारीही त्याच दिवशीं शिंद्यास दिली, छ ५ मोहरम ( २१ जुलै १७२९ ). श्रीमंताची स्वारी छ १९ मोहरम रोजीं ( ३१ जुलै १७२९ ) साताऱ्याहून निघाली. छ १६ मोहरम ( १ आगस्ट १७२९ ) चिमाजी अप्पा व नानासाहेबसुद्धां साताऱ्या-हून निघाले, ते साताऱ्याहून छ ८ रविलाखर ( २० अक्टोबर १७२९ ) रोजीं सुप्यास गेले. चिमाजी अप्पा छ २० रा॥खर रोजीं ( १ नोव्हेंबर १७२९ ) निघाले ते फलटन देशीं जाऊन उरमुडीस येऊन छ १४ जमादि-लाखर रोजीं ( २४ डिसेंबर १७२९ ) पुण्यास आले. लग्नाचे आमंत्रणाक-रितां गेले असावेत. छ १२ रजब रोजीं ( २१ जानेवारी १७३० ) नानासाहेब यांचें लग्न माघ शु॥ १४ रोजीं झालें. रास्ते भिकाजी-नाईक यांची कन्या गोपिकाबाई. मंडप जुने कोटांत दिला होता. छ १ रजब माघ शु॥ ३ मंदवारीं ( १० जानेवारी १७३० ) शनवारचा वाडा बांधावयास आरंभ केला. पायागड घेतल्याचें वर्तमान आलें, छ २३ रजब ( १ फेब्रूवारी १७२९ ). छ १४ साबान रोजीं ( २१ फेब्रूवारी १७३० ) श्रीमंत उंबरजेस गेले होते. अखेर सालपर्यंत तेथें होते. महाराज यांचा मुक्काम तेथें होता, सबब गेले होते. रा॥ वल महिन्यास ( सप्टेंबर १७२९ ) अप्पा स्वारीस निघून गुजरा-

थेंत गेले. व छ १२ रमजान रोजीं ( २२ मार्च १७३० ) ढवळकें शहर लुटलें. पिलाजी जाधव यास मुक्त करून कोवळणांत फिरंगीयावर सवाल महिन्यांत ( मे १७३० ) पो. मांडवगड घेतल्याची खबर मल्हारजी होळकर व उदाजी पवार यांजकडून आली, छ १८ जमादिलाखर ( २८ डिसेंबर १७२९ ) मु॥ मियाबाद. गुजराथचा सर-बुलंदखान यानें दिल्ली बादशहाकडे बहुतप्रे॥ बोलणें लाविलें कीं मुलखाची हैराणगत झाली, वसूल येत नाहीं, तर द्रव्य देऊन माझें रक्षण करावें. परंतु बादशहानें कांहीं उत्तर दिलें नाहीं. आणि चिमाजी अप्पानीं लष्करसुद्धां पेटलादेस येऊन त्या शहरची खंडणी घेऊन ढवळकें लुटलें. बाजीराव याचा निरोप त्यास आला कीं आह्मांस गुजराथची चौथ व सरदेशमुखी द्याल तर माझा भाऊ तुमचे मुलखाचा बंदोबस्त करील. त्यावरून सरबुलंदखानानें तें बोलणें मान्य केलें. मग त्यानें सुरत खेरीजकरून बाकी मुलखाची जकातसुद्धां चौथ व सरदेशमुखी दिल्ही. अमदाबाद शहर सबंध कांहीं दिल्हें व कांहीं न दिलें असें केलें. या अमलाबद्दल २५०० अडीच हजार स्वार ठेऊन मुलखाचा बंदोबस्त पेशवे यानीं ठेवावा असें कबूल केलें. शाहूमहाराज एके दिवशीं शिकारीस गेले असतां उदाजी चव्हाण याज-कडील मारेकरी भेटले. त्यांच्यानें मारवेना. महाराजानीं त्यांस सोडलें. परंतु हें कृत्य चव्हाणाचें, सबब त्याजवर प्रतिनिधीस पाठविलें. तेव्हां चव्हाणाचा पक्ष संभाजीनें धरिला. तेवेळेस प्रतिनिधीनीं पूर्वी निजामुन्मुलूक याशीं मसलत केल्यामुळें शाहूमहाराजाचे मनांतून तो उतरला होता. त्यास असें वाटलें कीं, यासमयीं संभाजीचा पराभव आपण केला तर आपली योग्यता वाढेल. ह्मणून त्यानें फौजसुद्धां एकदम संभाजीच्या तळावर येऊन संभाजीस व उदाजी चव्हाण यास पन्हाळ्याकडे पिटऊन लाविलें. तेव्हां संभाजीचीं बायकामाणसें सांपडलीं तीं धरून साता-ऱ्यास आणिलीं. त्यांत ताराबाई व तिची सून राजसबाई सांपडली. ताराबाई बोलली कीं, तुह्मीं व ते सर्व एकच आहा. मला कोठें तरी कैदेंतच राहणें आहे. त्यापक्षीं मी येथेंच राहतें. असें भाषण झाल्यावर

सातार किल्ल्यावरील वाडा नीट करून खर्चाचा बंदोबस्त करून व लवाजिमासुद्धां व्यवस्था लावून यादो गोपाळ कारभारी नेमून ताराबाईस व राजसबाईस किल्ल्यावर ठेविलें व बाकीचीं माणसें परत ठिकाणीं पावतीं केलीं. हें वर्तमान शके १६५१ सालीं झालें. आनंदराव महादेव खासनीस याजकडून अपराध झाला, सबब त्याचे सावत्र बंधु यशवंत महादेव यास खासनिशी व पोतनिशी सांगून इनाम सरंजाम वगैरेविषयीं सनदापत्रें दिलीं. उदाजी चव्हाण बंड करून चव्हाणचौथाई अशी बाब गांवगन्ना घेत होता. जबरीनें त्याजवर यशवंत महादेव यास पाठवून त्याचें पारपत्य केलें. सेखोजी आंग्रे वारले शके १६५१ सालीं, सबब संभाजीस सरखेल पदाचीं वस्त्रें झालीं शके १६५२. सबब संभाजीनें येसाजीस विजयदुर्ग सुवर्णदुर्ग सुभा सांगून पे॥ सरदारी मानाजीस सांगितली. त्याचें बनेना. तो फिरंग्याकडे गेला. त्यानें तुळाजीस दिवाणगिरी देऊन कुलाब्यास आले. छ २९ जमादिलाखर माघ शु॥ १ सलासीन सालीं (८ जानेवारीं १७३०) त्र्यंबकराव दाभाडे यास पदाचीं वस्त्रें झालीं.

## सु॥ इहिदे सलासीन मयात्र अलफ, सव ११४० फसली, अवल साल छ १८ जिल्काद, २९ मे १७३०, ज्येष्ठ वद्य ५ शके १६५२.

छ २९ जिल्काद [९ मे १७३०] अवल साल जासूद दिम्मत पिलाजी जाधवराव कोहज किल्ला प्रे॥ कोंकण पे॥ सर केल्याचें वर्तमान घेऊन आला. जिल्हेज महिन्यांत [जून १७३०] अप्पासाहेब पायागडची स्वारी करून उंबरजजेस गेले. महाराज तेथें गेले, भेट झाली. छ ३ मोहरम रोजीं [८ जुलै १७३०] पुन्हां चिमाजी अप्पा उंबरजेस गेले. छ ३ सफर रोजीं (६ आगष्ट १७३०) उंबरजेहून साताऱ्यास बाजीराव बल्लाळ यांची स्वारी आली व छ ९ मिनहू रोजीं (१२ आगष्ट १७३०) पुण्यास आले. छ ४ सफर रोजीं (७ आगष्ट १७३० खबर चिमाजी अप्पास पुत्र जाला ह्मणोन आली. छ ११

रोजीं ( १४ आगष्ट १७३० ) नामकर्ण ठेविलें. सदाशिवराव भाऊसाहेब याचा जन्म. छ २८ सफर रोजीं ( ३१ आगष्ट १७३० ) चिमाजी अप्पाची बायको बाळंत असतां मयत झाली, नांव रखमाबाई. छ ११ रविलाखर ( १३ अक्टोबर १७३० ) बाजीराव साहेब याची स्वारी निघाली चिमाजी अप्पासुद्धां. पुढें छ ४ रमजान रोजीं ( २ फेब्रूवारी १७३१ ) बाजीराव अप्पाचे लष्करांत आले. ही स्वारी गुजराथचे दाभाड्यावर झाली. ही स्वारी व्हावयाचें कारण निजामुन्मुलुकाचा व बाजीराव याचा तह होऊन भेट झाली असतांही त्याजला बाजीराव याणीं नाश केल्याचें स्मरण होतें. त्यानें आपलें अंग न दाखवितां दुसऱ्याकडून सूड उगविण्याचें मनांत आलें. त्या कामाचे उपयोगीं त्र्यंबकराव दाभाड्या आहे असें वाटलें. त्याचें व बाजीराव याचें पहिलेंच वांकडें होतें. पुढें गुजराथची चौथ व सरदेशमुखी पेशवे यांस प्राप्त झाल्यावर तो फौज ठेवावयास लागला असोन ३९००० फौज जमा केली. व निजामाचेंही साहाय्य आपणांस मिळेल असें समजून दक्षिणेंत येण्यास सिद्ध झाला, व लोकांत असेंही प्रसिद्ध करूं लागला कीं, आमचा 'धनी मराठा याचें राज्य बाजीरावानें घेतलें, तें त्याचें त्यास द्यावयास जातों. असें बोलून आपल्यास मदत पिलाजी गाइकवाड व कंठाजी, रघूजी कदम बांडे व उदाजी, व आनंदराव पवार व चिमाजी दामोदर वगैरे घेतले. हें वर्तमान पेशवे यास कळतांच तेही फौजेसहीत छ ९ सवाल रोजीं ( २ मार्च १७३१ ) डभई मुक्कामीं आले. त्यावेळेस लढाईस आरंभ झाला दमाजी गाईकवाड यानें त्रिनीवाला याशीं लढून त्याचा पराभव केला. नंतर पेशवे खुद्द चालून येऊन मोठें युद्ध झालें. दाभाडे याची फौज मारून त्र्यंबकराव दाभाडे यास गोळी लागून ठार झाले. व मालोजी पवार ठार झाले. उदाजी पवार व चिमणाजी दामोदर पाडाव झाले. आनंदराव पवार व पिलाजी गाइकवाड व यशवंतराव व जावजी दाभाडे व कुवर बहादूर हे जखमी होऊन गेले. त्र्यंबकराव याचा मुडदा व पिलाजीचा थोरला लेक सयाजी गाइकवाड

जखमी होऊन पाडाव होते, त्यांस पाठवून दिलें. पेशवे यांजकडील नारायणजी ढमढेरे पडले. याप्रों लढाईचा शेवट झाला. यावर्षी ब्राह्मणांस तळेगांवीं दक्षणा मिळाली नाहीं. ब्राह्मण पुण्यास आले. तुह्मीं सेनापति मारले असें बोलूं लागले. तेव्हां हुजूर साताऱ्यास लिहून ब्राह्मणांस ठेवून घेतलें. उत्तर आल्यावर श्रावण शुद्ध ७ स ( ३० जुलै १७३१ ) दक्षणा दिली. शु॥ ९ मीस ( २८ जुलै १७३१ ) दाभाडे देत होते. ही दक्षणा पुढें पेशवे अखेरपर्यंत ब्राह्मणास दरसाल श्रावणमासीं देत होते. त्र्यंबकराव याचे पुत्र व उमाबाई दाभाडी व बाजीराव पेवशे यांशीं महाराजांनीं साताऱ्यास बोलाऊन माळवा व गुजराथची हद्द करून देऊन तह ठरविला कीं, निम्में निम्में ऐवज फौजेस वगैरे खर्च करावा, व निम्में रसद हुजूर यावी. जातीचे खर्चास नेमणूक करून दिली. पेषकसी होईल ती हुजूर यावी. याप्रों तह ठरवून पुत्र यशवंतराव यास पदाचीं वस्त्रें सेनापति हुद्याचीं दिलीं. ते व्यसनी बेहुष राहूं लागले. सबब त्याचा कारभार गायकवाड यांनीं बाईचे विचारें करावा असें केलें. बाजीरावसाहेब दाभाडे यांची लढाई झाल्यावर लागलीच छ १ जिल्काद रोजीं ( २७ एप्रिल १७३१ ) चिमाजी अप्पासुद्धां परत आले. दुसरें वर्तमान सालगुदस्त प्रतिनिधीनीं संभाजीचा पराभव करून पन्हाळ्यास लाविलें. ते पन्हाळ्यास गेल्यावर जिजाबाईचे विचारें पारसनीस बाळप्रभू व चिटणीस चिटको प्रभू याशीं सल्ल्याकरितां शाहू महाराजाकडे पाठविलें. याप्रमाणें महाराजानीं मान्य करून महाराज यांची स्वारी उंबरजेस आली, व संभाजी महाराजही भेटावयास आले. उभयतांच्या भेटी कऱ्हाडानजीक जखीणवाडीस झाल्या, शके १६५२ फाल्गुन शु॥ ३ साधारण संवत्सरे ( २८ फेब्रुवारी १७३१ ) उंबरजेहून साताऱ्यास आले. तहनामा शके १६५३ छ १६ सवाल वरोधीकृत संवत्सरे चैत्र व॥ २ ( १३ एप्रिल १७३१ ) बिपतशील. अहद वारूणमहाल तहत संगम दक्षिणतीर कुलदुतर्फा मुलूख दरोबस्त देखील ठाणीं व किल्ले तुह्मास दिले असत कलम १. किल्ले कोपल तुह्माकडे दिला. याचे मोबदला तुह्मीं रत्नागिरी आह्माकडे केली, कलम १. वड-

गांवचें ठाणें पाडून टाकूं. कलम १. तुह्मापाशीं जे वैर कारितील त्यांचें पारपत्य आह्मी करावें, व आह्माशीं जे वैर कारितील त्यांचें पारपत्य तुह्मीं करावें. आह्मी तुह्मी एकविचारें वागून राज्याभिवृद्धि करावी, कलम १. वारणेच्या व कृष्णेच्या संगमापासून दक्षिणतीर तहत निवृत्ति-संगम तुंगभद्रापावेतों दरोबस्त देखील गड, ठाणीं तुह्माकडे दिलीं असत, कलम १. तुंगभद्रापासून तहत रामेश्वर देखील संस्थान निम्में आह्माकडे ठेऊन निम्में तुह्माकडे करार करून दिले असत, कलम १. कोकणप्रांतीं साळशिपलीकडे तहत पंचमहालपावेतो दरोबस्त तुह्माकडे दिले असत, कलम १. इकडील चाकर तुह्मी ठेऊं नये, व तुह्माकडील चाकर आह्मी ठेऊं नये, कलम १. मिरजप्रांत विजापूर प्रांतीचीं ठाणीं देखील अथणी, तासगांव वगैरे तुह्मी आमचे स्वाधीन करावीं. कलम १. एकूण नऊ कलमें करार करून तहनामा लिहून दिला असे. सदरहूप्रें॥ आह्मीं चालवूं. याशीं अंतर होणार नाहीं. मोर्तब.

## सु॥ इसने सलासीन मयाव अलफ, सन ११४१ फसली, अवल साल छ २९ जिल्काद, २९ मे १७३१, ज्येष्ठ शुद्ध १ शके १६५३.

छ ३ जिल्हेज रोजीं [ २९ मे १७३१ ] श्रीमंत साताऱ्यास गेले, ते छ २० जमादिलाखर रोजीं [ ९ डिसेंबर १७३१ ] पुण्यास परत आले. छ २० जमादिलाखर [ ९ डिसेंबर १७३१ ] चिमाजी अप्पाचें दुसरें लग्न झालें, नांव अन्नपूर्णाबाई. छ ९ साबान रोजीं [ २२ जानेवारी १७३२ ] स्वारी कुलाब्यास गेली होती. छ १० रमजान रोजीं [ २६ फेब्रूवारी १७३२ ] परत आले. दिल्लींत बादशहानें ऐकिलें कीं सरबुलंदखानानें मराठ्यास चौथ व सरदेशमुखी दिली. यामुळें त्यास राग येऊन त्यानें अभेसिंगाबरोबर लष्कर देऊन गुजराथेंत पाठविलें. व सरबुलंदखानास माघारें बोलाविलें. तो तिकडे गेल्यावर त्याचा अपमान केला. अभेसिंग याच्या फौजदारानें बडोदा किल्ला पूर्वीं मोंगलांनीं गाइकवाडाकडून घेतलेला तो आपण घेतला. परंतु तेथील लोकांस

पिलाजी गाइकवाड याचें अगत्य फार असे. त्याणें कित्येक जागीं आपलीं ठाणीं बसविलीं होतीं. करितां त्याशीं तह करण्याचें निमित्त करून कित्येक वेळां माणसें पाठविलीं. बोलणीं चालली होतीं त्याप्रमाणें एके दिवशीं त्याशीं बोलण्याकरितां मनुष्य पाठविला. तो बोलून परत निघाला. नंतर कांहीं वस्तु आंत राहिली असें मिष करून कांहीं गोष्ट कानांत सांगण्याचा आकार दाखवून पिलाजीजवळ जाऊन एकाएकीं खंजीर पोटांत खुपसून ठार मारिलें. त्या मारेकरियासही पिलाजीच्या माणसांनीं त्याच ठिकाणीं ठार मारिलें. पिलाजीचे मरणामुळें अभेसिंग लाभ चिंतीत होता, तो त्यास प्राप्त झाला नाहीं. पिलाजीचा मित्र पाद्रागांवाचा ठिकमा नांवाचा तेथील देसाई होता. त्यानें पिलाजीचा भाऊ महादजी यास बोलावून आणून बडोदा किल्ला त्याणें घेतला. तो अद्यापपर्यंत गाइकवाड यांचे वंशजांकडे आहे. पिलाजीचा वडील पुत्र सोनगडास होता. त्यानें मोठें लष्कर जमा करून बडोद्यापासून जोतःपूरपर्यंत स्वाऱ्या करून अभेसिंगास बहुत उपद्रव दिल्यामुळें तो अहमदाबादेस आपला विश्वासू मनुष्य ठेऊन आपण जोतपुरास जाता झाला. महाराज याणीं बाजीराव पेशवे यास सरदेशमुखीचे बंदोबस्ताकरितां हिंदुस्थानांत पाठविलें होतें.

**सु॥ सल्लास सलासीन मया अलफ, सन ११४२ फसली,**
**अवलसाल छ ११ जिल्हेज, २९ मे १७३२**
**ज्येष्ठ शुद्ध १२ शके १६५४.**

जंजिरें येथें सिद्धीचा अंमल होता. त्या सिद्धीस मोंगलांनीं याकूब असें पद दिलें होतें. त्याशीं व मराठ्याशीं निरंतर युद्ध होत असे. व तो शाहूच मुलखांतही लूट वगैरे करीत असे. यास अवरंगजेब याणें दिलेला मुलूख होता तो मराठ्याचे हातीं लागूं दिला नाहीं. यास्तव याजकडील जंजिरा प्रांत व रायबाग किल्ला, सन १६९० इ॥ सालीं शाहूमहाराजास व त्याची मातोश्री येसूबाई यांस कैद करून दिल्लीस नेलें, तेव्हां तोही मोंगलांचे हातीं लागला. व तो सिद्धी जंजीरकर याजकडे

दिला होता, तोही घ्यावा असें शाहूमहाराज व त्यांचे दरबारचे लोक इच्छित होते. जंजीरकर यास कपट करून जिंकावा अशी प्रतिनिधींनीं मसलत केली. ती अशी कीं, त्या सिद्धीजवळ त्याचा विश्वासू याकूबखान मुसलमान होता. त्याशी वश करून ठरविलें कीं सिद्धीचें अधिपत्य नाहींसें झालें असतां, कांहीं किल्ले आह्मास देऊन बाकीचें राज्य तूंच सांभाळ. ही मसलत शेवटास न्यावयाकरितां महाराजांनीं प्रतिनिधीबरोबर फौज देऊन कोंकणांत पाठविलें. त्या वेळेस यशवंतराव महादेव यासही महाराजांनीं पाठविलें होतें. परंतु त्यास कांहीं प्राप्त न होतां सिद्धीपुढें कांहीं चालेना. सबब प्रतिनिधी तेथून निघून गोवळकोट किल्ल्यामध्यें गेले. तेथेंही जंजीरकर याणीं लोक पाठवून छापा घालून प्रतिनिधीची दुर्दशा केली. याच सुमारें जंजिरे येथील सिद्धी गादीवर बसलेला मयत झाला. त्यास सहा पुत्र होते. वडील सिद्धी अबदूल जंजिऱ्यांत राहिला. त्याचे पाठचा अबदूल रहिमान मुर्दादफनास जंजिऱ्याबाहेर आले. बाकी त्यापेक्षां धाकटे सिद्धी सबान व सिद्धी आरबाब व सिद्धी रहयान व सिद्धी याकूब असे चौघांनीं विचार करून वडील सिद्धी अबदूल यास जिवें मारून आपण जंजिऱ्यांत राहिले. सिद्धी अबदूल रहिमान बाहेर आला होता, त्यानें चार बंधूंनीं दगा केला हें ऐकून जंजिऱ्यांत न जातां राजपुरीस राहिले. त्याजकडे यशवंत महादेव याणीं संधान लावून त्यास वश करून ठेविला होता. हें वर्तमान याकूबखान मुसलमान यास कळताच तो सिद्धी रहिमान याचा पक्ष स्वीकारून त्याचे विचारें शाहूमहाराजाकडे मदत मागितली. त्यावेळेस बाजीराव माळव्यांतून येत होता. त्यास मदतीकरितां जाण्याविषयीं आज्ञा देऊन शिवाय रिकामे लष्करी जे होते त्यांसही मदत करण्यास आज्ञा केली. त्याप्रमाणें बाजीरावसाहेब पेशवे छ २२ जिल्काद रोजीं (२६ एप्रिल १७३३) ह्मणजे अखेर सालीं अजमासें वैशाखांत जंजिऱ्याचे स्वारीस निघाले. यापूर्वी झालेलीं वर्तमानें:—सरकारवाड्याचे ह्मणजे शनवार वाड्याचे कोटास आरंभ झाला, श्रावण व॥ ९ (३० जुलै १७३२). रविलावल महिन्यांत रामचंद्र बाजीराव मयत

झाले. छ ११ जमादिलावल रोजीं ( २० अक्टोबर १७३२ ) चिमाजी अप्पा हिंदुस्थानचे स्वारीस निघाले. व बुंदेलखंड वगैरे ठिकाणीं गेले. छ १६ जमादिलाखर ता। २७ रमजान ( २४ नोव्हेंबर १७३२—३ मार्च १७३३ ) निजामुन्मुलुकाचे भेटीस स्वारी गेली होती. छ १६ जमादिलाखर साताऱ्यास जाऊन छ २७ रमजान परत पुण्यास आले. छ १० रमजान ( १४ फेब्रुवारी १७३३ ) पो। चापानेर सर केल्याची खबर आली, नजीक मईजगांव, परगणें वोडसे.

**पुरवणीः**—तीर्थरूप राजश्री राऊ तथा राजश्री आप्पा स्वामींचे सेवेसी. विनंति. आजि मंदवारीं प्रातःकाळीं दरबारास गेलों होतों. राजश्री नारबोवा व आणीकही कित्येक लोक मुजऱ्यास आले होते. तेव्हां राजश्री स्वामी बोलले कीं, राजश्री प्रधान पंत पुण्यास कोट बांधितात, येविषयीं पहिले हुजुरे व कागद पाठविले. परंतु ते गोष्ट न ऐकतां आपलाच हेका करून किल्ला बांधितात. तस्मात् मोंगलाचें पुण्याचें ठाणें बसावें, असें त्याच्या मनांत आहे कीं काय? सिंहगड किल्ला जवळ तेथें चिरेबंदी कोट पक्कें काम करितात. द्वाही हुजुरे यांणीं दिली, तथापि मोजीत नाहींत आणि कोट बांधितात. राजश्री सचीव पंताचा किल्ला सिंहगड जवळ आहे. ऐशियास सचिवाकडील किल्ल्यास मोंगलाचा मोर्चा बसवावा असें त्याचे चित्तांत आहे, हें कांहींच कळत नाहीं. तसेंच जागा जागा किल्ले वाघोली व नांदेडें व वाडी व आंबी वगैरे जागीं किल्ले बांधितात. मोंगलाची आवाई झाली तरी यांतून एकही जागा रुजणार नाहीं. आणि आपलें आपल्यासच प्रतिबाधक कर्म कां करितात? व वडीलही उगीच डोळे झांकितात. परंतु गळफांस बसेल. पूर्वीं पिलाजी जाधव वाडा बांधीत होते, तेव्हां आह्मीं मनाई करीत होतों. परंतु राजश्री चंद्रसेनराव जाधव थोराताची पाठ राखीत, यामुळें वाडीस कोट जाला. शेवटीं राजश्री बाळाजीपंत धरिले. तेव्हां तीच वाडी पुरंदरास मोर्चा जाहला व मुलूख हेराण जाहला. आह्मीं सांगत होतों तें न ऐकिलें. शेवटीं त्याच गोष्टीस आलें. तसेंच हेंही कर्म आहे. राजश्री प्रधान पंतांनीं कांहीं पुण्यांत कोट बांधावा असें कांहीं

नाहीं, ह्मणून बहुत श्रमी होऊन बोलले. स्वामीस विदित व्हावें ह्मणून लिहिलें आहे. चोरपाळतीनें बातमीही पाठविणार आहेत. किल्ला कसा बांधितात असें आहे. तरी स्वामीनीं राजश्री स्वामींचे आज्ञेप्रें।। किल्ला न बांधावा. हवेलीभोंवतीं बुरूज न घालितां चार दिवाळी मात्र करावीं. जुनें काम आहे तें कांहीं फार पक्कें तो नाहीं. परंतु उगीच भ्यासूर दिसतें. त्यास पांढरे मातीनें भितींचें बाहेरील अंग सारवावें, ह्मणजे डोळेफोड दिसणार नाहीं. अर्थ सूचना लिहिला आहे. स्वामी खावंद आहेत. खातरेस येईल तें करावें. विदित झालें पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.[२१]

---

२१. ग्रंथमालेंतील पत्रें यादी वगैरेच्या १२ व १३ पृष्ठावरील १५ वी टीप ह्या दोन चार सालांतील कालानुक्रम बसविण्यास उपयोगीं पडण्यासारखी आहे. सल्लास सल्लासीन सालाच्या पुरवणींत दिलेलें पत्र शनवार वाड्याचा बुरुज बांधला जात असतां लिहिलेलें आहे. हें पत्र भारतवर्ष मासिकपुस्तकांत छापिलें आहे. ह्या पत्रांत दिवाळीं ह्मणून जो शब्द आला आहे त्याचा अर्थ कोनाड्याची भिंत असा आहे. ह्या पत्रांत बाळाजी विश्वनाथाला दमाजी थोरातानें पकडल्याचा उल्लेख आहे. शाहू महाराज गढी बांधूं नका ह्मणून सांगत असतां पिलाजी जाधवानें चंद्रसेन जाधवाच्या सल्ल्यानें दिवे घाटावर जाधवाच्या वाडीस कोट बांधिला. तो कोट आश्रयाला घेऊन दमाजी थोरातानें पुरंधर किल्ल्यापासून पुण्यापर्यंतचा मुलूख मारून काढिला. त्या गर्दीत बाळाजी विश्वनाथ दमाजी थोराताच्या हातीं सुप्याकडे जात असतां सांपडला. बाळाजी विश्वनाथाला दमाजी थोरातानें कसें पकडलें, त्यावेळेस दमाजी थोरातानें काय धामधूम चालविली होती, चंद्रसेन जाधवानें दमाजी थोराताला मसलत कशी दिली, पिलाजी जाधवानें चंद्रसेन जाधवाची मसलत कशी ऐकिली वगैरे माहिती ह्या पत्रावरून अनुमानतां येते. दमाजी थोरातानें बंड केलें व फसवून बाळाजी विश्वनाथाला धरिलें, इतकी त्रोटक माहिती बखरकार देतात; परंतु त्यांच्या निल्याच्या नेमाप्रमाणें तपशील कांहींच देत नाहींत. त्या तपशीलाचें स्वरूप ह्या पत्राच्या साहाय्यानें कळून येतें. जाधवाच्या वाडीच्या कोटानें पुरंधराला जशी मोर्चेबंदी झाली, तशी शनवार वाड्याच्या

**सु॥ अर्बा सलासीन मयाव अलफ, सन ११४३ फसली, अवल साल छ २१ जिल्हेज, २९ मे १७३३, ज्येष्ठ वद्य ८ शके १६५५.**

सलास सलासीनांत अखेरसालीं बाजीरावसाहेब जंजिऱ्यास गेल्यावर त्यांनीं लागलीच महालोमहालीं ठाणीं सर करण्यास आरंभ करून छ २१ जिल्हेज ( २९ मे १७३३ ) अवलसालींच मंडणगड किल्ला घेतला, व याच महिन्यांत बिरवाडी, मांडल, अष्टमी, अश्राधार, आंतोण, नागोठणें, तळें, घोसाळें, निजामपूर वगैरे महालांचा अंमल घेतला. इतक्यांत प्रतिनिधि यांनीं माघारें उलटून रायगड किल्ला छ ६ मोहरमीं रोजीं [ ८ जून १७३३ ] सर केला, व या खालील महाल याच वेळेस आले. महाड घेतल्याबद्दल महाराजास छ २६ रमजानांत नजराही आल्या आहेत. सदरहू तालुका पुढें यशवंत महादेव यांचेच स्वाधीन महाराजांनीं करविला होता. तो सलास सबैन सन १७७२ पर्यंत त्याजकडे होता. पेशवे यांजकडे नवता. छ ११ रविलावल ( ११ आगस्ट १७३३ ) चिमाजी अप्पा महाराजांकडे आले. बराबर पिलाजी जाधवराव यास नेलें होतें. यास मुलूखगिरीस पाठविलें होतें. छ २१ जमादिलावल ( १९ आक्टोबर १७३३ ) चिमाजी अप्पा साताऱ्यास जाण्यास निघाले. बाजीराव पेशवे यांनीं जंजिरे प्रांतांतील अशीं महालोमहालीं ठाणीं बसविल्यानंतर, ज्या चौघांनीं वडील अबदुला यास मारिलें, त्यांपैकीं सिद्धी रहयान बाजीरावसाहेब यांशीं लढला; परंतु त्यांतच तो ठार जाला. नंतर जंजिरा घ्यावयाचें मनांत आल्यावर बाजीराव यांणीं खुषकींवरून मोर्चे लाऊन तोफांचा मार चालविला. त्यावेळेस मानाजी आंग्रेही साहाय्यास येऊन त्यांणीं समुद्रांतून तोफांचा मार चालविला. तथापि किल्ला हस्तगत होईना. जर या कामाकरितां आपण राहिलों, तर दुसरीं मोठालीं कामें तशींच

---

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू. ]

कोटानें सिंहगड किल्ल्याला होईल व पुढें संकट येईल असा शाहू महाराजांच्या बोलण्याचा रोख आहे.

राहतील, इतक्यांत सिद्धीचे × लोकही तह करण्यास कबूल जाल्यावरून तह करण्याचा विचार ठरून बाजीरावसाहेब छ १४ रजब रोजीं [ ११ डिसेंबर १७३३ ] परत साताऱ्यास गेले. तहनामा पुढें सबा सलासीन सन ११४६ फसलींत जाला. सिद्धी अबदूल रहिमान गादीवर बसले. छ २६ रजब रोजीं [ २३ डिसेंबर १७३३ ] नानासाहेब नसरापुरास गेले. पुढें सुप्यावरून छ २१ साबान [ १६ जानेवारी १७३४ ] रोजीं पुण्यास आले. तेच दिवशीं चिमाजी अप्पा साताऱ्याहून आले. छ ३ रमजान रोजीं [ २८ जानेवारी १७३४ ] मुलगा होऊन बारसें झालें. छ १९ सवाल [ १४ मार्च १७३४ ] बाणकोट फत्य झाल्याचें वर्तमान समजलें. छ ६ जिल्काद ( ३१ मार्च १७३४ ) कर्नाळ्याची बाब होऊन परत आले. सेखोजी आंग्रे रा॥ खर ( सप्टेंबर १७३३ ) महिन्यांत मयत झाले. तुळाजी सुवर्णदुर्गास होते, त्यास सुभा सांगितला. माळव्यांतून बाजीरावसाहेब हप्शी याजवर आले. त्यामागें माळव्यांत मल्हारजी होळकर लष्करासहीत तेथें होता. आंग्रे पलीकडेही जाऊन स्वारी करून मुलूख लुटीत होता. त्यावेळेस बादशहाचा वजीर खानडौरान होता. त्यानें आपला भाऊ मुजफरखान याजबरोबर फौज देऊन मल्हारराव याजवर पाठविला. त्यानें सिरोंजपर्यंत जाऊन मागें फिरून दिल्लींत येऊन मराठ्यांचा मोड केला, अशा गप्पा मारिल्या. मल्हारराव होळकर त्या सरदाराबरोबर हलके हलके युद्ध करण्यास थोडे लोक पाठऊन आपण फौजसुद्धां मुलखांत वसूल जमा करून बाजीराव याजकडे पाठवीत असे. मराठे लोकांशिवाय रोहिले लोकही त्या मुलखास उपद्रव देत असत. याशिवाय गुजराथेंतही मल्हारजीनें एकाएकीं अमदाबादपर्यंत स्वाऱ्या घालून कित्येक गांव लुटून परत हिंदुस्थानांत आला.[२२]

---

२२. ज्या खोट्या स्वारीसंबंधानें सादतखानानें खोट्या फुशारकीच्या गप्पा मारल्या त्या स्वारीचा सन ग्रांट डफ १७३६ देतो; परंतु तो चुकला आहे. बाजीरावासंबंधानें खोट्या गप्पा सादतखानानें १७३५त मारल्या. बाजी-

## सु॥ खमस सलासीन मयाव अलफ, सन ११४४ फसली, अवल साल छ ३ मोहरम, २९ मे १७३४, ज्येष्ठ शुद्ध ४ शके १६५६.

माळव्यांत महमदखान बंगष मयत झाल्यावर तो अधिकार व आग्रा या दोहो अधिकारांवर बादशहा दिल्ली याणें राजा जयसिंग यास सन १७३४ सालीं पाठविला. त्याचा व बाजीरावसाहेब यांचा पूर्वीपासून स्नेह होता. ह्मणोन ती जागा त्यास मिळाल्यानें मराठे बहुत संतोष मानूं लागले. परंतु तो बादशहाचा हस्तक ह्मणून मराठ्याचें सारें बोलणें मान्य करीना. नंतर त्याच्यापुढचे वर्षी बाजीराव याचें व त्याचें बोलणें होऊन माळवा प्रांत बाजीरावसाहेब यास दिल्हा. व बादशहासही समजावून तोही वश केला. परसोजी भोसले याचे पुत्र कान्होजी व दुसरे परसोजी व तिसरे साबाजी. त्या साबाजीस संतान नाहीं. त्याची बायको राजाऊ साताऱ्यास राहत असे. त्यास राजाऊचा गोट असें ह्मणतात. परसोजीचे पुत्र संताजी व राणोजी भोसले. पैकीं संताजी दिल्लीस बाळाजी विश्वनाथ याजबरोबर गेले होते, ते लढाईत ठार झाले. बिंबाजी भोसले वडील त्रीस पुत्र रघोजी भोसले याप्रमाणें असोन कान्होजी भोसले याणीं महाराजाची अवज्ञा केली. सबब त्यास कैद करून रघूजीस पदाचीं वस्त्रें दिलीं. तो शिकारीचे कामास मोठा धीट असे. शाहू महाराज यांणीं आपले बायकोची बहीण शिर्क्यांची कन्या यासी दिली, व वऱ्हाडची सुभेदारी सांगितली. त्याजबद्दल त्याजकडून नेहमीं पांच हजार स्वारांनिशीं चाकरी करावी, असें ठरवून दरसाल नऊ लक्ष रुपये पोत्यास पावते करावे. याशिवाय पेशवे मोहिमेस निघतील, त्यावेळीं त्यांजबरोबर दहा हजार स्वारांनिशीं जावें असें ठरविलें. छ ६ रविलावल [ २६ जुलै १७३४ ] बाजीरावसाहेब

---

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

रावाची आग्रा दिल्लीवरील ही स्वारी १७३४ जानेवारीपासून जूनपर्यंत चालला होता.

सातान्यास गेले. छ १९ साबान [ ३० डिसेंबर १७३४ ] सातान्याकडून सुप्यावरून पुण्यास आले. छ १ रजब [ १७ नोव्हेंबर १७३४ ] पिलाजी जाधव स्वारीस निघाले ते अखेरसालपर्यंत हिंदुस्थानांत होते. पेस्तर सालीं छ २४ मोहरम रोजीं [ ५ जून १७३५ ] पुण्यास परत आले. छ २९ रमजान [ १२ फेब्रूवारी १७३५ ] मु॥ सागरतलाव पे॥ ओंडसे येथें कमरोदिन याजबरोबर लढाई झाली, वि॥ पिलाजी जाधव. कान्होजी आंग्रे यास दोन पुत्र. वडील सेखोजी कुलाब्यांत व धाकटा संभाजी सुवर्णदुर्गास यांप्रे॥ होते. कान्होजीस आणखी नाटकशाळेचे तीन पुत्र; तुळाजी, येसाजी व मानाजी असे तीन कान्होजी शके १६५० सालीं वारले. सेखोजीस वस्त्रें झालीं. नंतर लागलीच शके १६५९ सालीं सेखोजीही वारले. तेव्हां संभाजीस पदाचीं वस्त्रें झालीं. तेव्हां त्यानें आपले सावत्र तिघे भावांपे॥ तुळाजीस आपलेजवळ ठेऊन येसाजीस मुलखाचा बंदोबस्त सांगितला, व मानाजीस किल्ल्याचा व फौजेचा बंदोबस्त सांगितला. तेव्हां त्या उभयतांमध्यें कांहीं कलह झाल्यावर मानाजीनें कपट करून फिरंगी लोक किल्ल्यांत आणून तुळाजीस दिवाणगिरी देऊन कुलाब्यास येऊन रात्रीं किल्ल्यास शिड्या लावून आंत उतरून येसाजीचे डोळे काढले, आणि बंदींत टाकलें. नंतर संभाजी मानाजीचे पारपत्यास गेला. तेव्हां मानाजीनें पेशवे यांस साहाय्याकरितां बोलाविलें. त्यावरून छ २१ रमजान रोजीं [ ४ फेब्रूवारी १७३९ ] स्वारी कुलाब्यास गेली, पेशवे यांची. तेथें छ २० जिल्काद्पर्यंत [ ३ एप्रिल १७३९ ] होती. स्वारी कुलाब्यास गेल्यावर छ १६ सवाल रोजीं [ १ मार्च १७३९ ] राजमाची व छ २० रमजान रोजीं [ ३ फेब्रूवारी १७३९ ] कुलाबा व छ २२ रमजान रोजीं [ ५ फेब्रूवारी १७३९ ] खांदेरी किल्ला पेशवे यांणीं सर केला. पुढें छ १२ सवाल रोजीं [ २५ फेब्रूवारी १७३९ ] किल्ला कोहाला फत्ते केला. पुढें याच सालीं मानाजी आंग्रे यांशीं तह झाला. त्यांत मामलेपाल किल्ले, सरसाट, मृगगड व किल्ले राजमाची व कोपनगड व किल्ल्याखालील महाल तर्फ चौपळ बारोटी व पे॥ नतरापूर पोट तर्फ

सु॥ अंमल पेशवे यांजकडे आला. बाकी कुलाबा वगैरे ठाणीं आंग्रे याजकडे दिलीं. हा तह नवदरे अलीबाग मुक्कामीं झाला. मानाजीस कुलाबा देऊन वजारतमाब किताब दिल्हा, व संभाजीस सरखेल असा किताब देऊन पेशवे यांणीं तंटा तोडला. अंबाजीपंत पुरंदरे काशीस गेले. मुतालिकीवर हुजूर दादोपंत वाघ होते. भाद्रपद शु॥ १४ वारले. [ २१ आगस्ट १७३४ ] माहुली मुक्कामीं आनंदनाम संवत्सरीं रघुनाथ-राव यांचा जन्म, मिति श्रावण शु॥ १३ [ १३ आगस्ट १७३४ ].

**सु॥ सीत सलासीत मयाव अलफ, सन ११४५ फसली, अव्वल साल छ १३ मोहरम, २९ मे १७३५, ज्येष्ठ शुद्ध १५ शके १६५७.**

छ २४ मोहरम रोजीं [ ९ जून १७३५ ] पिलाजी जाधवराव यांची स्वारी पुण्यास परत आली. छ १७ सफर रोजीं (२८ जून १७३५) चिमाजी अप्पा स्वारीस निघोन छ १० रबिलावल ( २० जुलै १७३५) पंढरीस जाऊन माघारे आले. छ २९ सफर रोजीं ( १० जुलै १७३५ ) दादासाहेब यांचे पाठीवर जनार्दनपंत याचा जन्म झाला. व्यतीपात होता. छ ५ रबिलाखर रोजीं ( १३ आगष्ट १७३५ ) श्रीमंतांची स्वारी साताऱ्यास गेली. छ १५ जमादिलावलपर्यंत [ २२ सप्टंबर १७३५ ] होती. छ म॥ परत आले. छ ७ जमा-दिलाखर रोजीं [ १३ अक्टोबर १७३५ ] स्वारीस निघून अप्पासुद्धां नारायणगांवपर्यंत जाऊन छ २० रजब रोजीं [ २५ नोव्हेंबर १७३५ ] अप्पा परत आले. श्रीमंत हिंदुस्थानांत गेले अजमीरपावेतों. छ २१ जमादिलाखर [ २७ अक्टोबर १७३५ ] पिलाजी जाधवराव यांची स्वारी झाली. परंतु ते स्वतः गेले नाहींत. व सटवाजी जाधवराव गेले ह्मणून स्वारी बाजी भिवराव असें लागलें. छ ४ रजब [ ९ नोव्हेंबर १७३५ ] किल्ले माहुली हें स्थळ बाळाजी गोविंद व खंडपाटील झुंजारराव व जानजी कराला याणीं सरकारांत हस्तगत करून दिलें, ह्मणून कांहीं इनाम देण्याचें ठरलें. छ १५ साबान

रोजीं [ १९ डिसेंबर १७३५ ] उष्टावण जनार्दनपंत याचें झालें. छ १ रमजान रोजीं [ ४ जानेवारी १७३६ ] चिमाजी अप्पा साताऱ्यास गेले. नंतर जेजुरीस जाऊन महाराजांची भेट घेऊन छ २४ रमजानांत [ २७ जानेवारी १७३६ ] परत आले पुण्यास. छ २९ रमजानांत [ १ फेब्रूवारी १७३६ नवीन दिवाणखान्यांत मुहूर्त करून गेले. छ २९ सवाल [ २ मार्च १७३६ ] मुंज सदाशिव चिमणाजी याची झाली. छ १७ जिल्काद [ २० मार्च १७३६ ] चिमाजी अप्पा साताऱ्यास गेले ते मुकामास येऊन परभारें कोंकणांत शामलावर गेले. चरईहून अलीबागेकडून तळे घोसाळ्यास जाऊन छ २० मोहरम रोजीं [ २१ मे १७३६ ] पुण्यास आले. आवजी चिटणीस मेले, सबब पुत्रास दुखोटा केला, छ १४ जिल्हेज [ १५ एप्रिल १७३६ ] छ १८ जिल्हेज [ १९ एप्रिल १७३६ ] शामलाशीं युद्ध झालें. सिद्दी सात हब्शी बुडविल्याची खबर अप्पाकडून आली. कामारल्यास लढाई होऊन युद्धांत ठार पडला. व सिद्दी याकूब उदेरीचा किल्लेदारही ठार पडला. मु॥ चरईनजीक रेवास. छ १४ जिल्हेज [ १५ एप्रिल १७३६ ] बाजीरावसा॥ पा॥ अजमर -पुष्कराज येथें गेले होते. छ ६ मोहरम रोजीं [ ७ मे १७३६ ] हब्शी मारल्याचें वर्तमान बाजीराव यांस कळलें मु॥ झुजारा. छ २२ मोहरम रोजीं [ २३ मे १७३६ ] बाजीराव यांचा मुक्काम डंग पे॥ गंगराड येथें होता. कंठाजी कदम याचा अंमल उठून सर्व गुजराथची चौथ दमाजी गाइकवाड याजकडे झाली.

## सु॥ सबा सलासीन मयाव अलफ, सन ११४६ फसली, अवल साल छ २४ मोहरम, २५ मे १७३६, अधिक ज्येष्ठ वद्य ११ शके १६५८.

अवल साल मोहरम महिन्यांत ( २५ मे १७३६ ) चिमाजी अप्पा जुन्नरापर्यंत जाऊन केंदूरपाबळ मुक्कामाहून छ १ सफर रोजीं ३१ मे १७३६ पुण्यास आले. बाजीरावसाहेब सालगु॥ हिंदुस्थानचे स्वारीस

गेले होते ते या अवलसालीं छ २९ सफर रोजीं [ २४ जून १७३६ ] पुण्यास आले. मोहरम महिन्यांत बाई महायात्रेस गेली, ती परत येऊन सावंदें झालें. छ ९ जमादिलावल ता॥ छ १४ जमादिलाखर [ ३१ आगस्ट-९ आक्टोबर १७३६ ] स्वारी रावसे॥ यांची सातार्‍यास ग्रहणाकरितां गेली. ग्रहण करून राणोजी शिंदे व मल्हारराव होळकर महाराजास भेटविलें. छ १९ रजब रोजीं [ १२ नोव्हेंबर १७३६ ] बाजीराव-साहेब हिंदुस्थानचे स्वारीस निघाले. आग्राप्रांतीं गेले, त्यावेळीं बाजी-राव याणें फौज बहुत ठेविली. या कारणानें तो बहुत लोकांचा देणेदार झाला. व फौजेस पैसाही वक्तशीर न मिळाल्यामुळें आज्ञेंत अंतर पडूं लागलें. त्यावेळीं धावडशीकर स्वामी यांस बाजीरावानें विनंतिपत्र पाठविलें होतें. त्यांत हांशीलः— मी बहुत लोकांचा देणेदार होऊन माझी कुतरओढ झाली, हेंच मला नरकयातना वाटतें. आणि सावकार व शिलेदार यांच्या पाया पडतां पडतां माझे कपाळाचें कातडें गेलें, असा हांशीलमा॥ होता. बाजीरावसा॥ हिंदुस्थानांत गेल्यावर माळवे प्रांतांतील चौथ व सरदेशमुखीचा ऐवज वसूल करून जयसिंगाचे योगें बादशहापासून माळवा मुलूख आपणास मागितला. याशिवाय गुजराथ प्रांतांतील चौथाई व सरदेशमुखी सरबुलंदखानानें देऊं केली होती, त्याचीही आज्ञा व्हावी असें मागणें केलें. या मागण्याप्र॥ बादशहा व वजीर यांणीं देण्याचें कबूल केलें. परंतु त्याचे पदरचा दुराणी सरदार याणें तें न देण्याविषयीं हरकत घातली. तेव्हां खानडौरान याणें आपला वकील याकूबखान यास बोलण्यास बाजीरावसा॥ याजकडे पाठविला. व त्याच्या हातीं चौथ व सरदेशमुखीच्या सनदा गुप्त देऊन सांगितलें कीं समय पाहून नंतर सनद द्यावी. हें वर्तमान खानडौरान याजपाशीं बाजीरावसा॥ याचा वकील धोंडोपंत पुरंदरे होते यांणीं श्रीमंतास खबर ही कळविली. याकूबखान वकील बाजीरावसा॥ याजकडे आल्यावर बाजीरावसा॥ यांणीं एकंदर मागणें केलें, तें येणेंप्रमाणें'— संपूर्ण माळवा मुलूख द्यावा, चंबळा नदीचे दक्षिणेकडील मुलूख द्यावा, किल्ला मांडू, किल्ला धार, व किल्ला रेमीन हे

तीन किल्ले व पन्नास लक्ष रुपये रोख, शिवाय सरदेशपांडेपण साहा सुम्यांचें घ्यावें, याप्रमाणें मागितलें. यानंतर या मागण्यापैकीं सरदेशपांडेपणाची सनद मात्र दिली. खानडौरान याचें व निजामाचें वांकडें होतें, याकारणानें खानडौरानें सनद देवविली. नंतर बादशहानें निजामास लिहिलें कीं, तूं लौकर दिल्लीस यावें; नाहींतर मुसल्मानी राज्य बुडेल. असें लिहिल्यावरून निजाम दिल्लीस आला. पुढें त्याचें मन वश होण्याकरितां त्याचा पुत्र ग्याजुद्दीन यास माळवा व गुजराथ प्रांताचा अधिकार देऊन सर्व मांडलीक यांणीं याचे हाताखालीं वागावें, असें ठरविलें. या वेळेस निजामाजवळ फौज चौतीस हजार जमली होती. शिवाय तोफखानाही फार होता. बाजीराव पेशवे यांणींही फौज ऐंशी हजार जमवून तयार केली होती. बाजीराव यांणीं अमर्याद मागणें केलें, याजकरितां यांशीं लढावें असा दिल्लीदरबारांत संकेत ठरला. हें वर्तमान बाजीरावसाहेब यांणीं ऐकून आपलेबरोबरचें जड सामान छत्रसाल राजापाशीं ठेऊन सडे स्वारीनिशीं यमुनेचे कांठीं उतरला. व त्यास मल्हारजी होळकर व राणोजी शिंदे छ १३ रमजान रोजीं (४ डिसेंबर १७३६) वेत्रवती पे॥ भेलसें या मुक्कामीं येऊन भेटले. नंतर छ २८ सवाल [१८ फेब्रुवारी १७३७] आठरे पे॥ चंदावर येथें लढाई झाली. त्यांत मोंगलाचा पराभव होऊन बाजीराव याचा जय झाला. पेशवे यांजकडलि इंद्राजी कदम सरदार लढाईंत पडला. मग बाजीरावसाहेब परत ग्वालेरीकडे येण्यास निघाले. तेव्हां खानडौरान यानें बाजीरावसाहेब यांस सांगून पाठविल्यावरून माळवा प्रांताचा अधिकार व तेरा लाख रुपये स्वारीखर्च घेण्याचें ठरवून सल्ला केला. नंतर बाजीरावसाहेब कोंकण प्रांतीं आंग्रे याचे साहाय्याकरितां गेला. तो प्रकार असा कीं, मानाजी आंग्रे याणीं पूर्वीं कुलाबा घेण्याविषयीं फिरंगी लोकांचें साहाय्य मागितलें होतें त्याप्रमाणें ते येऊन मानाजीस कुलाबा प्राप्त झाला. परंतु तेव्हां जें कांहीं त्यास देऊं केलें होतें, तें दिलें नसल्यामुळें फिरंगी लोकांनीं संभाजीस अनुकूल करून कुलाबा घ्यावयास आले. तेव्हां बाजीराव यांणीं याचें साहाय्य करून आलेले फिरंगी

वगैरे फौज हाकून लाविली. तेव्हां मानाजी आंग्रे यांणीं सात हजार रुपये रोख व तीन हजारांचें बिलोरी वगैरे सामान देत जावें, असें ठरविलें. नंतर परत आले. छ १९ रा।वल समान [ ६ जुलै १७३७ ] सलासीन. छ १३ रमजान रोजीं [ ४ जानेवारी १७३७ ] चिमाजी अप्पा निघून जेजुरी सुप्यापर्यंत जाऊन पुढें आळेगांव तर्फ पाठस येथें गेले. मांडवगणपर्यंत जाऊन छ ६ जिल्काद रोजीं [ २६ फेब्रूवारी १७३७ ] पुण्यास आले. कोंकण प्रांतीं फिरंगी लोकांकडे साष्टी प्रांत होता. तो घेण्याची मसलत ठरवून चिमाजी अप्पा छ १ जिल्हेज [ २२ एप्रिल १७३७ ] ह्मणजे अखेर सालीं वैशाख मासीं निघून कोंकणांत गेले. बरोबर राणोजी शिंदे व मल्हारराव होळकर व चिमणाजी माणकर यास घेऊन गेले. व्यंकटराव नारायण घोरपडे इचलकरंजीकर यासही फौज देऊन गोव्याकडे पाठविलें होते. मराठ्यांचे व पोर्चिगीज लोकांचे युद्धप्रसंग बहुत होऊन शेवटीं साष्टी प्रांता पे॥ महाल वगैरे खालीं लिहिले तारखेस पेशवे यांणीं आपला अंमल बसविला. छ ९ जिल्हेज रोजीं ( ३० मार्च १७३७ ) उरुळाचें ठाणें सर केलें. याविषयीं वर्तमान पेशवे यांस आले. छ १८ जिल्हेज ( ८ एप्रिल १७३७ ) किल्ले दत्ताजी मोरे याणीं घेतल्याची खबर साष्टीस आली. छ १९ जिल्जेज ( ९ एप्रिल १७३७ ) बेलापूरचा पडकोट घेतल्याचें वर्तमान आलें. छ २१ जिल्हेज ( ११ एप्रिल १७३७ ) ठाणें साष्टीचे कोटास आरंभ केला. छ ७ मोहरम ( २७ एप्रिल १७३७ ) बेलापूर घेतल्याची खबर आली. छ १५ मोहरम ( ५ मे १७३७ ) तालीमवाडी व कालदुर्ग फत्ते झाल्याचें वर्तमान हरबाजी ताकपीर याजकडून आलें ; घोड बंदरावर छ २७ मोहरम ( १७ मे १७३७ ) साष्टी घेतली, सबब तेथील लोकांस बक्षीस दिलें. ६६ गांव आहेतह्मणून सांष्टी ह्मणतात चैत्र शु॥ ७ शके १७५९ रोजीं घेतली. किल्ले मजारी फत्ते झाल्याची खबर छ १ सफर अखेर सालीं ( २० मे १७३७ ) आली. छ ३ सफर ( २९ मे १७३७ ) वांद्र्याचे कोटास मोर्चे लाविले. नारो शंकर पंत सचीव वारले. दत्तक चिमणाजी नारायण यास घेऊन पदाची वस्त्रें दिलीं. नागेश्वराचें देवालय पुण्यांतील

रामभट चिताव याणीं बांधिलें. जंजीरकर हब्शी याचा व पेशवे यांचा तह पूर्वी अर्जी सलासीनांत संकेत झाल्याप्रें॥ शेवटास गेला. तो प्रकार असा कीं, राजापुरी प्रांत ११ महालपे॥ जंजीरकर याजकडे पा॥ १ नांदगांवमुरूड पा॥ १ श्रीवर्धन पा॥ १ दिवें १ ह्मसनें ता॥ १ मांडूळ ता॥ गांवल -॥- गांव ४९ पा॥ दिल्यापा॥ निम्में गांव २४॥, येणेंप्रमाणें साडेपांच महाल जंजीरकर याजकडे जाऊन बाकी ५॥ ह्मणजे मामले तळें १, पा॥ घोसाळें १, ता॥ गोरेगांव १, ता॥ बिरवाडी तर्फ निजामपूर १, ता॥ गोवळ, चाणगांव निम्मे महाल, येणेंप्रमाणें ११ महाल दोहोंकडे वांटणी झाली; परंतु एकंदर ११ महालांत दुतर्फा पाहणीदार फिरून दुतर्फा अंमलदार यांचे विद्यमानें जमाबंदी होऊन ज्याचे महालाचा आकार त्यास देऊन फाजील बाकी बराबर करून घ्यावी असें ठरलें. याशिवाय रायगड १, व तळें १, घोसाळें १, अवचितगड १, बिरवाडी १, हे किल्ले व ता॥ नागोठणें व अष्टमी वशी महाल पाली येथील अंमल निम्मेंनिम आजपर्यंत चालत आला असून या तहापासून हे महाल दरोबस्त पेशवे यांणीं घ्यावे, जंजीरकरांनीं हरकत करूं नये, असें ठरलें. प्रतिनिधीस चव्हाणावर पाठवून त्याचा बंदोबस्त करून ठराव करून घेतला, व दुसरे वर्षी मिरजेवर पाठवून मोंगलांकडून किल्ला घेऊन डुबाल यास सुभा सांगितला. मिरज प्रांत मराठ्यांचे हातीं लागला. शाहू महाराज स्वतः स्वारीस निघाले. सेनासाहेब सुभा, सेनाखासखेल, आघाडीस; प्रतिनिधि व मुख्य प्रधान, अमात्य व सचीव, सोयरे लोक व पंडितराव, सुमंत, न्यायाधीश, चिटणीस, पोतनीस, जामदारखाना मंत्री, उजवेबाजूस; सेनापति व आणखी सरदार, पथकी, फडणीस, दप्तरदार, शिलेदार, डावे बाजूस; पिच्छाडीस सर लष्कर व त्याचे निजबतीचे काकडे व कोकाटे वगैरे; मागें जनानखाना; सर्वांपुढें निशाणवाले त्यामागें निशाण; त्याचे पश्चात् वाद्य; त्याचे पिच्छाडीस हत्ती; नंतर सरदार; तदनंतर इटेकरी; तदनंतर बोथाट्या; त्यामागें खासबारदार; नंतर नगरखाना याप्रों स्वारी निघून शके १६५८ सालीं उंबरजेस आली. दोन वर्षे छावणी तेथें होती. नंतर साताऱ्यास आले.

### सु॥ समान सलासीन मयाव अलफ, सन ११४७ फसली, अवल साल छ ६ सफर २९ मे १७६७, ज्येष्ठ शुद्ध ७ शके १६५९.

वसवें फत्ते झाल्याचें वर्तमान आलें; छ २४ सफर [ १२ जून १७३७ ] छ १९ रबिलावल [ ६ जुलै १७३७ ] श्रीमंत बाजीरावसाहेब यांची स्वारी हिंदुस्थान वगैरे स्वारी करून परत आले. हिंदुस्थान, गुजराथ, माळवा, वगैरे अंमल बसवून परत आले. छ ४ रा॥वल [ १ जुलै १७३७ ] चिमाजी अप्पा ठाणें साष्टी, वगैरे स्वारी करून पुण्यास आले. छ ११ रजब रोजीं [ २९ अक्टोबर १७३७ ] श्रीमंत बाजीरावसाहेब व चिमाजी अप्पा असे उभयतां स्वारीस निघाले ते छ १० साबान रोजीं [ २२ नोव्हेंबर १७३७ ] सांगवीनजीक करवंदवारीनें बाजीराव भोपाळाकडे गेले, व अप्पा परतोन खानदेशांत येऊन तारापुराहून साष्टीकडे गेले, छ १४ जिल्काद [ २३ फेब्रूवारी १७३८ ] निजामुन्मुल्क सरोंजेस होता. तो भोपाळाजवळ चांगली जागा पाहून बाजीराव याची वाट पाहत. बसला होता. बाजीरावाचें लष्कर तेथें पोहोंचतांच त्याणीं, निजामुन्मुल्क आसरा धरून बसला, तस्मात् याचे मनांत भीति आहे असें समजून छ ३ रमजान रोजीं [ १५ डिसेंबर १७३७ ] भोपाळाजवळ लढाई सुरू झाली. त्यांत निजामाकडील रजपूत लोक ५०० पडले. घोडेस्वार सातशें मेले. मराठ्याकडील १०० पडले, व ३०० जखमी झाले. तेसमयीं बाजीराव दोन बाणाचे टप्यावर उभा राहून निजामुन्मुल्क आपली जागा सोडून निघाला असतां त्याजवर एकदम हल्ला करावा अशी वाट पहात होता. परंतु ती जागा त्याणें सोडिली नाहीं. मग बाजीराव याणें फौजेच्या टोळ्या करून निजामासभोंवतीं गराडा घातला व त्यास धान्य व गवत वगैरे मिळेनासें केलें. छ १९ रमजान रोजीं [ ३१ डिसेंबर १७३७ ] याप्रों तजवीज केली. निजामास असें संकट प्राप्त झाल्याचें वर्तमान कळतांच तिकडून त्याचे मुक्ततेविषयीं कुमक पाठविण्याची तयारी

होऊं लागली. परंतु बाजीराव यास पक्कें ठाऊक होतें कीं, खानडौराण वजीर याचें निजामाशीं वांकडें होतें, यामुळें तिकडील फौज येणार नाहीं. कदाचित् हैदराबाद व औरंगाबादेकडून मदत येऊं लागल्यास त्याचे बंदोबस्ताविषयीं पेशवे याणीं व शाहू महाराज याणीं रघोजी भोसले यास लिहिलें असतां त्याणें ऐकिलें नाहीं. बाजीराव याचा भाऊ चिमाजी अप्पा हा मात्र लोक जमा करून तापीच्या कांठीं राहिला होता. त्यास बाजीराव याणें पत्र पाठविलें कीं, यासमयीं तुला फौज मिळेल ती जमा कर; व दक्षिणेंतु पत्र पाठवून फत्तेसिंग भोसले व शंभुसिंग जाधव व सरलष्कर यांस आण. बांडे व दाभाडे हे मजकडे येत नसतील तर तूं आपल्याजवळ घेऊन तापीवर रहा. यावेळेस मराठे एकचित्त झाले तर मुसलमान लोक दक्षिणेंतून हांकून द्यावयाची संधि हीच आहे. निजामुन्मुल्क अशा अडचणींत पडला तेव्हां ती जागा सोडून दूर गेला. परंतु तोफा वगैरे सामान फार होतें, सबब तो माघारा फिरून भोपाळचे किल्ल्यांत शिरला. ती जागा लहान; कांहीं लोक आंत व कांहीं बाहेर असे राहिले. तेव्हां तो नबाब कांहीं सामान भोपाळ येथें व कांहीं इसलामगड येथें ठेऊन बाहेर पडून दाराई सराई गांवपावेतों पोहोंचला. तेथें पेशवे यांणीं शिंदे, होळकर यांस पाठवून मिरमानाखान फौजदार शाहाजापूरकर मारला. दोन हजार फौज बुडविली. खुद्द पेशवे यांणीं नबाबाचे रोखें जाऊन तीन कोसांचे अंतरानें मुक्काम केला. नबाबानीं पाठ देऊन कूच केलें. भोपाळचे तळ्याचा आश्रा केला. व पेशवे यांजकडील फौजांनीं दाणा, वैरण बंद केली. तीन शेर धान्य नबाबाचे लष्करांत झालें. नबाब ढेंकळाचें कुसू रचून अडचणींत राहिले. रात्रंदिवस तिरंदाजी व गोळी पेशवे यांणीं त्याजवर चालविली, यामुळें नबाबाचे लोक रात्रंदिवस घोड्यावरील व हत्तीवरील हौदा न उतरतां राहिले. नबाब हौद्यांत बसून राहिले, अशी फजिती होऊं लागली. तेव्हां छ २६ रमजानीं•( ७ जानेवारी १७३८ ) सल्ला होऊन तह ठरला कीं, बाजीराव यास चंबळा व नर्मदा यांमधील मुलूख आहे, त्याचें आधिपत्य प्राप्त होण्यास बादशहास नबाबानीं अनुकूल

व्हावें; व याशिवाय पन्नास लक्ष रुपये बाजीराव यास स्वारीखर्चाबद्दल द्यावे, असें ठरून लढाई महकूब झाली. सरकारवाड्यापाशीं प्राचीन गांवकुसूं होतें, तें मोडून चिमाजी अप्पा यांणीं पेठ मुद्याबादची जमीन घेऊन केदारवेशीपासून मावळत्या वेशीपर्यंत कोट बांधण्यास आरंभ केला. प्रतिनिधीनीं मिरज घेऊन डुबल याजकडे सुभा सांगितला. नजीबउद्दवला मोमीनखान गुजराथचा सुभा झाला. त्यानें रत्नसिंग भांडारी अहमदाबाद याजवर दमाजीकडील मदत रंगोजी यास घेऊन स्वारी करून अहमदाबाद घेतली छ २० मराठी व मोंगल निम्मेंनिम तह ठरला. सुज्याइतखान यास रघोजी भोसले यांणीं बुडवून पांच हजार घोडे व हत्ती, पालख्या व जेजाला पाडाव केले. याखुदखान यास परत करून पांच लक्ष रुपये खंड घेऊन सोडून दिलें. पुढें मयत झाल्याची ही खबर आहे.

## सु॥ तिसा सलासीन मया अलफ, सन ११४८ फसली, अवल साल छ १६ सफर, २५ मे १७३८, जेष्ठ वद्य ३ शके १६६०.

छ २९ सफर (७ जून १७३८) अवलसाल चिमाजी अप्पा स्वारीहून पुण्यास दाखल झाले. छ ७ र॥ खर (१४ जुलै १७३८) श्रीमंत हिंदुस्थानचे स्वारीहून पुण्यास आले. छ २४ जमादिलावल (२९ आगष्ट १७३८) स्वारीस निघाले. जेजुरीपर्यंत गेले. छ १८ रजब (२१ अक्टोबर १७३८] तासगांव घेतल्याची खबर श्रीमंतांकडून पुण्यास आली. छ २४ साबान [२६ नोव्हेंबर १७३८] चिमाजी अप्पा स्वारीस निघाले ते छ २८ रमजानात [२९ डिसेंबर १७३८] कोंकणप्रांतीं माहिमास जाऊन लढाईत दाखल झाले. छ ९ सवाल [९ जानेवारी १७३९] राणोजी शिंदे यांणीं डाहाणू घेतल्याचें वर्तमान आलें. छ २४ सवाल [२४ जानेवारी १७३९] बाजी भिवराव शेल्लूकर तारापूरचे हल्ल्यांत ठार झाले. किल्ले अशरी फत्ते झाली, छ २ जिल्काद (२१ फेब्रूवारी १७३९). छ ६ जिल्काद [९ फेब्रूवारी १७३९, वदलापारडी फत्ते झाली. छ ११ जिल्काद [१०

फेब्रूवारी १७३९ वेसवे फत्ते झाल्याचें खंडेराव माणकर याजकडून पत्र आलें. श्रीमंत स्वारीस निघाले [ ११ फेब्रूवारी १७३९ ] छ १२ जिल्काद. छ १८ जिल्काद [ १७ फेब्रूवारी १७३९ ] शिदोला किल्ला मखमूल अलमखान यास दिला. छ ६ जिल्हेज [ ६ मार्च १७३९ ] धाराशीव घेतल्याचें वर्तमान आलें. छ ६ जिल्हेज चिमाजी अप्पानीं वसईस मोर्चे लाविले. छ ७ जिल्हेज [ ७ मार्च १७३९ ] व्यंकटराव नारायण याजकडून फोंडा मर्दनगड किल्ला घेतल्याचें वर्तमान आलें. छ १४ जिल्हेज [ १४ मार्च १७३९ ] रामचंद्र हरी पटवर्धन यास वसई मुक्कामीं पालखी दिली. व गोविंद हरी यास सरदाराचीं वस्त्रें दिलीं अप्पानीं. छ १९ जिल्हेज [ १९ मार्च १७३९ ] वांद्रे पाडावयास आरंभ केल्याचें वर्तमान धुळ्यास आलें. पोर्चुगीज लोकांचें व मराठ्याचें युद्ध होत असतां सेनासाहेब सुभ्याच्या पुतण्यानें कोणाची आज्ञा न घेतां अलाहाबादपर्यंत स्वाऱ्या करून मुलूख लुटला. त्याजवर आवजी कवडा यास पाठविलें असतां त्याचा पराभव त्यानें केला. मग बाजीराव याचा सूड उगवावयास निघाला तों इतक्यांत वर्तमान आलें कीं, नादिरशहा बादशहा इराणचा दिल्लीस येऊन त्यानें मोंगलाचा पराभव केला, व दिल्लीची खंडणी बादशहास मागूं लागला, व खानडौरानही मयत झाला; असें ऐकिलेवर पुढें जात असतां पुढें असें वर्तमान कळलें कीं, नादिरशहानें दिल्लीबादशहा महंमदशहा यास कैद केलें, व आठ हजार लोक ठार मारले, आणि शहर लुटलें, आणि तो लक्ष फौज जमा होऊन दक्षिणेंत येत आहे, असें समजलें. तेव्हां चिमाजी अप्पा यास कोंकणांतून बोलावून बराबर घेऊन लोकांस विदित केलें कीं, जे कोणी हिंदु, मुसलमान असतील त्यांणीं येऊन माझें साहाय्य करावें. याप्रे॥ होळकर व शिंदे यासमयीं श्रीमंतांस मिळाले. इतक्यांत वर्तमान आलें कीं, तो नादिरशहा आपले मुलखीं स्वसंतोषें जाऊन पहिला दिल्लीबादशहा मला मान्य, माझे बंधूप्रे॥ आहे, व याचे आज्ञेंत सर्वांनीं वागावें; जर कोणी असें न करील तर मी माघारा येऊन त्याचें पारपत्य करीन, याप्रों जालें. हें वर्तमान बाजीरावसाहेब यांस छ २४

सफर रोजीं [ २२ मे १७३९ ] पाच्छाइ यांजकडून फरमान घेऊन काशीद घेऊन आले. मुक्काम जेनाबाद येथें आले छ ३ सफरीं [ १ मे १७३९ ] बसविले ह्मणून. नादिरशहा दिल्लींत सन १७३९ चे नवंबरांत येऊन मार्च सन १७३९ सालीं दिल्लींत कत्तल केली होती. वसई प्रांतांतील बहुतेक महाल सर जाले. परंतु मुख्य वसई किल्ला हस्तगत होण्याचे कामीं पेशवे यांनीं बहुत प्रयत्न चालविला. तो असा कीं, सन १७३९ चे फेब्रूवारी महिन्याचे १७ वे तारखेस चिमाजी अप्पाचा चिनीवाला शंकराजी नारायण याणें खुषकीवरून व आंग्रे यांनीं पाण्याचे बाजूनीं, असा चोहोंकडून वेढा घातला. मग किल्लेदारानें येऊन विनंति केली कीं, जंजीरकराप्रमाणे करार कराल तर किल्ला देतों असें बोलूं लागला, परंतु तें चिमाजी अप्पानीं मान्य केलें नाहीं. नंतर जागजागीं मोर्चे बांधून तोफेचा मारा चुकवून जावयाकरितां जमिनींतून चर खणून मोठमोठ्या वाटा केल्या आणि किल्ल्याचे तटास भोंक पाडलें. त्यांतून जावयाजोगा रस्ता नव्हता, सबब कोटाखालीं सुरुंग पाडूं लागले. तेव्हां किल्लेकरीही त्याच सुरुंगांचे सुमारें आंतून सुरुंग पाडूं लागले, यामुळें मराठ्यांचा यत्न व्यर्थ गेला. मग विचार ठरला कीं पांच सुरुंग लावून तटास मोठें खिंडार पाडावें. त्याप्रमाणे पांच सुरुंग तयार केले. पैकीं प्रथम तीन सुरुंगास आग घातली. पैकीं दोन उडाले. खिंडार मोठें पडलें. त्यांत मराठे लोक जाण्यास निघाले, तों तिसरा सुरुंग उडाला, त्यानें मराठे लोक फार मेले गेले. तेव्हां किल्लेकरांनींही लागलीच तो रस्ता बंद केला. आतां जावयास उपाय राहिला नाहीं. एक सुरुंग पहिलाच उडविला होता, परंतु त्यानें कांहींच कार्य झालें नव्हतें. पांचवा सुरुंग तयार करण्याचें काम मल्हारजी होळकर यांजकडे होतें. त्याणीं तें काम पक्कें केलें होतें. तो सुरुंग उडविल्याबरोबर मोठा बुरुज ढांसळून मोठा रस्ता झाला, व आंतील लोकांस खाण्यापिण्याची वगैरे सामग्रीही राहिली नव्हती. सबब त्यांणीं शेवटीं सल्ला केला कीं आठ दिवसांत किल्ला खालीं करून देतों. असा सल्ला होऊन लढाई महकूब झाली. वसईवर हल्ला छ ४ सफर [ २ एप्रिल १७३९ ] रोजीं होऊन छ ६

सफरीं [ ४ एप्रिल १७३९ ] फत्ते झाली; व निशाण वैशाख व॥ ४ मंगळवार ( १९ मे १७३९ ) दोनप्रहरीं पेशवे यांचें किल्ल्यावर लागलें. श्रीमंत बाजीराव यास किल्ला सर झाल्याविषयीं छ १८ सफरीं [ १६ मे १७३९ ] पत्रें कसबे रानाळी पे॥ जेनाबाद येथें आलीं. हा किल्ला घेण्याचे कामीं खंडोजी माणकर व परशराम नाईक आंतुरकर व तुळबाजी मोरे यांणीं अन्य वेषें कोणी गुराखी, कोणी कासार बांगड्या भरणार व कोणी सुतार असे वेष घेऊन किल्ल्यांतील भेद आणविल्यावर किल्ला सर झाला. या किल्ल्याचे मोहिमेंत एकंदर पेशवे याजकडील मनुष्यें बाराचौदा हजार सुमारें मेलीं व फिरंगी याजकडील मेले जखमीं झाले, मिळून आठशें याप्रों जालें. इराणचा बादशाहा दिल्लीस येण्याचें कारण वजीर व उमराव यांणीं विचार केला कीं, मराठ्यांचें प्राबल्य फार झालें. बादशाहा वेडा. दिल्लीपर्यंत बाजीराव स्वाऱ्या करितात व बंगाला अयोध्येपर्यंत भोसल्यांनीं मुलूख घेतला. सबब इराणी बादशाहाशीं राज्यकारण करून दुसरा बादशाहा स्थापावा असें करून मंहमदकुलीखान ऐशीं हजार घोडा व पंचवीस हजार गाडद तोफखानासुद्धां आला. तेव्हां बादशाहानें विचार केला कीं, आपलेच पदरचे लोक फितले. ह्मणून देवराव हिंगणे याचे विचारें बाजीराव पेशवे यांस दोन लाख फौज मागितली. निम्मे अंमल हिंदुस्थान सुभा द्यावा असा करार ठरून पत्रें आलीं. तेव्हां वसईस राज्यकारण लागलें होतें, तें आटपून बाजीराव दसऱ्यास हिंदुस्थानांत निघाले. ही खबर लागतांच इराणी फौज मोठ्या मजला करीत दिल्लींत येऊन बादशाहास कैद केलें. दौलत जप्त केली. बादशाहाचेच्या बहिणीशीं निके लावून नेल्या. दिल्लींत मोठी लूट झाली. लक्षावधि मनुष्यें मेलें. तेव्हां शहरचे लोकांनीं इराणी लोकांवर हल्ला केला. इतक्यांत मराठ्यांची फौज जवळ आली, असें ऐकून अजीमशाहास कैदेंतून मुक्त करून गादीवर बसविलें. तेव्हां दौलत व किल्ले गेले. आपण येथें राहून काय करावें ह्मणून अजमीर येथेंच राहिले. तामसखा दौलत घेऊन

इराणास चालल्याची खबर समजतांच बाजीरावसाहेब स्वारीस निघून येणार तों नर्मदातीरीं वैशाख व॥ ६ शके १६६२ सालीं वारले.

## सु॥ अर्बैन मयात्र अलफ, सन ११४९ फसली, अवल साल छ २७ सफर, २५ मे १७४९, वैशाख वद्य १४ शके १६६१.

छ १ जमादिलावलचे सुमारें [ २७ जुलै १७३९ ] बाजीराव बल्लाळ परत पुण्यास आले. हिंदुस्थानची स्वारी असें वाटतें. छ १० जमादिलाखर रोजीं [ ३ सप्टेंबर १७३९ ] चिमाजी अप्पा वसई सर करून पुण्यास परत आले. कांहीं ठाणीं किरकोळ घेणें राहिलीं, तीं तेथें सरदार ठेविले त्यांस सोंपून आपण स्वतः परत आले. छ ९ रजब ( २ सप्टेंबर १७३९ ) धाराशीव व वसेवे हे दोन महाल खंडोजी माणकर याणीं घेतले. सबब नवस फेडला. छ १० साबान कार्तीक शुद्ध ११ ( १ नोव्हेंबर १७३९ ) बाजीराव बल्लाळ मुहूर्त करून स्वारीस निघाले. छ १५ साबान रोजीं निघून छ २१ रमजानास ( १२ डिसेंबर १७३९ ) चालते झाले. छ ९ रमजानपर्यंत [ ३० नोव्हेंबर १७३९ ] उभयतांची स्वारी एकच होती. पुढें छ १० रमजानीं [ १ डिसेंबर १७३९ ] श्रीमंतांची स्वारी वेगळीहोऊन सवाल महिन्यांत [ जानेवारी १७४० ] औरंगाबादेस होते. तेथून उलटून नजीक हिवरें पे॥ नेवसेंवरून छ १९ जिल्हेज रोजीं ( ७ मार्च १७४० ) लोणी पे॥ येकदुणी येथें येऊन हिंदुस्थानचे स्वारीस गेले. अप्पासाहेब देशीं निघाले. छ २० जिल्काद रोजीं [ ८ फेब्रूवारी १७४० ] औरंगाबादेस गेले. छ २९ सवाल रोजीं ( १८ जानेवारी १७४० ) वर्तमान आलें कीं, गोपिकाबाईस ऋतु प्राप्त झाला, नानासाहेब यांचे कुटुंबास. छ १६ जिल्काद माघ व॥ २ ( ४ फेब्रूवारी १७४० ) दादासाहेब यांचा वृतबंध श्रीमंत स्वारीस गेल्यामागें नानासाहेब यांणीं केला. मुंजीस शाहू महाराज आले होते. छ १९ जिल्काद [ ७ फेब्रूवारी १७४० ] सदाशिव चिमणाजी यांचें लग्न झालें. नांव उमाबाई. ही खमसेनांत वारली. छ १० जिल्हेज ( २७ फेब्रूआरी १७४० ) मोंगलांचा सल्ला केला. रात्रीं बोली झाली.

मुक्काम हिवरें पो नेवासें. छ १२ जिल्हेज [ २९ फेब्रूवारी १७४० ] अप्पासाहेब याची व मोंगलाची भेट झाली. मु॥ वरखेड नजीक गंगातीर पो नवासें. छ १९ जिल्हेज [ ३ मार्च १७४० ] बाजीरावसाहेब यांची व नासिरजंगाची भेट झाली, मु॥ वरखेड. छ १७ जिल्हेज [ ५ मार्च १७४० ] पुन्हा मोंगलांवर उलटले. छ २१ जिल्हेज रोजीं [ ९ मार्च १७४० ] अप्पासाहेब औरंगाबादेस गेले. यावेळेस तह होऊन नेमाड प्रांत मिळाला. छ १६ मोहरम [ ३ एप्रिल १७४० ] अप्पासाहेब मोंगलाईतून परत येऊन पुण्यास दाखल झाले. बराबर महादाजी अंबाजी पुरंदरे होते. छ १७ मोहरम रोजीं [ ४ एप्रिल १७४० ] नानासाहेबसुद्धां चिमाजीअप्पा कोंकणांत गेले. छ १८ रोजीं [ ५ एप्रिल १७४० ] पार्लीचें ठाणें फत्ते झालें. पुढें कुलाब्यास गेले. रेवदंडा किल्ला घेण्याचे मसलतीस गेले. आंग्रे याशीं लढाई झाली. सफर महिन्यांत [ मे १७४० ] कुलाब्यास होते. मानाजीचे साहाय्यास गेले. तुळाजी पळून गेला. छ १२ सफर [ २८ एप्रिल १७४० ] बाजीराव बल्लाळ मु॥ रावेरें पो खरगाणें रेवातीरीं वारले. बराबर जनार्दनपंत होते. छ २० रविलावल [ ४ जून १७४० ] इहिदे अर्बैनांत परत आले. बाजीरावसाहेब वारल्याचें वर्तमान कुलाब्यास चिमाजीअप्पा व नानासाहेब यांस कळलें. नंतर तेथें क्रिया वगैरे करून छ २६ सफर रोजीं [ १२ मे १७४० ] पुण्यास येण्यास निघाले ते छ १० रा वल [ २५ मे १७४० ] इहिदे अर्बैन रोजीं पुण्यांत दाखल झाले. छ २३ मोहरम [ १० एप्रिल १७४० ] उरणचें ठाणें सर केल्याचें वर्तमान आलें. छ १३ सफर [ २९ एप्रिल १७४० ] फावडी किल्ला ता॥ रत्नगड जावजी मराठे याणीं सर केल्याचें वर्तमान आलें. छ १८ सफर [ ४ मे १७४० ] मिरगड घेतल्याची खबर आली. बाजीरावसाहेब रमजान महिन्यांत [ डिसेंबर १७३९ ] स्वारीस निघाले याचें कारण, निजामाचे बोलण्याप्रमाणें माळव्याची सनद मिळाली नाहीं. त्यावरून निजाम हा घातकी आहे. यास्तव त्याची दक्षिणेंतील सत्ता नाहींशी करावी असें मनांत

आणून औरंगाबादेस सवाल महिन्यांत [ जानेवारी १७४० ] गेले. तेथें निजामाचा पुत्र नासिरजंग हा दहा हजार फौजेसुद्धां होता. त्याजवर जाऊन सभोंवता फौजेकडून गराडा घातला. परंतु इतक्यांत त्याच्या कुमकेस मोठें सैन्य आल्यामुळें तो हातचा सुटून अमदनगरचे वाटेनें मुलूख लुटीत चालला. इतक्यांत चिमाजीअप्पाकडून ते व त्याचें लष्कर येऊन पोहोंचतांच त्यास पुढें न जाऊं देतां माघारा परतविला. नंतर कांहीं दिवस युद्ध होत होतें; परंतु कोणा एकासही लाभ झाला नाहीं. सबब तह छ १० जिल्हेज रोजीं ( २७ फेब्रुवारी १७४० ) झाला कीं इतःपर कोणी रयतेस उपद्रव करूं नये. मोंगलांनीं नर्मदेचे कांठीं पेशवे यांस जहागीर द्यावी. असा तह झाल्यानंतर बाजीरावसाहेब पुण्याकडे परत न येतां हिंदुस्थानांत जात असतां वर लिहिल्याप्रमाणें मयत झाले. बाजीरावसाहेब मयत झाल्यावर निजामुन्मुलूक कितेक दिवस दिल्लीस होता. पुढें बादशहानें त्याचे नांवास अमीरून उमराव असें पद जोडिलें. त्यास वर्तमान कळलें कीं, आपला पुत्र नासिरजंग दक्षिणेंत आहे. तो माझी सत्ता नाहींशी करून आपण कारभार करणार. हें बंड मोडण्याकरितां निजाम दक्षिणेंत निघतेसमयीं बादशहास विनंति केली कीं, मला जें पद दिल्हें तें माझा वडील पुत्र ग्यासुदिन यास असावें. रघूजी भोसले व पेशवे यांचे दरम्यान कलह उत्पन्न झाला होता. परंतु नादरशा अफगाणचा बादशहा दिल्लींत आला होता. या गडबडीमुळें तें प्रकरण तसेंच राहिलें होतें. पुढें त्याची आपसांत समजूत होऊन पुढें कर्नाटकांत रघूजी भोसले व प्रतिनिधि व फत्तेसिंग भोसले वगैरे सरदार गेले. त्यांत मुरारजी घोरपडाही आला होता. तो पूर्वीचें सेनापतिपद मागत होता. परंतु तें न देतां कांहीं पे॥ तुंगभद्रेचे कांठीं देऊन वश केला होता. असें एकंदर लष्कर दोस्त अल्लीनबाब याजवर जाऊन त्यास ठार मारला. पुढें दोस्तअल्लीचा पुत्र सफरदअल्ली याणें मराठे यांस कांहीं द्रव्य देऊन माघारें फिरावें असें केलें. त्या वेळेस त्या सफरदअल्लीचें व भोसले यांचें बोलणें झालें कीं, त्रिचनापल्लीचा अधिकारी चंदासाहेब यास मराठ्यांनीं हांकून द्यावा. त्या करारांप्र॥ मराठे सफरदअल्लीचा मुलूख सोडून माघारें सव्वाशें कोस जाऊन शिव-

गंगेचे कांठीं उतरले. त्याचा मनसोबा असा होता कीं, आपण येथें राहून चंदासाहेब असावध असतां एकदम त्याजवर जाऊन त्यास जिंकूं. इतक्यांत रघूजी भोसला तेथून निघून साताऱ्यास आला. आणि बाळाजी बाजीराव यांस पेशवाईचीं वस्त्रें न देतां बाबूजीनाईक बारामतीकर यास पेशवा करावा, असा राजाजवळ उद्योग करूं लागला. आणि शाहू महाराज यांस समजविलें कीं, बाबूजीनाईक मोठा सावकार आहे; तो पुष्कळ द्रव्य देईल, अशी बहुत खटपट केली. तथापि ती शेवटास गेली नाहीं. पुढचे वर्षीं ह्मणजे इहिदे अर्बैन सालांत बाळाजी बाजीराव यांस पेशवाईचीं वस्त्रें रा। खर महिन्यांत प्राप्त झालीं. विरूबाई दाशी कन्हेरखेडकर शिंद्याकडून दिल्लीस शाहू महाराजाचे लग्नसमयीं आंदण आली होती, तिजवर महाराजांची बहुत मर्जी होती. ती वर लिहिल्याशिवाय दोघी बायका यावेळेस होत्या. वडील सकुवरबाई व दुसरी सगुणाबाई. येसाजी व कुसाजी भोसले शिराळकर सरकारचे लेकावळे होते. त्यांस शिरोळ सुभा महाराजांनीं दिल्हा. तहनामा होऊन नेमाड प्रांत पेशवे यांस मिळाला.

## सु।। इसन्ने अर्बैन मयाव अल्लफ, सन ११५१, अव्वल साल छ २० रबिलावल, २९ जून १७४१, ज्येष्ठ वद्य ६ शके १६६३.

छ १२ रबिलावल ( १७ मे १७४१ ) भाऊसाहेब व नानासाहेब साताऱ्यास जाण्याकरितां निघून साताऱ्यास जाऊन छ २१ रजबीं ( २१ सप्टेंबर १७४१ ) पुण्यास परत आले. छ २० सव्वाल रोजीं ( १८ डिसेंबर १७४१ ) भाऊसाहेबासुद्धां हिंदुस्थानचे स्वारीस निघाले ते छ १६ जिलकाद ( १३ जानेवारी १७४२ ) देवठाण्यापैकीं पाटोदे येथपर्यंत जाऊन त्या मुकामाहून भाऊसाहेब परत पुण्यास आले, नानासाहेब पुढें हिंदुस्थानांत गेले, ते दोन वर्षें तिकडे राहून अर्बा अर्बैनांत माळव्याची सनद घेऊन छ १९ जमादिलाखरास [ २९ आगष्ट १७४३ ] परत आले. सव्वाल महिन्यांत [ डिसेंबर १७४१ ] नासरुद्दौला

ब्ऱ्हाणपूरचा यांची भेट झाली होती. छ ३० जिल्हेज [ २९ फेब्रूवारी १७४२ ] दादासाहेब यांचें लग्न झालें, गणेशभट कर्वे याची कन्या. जिवाजी खंडेराव चिटणीस पौष वद्य ७ रोजीं [ २ जानेवारी १७४२ ] वारले. यास बंधू बापू, गोविंदराव व बहिरराव असे होते व पुत्र रामराव व देवराव व जिवाजी असे असून, रामराव सात वर्षांचे परंतु चिटणीशी त्यास सांगितली. बापूजी खंडेराव यास सरदारी सांगितली. हिंदुस्थानांत पेशवे गेल्यावर अलहाबादेस स्वारी करावी असा पेशवे यांचा बेत होता. परंतु भोसले यांचे मनांत पूर्वेकडे बंगाल प्रांताचा लाभ आपल्यासच मिळावा, तिकडे पेशवे याचा प्रवेश होऊं नये. अशी तजवीज करण्यास भोसले यांनीं दमाजी गायकवाड व बाबूराव बारामतीकर यांस माळवे प्रांतांत पाठवून त्यास लुटावयास सांगितलें. तेव्हां पेशवे यांनीं अलहाबादेकडे जाण्याचें टाकून माळव्याकडे बंदोबस्ताकरितां गेले. इकडे भास्करपंत बंगाल्याकडे जात असतां बहारपरगणा येथें त्यांनीं स्वारी घातली. त्यावेळेस अल्लीवर्दीखान याच्या पुतण्याचा पुत्र कटाप्रांतीं बंडें करीत होता. त्यास तें बंड मोडण्याकरितां अल्लीवर्दीखान बहाराहून जाऊन बंड मोडून तो मुरशिदाबादेकडे जात असतां, मराठे बहारांत शिरले अशी बातमी आल्यावरून त्याचे पारिपत्याकरितां आला. तेसमयीं मराठी लष्कर सुमारें बाराहजार होतें. परंतु आवई पन्नास हजारांची झाली. अल्लीवर्दीखान ह्याजपाशींही तीन साडेतीन हजार स्वार व चार हजार पायदळ होतें. परंतु त्याच्या लष्करासभोंवतां मराठ्यानीं वेढा घालून त्याचें सामान लुटलें, त्यामुळें त्याचे कित्येक लोक पळाले, व कांहीं मारले गेले. बाकी राहिलेले लोक अजमासें तीन हजार होते. तेव्हां अल्लीवर्दीखानानें मरावें किंवा मारावें असा निश्चय करून युद्ध करीत खटावापर्यंत आला. त्या युद्धांत अल्लीवर्दीखान याचे लष्करांत मीरहबीब होता. तो पहिले दिवशींच मराठे यांनीं धरिला. नंतर त्यानें मराठ्यांचा पक्ष स्वीकारून भास्करपंताचा तो परम विश्वासू झाला. यानें तो मुरशिदाबादेस आपला भाऊ कैदेंत

होता त्यास सोडवून त्या शहरीं राहणार जगतशेट सावकार याचें घर लुटून पंचवीस लक्ष रुपये घेऊन भास्करपंतास मिळाला. त्यास द्रव्याचा लोभ दाखवून बंगाल्यांत ठेवून घेतलें. तेव्हां त्याचे मसलतीप्रमाणें भास्करपंत माघारा फिरून हुगळी शहर हस्तगत केलें व खटावापासून मिदिनापूरपर्यंत बहुतेक मुलूख त्याचे हातीं लागला. त्यावेळेस हुगळीचे नदीस पाणी फार असल्यामुळें पुढें जाऊन मुरशिदाबाद घेणें राहिलें. दिल्लीहून बादशाहाकडील कारभारी बंगाल्याची खंडणी मागावयास आला. ते अल्लीवर्दीखानानें त्यास उत्तर केलें कीं, मराठ्याचे उपद्रवामुळें मला यावेळेस अनुकूल नाहीं, तरी स्वामींनीं माझे साहाय्यास लष्कर पाठवून माझें रक्षण करावें. असें त्याशीं बोलून वऱ्हाडप्रांतीं भोसल्याचा मुलूख लुटण्यास पेशवे यास सूचना केली. हें वर्तमान बरसात सुरू होण्याचे अगोदरपर्यंत झालें.

## सु ॥ इहिदे अर्बैन मया व अल्लफ, सन्न ११५० फसली, अव्वल साल छ ९ रबिलावल, २४ मे १७४०, ज्येष्ठ शुद्ध १० शके १६६२.

वीरगड फत्ते झाल्याचें वर्तमान आलें त्याप्रमाणें नवस केलेला छ ८ रबिलावल रोजीं ( २३ मे १७४० ) फेडला. छ २० रबिलावल रोजीं ( ४ जून १७४० ) निघून सातारा, वांई वगैरे करून छ २ जमादिलाखर रोजीं ( १४ आगष्ट १७४० ) परत आले. वस्त्रें आणण्याकरितां स्वारी गेली होती. छ ११ रबिलाखर आशाढ शु॥ १२ बुधवार रोजीं ( २५ जून १७४० ) सातारे मुक्कामीं दहा घटका दिवसास बाळाजी बाजीराव यास पेशवाईचीं वस्त्रें झालीं. बरोबर चिमणाजी अप्पाही होते. छ २७ जमादिलाखर रोजीं ( ८ सप्टेंबर १७४० ) पेशवे व फिरंगी गोवेकर यांचे दरम्यान तह झाला. त्यांत वसई प्रांत पेशवे यास दिला. त्यांत पुन: फिरंगी यांनीं उपद्रव करूं नये. छ २४ रबिलाखर ( ८ जुलै १७४० ) दिपाजी जाधवराव पुण्यास परत आले. कार्तिक शु॥ ३ छ १ साबान ( १२ अक्टोबर १७४० ) भांबवडें येथें स्वारी गेली.

पुढें जाणार इतक्यांत चिमाजी आप्पांची प्रकृति बिघडली. सबब छ २० साबान ( ३१ अक्टोबर १७४० ) परत आले. छ १४ रमजान ( २३ नोव्हेंबर १७४० ) नानासाहेब स्वारीस निघाले, मुक्काम कोरेगांव. हिंदुस्थानचे स्वारीस गेले. छ १७ रमजान ( २६ नोव्हेंबर १७४० ) बहिरजी बळकवडे यांजकडून कुरंगगड व तुरूप किल्ले घेतल्याचें वर्तमान आलें. छ ३ सवाल ( १२ डिसेंबर १७४० ) रेवदंडा फत्ते झाल्याचें वर्तमान खंडोजी माणकर यांजकडून आलें. छ ८ सवाल रोजीं ( १७ डिसेंबर १७४० ) चिमाजीअप्पा कैलासवासी झाले. अन्नपूर्णाबाई सतीं गेली, पौष शु॥ १० सह ११ बुधवार ( १७ डिसेंबर १७४० ) पहिली रखमाबाई अगोदरच मयत झाली होती. छ २७ सवाल ( ५ जानेवारी १७४१ ) मल्हारजी होळकर याजकडून किल्ले धार फत्ते झाल्याचें वर्तमान आलें. छ २९ सवाल ( ७ जानेवारी १७४१ ) मुक्काम बेदे परगणें यदलाबाद नबाब निजाम उल्मुलूक यांची भेट झाली. पूर्वी पेशवे यांजकडून पिलाजी जाधवराव गेले होते. त्यावेळेस पेशवे यांनीं माळवे प्रांताबद्दल मागणें केलें व त्याचीं उत्तरें निजाम उल्मुलूक यांनीं दिलीं तीं येणेंप्रमाणें:—( १ ) प्रथम कलमांत हा अर्ज आहे कीं, बादशहानीं बाळाजी बाजीराव यास माळवे सुभ्याचें काम सांगावें आणि त्या सर्व प्रांताची जहागीर द्यावी. याजवर निजाम उल्मुलूख याचा जबाब असा झाला कीं, सुभेदार तर आह्मी खुद्द आहोंत, जर हुकुमाची तामिली करीत जाऊं अशी पेशवे यांची इच्छा असेल तर नायकीच्या सनदा त्यास दिल्या जातील. दुसरे कलमांत अर्ज आहे कीं, बादशहानीं पेशवे यास मदतखर्चास पन्नास लक्ष रुपये देण्याचें कबूल केलें ते द्यावे. त्याजवर जबाब आहे कीं, ही रकम बादशहाकडून घेऊन तुह्मांस देण्याविषयीं प्रयत्न केला जाईल. हा बोलण्याचा प्रकार, नादिरशाह हिंदुस्थानांतून परत गेल्यावर जेव्हां निजामउल्मुलूक दक्षिणेंत आपल्या मुलानें पुंडावा माजविला होता त्याच्या शासनास जातांना माळव्यांत आला तेव्हां झाला असें दिसतें. छ २० जिलकाद ( २७ जानेवारी १७४१ ) त्र्यंबक हरी सुभेदार याजकडून पुनः बांडें फत्ते झाल्याचें

वर्तमान आलें, परगणे नेमाडपैकीं. जिल्हेज महिन्यांत (फेब्रूवारी १७४१) देवरीवर लढाई होऊन छ १ मोहरम रोजीं (८ मार्च १७४१) ठाणें फत्ते होऊन आवजी कवडे यांचे स्वाधीन केलें. छ २९ सफर (३० एप्रिल १७४१) भाऊसाहेब रघुनाथपंत व जनार्दनपंतसुद्धां साताऱ्यास जाऊन छु ३ रबिलावल रोजीं (८ मे १७४१) पुण्यास परत आले. रबिलावल अखेरसाल या महिन्यांत (मे १७४१) ढवळपूरचे मळीस मुक्काम असतां, सवाई जयसिंग माळवे प्रांतांचा सुभेदार त्याची भेट नानासाहेब यांनीं माळवा मिळण्याकरितां घेऊन बोलणें होऊन अखेर ज्येष्ठ शुद्ध १४ ह्मणजे छ १२ रबिलाखर रोजीं संवत् १७९७ इसवी सन १७४१ रोजीं (१८ मे १७४१) उभयतांमध्यें तहाचें बोलणें ठरलें. तें असें कीं:—पहिलें कलम:—परचक्र चढ करून आलें असतां अगर परचक्रावर चढ करून जाणें झाल्यास जयसिंगांनीं व मराठे यांनीं एकमेकांची मदत ठेवावी. दुसरें कलम विचित्र आहे. बादशाहाशीं बेइमान होण्याचा प्रसंग येईल अशी कल्पना मनांत घेऊन हें कलम लिहिलें आहे कीं, हा प्रसंग मी येऊं देणार नाहीं, कदाचित् आल्यास मी जयसिंग पेशवे याचे पाठीशीं असेन. कलम ३ व ४ मोघम आहेत. पांचव्या कलमांत जयसिंग वचन देतो कीं, चंमेला नदीच्या उत्तरेकडील ज्या रजपूत सरदारांविषयीं बाळाजीनें शिफारस केली आहे, त्यांच्या हितावर मी दृष्टि देईन, जरासें बादशाहाच्या ताबेदारींत फरक करणार नाहीं, तर व खंड देतील तर त्यांच्या जमिनी त्यांजकडे चालवीन. शेवटील कलम सर्वांत महत्वाचें आहे कीं, सुभे माळव्याचे वजरीची सनद व त्याबद्दल रिवाजाप्रमाणें खिलत शाहूकडे पाठविण्याविषयीं व चंबळा नदीचे उत्तरेकडील राज्यावर बसविलेला खंड घेण्यास परवानगी देण्यास सहा महिन्यांच्या आंत मी बादशाहाचा हुकूम आणितों. याप्रमाणें तह सन १७४१ इसवींत ठरून दुसरे वर्षी जयसिंग मयत झाला. शिंदे होळकर यांनीं ग्वाल्हेरीस येऊन छावणीस राहून छ ४ जमादिलावल (७ जुलै १७४१) इसन्ने अर्बैन सालीं पुण्यांत आले. बाबूजी नाईक यास पेशवेपद मिळालें नाहीं तेव्हां

त्याचा कर्जाऊ पैसा पेशवे याजकडे येणें होता तो येण्याविषयीं तो फार तगादा करूं लागला. यामुळें पेशवे यास बहुत संकट प्राप्त झालें. तेव्हां महादाजी अंबाजी पुरंदरे पेशवे यांचे दिवाण यांनीं त्या संकटांतून पेशवे यांची मुक्तता केली. यामुळें त्या दिवाणावर अत्यंत प्रीति करूं लागले. रघूजी भोसले यानें चालविलेली खटपट व्यर्थ गेली. सबब तो बाबूजीनाईक यास बरोबर घेऊन कर्नाटकांत प्रतिनिधि श्रीमंतराव व फत्तेसिंग भोसले यांसुद्धां जाऊन सन्न १७४१ चे मार्च महिन्यांत त्रिचनापल्ली मराठ्याच्या हातीं लागली, व चंदासाहेब तेथील धनी कैद करून साताऱ्यास पाठविला आणि मुराररराव घोरपडे यास ठेवून दरसाल वीस हजार रुपये पेशवे यास देत जावे असें ठरलें. बाळाजी बाजीराव पेशवे यांनीं शाहूमहाराजांस आपली गरीबी दाखवून, फिरंगी लोकांकडील साष्टी, वसई वगैरे मुलूख सर केला त्याची सनद करून घेतली, व गुजराथ खरेदी करून नर्मदेच्या उत्तरेकडील मुलुखांतील खंडणी जी द्यावयाची त्याचाही वसूल पेशवे यांनींच करावा अशी सनद महाराजांकडून घेतली. बंगालचा नबाब सुजायतखान यानें आपला हस्तक लाहोर सुभ्यावर अलीवर्दीखान ठेविला. तो सुजायत मयत झाल्यावर त्याचा पुत्र तक्ताधिपति झाला; परंतु त्याची व याची लढाई होऊन तो तक्ताधिपति मरण पावला, सबब अलीवर्दीखान यास तें आधिपत्य प्राप्त झालें. त्यावेळेस उरसा सुभ्यामध्यें पहिले नबाबाचा हस्तक मुशरद कूली ह्मणून होता, त्याचा दिवाण मीर हबीब याशीं अलीवर्दीखानानें युद्ध करून त्यास सुभ्याचे पार घालविलें. पुढें तो कांहीं दिवस कांहीं दिवस गेल्यानंतर त्या अलीवर्दीखानाकडे चाकरीस राहिला. तो बंगाल्यांत मराठे लोकांची सत्ता होण्याच्या कामीं पुढें उपयोगीं पडला. मुशरद कूलीखान यास अलीवर्दीखान यानें मुलुखांतून पार केल्यावर मीर हबीबाचा व वऱ्हाडांत रघूजी भोसले याचा हस्तक भास्करपंत यास कटक सुभा सुटणेविषयीं मसलत करून सल्ला दिला. तेव्हां भास्करपंतानें आपला धनी कर्नाटकांत होता त्याची येण्याची वाट पाहिली. इतक्यांत अलीवर्दीखान लष्करसुद्धां येऊन सुभा घेतला. त्यास मीर हबीबही

जाऊन मिळाला. नंतर कांहीं निमित्त करून भास्करपंत बंगाल्यांत जाण्यास निघाला. बाळाजी बाजीराव पेशवे हिंदुस्थान प्रांत जावले सत्तेंत आणण्याची वाट पाहत होता. यांनीं हिंदुस्थान प्रांतांतील गढा व मेदक किल्ला हस्तगत केला. पुढें बरसात नजीक आली. सबब नर्मदा तीरीं छावणीस शिंदे होळकर यांस ठेवून आपण स्वत: परत निघाला. तो छ ४ जमादिलावल (७ जुलै १७४१) इसने अर्बैन सालीं पुण्यांत दाखल झाला. रामचंद्र हरी पटवर्धन यांची स्वारी इस्तकबिल छ २८ सवाल (६ जानेवारी १७४१) इहिदे अर्बैन तागायत छ २३ रबिलाखर (२६ जून १७४१) इसने अर्बैन.

## सु॥ सल्लास अर्बैन मया व अल्लफ, सून ११५२ फसली, अव्वल साल छ १ रबिलाखर, २५ मे १७४२, ज्येष्ठ शुद्ध ३ शके १६६४.

छ ४ रबिलाखर (२८ मे १७४३) काशीबाई बाजीराव पेशवे याची बायको रामेश्वरयात्रा करून आली. छ ३० जमादिलावल (२२ जुलै १७४२) गोपिकाबाई, नानासाहेब याची स्त्री, प्रसूत होऊन मुलगा झाला, नांव विश्वासराव. पुत्र झाल्याची खबर नानासाहेब यांस स्वारींत कळली. बरसात खलास होतांच माझे साह्यास यावें अशी विनंति अलीवर्दीखान यानें बादशहास व पेशवे यांस पाठविली ह्मणजे पत्रें पाठविलीं. परंतु त्या अलीवर्दीखानानें ती कुमक येण्याचे अगोदर बरसातींतच आपले मुलखांतील आज्ञेंत वागणारे शिपाईलोक जमा करून खटाव्यास भास्करपंतावर चालून जाण्याची तयारी केली. तेव्हां हुगळीची नदी व आजी नदीस पाणी फार असतां होड्यांचे पूल बांधून पलीकडे जात असतां होडींचा पूल तुटून हजार पंधराशें माणसें वाहून गेलीं. तशीच निकड करून रात्रीसच एकाएकीं भास्करपंताचे लष्करावर जाऊन अशी गर्दी केली कीं मराठे लोक लढाई न करितां पळून गेले. नंतर जाधवराव आल्याची खबर कळतांच पुन: मराठे लोक मिदीना परगण्यांत शिरले. परंतु अलीवर्दीखान पाठीशीं

लागला. तेव्हां ते युद्ध न करितां आपले स्वस्थळास परत गेले. ते लोक ठिकाणीं येण्याचे अगोदरच रघोजी भोसला फौजेसहित कर्नाटकांतून वऱ्हाडास पोहोंचला होता. त्यावर भास्करपंताचे मदतीकरितां ज्या वाटेनें भास्करपंत बंगाल्यास गेला त्याच वाटेनें जाऊं लागला. हें वर्तमान दिल्लींत बादशहास कळतांच अयोध्येचा नबाब सफदरजंग यास मराठे लोक आपले मर्यादेबाहेर जाऊं देऊं नयेत अशी आज्ञा केली. याशिवाय या कामास मदतीकरितां पेशवे अनुकुल होण्याकरितां त्यास लिहून पाठविलें कीं, अल्लीवर्दीखानाकडे अजिमबादच्या खंडाबद्दल पैसा येणें त्याबद्दल चौथाई तुह्मांस देऊं व माळवे प्रांताची सनदही देऊं असें पत्र पाठविलें. या आशेनें बाळाजीबाजीराव माळवे प्रांतीं होते त्यांनीं हें पत्र पाहतांच माळवा सोडून मोरशदाबादेस येऊन पोहोंचले. नंतर अल्लीवर्दीखानास आपल्यास बादशहानें दिलेले पैशाबद्दल तगादा लाविला. तेव्हां त्यानें हिशेब करून पैसा देतों असें कबूल केलें. ही पेशवे याची कुमक आल्याची खबर रघोजी भोसले यास कळतांच तो डोंगरांत पळूं लागला. त्याचे मागें अल्लीवर्दीखान लागला. परंतु या लोकांचे हातीं भोसला लागणार नाहीं अशी अटकळ करून बाळाजीबाजीराव पेशवे यानीं लष्करासह दुसऱ्या आड-मार्गानें अल्लीवर्दीखानाचें लष्कर येण्यापूर्वींच रघोजी भोसल्याचा पाठलाग करून साबान महिन्यांत ( अक्टोबर १७४२ ) पहिली लढाई कसबा जावळ येथें झाली. नंतर छ ३० साबान रोजीं (१९ अक्टोबर १७४२) भंडाले परगणा खटाव येथें जी लढाई झाली, त्यांत त्या रघोजीचा अगदीं मोड केला. नंतर रघोजी भोसल्यानें पेशवे याकडे वकील पाठवून बोलणें कळविलें कीं, तुह्मीं राज्यरीतीप्रमाणें जी वर्तणूक करितां ती फार उपयोगी आहे असें आतां मला कळतें. अशी मनाची निर्मळता दाख-विल्यावर पेशवे यांनींही बंगालप्रांत रघोजीकडे ठेवणें बरोबर आहे, असें मनांत आणून रघोजीशीं सल्ला करून भेटून त्यास आपलेबरोबर मोंगलाई-कडे नेलें होतें. पुढें देशीं अर्बा अर्बैन सालीं आल्यावर महाराज साता-रकर यांचे विद्यमानें तह ठरला. याचा प्रकार खालीं लिहिला आहे.

रघोजीचा बंगाल्यांतून पराभव केल्यावर बादशहानें आपल्यास माळव्याचा अधिकार देऊं केला होता तो कायम करण्याकरितां माळव्यांत पेशवे आले. तेव्हां महमदशहा बादशहा यानें विचार केला कीं, येवढा मुलूख दिला ह्मणजे आपली मानहानि होईल. यास्तव लोकांत प्रसिद्ध होण्याकरितां आपला मुलगा अहमदशहा आहे, याचे नांवें सनद करून वहिवाट पेशव्यास सांगावी असें ठरविलें. नंतर माळवा प्रांत देऊन पेशवे यांनीं कोणत्या रीतीनें बादशाहाशीं वागावें असेविषयीं कबुलायत पेशवे याजकडून घेतल्याचे मालकम साहेबाचे बुकांत हकीकत आहे, त्यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें उतारा घेतला आहे. बादशहानीं कृपावंत होऊन नोकर बाळाजीराव व चिमणाजीराव यांस माळवे सुभ्याचें काम सांगितलें. त्यास आह्मी बाळाजीराव व चिमाजीराव खालीं लिहिल्याप्रमाणें नोकरी बजविण्यास तयार आहों. बादशहाचे हुजूरास आह्मांस पदवी प्राप्त होऊन आमची इभ्रत वाढावी असा आमचा अर्ज आहे. आह्मी लिहून देतों कीं, माळवा सोडून जाऊन दुसऱ्या देशावर स्वारी करणार नाहीं व लुटालूट करून देश उद्ध्वस्त करणार नाहीं. कोणी मराठे सरदार नर्मदेच्या पलीकडे उत्तर हिंदुस्थानांतील सुभ्यांत जाणार नाहीं. याची जबाबदारी आह्मी आपले माथ्यावर घेतों. कोणी तरी लायक मराठी सरदार पांचशें स्वारांनिशीं बाशहाच्या हुजुरास चाकरीस हमेशा राहील. या सालीं जो ऐवज आह्मास बादशहानीं इनाम दिला तो आह्मीं ग्रहण करितों; परंतु पुढें आह्मीं बादशाही दरबारांतून छदाम मागणार नाहीं. बादशाही दरबार पृथ्वीचा मध्य आहे. आह्मीं आपल्या कामांत बादशाहाचे सेवेंत हमेषा तत्पर राहूं. जेव्हां जेव्हां सरकारचें गाजी सैन्य बाहेर निघेल तेव्हां तेव्हां चार हजार स्वारांची टोळी त्या लष्कराबरोबर आह्मीं पाठवून देऊं; परंतु जर जास्ती लोकांचे जरूर असेल तर हुजुराहून त्याचा खर्च मिळावा. चमला नदीचे पलीकडील जमीनदारांपासून ठरलेल्या पेशकश खेरीज एक छदाम आह्मीं जास्ती घेणार नाहीं. चमला नदीच्या पलीकडील मुलुखांत कोणा एखाद्या लहानसान जमीनदाराचें शासन केल्यास हुजूर फर्मावतील तर आह्मी चार हजार स्वार तिकडे

पाठवूं. हें लष्कर तें काम तडीस नेण्यास हरप्रकारया नेतील. किल्लेदार लोकांच्या जहागिरी, कोट, गांव, मुत्फीक यांचे हक्क, इनाम व जमिनी व पेशकश व धर्मादाय वगैरे हुजूरच्या देणग्यामध्यें आह्मी व्यत्यय आणणार नाहीं. ज्या ज्यास त्या दिल्या आहेत त्यांनीं त्यांनीं उपभोगून बादशहाशीं हमेषा बढती व्हावी या हेतूनें दुवा देत असावें, ह्मणून त्या आह्मी चालवूं. येणेंप्रमाणें पेशवे यांनीं बादशहाशीं कबुलात लिहून देऊन पुढें पेशवे यांच्या स्वाऱ्यापासून कांहीं एक उपसर्ग होणार नाहीं अशी खातर तसली करण्यासाठीं मराठ्या सरदारांनीं खालीं लिहिल्याप्रमाणें कबुलात महमदशाहा बादशाहास लिहून दिली. आह्मी राणोजीसिंग, मल्हारजी होळकर, यशवंतराव पवार आणि पिलाजी जाधव स्वदस्तूर लिहून देतों कीं:—बाळाजीराव मुख्य प्रधान यांनीं बादशाहाची नोकरी करणें कबूल केली आहे. त्यास जर तो यापुढें चाकरी करण्यास मागें पुढें पाहील तर आह्मीं त्यास दोन गोष्टी सांगून तसें करूं देणार नाहीं. आणि आह्मीं सांगितलें असतां जर बाळाजीराव चाकरी न करण्याचा हट्ट करील तर आह्मीं सारे पंडितप्रधान याची चाकरी सोडूं. दाखल्यांभावी हा दस्ताऐवज लिहून दिला असे. हा दस्ताऐवज सन १७४३ त छ ७ रबिलावल (२१ एप्रिल १७४३) बादशाही कारकीर्दीच्या विसावे वर्षीं ह्मणजे सन २४ जुलूस सालीं लिहून दिला. याप्रमाणें पेशव्यांची कबुलात झाल्यावर दिल्लीबादशाहा महमदशाहा यांनीं आपले पुत्र अहमदशाहा याचे नांवाच्या सनदा व परवाने शिरस्तेप्रमाणें छ २२ जमादिलावलचा (४ जुलै १७४३) व दुसरी सनद छ १८ रजबची (२८ आगस्ट १७४३) याप्रमाणें दोन पेशवे यास दिल्या, अर्जा अर्बैनात. बादशाहाकडून सनदा पदरीं पडेतोंपर्यंत या सालांत पेशवे यांनीं हिंदुस्थानांत असतां व पुण्यास दादासाहेब वगैरे यांनीं काय काय कामें केलीं तीं खालीं दाखविलीं आहेत. छ ८ रमजान (२६ अक्टोबर १७४२) महिन्यांत गढे मंडळावर लढाई झाली, व छ १ सवालरोजीं (१८ नोव्हेंबर १७४२) गढे मंडळ फत्ते झालें. छ ९ सवाल उंडेऱ्याचे (२६ नोव्हेंबर १७४२) अहीर

याशी लढाई होऊन मोर्चे लाविले. छ २२ सवाल (९ डिसेंबर १७४२] झाशी घेतल्याची खबर आली. छ ३ जिलकाद [ २० डिसेंबर १७४२] भाऊसाहेब व दादासाहेब जनार्दनपंतसुद्धां नाशिकास गंगास्नानास गेले. नानासाहेब हिंदुस्थानांत असतां छ ११ जिल्हेज रोजीं ( २७ जानेवारी १७४३ ) प्रयागास यात्रेकरितां आले. छ २४ जिल्हेज ( ९ फेब्रूवारी १७४३ ) रामपुरा काशी दक्षिणतीरास मुक्काम केला. तेव्हां श्रीमंतांच्या मनांत काशीक्षेत्र हस्तगत करावें ह्मणून आल्यावर स्वारीच्या ढाला काशीकडे फिरविल्या. त्यासमयीं काशींत सफदरजंग अधिकारी होता, त्यास ही गोष्ट कळली. तेव्हां त्यांनीं घाबरून सर्व काशी क्षेत्रांतील नारायण दीक्षित पाटणकर आदि शिष्ट ब्राह्मण जमा करून आणून त्यांस सांगितलें कीं, तुमचे ब्राह्मण राजे यांनीं काशी घ्यावयाचा बेत केला, याप्रमाणें ढाल उभी करून हिकडे येतात, त्यांस माघारें फिरवावें, नाहींतर तुह्मां सर्वांस मुसलमान करीन. अशी जरब देतांच सर्व ब्राह्मणांनीं भिऊन त्यास सांगितलें कीं, आह्मीं माघारें फिरवितों. असें बोलून दीक्षित आदिकरून चारशें ब्राह्मण उघडे बोडके काशीबाहेर श्रीमंत ज्या ठिकाणीं उतरले होते त्या ठिकाणीं रात्रीस चार घटिका रात्र झाली त्यावेळेस पोहोंचले. ब्राह्मणसमुदाय पाहून श्रीमंत डेऱ्याबाहेर येऊन उभें राहून दीक्षित पाटणकर यांस पाहून बोलले कीं उघडे बोडके कां आला? तेव्हां झालेला मजकूर श्रीमंतांस कळवून ब्राह्मण राखावयाचे असल्यास आपण माघारे फिरावें हें चांगलें आहे. हा मजकूर श्रीमंतानीं ऐकून इतक्यां ब्राह्मणांस आह्मांकरितां दु:ख होतें तर आह्मांस या गोष्टीची जरूर नाहीं. तेव्हां ब्राह्मणांनीं आपण माघारे फिरावें असें सांगितलें. नंतर श्रीमंत बोलले कीं आह्मांस गंगास्नान करावयाचें आहे तें कसें घडेल? हें ऐकून दीक्षित बोलले, आमचे मेळ्यांत आपण चलावें, आपल्यास स्नान घालून परत पाठवितों. त्यावरून श्रीमंत एकटेच त्या ब्राह्मणांबरोबर काशींत जाऊन स्नान करून माघारे उलटले. हा मजकूर सफदरजंग यानें ऐकिल्यावर त्याचा सन्मान झाला नाहीं ही आमची चूक झाली असें बोलले. श्रीमंत काशीहून गयेस चालते झाले. छ १०

मोहरमीं (२४ फेब्रूवारी १७४३) गयेस जाऊन गयावर्जन केलें. त्यावेळेस बरोबर पिलाजी जाधवराव, महादाजी अंबाजी पुरंदरे व बाजी भिवराव चावेरीकर व रघोजी भोसले होते. छ १४ सफर रोजीं (३० मार्च १७४३) मुस्ताफाखान याची भेट झाली व छ १५ सफरीं (३१ मार्च १७४३) सौराज्य प्रांतांत मक्षुकाबादेस मुक्काम झाला तेथें अला-बकस याची भेट झाली. छ २३ सफर (८ एप्रिल १७४३) मौजे पलटी यापैकीं मनोर येथें अलीवर्दीखान भेटीस आले होते. छ २९ रबिलावल (१३ मे १७४३) अखेरसाल सातार्‍यास जाऊन छ १८ जमादिलावल (३० जून १७४३) अर्बा अर्बैन सालीं परत आले. महाराजांची प्रकृति बिघडली होती, सबब खुद्द पेशवे यावेळेस पुण्यास नव्हते. भाऊसाहेब गेले असावे. संभाजी आंग्रे मयत झाले.

### सुरुसन्न अर्बा अर्बैन मया व अलुफ, सन ११५३ फसली, अव्वल साल छ ११ रबिलाखर, २५ मे १७४३, ज्येष्ठ शुद्ध १३ शके १६६५.

छ ३ जमादिलाखर (१४ जुलै १७४३) बर्‍हाणपूरकर सुभेदार नासरुद्दौला मयत झाला. छ १ रज्जब रोजीं (११ आगष्ट १७४३) नानासाहेब व भाऊसाहेब यांची स्वारी सातार्‍यास गेली. बरोबर महादाजी अंबाजी पुरंधरे होते. छ २१ रज्जब (३१ आगष्ट १७४३) श्रीमंत मोरेश्वरास गेले. छ ४ साबान (३१ आगष्ट १७४४) खमस अर्बैन सालीं परत आले. नाना फडणीस यांचा जन्म झाला, आई रख-माबाई, चित्रा नक्षत्र, माघ वद्य १४, शुक्रवारीं, (११ फेब्रूवारी १७४२) वृद्धियोग, बवकरण, अकरा घटका रात्रीस. भाऊसाहेब गंगथडीस जाऊन आले. भोसले व पेशवे यांचा तह महाराज यांचे विद्यमानें झाला. तो असा कीं, पेशवे आपला पूर्वीचा संपादित जो मोकासा व आपण मिळविलेली जहागिरी आणि पूर्वार्जित ज्या जहागिरी व कोंकण आणि माळवा यांचें अधिपत्य, याशिवाय अमदाबाद व आंग्रे अजमीर यांची खंडणी आणि पाटणा प्रांतांतील तीन तालुके व अर्काट

परगण्यांतील जमेपैकीं वीस हजार रुपये यांखेरीज रघोजीचे सत्तेंतील कितीएक गांव हे सर्व पेशवे यानीं अनुभवावे, अशी राजानें सनद दिली. व रघोजीस सनद दिली कीं, लखनौ व पाटणा व पैनबंगाला याचा वसूल खंडणी त्यानें घ्यावी व याखेरीज वऱ्हाडपासून कटकपर्यंत खंडणी जमा करावयाचें काम रघोजी भोसले यानें करावें. याप्रमाणें राजानें उभयतांस सनदा दिल्या. त्या वेळेस असें ठरलें कीं, दमाजी गायकवाड यानें माळव्यांतील खंड घेतल्याचा हिशेब पेशव्यांस दाखवून तो ऐवज त्यांचे हवालीं करावा. असेंच दाभाडे याजकडेही राजाचे देणें होतें; परंतु त्यावेंळेस ती चौकशी झाली नाहीं. मोमीनखान गुजराथचा सुभा मेला. त्या जागेवर अबदुल अजीमखान होता. त्यास गायकवाड याजकडील लोकांनीं नाहींसें केलें. पुढें फकीरउद्दौला सुभा झाला. यासालीं बारामती महाल बाबूजी नाईक बारामतीकर यास शाहू महाराज यांनीं दिला. इहिदे अशरीन मयातैन व अल्लफपर्यंत होता, पुढें जप्त झाला, बाजीराव याचे अमलांत. जनार्दनपंत यांचें लग्न वैशाख वद्य ९ रोजीं ( २० एप्रिल १७४४ ) झालें, रामाजी नाईक भिडे यांची कन्या, नांव सगुणाबाई. त्रिंगलवाडी किल्ला कर्णाजी शिंदे यांनीं फत्ते केला, हें वर्तमान आलें. निजामउलमुलूख याचे पुत्रानें बंड केलें तें मोडावयाकरितां दिल्लीहून निजाम औरंगाबादेस गेला. तेथें युद्धप्रसंग न पडतां पुत्र स्वाधीन करून घेतला. तेव्हां निजामानें विचार केला कीं, कृष्णेच्या दक्षिणेस मोंगलाईचे मुलुखीं अव्यवस्था असून शिवाय अर्काटचा नबाब सफदरअल्ली यास त्याचा मेहुणा मोर्तिजाखान यानें मारलें. सबब यासमयीं आपलें आधिपत्य स्थापावयास ही संधि बरी आहे. ह्मणजे त्यानें हैदराबादेहून लष्कर जमा करून कर्नाटकांत चालला. तेथें कितीएक मुलूख घेऊन एक वर्षानंतर त्यानें मराठे लोक सातान्यास फौज जमा करितात, ह्मणून त्यास शंका उत्पन्न होऊन तो माघारा फिरून हैदराबादेस चालला. तेसमयीं आपला हस्तक अनवरउद्दीन याजला कर्नाटकांतच घांटीं ठेविला व आपला नातू हिदायत मोहीदीन उर्फ मुजफरजंग यास अदवानी परगणा देऊन त्यानें विजापुरास

रहावें असें केलें; आणि हैदराबादेच्या वाटेनें जात असतां आपल्यावर मराठ्यांची मसलत नाहीं असें समजून आपल्या राज्याचा बंदोबस्त करीत तेथेंच राहिला. तेव्हां निजाम दूर गेला असें पाहून मराठे यांचे मनांत आपला स्वार्थ साधावा असें आलें; परंतु रघोजी भोंसला यानें आपले सत्तेंतील बंगाल्यासंबंधीं मुलूख गेला तो परत घेण्याचें योजिलें. यामुळें तो मराठ्यांचा बेत सिद्धीस गेला नाहीं. पेशवे यास दुसरी शंका उत्पन्न झाली कीं, आपण कबूल केल्याप्रमाणें रघोजी भोंसले याचें निवारण झालें ह्मणजे बादशाहाचा दोष आपल्याघर येईल. याजकरितां दक्षिणेंत कामें बहुत आहेत असें मिष करून उत्तरेकडे गेला नाहीं.

## सु॥ खमस अर्बैन मया व अलफ, सन ११५४ फसली, अव्वल साल छ २२ रबिलाखर, २४ मे १७४४, ज्येष्ठ वद्य ९ शके १६६६.

छ १ रमजान (२७ सप्टेंबर १७४४) चावड किल्ला फत्ते झाल्याचें वर्तमान आलें. छ २९ सवाल (१९ नोव्हेंबर १७४४) हसडर किल्ला घेतल्याचें वर्तमान आलें. छ २६ सवाल (२० नोव्हेंबर १७४४) नानासाहेब व भाऊसाहेब व जनार्दनपंतमुद्धां स्वारीस निघाले. नानासाहेब हिंदुस्थानांत चालते झाले. भाऊसाहेब व जनार्दनपंत नाशिकाहून माहुलीस गेले. छ ९ मोहरम (२८ जानेवारी १७४९) बहिरवगड उर्फ खापऱ्या किल्ला घेतल्याची खबर आली. छ १८ मोहरम (१० फेब्रूवारी १७४९) भेलशास मोर्चे लाविले. छ २९ मोहरम (१७ फेब्रूवारी १७४९) गोपिकाबाई प्रसूत झाली. छ २९ मोहरम माघ वद्य ११।१२ मंदवार ११ घटिका दिवसास माधवराव याचा जन्म मकरराशीं होता. सफर महिन्यांत (मार्च १७४९) भेलशावर लढाई झाली. किल्ला घेतला. छ २९ सफर (२२ मार्च १७४९) वि॥ पिलाजी जाधवराव, भूपाळचा दोस्त महमद याचा नातू फैज महमद याशीं तह होऊन निम्मे वांटणीचे पेशवे याजकडे महाल आले ते:— १ भेलसे, २ इच्छावर, ३ अष्टे, ४ सुजानपूर, ५ उदेपूर, ६ ताल,

७--११ जमोवार पंचमहाल, १२ शिकारखम, १३ ओडा, १४ वरशा, १५ उरया, ०॥० सिवणी निमे, असे साडेपंधरा महाल किल्ले वगैरेसुद्धां आले. दोस्त महमद यास फैज महमद व यसीत महमद व हियत महमद असे तिघे नातू होते. रबिलाखर महिन्यांत वैशाख शु॥ ४ बुधवारीं ( ८ मे १७४५ ) बयाबाई भाऊसाहेब यांची कन्या इचें लग्न झालें. गंगाधर नाईक ओमकर यास दिली. छ २८ रबिलाखर ( २० मे १७४५ ) भाऊसाहेब सातान्यास गेले. छ १७ रबिलावल ( ९ एप्रिल १७४५ ) नानासाहेब यांनीं भेसलें घेतल्याची खबर भाऊसाहेब यास आली. छ २८ रबिलावल रोजीं [ २० एप्रिल १७४५ ] नानासाहेब स्वारी करून परत आले. अंजनवेल उर्फ गोपाळगड शामळ जंजीरकर याजपासून माघ शु॥ २ भौमवारीं [ २३ जानेवारी १७४५ ] रात्रौ तुळाजी आंग्रे यांनीं घेतला. नंतर तुळाजी बिन कान्होजीराव यास सरखेलीचीं वस्त्रें दिलीं. रघोजी भोसले सालमजकूर अव्वल सालीं बरसातीकरितां वऱ्हाडास जाऊन पर्जन्य समाप्त झाल्यावर आपला प्रधान भास्करपंतास व त्याचे बरोबरचे मानकरी वगैरे फौज वीस हजार देऊन बंगाल देशांत ओरिसा प्रांतांत पाठविलें. तेथें अल्लीवर्दीखान यानें कपटाशिवाय आपलें कार्य साधावयाचें नाहीं हें जाणून तुमचा आमचा तह आहे असें बोलून भास्करपंतास व त्याचे बरोबरचे मोठमोठे सरदार वीस असामी मेजवानीस बोलावून नेऊन एकाएकीं मारेकरी घालून ते सर्व मारून टाकिले. बाकी राहिले लोक युद्ध न करितां माघारे जाऊं लागले. त्यांतील कित्येक लोक निराळे सांपडले तेही गांवकरी यांनीं मारून टाकिले. यासमयीं कार्य सिद्धीस गेलें नाहीं. सबब मराठे लोक आपला समय येण्याची वाट पहात बसले. पुढें थोडे वेळानें अल्लीवर्दीखानाचे लष्करांत अफगाण लोक होते ते कांहीं दंगा करूं लागले. त्यांचे बंदोबस्ताकरितां आपण फौज घेऊन जाऊन उरुष प्रांतीं हिंदू अधिकारी ठेविले. ही बातमी रघोजी भोसल्यास जासुदांनीं कळवितांच त्यानें ओरिसा प्रांतीं स्वारी घालून, कित्येक परगणे घेऊन, बाकी मुलुखाची खंडणी तीस कोट रुपये मागूं लागला. तेव्हां अल्लीवर्दीखानानें त्यास

युक्तीनें भुलथाप देत देत कित्येक दिवस घालविले. नंतर अफगाण लोक स्वाधीन करून घेतल्यानंतर उलट्या गोष्टी सांगून अलीवर्दीखान युद्धास सिद्ध झाला. पुढें युद्ध होतां होतां मराठे लोकांचा मोड होऊन युद्ध राहिलें. कारण रघोजीस आपल्या मुलखांत जाण्याचें जरूर कारण लागलें, तें खालीं लिहिलें आहे. देवगडचा गोंडवणांतील तक्ताधिपति मेल्यानंतर राजपुत्र भांडूं लागले. ह्यांतील वलीशा ह्मणून होता त्यानें आपले दोघे भाऊ कैदेंत ठेविले होते. दुसरा चांदाचा राजा नीलकंठशाहा होता, त्यास आपण सामील होऊन मराठ्यांस चौथाई व सरदेशमुखी न द्यावी अशी हरकत घातली होती. त्याचा शेवट असा झाला कीं रघूजी भोसल्यानें त्या उभयतांचा मुलुख घेतला. तेव्हां वलीशानें दोघे भाऊ कैदेंत ठेविले होते, त्यांपैकीं एकास रतनपूर दिलें. याशिवाय खजिन्यांतून कांहीं पैसा देण्याचें कबूल केलें. तें आजपर्यंत कांहीं मिळत होतें. दुसरा भाऊ अकबरशाः ह्मणून होता तो निजामच्या आश्रयानें कांहीं वर्षें होता. पुढें तो मयत झाला.

## सु॥ सीत अर्बैन मया व अलुफ, सन ११५५ फसली, अव्वल साल छ ४ जमादिलावल, २५ मे १७४५, ज्येष्ठ शुद्ध ६ शके १६६७.

छ १० जमादिलावल ( ३१ मे १७४५ ) भाऊसाहेब सालगुदस्ता छ २८ रबिलाखरीं ( ३० मे १७४४ ) साताऱ्यास गेलेले आजरोजीं पुण्यास परत आले. राणोजी शिंदे सुजहालपुराजवळ राणीगंज नांवाचें खेडें आहे, त्या ठिकाणीं मयत होऊन दहन झालें. दुखोटा छ २९ जमादिलाखर रोजीं [ १९ जुलै १७४५ ] बायकोस व पुत्रास श्रीगोंदें मुक्कामीं पाठविलें. बायकोचें नांव मीनाबाई होतें. मलकामचे बुकांत नमूद आहे. छ १३ रज्जब [ २१ जुलै १७४६ ] नानासाहेब व बापूजी भिवराव सुभा भेलशाची स्वारी करून पुण्यास परत आले. छ १८ रज्जब [ १९ जुलै १७४६ ] धर्मादाय देणें बजरबट्ट,

बैरागी, अष्टमीचे उत्साहाबद्दल सालमजकुरीं मात्र दिलें. दरसाल न द्यावें. मोईन नव्हे. याप्रमाणें झालें. छ ८ रमजान आश्विन शुद्ध दशमीस [ १३ सप्टेंबर १७४६ ] स्वारीस साताऱ्यास निघाले. छ २९ सवाल [ ३ नोव्हेंबर १७४६ ] मार्गशीर्ष मासीं खंडेराव जाधव मयत झाले.

## सु॥ सब्बा अर्बैन मया व अल्लफ, सन ११५६ फसली, अव्वलसाल छ १९ जमादिलावल, २९ मे १७४६, ज्येष्ठ वद्य २ शके १६६८.

छ २९ जमादिलावल [ ४ जून १७४६ ] अव्वल साल जैतपूर घेतल्याचें वर्तमान साताऱ्यास आलें. छ २१ जिल्काद [ २४ नोव्हेंबर १७४६ ] मार्गशीर्षमास भाऊसाहेब यांस मुलगा झाला. छ ३ जिल्हेज [ ९ डिसेंबर १७४६ ] भाऊसाहेब साताऱ्याहून स्वारीस निघाले. कर्नाटक प्रांतास सखारामबापू बरोबर होते. छ ३ जिल्हेज [ ९ डिसेंबर १७४६ ] रतनगड फत्ते झाल्याचें वर्तमान आलें. मोहरम महिन्यांत [ जानेवारी १७४७ ] अडर आजरें येथें लढाई झाली तींत' भाऊसाहेब मायनहळ्ळीं बिदनपूर येथें लढाई झाली रबिलावल [ मार्च १७४७ महिन्यांत ] याच मुक्कामीं मुरारराव घोरपडे यांची भेट झाली. छ २९ रबिलावल रोजीं [ ३० मार्च १७४७ ] बहादूरबिंडा किल्ला घेऊन स्वारी परत निघाली. छ १३ रबिलाखर [ १३ एप्रिल १७४७ ] श्रीमंत नानासाहेब यांनीं निरोपाचीं वस्त्रें घेतलीं. नंतर पंढरपुरास गेले. तेथून परत येतांना, जेजोरीनजीक भाऊसाहेब कर्नाटकांतून आले, त्यांची भेट झाली. दोन्ही स्वाऱ्या एकत्र होऊन छ २४ जमादिलावल रोजीं [ २४ मे १७४७ ] पुण्यास आले, सखाराम भगवंतसुद्धां श्रीनिवास परशराम उर्फ श्रीपतराव प्रतिनिधि मार्गशीर्ष वद्य ८ रोजीं शांत झाले. स्त्री राधाबाई माहुलीस सहगमन गेली. श्रीनिवासराव यास पुत्र नाहीं. सबब जगजीवन परशराम यास प्रतिनिधि पदाचीं वस्त्रें दिलीं. यमाजी शिवदेव यास मुतालिकीचीं वस्त्रें दिलीं. छ १४ जिल्हेज पौष वद्य १.

## सु॥ समान अर्बैन मया व अलफ, सन ११५७ फसली, अव्वल साल छ २५ जमादिलावल, २५ मे १७४७, वैशाख वद्य १३ शके १६६९.

छ १० रमजान (९ सप्टेंबर १७४७) स्वारी सिद्धटेंकास जाऊन आजरोजीं निंबाळकर यास भेटून परत आले. छ १७ सवाल (११ अक्टोबर १७४७) किल्ला घेतल्याचें वर्तमान आलें, होळकर याजकडून. छ १ जिलकाद (२५ अक्टोबर १७४७) नारो अपाजी खिरे यास पुणें मुक्कामीं सुभ्याची दिवाणगिरी सांगितली. छ १ जिलकाद (२५ अक्टोबर १७४७) शिंदे होळकर यास हिंदुस्थानांत जाण्याची परवानगी झाली. छ ६ जिलकाद [३० अक्टोबर १७४७] किल्ले हरिश्चंद्र फत्ते झाल्याचें वर्तमान आलें. छ २४ जिलकाद [१७ नोव्हेंबर १७४७] पर्वती येथील महादेव रुप्याचा वजन ६७३४॥ व गणपति ६८६॥=~ पार्वती वजन १२४५५ येणेंप्रमाणें मूर्ति तयार झाल्या. छ १८ जिल्हेज [१० डिसेंबर १७४७] स्वारीस निघाले ते मौजे पिंपरखेडें परगणे छ ४ सफर रोजीं (२४ जानेवारी १७४८) गेले. तेथून श्रीमंत हिंदुस्थानांत गेले. भाऊसाहेब यांची प्रकृति बिघडली. सबब दादासाहेबसुद्धां परत पुण्यास आले. श्रीमंत गुजराथेंतून नेवळीचे स्वारीस गेले. छ १८ जमादिलावल (६ मे १७४८) माधवसिंग सवाई जयसिंगाचा पुत्र मौजे बागथडी, प्रा॥ ताडर, पा॥ जयनगर येथें श्रीमंताच्या भेटीस आला. भेट झाली. त्याचे डेऱ्यास गेले होते. मुलूख देऊन रवाना केलें. आणि माघारे उलटून अखेर सालीं उज्जनीवर आले. छ २ जमादिलाखर (१९ मे १७४८) माणिकगड घेतल्याची खबर आली. छ १ रज्जब थेउरास (१७ जून १७४८) परत आले. छ २ रज्जब (१८ जून १७४८) भाऊसाहेब यांचे पुत्राचें बारसें झालें. छ ९ जमादिलाखर [२६ मे १७४८] भिऊबाई बारामतीकर यांचे घरीं अबाजी नाईक यास दिली होती ती मयत झाली. बाळाजी विश्वनाथ याची मुलगी

इचीच बहीण अनुबाई इचलकरंजीकर यांचे घरीं व्यंकटराव नारायण घोरपडे यास दिली होती. पागा मुक्काम कवडी येथें नवा बाण स्थापन केला, छ २ रबिलाखर [२१ मार्च १७४८]. खासा स्वारी देहेर व खानदेशपर्यंत गेली. तों नासरजंग व कारभारी रामदासपंत चालून आले व लढाई झाली. नंतर अशीउंबरीवर फाल्गुन मासीं [मार्च १७४८] तह होऊन पुढें हिंदुस्थानास गेले. खासा व बाबा यांचे कारभारांत पेंच पडूं लागले. भाऊसाहेब लहान असतां कारभार करूं लागले. अहमदशा अबदली इराणी बादशाहानें दिल्लीवर स्वारी केली तेव्हां दिल्ली बादशाहा महमदशाहा यानें आपला पुत्र अमदशा यास पाठविलें. त्यानें याचा पराभव करून काबुलापर्यंत मागें हटविलें. नंतर तो दिल्लीस माघारा येत असतां याचा बाप महमदशाहा मयत झाला होता. मग त्याचे जागीं या अहमदशाहाची स्थापना सन १७४८ एप्रिल महिन्यांत झाली. त्यावेळेस निजामउल्मुलूख यास वजीर होण्याविषयीं बहुत आग्रह केला. परंतु यानें वृद्धापकाळामुळें तें काम करण्याचें कबूल केलें नाहीं. तेव्हां तें वजिराचें काम अहमदशाहा बादशाहानें सफदरजंग औंदचा नबाब यास दिलें. निजामउल्मुलूख तारीख २९ जून सन १७४८ रोजीं बऱ्हाणपुरास मयत झाला. या वेळेस याचें वय १०४ वर्षांचें होतें.

## सु॥ तिसा अर्बैन मया व अल्लफ सन ११५८ फसली, अवल साल छ ७ जमादिलाखर, २४ मे १७४८, ज्येष्ठ शुद्ध ८ शके १६७०.

छ २३ रज्जब (९ जुलै १७४८) श्रीमंत नानासाहेब जनार्दनपंतसुद्धां नेवाईची स्वारी करून पुण्यास परत आले. भाऊसाहेब यास पुत्र झाला, छ १९ साबान (३० जुलै १७४८). छ २९ साबान (१३ आगष्ट १७४८) नानासाहेब यांस यशवंतराव ह्मणून पुत्र झाला होता. छ ११ रमजान रोजीं (२९ आगष्ट १७४८) सातान्यास जाऊन छ १ सवाल रोजीं (१४ सप्टेंबर १७४८) परत पुण्यास

आले. छ ३ साबान ( १८ जुलै १७४८ ] गडगडा किल्ला शंकराजी केशव हसबनीस यांनीं घेतल्याचें समजलें. छ १० साबान [ २९ जुलै १७४८ ) हरिश्चंद्रगड कर्णाजी शिंदे यांनीं फत्ते केला. सबब सोन्याचें कडें बक्षीस दिलें. छ ७ जिल्हेज रोजीं ( १८ नोव्हेंबर १७४८ ) स्वारीस निघाले व छ १० रोजीं ( २१ नोव्हेंबर १७४८ ) परत आले. थेउरास जाऊन कल्पलतादान देऊन. छ २४ मोहरम ( ३ जानेवारी १७४९ ) नानासाहेब साताऱ्यास जाऊन लागलीच छ ११ रबिलावल रोजीं ( १८ फेब्रूवारी १७४९ ) परत आले. मुंजीचे आमंत्रणाकरितां गेले असावे. छ ५ सफर ( १४ जानेवारी १७४९ ) समशेर बहादर याची मागणी घातली, लक्षधीर दौलतराव, संस्थान पेंठ, व पुढें जमादिलावल महिन्यांत लग्न झालें. छ ११ सफर ( २० जानेवारी १७४९) नानासाहेब व भाऊसाहेब व जनार्दनपंत स्वारीस निघाले व छ ९ रबिलावलीं ( १६ फेब्रूवारी १७४९ ) परत आले. छ ३० रबिलावल. ( ९ मार्च १७४९ ) विश्वासराव यांची मुंज झाली. छ २९ रबिलाखर ( ७ एप्रिल १७४९ ) जयाजी शिंदे व मल्हारजी होळकर यांजकडून करेरा घेतल्याची व दतियाशीं पण केल्याची खबर आली. छ २४ जमादिलावल ( १ मे १७४९ ) देवदेवेश्वर पर्वती याची स्थापना झाली. पर्वताई भवानी पूर्वींचीच पाषाणाची स्थापिली. गणपति व महादेव रुप्याचा व पार्वती सोन्याची व बाण देवदेवेश्वर छ २९ रबिलाखर ( ७ एप्रिल १७४९ ) छ ६ जमादिलावल ( ६ मे १७४९ ) पर्यंत वैशाखमासीं स्थापना झाली. शाहू महाराज यांची धाकटी बायको अजारी होती, तिजला महाराजांनीं घेऊन जेजुरीस आले. तेथें या सालीं निवर्तली. दहन माहुलीस नेऊन केलें. श्रीपतराव व केदार हत्ती मेला. चित्त उदास झालें. वृद्धापकाळीं पोटीं संतान नाहीं. काळविपर्यास आला, ह्मणून वनवास करावा या हेतूनें सातारा व माहुलीचे दरम्यान वाडी होती तेथें राहिले होते. त्या वाडीचें नांव वनवासवाडी पडलें. निजामउल्मुलूख बऱ्हाणपुरीं मयत झाले. यास या वेळेस पुत्र होते तेः—१ गाजुदीनखान, २ नासरजंग, ३ सलाबतजंग, ४ निजाम-

अली, ५ महमदसरीफ, ६ मोगलअली. यांत प्रथम दोघे एक आईचे. दुसरे चार यांच्या आया निरनिराळ्या होत्या. निजामउल्मुलूख मरण पावला तेव्हां गाजुदीन दिल्लीस होता, ह्मणून दुसरा पुत्र नासिरजंग तोच तक्ताधिपत्य करूं लागला. यानंतर दोन तीन महिन्यांनीं दिल्लीबादशाहानें नासिरजंगास भेटीस बोलाविलें. याप्रमाणें निघून नर्मदेपर्यंत गेला तोंच न येण्याविषयीं पुनः पत्र आलें. तत्राप तो उदासचित्त न होतां त्याचा पुतण्या मुजफरजंग याचे व चंदासाहेब याच्या साह्यानें व फ्रान्सिकोच्या आश्रयानें दंगा करीत होता हें वर्तमान व दुसरें वर्तमान आणखीं कळलें कीं निजामउल्मुलुखानें आपला हस्तक अनवरुद्दीन कर्नाटकांत पैन घांटीं ठेविला होता तो मेला. नंतर नासरजंगानें रघोजी भोसल्यास पत्र पाठविलें कीं, माझ्या साह्यास आला तर मी कांहीं मुलूख देईन. याखेरीज जे मागील संबंधी लोक होते त्यांसही मी तिकडे येतों, तुह्मीं मला मिळावें. तेव्हां तो कर्नाटकांत चालला. तेव्हां ते लोक त्यास मिळाले. त्यांत मुरारराव घोरपडा असे. त्यास निजामउल्मुलुखानें गुत्तीची जहागीर दिली होती. ह्मणून त्यास जाणें अवश्य झालें. दुसरा महीदपूरचा राजा व कितीएक नबाब व अनवरउद्दीन याचा दुसरा पुत्र महमदअली असे सर्व स्वतः किंवा लष्कर पाठवून साह्य करीत असत. महमदअलीचे स्नेहास्तव मद्रासचे इंग्लिश लोकही नासिरजंगाचे उपयोगीं पडले. मोरोबादादा फडणीस याचें लग्न झालें. आईचें नांव पार्वतीबाई, बाबूराव फडणवीस याची बायको.

### सु॥ खमसैन मया व अल्लफ, सन ११५९ फसली, अव्वल साल छ १९ जवादिलाखर, ३१ मे १७४९, ज्येष्ठ वद्य ५ शके १६७१.

छ ९ साबान रोजीं ( १३ जुलै १७४९ ) स्वारी पेशवे यांची सासवडास गेली ती रमजानांत ( आगष्ट १७४९ ) परत आली. सातान्यास शाहू महाराजांची प्रकृति फार बिघडली. तेव्हां जवळ मंडळी होती त्यांनीं मसलत केली कीं, राजानें दत्तक पुत्र घ्यावा. परंतु शाहू

महाराज यांची प्रकृति अलीकडे कांहीं दिवस भ्रांतासारिखी झाली होती. त्यापूर्वीं प्रकृति साफ असतां राजाचे दोन पुत्र दोन तीन वर्षांचे होऊन वारले. वृद्धापकाळ सबब तेच वेळेस असा विचार ठरला कीं, कोल्हापुरास संभाजीस पुत्र झाला तर तो मी दत्तक घेईन. संभाजीस संततीच झाली नाहीं. तेव्हां मालोजीचा बंधू, शाहाजीचा चुलता, विठोजी होता, त्याचा वंशज घ्यावा, तर त्याचाही शोध लागेना. तेव्हां शाहू महाराज यांनीं महादाजी अंबाजी पुरंदरे, गोविंदराव चिटणीस यांस सांगितलें कीं ताराबाई साताऱ्यास आहे. तिनें आपला नातू, शिवाजीचा पुत्र, शिवाजीचे मरणानंतर जन्मला, त्यास ताराबाईनें कोठें लपवून ठेविला आहे त्याचा शोध आणावा. मग ताराबाईस विचारितां त्यांनीं सांगितलें कीं, शिवाजी मेला, तेव्हां त्याची बायको भवानीबाई गरोदर होती, तिला पुत्र झाला, तो रामराजाच्या भीतीस्तव त्या मुलास पन्हाळ्यावरून काढून गुप्तपणें त्याचे मावशीचे घरीं ठेविलें, तिनें बारशीस नेला, तो अप्रसिद्धपणें तेथें आहे, असें सांगितलें. हें वर्तमान सकवारबाईस कळतांच ताराबाईचा नातू निघाला तो खोटा आहे अशी मसलत केली. यास प्रातिनिधि व त्याचा मुतालीक व दमाजी गायकवाड यास अनकूल करून घेऊन घांटमाथ्यास व कोंकणांत शिबंदी ठेवण्यास कारभारी पाठविलें. याप्रमाणें आपला बेत सिद्धीस जाण्याकरितां याची प्रसिद्धि लोकांत न व्हावी ह्मणून नित्य बोलत असे कीं, मी आपल्या भ्रताराबरोबर सती जाईन. हा मनसोबा पेशवे यांनीं जाणून छ १८ रमजान रोजीं ( २१ आगस्ट १७४९ ) आपण व जनार्दनबाबासुद्धां शिंदे, होळकर असे सरदार ३५००० फौजेनिशीं पुण्याहून निघून साताऱ्यास आले. पुण्यास बंदोबस्तास दादासाहेब व भाऊसाहेब यांस ठेविलें. पेशवे साताऱ्यास आल्यावर यांनीं असा विचार केला कीं, या वेळेस ताराबाईचा पक्ष स्वीकारावा. सकवारबाईनें प्रतिनिधि व सेनापति वगैरे अनुकूल करून फौज जमविली. त्यांनीं संभाजी करवीरास आहेत याजकडे जावें, व संभाजीनीं त्या फौजेसुद्धां साताऱ्यावर यावें अशी मसलत केली. तेव्हां शाहू महाराज यांनीं तिकडे बापूजी खंडेराव यास पाठवून जिजाबाई

व कारभारी मंडळींत भेद करून ही गोष्ट सिद्धीस जाणार नाहीं असें संभाजीस सांगून माघारें फिरविलें. सकवारबाईनें रघोजी भोसले व सेनापति गायकवाड यांस जलद येण्याविषयीं पत्रें पाठविलीं. ते वेळेस आले नाहींत. यमाजीपंत यांनीं राणीचे आज्ञेनें ताराबाईचे बंदोबस्तास आपले बंधु अंताजी शिवदेव याजबरोबर लोक देऊन पाठविलें. पंतप्रधान यांनींही किल्ल्याशीं राजकारण करून लोकांस बक्षिसें द्यावयाचें कबूल करून यादो गोपाळ व गोपाळ यादव व बाजी यादव यांस ताराबाईजवळ ठेवून किल्लेदार अनंतराव जाधव, जोतीपंत सुभेदार हे वश करून ठेविले. महाराज यांची प्रकृति बिघडली. तेव्हां सकवारबाई नेहमीं जवळ असे. कदाचित् आपल्यास बाहेर जाणें झाल्यास आपले पक्षाचे लोकांस बसवून जात असे. पेशवे यांनीं इतक्यांतूनही संधि साधून शाहू महाराजाशीं एकांत करून त्यांजपासून सनद करून घेतली. ती अशी कीं, मराठ्यांचें सर्व राज्य पेशवे यांनीं करावें व लौकिकांत राजाचा मान राखावा. ताराबाईचा नातू अधिकारी करावा. तो व त्याची संतति होईल तिचा उत्तम रीतीनें सांभाळ करावा. कोल्हापूरचें संस्थान संभाजीचें प्रथक आहे तसें असूं द्यावें. याप्रमाणें पेशवे यांनीं बंदोबस्त करून घेतल्यानंतर शाहूमहाराज छ॥ १९ मोहरम मार्गशीर्ष व॥ २ शुक्रवारीं (१९ डिसेंबर १७४९) सकाळीं चार घटिका दिवसास वारले. त्यावेळेस पृथक प्रतिनिधि व त्याचा मुतालीक यांस कैद करून, पायांत बिड्या घालून, प्रतिनिधीस पुरंदरावर व यमाजी गभाजी शिवदेव यांस आणकाई किल्ल्यावर ठेवून नजरबंदी केली व सातारे किल्ल्यावर पेशवे यांनीं आपली शिबंदीच ठेवून बंदोबस्त केला. सातारा शहरची नाकेबंदी केली व राणीसाहेब यांस तिचे बापाचे मार्फत सांगून पाठविलें कीं, महाराजांचे आज्ञेप्रमाणें करावयाचें किंवा सहगमन जावयाचें? तेव्हां राणीसाहेब यानीं विचार केला की, प्रधान पराक्रमी आहेत, प्रतिनिधिच्यानें मसलत शेवटास जात नाहीं, ताराबाईचे आज्ञेंत राहणें हेंही योग्य नाहीं. सहगमन जाणें असा निरोप आल्यावर, प्रधानपंत यांनीं वाड्यांत जाऊन बंदोबस्त करावा. नंतर महाराज

यांचें प्रेत सकवारबाईसुद्धां माहुलीस कृष्णावेणीसंगम जाणून दहन झालें. सकवारबाई सती गेली. उत्तरकार्य मालोजी भोसले मुंगीकर यांजकडून करविलें. दहन कृष्णावेण्यासंगमीं प्रवाहांत झालें. त्या ठिकाणीं देवालय करूं नये असा दृष्टांत झाला. एक थडगें करून महाराजांचें लिंग व बाईसाहेबांची मूर्ति स्थापन केली. नदीस पूर आले असतां मोठाले पाषाण वाहून जातात, तत्राप तें लिंग व मूर्ति अद्याप कायम आहेत! महाराजांजवळ एक कुत्रा असे. तो सर्वकाळ महाराजांपाशीं गादीजवळ असे. कोणे एकेदिवशीं महाराज वाघावर शिकारीस गेले. बरोबर हा कुत्रा होता. महाराजांनीं वाघावर बंदुकीची गोळी मारली. ती चुकून जाऊन वाघ महाराजांवर चालून आला, तेव्हां त्या कुत्र्यानें वाघ येतो असें पाहून एकदम वाघाचे मागले अंगास जाऊन त्याचें अंड धरिलें. इतक्यांत महाराजांजवळ बंदूक होती. दुसरी गोळी वाघावर मारिली. वाघ मारिला. त्या दिवशीं या कुत्र्यानें महाराजांचा प्राण वांचविला. तेव्हांपासून त्याजवर महाराजांची प्रीति होती. महाराजांचा अंतकाळ झाल्यावर मराठेचालीप्रमाणें प्रेत पालखींत घालून मोठे समारंभानें माहुलीस आणिलें. त्याजबरोबर कुत्राही आला. पुढें महाराजांचें दहन होऊन मंडळी माघारी येण्यास निघाली, त्यांत महाराजांची पालखी व महाराज मयत असें कुत्र्यानें पाहून त्या नदीचे कांठीं डोकें आपटून प्राण दिला. त्या कुत्र्याचेंही थडगें कृष्णेच्या कांठीं महाराजांच्या थडग्यानजीक अद्याप कायम आहे. त्या थडग्यावर दगडाचा कुत्रा हुबेहुब कुत्र्याप्रमाणें करून बसविलेला अद्याप आहे. प्रथम दिवशीं विधि झाल्यावर महाराजांचे पूर्वीचे आज्ञेप्रमाणें बारसीपानगांवाहून रामराजे यांस आणावयाकरितां ताराबाईकडील चिंतो विनायक व बापूजी खंडेराव व इंद्राजी कदम वगैरे मंडळी लागलीच पाठविली. ते तेथें जाऊन रामराजास घेऊन छ २६ मोहरम रोजीं. (२६ डिसेंबर १७४९) वडूथाजवळ कृष्णेचे ठिकाणीं आले. इतक्यांत महाराज वारल्याची बातमी पुण्यास गेल्यावर भाऊसाहेबही छ २० मोहरम रोजीं (२० डिसेंबर १७४९)

पुण्याहून निघाले. महाराज वारल्याची खबर लागतांच वडुथावर राहिले होते, त्यांची भेट तिसरे प्रहरीं दिवसास झाली, व पुढें छ ६ सफर रोजीं [ ४ जानेवारी १७५० ] साताऱ्यास येण्यास मुहूर्त होता त्या दिवशीं मुहूर्तानें शहरांत दाखल झाले. तेव्हां श्रीमंतानीं ८८९ रुपयांचा पोषाख महाराजांस केला. त्याच दिवशीं ह्मणजे पौष शु॥ ८ [ ४ जानेवारी १७५० ] सहा घटिका दिवसास राज्याभिषेक झाला. पुढें रबिलावल महिन्यांत लग्न झालें, मोहित्यांची कन्या. सर्व मराठेमंडळ शिरके, मोहिते, महाडिक, पालकर वगैरे साताऱ्यास जमले होते. त्यांत कल्पना निघाली कीं, सर्वांनीं एका ताटांत आईसाहेबसुद्धां जेवावें ह्मणजे रामराजे खरे, असें समजूं. अशी कल्पना निघाल्यावर संभुसिंग जाधवराव, चंद्रसेन यांचे बंधू, महाराजांचे पक्षांतील होते. हे सर्व आईसाहेब यांस बोलले कीं, आपण आधीं ग्रास घ्यावा. त्यावरून आमचे नातू खरे ह्मणून प्रथम ग्रास आईसाहेबांनीं घेतला. नंतर सर्वांनीं भोजन केलें. रघोजी भोसले बरोबर फौज घेऊन आले ते दाखल झाले. शिंदे, होळकर व सोमवंशी सरलष्कर व पिलाजी जाधवराव अशी फौज पेशवे यांची २५००० पंचवीस हजार जमली. एकंदर मराठ्यांकडील फौज ६००० हजार जमली. सर्वांचा बंदोबस्त करून देण्याकरितां स्वारीस निघाले. तेथें ठेवून श्रीमंत पुण्यास निघाले ते छ २४ रबिलाखर रोजीं ( २२ मार्च १७५० ) भाऊसाहेब यांची बायको उमाबाई पुण्यास वारली. सबब तूर्त स्वारीचा बेत राहित करून रघोजी भोसले तेथें ठेवून श्रीमंत पुण्यास निघाले ते छ २४ जमादिलावल रोजीं [ २१ एप्रिल १७५० ) वानवडीस मुक्कामास येऊन छ २५ रोजीं ( २२ एप्रिल १७५० ) पुण्यास दाखल झाले. याप्रमाणें साताऱ्याकडील राज्याचे व्यवस्थेचें वर्तमान झालें. हिकडे दुसरीं कित्येक नवलविशेष झालेलीं कार्यें झालीं. त्यांची हकीकत खालीं लिहिली आहे. सवाल महिन्यांत जनार्दन बाजीराव सातारे मुक्कामीं वारले, भाद्रपद व॥ ७ रोजीं ( २१ सप्टेंबर १७४९ ). छ २० मोहरम ( २० डिसेंबर १७४९ ) चावड जिवधन किल्ला फत्ते झाल्याचें वर्तमान आलें. छ १८ जिल्हेज

( १८ नोव्हेंबर १७४९ ) किल्ला पेटाव रामाजी महादेव यांनीं सर केल्याचें वर्तमान आलें. छ १ रबिलावल रोजीं ( २९ जानेवारी १७५० ) वासोटा किल्ला रामाजी महादेव बिवलकर यांनीं सर केल्याचें वर्तमान उमाजी निकम घेऊन आला. छ १५ रबिलावल [ १२ फेब्रूवारी १७५० ] माणीकगड घेतल्याची खबर आली. छ १७ रबिलावल [ १४ फेब्रूवारी १७५० ] ता। छ २७ जमादिलाखर [ २४ फेब्रूवारी १७५० ] गंभीरगड किल्ला व त्याखालील महालसुद्धां रामदेव राणा रामगीरकर कोळी यांजकडील रावोबा नारायण यांनीं सर केल्याची खबर आली. छ ४ रबिलाखर [ २ मार्च १७५० ] किल्ले तुंग व तिना घेतल्याची खबर आली. छ २९ जमादिलावल [ २६ एप्रिल १७५० ] भाऊसाहेबांचें दुसरें लग्न झालें, हरि चिंतामण दीक्षित यांची कन्या. बनेश्वराचें देवालय बांधण्यास आरंभ झाला. नानासाहेब व भाऊसाहेब यांस पुत्र झाले होते. छ १२ सवाल ( १४ सप्टेंबर १७४९ ) या सालीं कपिलाषष्ठी आली होती. रामचंद्रबाबा शिंद्यास कारभारी दिले होते. त्यांचें व सरदारांचें जमेना. सबब मल्हारजी होळकर यांचे विचारें त्यानें कारभार करूं नये. सन १७४९ इसवींत ढोकलसिंग मारवाडाचा राजा मेला. त्याजा मुलगा रामसिंग याचे दुर्वर्तनामुळें चुलता बळवंतसिंग गादीवर बसला. दोघा भावांचे भांडणामुळें तंजावर राजानें देवीकोटचा किल्ला इंग्रज यांस दिला.

## सु॥ इहिदे खमसैन मया व अल्लफ, सन ११६० फसली, अव्वल साल छ २९ जमादिलाखर, २५ मे १७५०, ज्येष्ठ शुद्ध १ शके १६७२.

ताराबाई सत्तर वर्षांची ह्मातारी झाली असतां आपण स्वतंत्रपणें धनीपणा करावा ह्या खटपटींत सचीव ह्मास अनुकूल करून घेऊन वरकांतीं सिंहगडास तिचा नवरा राजाराम याचें थडगें आहे तेथें दर्शनास जात असे. असें मिष करून साताऱ्याहून पुण्यानजीक शिवापुरास रामराजासुद्धां आली. रज्जब महिन्यांत [ जून १७५० ] आली. पंतसचिव तारा-

बाईस अनुकूल झाले. ही खबर ताराबाईकडे येण्याचे अगोदर दोन तीन महिने पेशवे यांस कळतांच सचिव पंत यांच्या तुंग, तिकोना वगैरे किल्ल्यांची व मुलुखाची जप्ती करून चिमणाजी नारायण पंतसचिव व मुलगा चिटकोपंत असे पुण्यास आणून कैदेंत सिधा सरंजाम खाजगी-कडून पावत होता. छ २० रज्जब ( १४ जून १७५० ) अव्वलसाल श्रीमंतांची स्वारी मल्हारजी होळकर यांजकडे श्रीगोंद्यास गेली होती. छ २९ माहे मजकुरीं ( १९ जून १७५० ) परत आली. पुण्यानजीक सिंहगड किल्ला पंतसचिवाचा आहे, तो आपल्यास मिळावा, असें महाराज यांस श्रीमंतानें विचारिलें. नंतर किल्ला दिल्याविषयीं आज्ञापत्रें झालीं; परंतु किल्ल्यावर पंतसचिवाचे लोक होते, ते किल्ला खालीं करून देईनात. लढूं लागले. तेव्हां किल्ला आपल्यास घेणें अवश्य, सबब त्याचे मोबदला पेटा सिरवळ परगणें खालसा अम्मल व परगणे जाफराबाद येथील बाबती अम्मल आणखी कांहीं महाल वगैरे देण्याचें ठरवून जिवाजी गणेश खाजगीवाले यास किल्ला घेण्यास पेशवे यांनीं पाठविलें. त्यांनीं किल्ला सर करून छ १२ साबान रोजीं ( ६ जुलै १७५० ) निशाण चढविलें. किल्ला व किल्ल्याखालील कर्यात मावळ वगैरे गांव सरकारांत घेतले. त्याची कमाविस जिवाजी गणेश याजकडेस पेशवे यांनीं सांगितली होती. साबान महिन्यांत ( जुलै १७५० ] शिंदे होळकर यांस हिंदुस्थानांत पाठविलें. छ १७ रमजान [ ९ आगस्ट १७५० ] रघोजी भोसले सातान्यास श्रीमंतांनीं ठेवून आपण सालगु॥ पुण्यास आले होते. आज्ञे-प्रमाणें भोसले या तारिखेस श्रीमंतांकडे आले. छ १७ सवाल महिन्यांत [ ८ सप्टंबर १७५० ] निरोप ठिकाणीं जाण्याविषयीं होऊन वस्त्रें झालीं. वऱ्हाड व गोंडवण आणि बंगाल यांच्या सनदा व शिवाय वऱ्हाडानजीक प्रतिनिधीकडील कांहीं मुलूख हो[illegible] तोही त्यास दिला. छ १९ रमजान [ ११ आगष्ट १७५० ] हडसर किल्ला जुनरानजीक आहे तो सर झाल्याची खबर आली. खासा स्वारी महा-दजी अंबाजीसुद्धां श्रावणमासीं [ आगष्ट १७५० ] डेऱ्यास चऱ्होलीस तळावर गेली होती. तेथें भाऊसाहेबानीं रामचंद्र मल्हार यास भेटविलें.

रामचंद्रबाबाचे संकेतानुरूप श्रीमंतांशीं भाऊसाहेब यानीं बोलणें लाविलें कीं, कारभार आह्मी करूं. तेव्हां तें बोलणें श्रीमंतांनीं मान्य केलें नाहीं. कारण पुरंदरे हल्लीं कारभार करितात त्याचे उपकार आपल्यावर बहुत झाले आहेत, ह्मणून तें बोलणें मान्य केलें नाहीं. आपल्यास कारभार मिळत नाहीं असें भाऊसाहेब समजले. इतक्यांत कोल्हापूरकर संभाजी महाराज यांजकडून भाऊसाहेब यांस आज्ञापत्र झालें कीं शाहूचे राज्यांत पेशवे आहेत, आह्मांस पेशवे माहीत, आह्मी आपले राज्याची पेशवाई तुह्मांस देतों. त्या पत्रांतच तीन किल्ले ह्मणजे भीमगड व पारगड व वल्लभगड व पांच हजारांचा मुलूख देऊं असें लिहिलें होतें. तिकडे भाऊसाहेब जाऊं लागले. तेव्हां महादाजी अंबाजी यांनीं विनंति केली कीं, आह्मी चाकर व भाऊसाहेब आपले बंधु, त्यांचें न ऐकिल्यास दौलत फाटेल, यास्तव कारभार त्यांस सांगावा, मी घरीं बसतों. असें सांगून गेल्यावर श्रीमंतांनीं भाऊसाहेब यांची समजूत करून त्यांस कारभार सांगितला. नंतर रामचंद्रबाबा व भाऊसाहेब कारभार करूं लागले. रामचंद्रबाबा सावंतवाडी प्रांतांतील आरवली गांवचा कुलकरणी. तो कांहीं कामांत अंतर पडलें ह्मणून पळून साताऱ्यास आला. प्रथम कचेश्वरबावा राजगुरूपाशीं चाकरीस राहिला. तो कारकुनी व शिपाईगिरीचे कामांत हुशारसा पाहून पेशवे यांनीं आपलेजवळ ठेविला होता. पुढें राणोजी शिंद्याची दिवाणगिरी दिली होती. पुढें राणोजी मेल्यावर जयाप्पा शिंद्याचें व त्याचें जमेना. सबब तेथून निघाला तो भाऊसाहेब यांजपाशीं आश्रयानें राहिला होता. छ १४ सवाल रोजीं ( ९ सप्टेंबर १७५० ) चिमणाजी नारायण पंतसचिव व पुत्र चिटकोपंतसुद्धां पेशवे यांनीं भोरास पाठविले. सत्तर हजार रुपये मशारनिल्हेस द्यावयाचा करार. छ १ रमजान ( २४ जुलै १७५० ) तुंग, तिकोना किल्ले माघारे दिले. शिरवळ येथील खालसा अम्मल व पवन मावळ दिले. छ १ रमजान ( २४ जुलै १७५० ) भोरप व उतरोली व खानापूर दिले. छ ९ सवाल रोजीं ( ३१ आगष्ट १७५० ) निवून स्वराज्य अम्मल पूर्वी होता त्याशिवाय मोंगलाई सर-

देशमुखी दिली. छ १२ सवाल ( ३ सप्टंबर १७६० ) भाऊसाहेब व छ २१ सवाल रोजीं ( १२ सप्टंबर १७६० ) रामराजे यांस स्वारीस जाण्याविषयीं जोशी यांनीं मुहूर्त दिल्याप्रमाणें भाऊसाहेब सातान्यास महाराज यांस बरोबर घेऊन गेले. सांगोलें याचें ठाणें व मंगळवेढें येथील ठाणीं होतीं त्यांचे बंदोबस्ताकरितां यमाजी शिवदेव यास पाठविलें होतें. शिंदे, होळकर यांजकडील व नाना पुरंदरे स्वतः फौजेनिशीं अशी एकंदर साठ हजार फौज जमा करून आश्विनमासीं सातारकर राजे याचे मुलखांतील व राज्याचा बंदोबस्त रामचंद्र मरहार यांचे विद्यमानें खालीं लिहिल्याप्रमाणें केला. छ ४ जिलकाद रोजीं ( २९ सप्टंबर १७६० ) दादोबा प्रतिनिधि पुरंदर किल्ल्यावर कैदेंत होते त्यांस स्वामींनीं हुजूर बोलावल्यावरून स्वारींत भाऊसाहेब यांजकडे पाठविलें. त्यांस पुनः पद दिलें. सांगोलें याचें ठाणें लढून घेतलें तें हुजूर येऊन राणोजी मोहिते यास दिलें; व मंगळवेढ्याचें ठाणें पंतप्रधान यांजकडे दिलें. दाभाडे बेहोष, त्यांचा अम्मल गुजराथेंत बरोबर चालत नाहीं, करितां हुजूर खाजगीचा अम्मल आह्माकडे सांगावा अशी विनंति करून निम्मे अम्मल आपल्याकडे घेऊन सनद घेतल्या व निम्मे दाभाडे याजकडे ठेविली. कर्नाटक सुभा बाबूजी नाईक याजकडे होता. तो जास्ती रसीद कबूल करून आपल्याकडे घेतला. गोविंदराव चिटणीस यांनीं महाराजांपाशीं पंत प्रधान यांचे अनुमतें कारभार करावा. बापूजी खंडेराव यांनीं हुजूर असावें. चार लक्षांचा सरंजाम व दातेगड प्रतिनिधीकडील उभयतांच्या नांवें दिला. खानदेश व गंगातीरीं पन्नास हजारांचे मोकासे दिले. यशवंतराव पोतनीस यानें खानगी कारभार करावा व पोतनिशी करार केली. चाळीस हजारांचा सरंजाम दिला. यशवंत लपाटे यांनीं हुजूर खानगीचा कारभार करावा. त्याजकडे तालुके वगैरे करार केले. पंत प्रधान वगैरेकडील तालुके सरंजाम ज्याचे त्याजकडे करून नेमणुकी ऐवज सालाबादप्रमाणें द्यावा. हुजूर खानगी सदरेस हुजूर मामला व खाजगीचे दरोबस्त महाल व प्रधान पंताकडील दरमहाचा ऐवज व हिंदुस्थान व कर्नाटक व कोंकणप्रांताचा ठरावाप्रमाणें

ऐवज व दाभाडे यांजकडील निम्मे गुजराथचे ठरावाचा ऐवज व प्रतिनिधी-कडील व सरलष्कर यांजकडील नेमणुकी दरमहाचा ऐवज हुजूर पावता करून द्यावा. व हुजूरचे किल्ले रायगड व प्रतापगड नेमणूक वगैरे आहे ते चालवावें. पंत प्रधान यांजकडील दरमहा हुजूर खानगीकडे ऐवज पेशजीप्रमाणें व कर्नाटक व निम्मे गुजराथचा ऐवज देत जावा. पंत प्रतिनिधि यांनीं दरमहाचा ऐवज व सचिव यांनीं पीलखान्याचा ऐवज व भोसले सेनासाहेब सुभा यांजकडून व मानाजी व तुळाजी आंग्रे यांज-कडील व मंत्री व केसरकर यांजकडील सरदेशमुखीबद्दल व कुसाजी भोसले शिरोळ वगैरेबद्दल ऐवज व शहर सातारा वगैरे पेठ मंगळवार-सुद्धां मक्त्याचा ऐवज, प्रांत वांई व प्रांत कऱ्हाड, हुजूर मामला व जावली व प्रतापगड निसबत महादाजीपंत पिंगळे यांजकडील प्रांत, मिरज निसबत शिवाजी डुबल फत्तेसिंग बावाकडील व कजबे रहिमतपूर व संस्थान सोंधे व सुभा व व्याघ्रगड व वासोटा निसबत रत्नाकर विठ्ठल व महाल विठोबा वाकडे, व पो इंदापूर नागोराव मेघःशाम, व कार्यात तासगांव निसबत खंडो नागनाथ व किल्ले संतगड व पांडवगड, संस्थान लखमेश्वर, व गदग येथील खंडणी व प्रांत गुजराथ प्रो हुजूरचे महाल १ भडोच, १ देहेजबरें खंबायत, १ अंक्लेश्वर, १ नवसरी, १ घोगराज पिंपळ, १ मांडवी शहर, घोडेबंदर येथील ऐवज, याशिवाय खंडणी, कामरज प्रांत द्वारका, काठणहळी इनवा सरकार सोरट व कच्छभूज व किरकोळ बागा सरै वगैरे येते तो ऐवज सालाबाद येत असावा. असा बंदोबस्त आश्विनमासीं एकंदर केला. राणोजी शिंदा मयत झाला होता, त्याचा अधिकार वडील पुत्रास दिला. माळव्याची एकंदर जमा दीडकोट, पैकीं होळकर यास ७४,००,००० लक्ष, व शिंद्यास ६९,५०,००० साडेपासष्ट लक्ष, व बाकी साडे दहा लक्ष इतर सरदा-रांस वांटून दिले. त्यांत मुख्य आनंदराव पवार. रामराजे सदाशिव-राव भाऊसाहेब यांजबरोबर सांगोल्यास होते. तेव्हां पेशवे यास सनद दिली होती कीं, साताऱ्यानजीक कांहीं मुलूख देऊन बाकी सर्व राज्यकार-भार पेशवे यांनीं चालवावा. याप्रमाणें सनद झाली. परंतु याप्रमाणें

मुलूख कांहीं न देतां रोख पैसाच देत आले. याप्रमाणें बंदोबस्त राजाचे नांवें झाला; परंतु लोकांत प्रसिद्धि पेशवे यांनीं केल्याची झाली. याप्रमाणें एकंदर बंदोबस्त करून कार्तिकमासीं ( नोव्हेंबर १७५० ) भाऊसाहेब महाराजांसुद्धां पुण्यास आले. मग ताराबाई यांचा व रामराजे यांचा आदर करून बंदोबस्तास बरोबर त्र्यंबकराव सदाशिव ऊर्फ नाना पुरंदरे यांस फौजेनिशीं देऊन साताऱ्यास रवानगी केली त्यासमयीं ताराबाईचे प्रसन्नतेकरितां सातारा किल्ल्यावर पेशवे यांनीं आपले लोक ठेविले होते, ते परत आणून, पूर्वींचे गडकरी वगैरे अधिकारी होते, त्यांस गडावर पाठवून, ताराबाईचे आज्ञेंत वागत जाण्याविषयीं पेशवे यांनीं आज्ञा दिली. यावेळेस रामराजे यांस पासष्ट लक्ष रुपये खर्चास देऊन समारंभानें साताऱ्यास ठेविलें होतें. सांगोल्याचे स्वारीहून भाऊसाहेब परत आल्यावर बाबा ह्मणजे महादाजी अंबाजी पुरंदरे याचे मनांत भाऊसाहेब यांनीं संभाजीकडील मनसब करून तेथील आधिपत्य मिळवावें असें होतें. सांगोलें वगैरे ठाणीं, गोपाळ महादेव, प्रतिनिधि भवानराव यास कारभारी नेमून दिला, याचे हवालीं करावीं असें होतें; परंतु भाऊसाहेबांनीं मान्य केलें नाहीं. मोहिमेस पैसा रामचंद्रबावा देईनात. मग नाना व भाऊ एक होऊन चऱ्होलीस भेटले. बाबाची मसलत वाईट यामुळें पुढें बाबाशीं विटले. बाबा पुण्यास आल्यावर चोरचौकी बसली. बाबाचें कृत्य नानास कळलें. बाबाचें कृत्य नानास कचलें. पुरंदरास पाठविलें. फार संशय वाटून मनस्वी विटलें. पुढें नानाबरोबर बाबा उगीच सिंहस्थसालीं हिंडत होते. नंतर स्वारीस निराळे पाठविले; परंतु विश्वास मध्यमच होता. साताऱ्यास ताराबाई पुण्याहून गेल्यावर सर्व कारभार प्रधान पंत यांचे आज्ञेप्रमाणें गोविंदराव चिटणीस व यशवंतराव खासनीस व देवराव लपाटे करूं लागले. आपलें कांहीं चालत नाहीं असें तिचे मनांत येऊन, दोन्ही राण्या आपल्याबरोबर घेऊन, रुसून किल्ल्यावर जाऊन राहून, किल्ला बळकाविला. तिजला समजावून आणावयाकरितां स्वतः रामराजे बापूजी खंडेराव यांचे कांहीं लोक बरोबर घेऊन मार्गशीर्ष शु॥ ९ रोजीं [ २३ नोव्हेंबर १७५० ] किल्ल्यावर गेले. तेव्हां

ताराबाईनीं त्यांस स्वतंत्र वागण्याविषयीं बहुत उपदेश केला. परंतु तें सांगणें महाराजानीं मान्य केलें नाहीं. तसे परत साताऱ्यास आले. नंतर दुसरे दिवशीं चंपाषष्ठीचे [ २४ नोव्हेंबर १७५० ] निमित्तानें ताराबाईनें किल्ल्यावर भोजनास बोलाविलें. तेव्हां महाराज किल्ल्यावर जातांच तेथें कैद केले व किल्ल्याचे कामगार हवालदार वगैरे यांस आज्ञा केली कीं, बरोबर आलेल्या लोकांस बंदुकांचा मार करून घालवून द्या. पुढें ताराबाईनीं दमाजी गायकवाड यास पत्र पाठविलें कीं, मराठ्यांचें राज्य ब्राह्मणांचे हातीं लागलें तें सोडण्याविषयीं तुह्मीं यावें. त्याप्रमाणें त्यानीं मान्य करून येण्याची तयारी केली. सातारे शहरांत कोंकणस्थ ब्राह्मणांचे पक्षपाती जे लोक असतील त्यांचे घरांवर तोफांचा मारा चालेल असें करून ठेवावें, अशी किल्ल्याचे कामगार यास आज्ञा दिली. ही गोष्ट नाना पुरंदरे वगैरे पेशवे यांजकडील अधिकारी यांस कळली; परंतु ते समजले कीं ही ह्मातारी वेडी आहे. ह्मणून उगीच बसले. ताराबाईनीं किल्ला बळकावून महाराजांस कैद केल्याची व गायकवाड येण्याची खबर पेशवे यांस पुण्यास लागली. तेव्हां यानीं त्र्यंबकराव सदाशिव पुरंदरे यास किल्ल्यासभोंवतीं चौक्या बसवून, किल्ल्यावर धान्य वगैरे सामान न जाईल असा बंदोबस्त करण्याविषयीं आज्ञा देऊन, दमाजी गायकवाड येत आहे त्याचे बंदोबस्ताकरितां बळवंत गणपत मेहेंदळे व बापूजी बाजीराव रेटरेकर यांस नेमून, पांच हजार फौज त्यांजबरोबर ठेविली. पुरंदरे यांची फौज किल्ल्यासभोंवतीं मोर्चेबंदी करून मार्गशीर्ष तागायत फाल्गुनमासपर्यंत होती. वा॥ ६ पर्यंत याप्रमाणें बंदोबस्त ठेविला होता. दमाजी गायकवाड यानें खानदेशांत दंगा मांडला होता. त्याजवर वर लिहिलेले दोन सरदार फौजेनिशीं रवाना केले. त्याशीं लढाई झाली. पेशवे यांजकडील फौजेचा मोड झाला. जेजुरी मोरगांवपर्यंत आला. दरम्यान पुण्यावर येणार होता. लोक गलबलून पळू लागले. तेसमयीं बाबा फडणीस व महादाजी अंबाजी पुरंदरे यांनीं त्यास चिठी पाठविली त्यावरून पुण्यावर न येतां परभारा गेला. दमाजी गायकवाड यानें पेशवे यांजकडील फौजेचा

मोड केल्याची खबर साताऱ्यास नाना पुरंदरे यास कळतांच त्यानें सर्व फौज घेऊन नाझऱ्यास जेजुरीनजीक मेहेंदळे रेटरेकर यास येऊन मिळाले. त्यास दिल देऊन सर्व लोकांचें समाधान करून सर्व फौज एके ठिकाणीं जमवून गायकवाडाचे पाठीमागें लागले. त्या वेळेस गायकवाड साताऱ्यानजीक वेण्येचे कांठीं वऱ्यावर उतरला होता. पुरंदरे यानीं फौज घेऊन एकंदर वडूथावरून गायकवाड याजवर गेले. लढाई झाली. गायकवाड याचा मोड होऊन गेंड्याचे माळावरून सातारा शहरांत घालविला. लष्कराचे डेरे दांडे सर्व लुटून आणिले. निशाणें व नौबत बापू व बळवंतराव यांची गायकवाड यानीं नेली होती ती माघारी आणिली. गायकवाड लुटून फस्त केला. हें वर्तमान छ माहे जमादिलावर रोजीं झालें. हिकडे श्रीमंत पुण्यास असतां निजामउलमुलूख याचा दुसरा पुत्र नासरजंग यानें राज्याचा अधिकार चालविला होता. तो कर्नाटकांत फौजेसहित गेला होता. गाजुद्दीन, निजामाचा वडील पुत्र, यानें मल्हारराव होळकर यांचे विद्यमानें पेशवे यास बोलणें लाविलें कीं, निजामपदवी आपल्यास मिळावी, या गोष्टीस आपण साह्य व्हावें. ती गोष्ट पेशवे यानीं मान्य करून दिल्लीस पत्र पाठवून औरंगाबादेकडे जाण्याची तयारी केली. नासिरजंग कर्नाटकांत गेला. तेव्हां बरोबर सलाबतजंग व निजामअल्ली व बसालतजंग व मोगलअल्ली असे पुलचेरीवर असतां, हिदायत मोहिदीनखान नवसा ह्मणजे मुलीचा मुलगा लढत असतां त्या लढाईत महंमदखान कडप्याचा नवाब यानें गोळी घालवून नासिरजंगास मारिलें, व हिदायत मोहिदीनखानही ठार झाला. त्या लढाईत मग निजाम पदवी सलाबतजंग यास मिळून तो हैदराबादेकडे जात असतां ताराबाईनीं त्याशीं राज्यकारण करून त्यास साताऱ्यास आणणार होती. ही खबर पेशवे नानासाहेब यांस कळतांच छ ६ जिल्हेज रोजीं (२६ अक्टोबर १७५०) त्यावर स्वारीस निघाले. त्यांनीं सलाबतजंग यास कृष्णेच्या कांठीं गांठून लढाई केली. पुढें तह असावा असें बोलण्यांत सलाबतजंग याजकडून छ ३ जमादिलावर रोजीं (२० मार्च १७५१) श्रीमंताकडे आलें होतें. इतक्यांत साताऱ्याकडे ताराबाईचेकडून दमाजी बडोद्याहून

येऊन नाना पुरंदरे याशीं लढत आहे अशी खबर श्रीमंतांस कळताच रामदासपंताचे विद्यमानें सल्ला करून खंडणी सतरा लक्ष रुपये घेऊन एकदम तेरा दिवसांत साताऱ्यास आले. याच स्वारींत छ २८ रविलाखर रोजीं [ १६ मार्च १७५१ ] श्रीमंतांनीं मुगणहळ्ळी पेठ व गोपाळपेठची खंडणी घेतली. बरोबर रघोजी भोसले व फत्तेसिंग भोसले असे होते. साताऱ्यास स्वारीस येण्याचे अगोदर दमाजीचा मोड नाना पुरंदरे यांनीं केला होता. पेशवे फौजेनिशीं नजीक आले. प्रतिनिधीनेंही बोलल्याप्रमाणें साहाय्य केलें नाहीं, याजकरितां दमाजीपेशवे याजबरोबर तहाचें बोलणें लाविलें. तें पेशवे यांनीं मान्य केल्यासारखा आकार दाखवून तह करण्यास आह्मांजवळ यावें असें सांगून, जवळ आणिला. तेव्हां आपले हातीं पुरता सांपडला असें समजून त्यासही गुजराथसंबंधें कांहीं पैसा येणें होता तो मागूं लागले. नंतर त्यानें उत्तर केलें कीं, या गोष्टीस मी एकटाच मालक नाहीं. तेव्हां छ १८ जमादिलाखर रोजीं ( ४ मे १७५१ ) दाभाडे याजकडील गुजराथ खातेंबाकी उत्पन्नाची पेशवे यानीं जप्ती केली व पुढें छ १० रज्जब अखेर साल ( २५ मे १७५१ ) यशवंतराव दाभाडे व दोघी बाया कैद करून पुण्यास पाठविल्या. त्या होळकर याच्या वाड्यांत ठेविल्या होत्या, व त्याच दिवशीं इंदूरीचें ठाणेंही जप्त केलें. गुजराथचा निमेभाग पेशवे यांस महाराजांनीं दिला असतां दाभाडे यांनीं हवाला केला नाहीं, त्याजबद्दल दाभाडे यांजकडे पंचवीस लक्ष रुपये येणें, त्या ऐवजीं दाभाडे याचा निम्मे हिस्सा जप्त करून पेशवे यानीं घेतला. त्याजबद्दल छ २१ जमादिलाखरची [ ७ मे १७५१ ] सनद दाभाडे यांचे नांवें झाली आहे कीं, स्वामींनीं गुजराथप्रांत सालमजकुरीं आह्माकडे देवविला ते तुह्मी गरगशा खालीं घालून हवालीं केला नाहीं, याजबद्दल पंचवीस लक्ष रुपये तुह्माकडे येणें, त्याजबद्दल तुमचा निम्मे हिस्सा तुह्मी लावून दिला, तो आह्मी कबूल केला, तो पंचवीस लक्ष रुपये फिटले ह्मणजे परत देऊं असा मजकूर आहे. मग दमाजीस कैद करून, त्याचे लष्करावर छापा घालून, दमाजीस पुण्यास कैद करून, आवजी कवडे यांचे वाड्यांत ठेविलें, छ २५ जमादिलाखर ( ११ मे १७५१ ).

या सालीं दुसऱ्या गोष्टी मनांत ठेवण्यासारख्या घडून आल्या, त्या येणें-प्रमाणें. हरी फडके या सालीं उमेदवार कारकून होते. छ २६ जिल्काद लागू छ ६ जिल्हेज [ १७ आक्टोबर—२६ आक्टोबर १७५० ]. श्रीमंत राव बापूजी पुणें सुभा याशीं शाहूचे नांवचे मुतालिकी शिक्के होते ते मोडून रामराजाच्या नांवें करून दिले. खरगाणें प्रांत मापणा नवा मुलूख या सालीं सरकारांत आला. छ २६ रबिलाखर [ १४ मार्च १७५१ ] पासून त्रिंबकराव मामा पेठे पुण्याचें कामकाज पाहूं लागले. जमादिलावल [ एप्रिल १७५१ ] महिन्यांत नानासाहेब यांस मुलगा झाला होता. भागानगरची स्वारी करून पंढरपुरास माघारे येऊन तेथील बंदोबस्त करून छ ७ रज्जब [ २२ मे १७५१ ] १६ घटिका दिवसास पुण्यास दाखल झाले. शिंदखेड व खांडवे व भालगड व पिंपळदेहे, हांडे, यमाखळ, रघोजी भोसले यांजकडून मोबदल्यांत घेतले. पर्वतीस देकार द्यावयास जागा करून सोपे बांधावयास काम लाविलें.

## सु॥ इसन्ने खमसैन मया व अलफ, सन्न ११६१ फसली, अवलसाल छ १० रज्जब, २५ मे १७५१, ज्येष्ठ शु॥ ११ शके १६७३ प्रजापति संवत्सरे.

पेशवे गाजुदिनाचे कामाकरितां मोंगलाकडेस स्वारीस पुण्याहून छ २४ जिलकाद रोजीं ( ४ अक्टोबर १७५१ ) निघून, छ २६ पर्यंत भांबर्डे येथें मुक्काम करून, पुढें छ १ जिल्हेज (१० अक्टोबर १७५१) वडगांवास जाऊन, पुढें घोडनदीकडे चालते झाले. पेशवे आपल्यावर येतात अशी बातमी सलाबतजंग यास कळल्यावर त्यानेंही फरासिसांचीं पलटणें साह्यास घेऊन एकदम कोरेगांवावर आला. पेशवे फौजेसुद्धां त्याचे पाठी लागले. छ १९ मोहरम रोजीं (२७ नोव्हेंबर १७५१ ) घोडनदीवर लढाई झाली. छ १ सफर रोजीं ( ९ डिसेंबर १७५१ ) तुळापुरास येऊन पुनः माघारे उलटून मांडवगण वगैरे ठिकाणीं लढाया झाल्या त्यांत कोन्हेर त्रिंबक एकबोटे यानें मोठा पराक्रम केला. मराठे जय

पावले. याच लढाईंत बाबूराव फडणीसास तोफेचा गोळा लागला होता. छ २४ मोहरम रोजीं ( २ डिसेंबर १७५१ ) त्र्यंबक किल्ला सर झाल्याची खबर आली. छ ३० सफर रोजीं [ ७ जानेवारी १७५२ ] उभयपक्षीं सल्ला होऊन सलाबतजंग याजकडील नानरोटी व दिवाण रामदासपंत याजकडील तुळशी ठेवून सिंगवे परगणें राहुरी मुक्कामीं सल्ला होऊन लढाई तहकूब झाली. रामदासपंत यास किताब राजा रघुनाथ ह्मणून होता. नबाबाचे लष्करांत कांहीं तंटा उत्पन्न झाला यांत तारीख ७ एप्रिल सन १७५२ रोजीं मारला गेला. त्याची दिवाणगिरी शहानवाजखान ऊर्फ सरलष्कर-खान यास दिली होती. याचा पुत्र समशुदौला यास मुसाभुशी यांणीं मारल्यावर विठ्ठल सुंदर दिवाण झाले. रामचंद्र मल्हार याणीं लोकांवर कर्जपट्टी घातली होती. त्याणीं थोडे दिवस तीन वर्षेपर्यंत कारभार करून पुण्यांत गणपतीच्या मागें त्यांचा वाडा होता तेथें मयत झाले. सदाशिव रामचंद्र पुत्र यास नवी सरदारी दिली, छ १२ जिल्हेज [ २० आक्टोबर १७५२]. खंडेराव व सयाजी गायकवाड यांस कैदेंतून सोडून बहुमानाचीं वस्त्रें दिलीं. दमाजी लोहोगडावर व जयसिंग यास कोरीगडावर कैदेंत ठेविलें होतें, व उमाबाई दाभाडी सिंहगडास ठेविली होती. पुढें तिजला सोडिलें. ती चरवलीस श्रीमंतांस भेटली. जयसिंग गायकवाड यास विठ्ठल शिवदेव याजबरोबर गुजराथचीं ठाणीं खालीं करून घ्यावयाविषयीं पाठविण्याचा विचार होता. परंतु तो जयसिंग कोरी-गडावर कैदेंतच मयत झाला. यशवंतराव दाभाडे यास पुण्यास कैदेंत ठेविलें होतें. पुढें शरण आल्यावरून त्यास सोडून तळेगांवास पाठविलें होतें. परंतु तो फार बेहोश. गुजराथचा अम्मल उठवावा ह्मणून दादा-साहेब यांस चंद्र १० ते १३ जिल्हेज रोजीं [ २२ आक्टोबर १७५१] स्वारीस पाठविलें. सोनगड वगैरे प्रांतीं स्वारी झाली. छ १६ रबिलाखर [ २१ फेब्रूवारी १७५२ ] पारनेरा किल्ला घेतल्याची खबर आली. पुढें दमाजीनें एकनिष्टपणें वागावें असें कबूल करून घेऊन त्यास मोकळा करून छ २० रबिलाखर रोजीं [ २५ फेब्रूवारी १७५२ ] गुजराथेंत

दादासाहेब यांजकडे पाठविलें. छ ४ जमादिलाखर रोजीं [ ८ एप्रिल १७५२] आहद सोनगड तहद सिंधुसागर गुजराथप्रांत देखील जकात निम्मे अम्मल पेशवे निम्मे दाभाड्याबद्दल गायकवाड याजकडे, याप्रमाणें वांटण्या झाल्या. छ १० रबिलाखर ( १९ फेब्रूवारी १७५२ ) श्रीमंत माधवराव बल्लाळ यांची मुंज पुण्यास त्र्यंबकराव मामा यांनीं लाविली. छ १२ जमादिलावल ( १८ मार्च १७५२ ) भीमाशंकर व त्र्यंबकेश्वर यांजला करून श्रीमंत पुण्यास आले. याच दिवशीं दिल्लीबादशहाकडून फरमान आले होते, चैत्र शु॥ १५ ( १८ मार्च १७५२ ). महादाजी अंबाजी घरीं बसून होते, त्यांस सरदारी दिली व पुत्र निळकंठराव पुरंदरे यास पुणें सुभा सांगितला. हरी गोपाळ यास सरदारी दिली व नारो अप्पाजी यास पुण्याच्या सुभ्याचे कारभारावर पाठविलें. दमाजी गायकवाड यास कैद करून पुण्यास ठेवून पेशवे कारभार करूं लागले. तेव्हां आईसाहेबांनीं मोरो शिवदेव यास चिटणीशी सांगितली. राज्यकारण करूं लागली. प्रतिनिधीचेनीं कांहीं होत नाहीं, सबब जगजीवन परशराम यास पद दूर करून बाबूजी नाईक यास द्यावें, या बेतानें नाईक फौजेसुद्धां साताऱ्यास आले. प्रतिनिधीचे तालुके घ्यावयास गेले. तेथें तांदुळवाडीनजीक लढाई होऊन नाइकास जखम लागली. पळून बारामतीकडे गेले. साताऱ्याचा बंदोबस्त असावा ह्मणोन दादोपंत वाघ दहा हजार फौज देऊन पाठविलें. चंदन-वंदननजीक छावणी करून राहिले. तेव्हां आईसाहेबाकडील बखेडा मोडला. रघोजी भोसले वारले. त्याच्या धाकट्या बायकोचा परंतु वयानें वडील जानोजी यांस सेना साहेब व सुभ्याचीं वस्त्रें दिलीं. वडील बायकोचे परंतु मागाहून झाले. सबब यास नवें पद सेनाधुरंधर दिलें छ २ रबिलाखर फाल्गुन शु० ३. दमाजीचा भाऊ खंडेराव यांस नवीन परगणा व भडोच सुभा देऊन त्यास बाळाजीनें तिकडे घालविलें. रघोजी भोंसला असतां त्यांणीं आपला पुत्र जानोजी कर्नाटकांत गेलेला परत आल्यावर या सालीं त्यास बंगल्यांत मीरहबीब याचे साहाय्यास पाठविलें होतें. त्यासमयीं अल्लीवर्दीखान याणें निरुपाय होऊन कटक प्रांतांतील बक्सरपर्यंत मुलूख मीरहबीब यांचे स्वाधीन केला. पुढें रघोजीचा पुत्र

जानोजी ह्याने व मीरहबीब यांचे दरम्यान तंटा उत्पन्न होऊन शेवटीं त्या मीरहबीबास त्या भोसल्यानें कैदेंत ठेविलें होतें. त्यास तो प्रतिबंध सोसवेनासा होऊन चौकीदारावर जाऊन त्यांत तो मारला गेला. अलीवर्दीखानानें रघोजीस कटकप्रांत दिला. त्यावेळेस रघोजीनें बंगाल व बहार प्रांतांचे चौथाईबद्दल बत्तीस लक्ष रुपये घेतले. नंतर बंगाल्यांत शिरून त्याणें गाविलगड व नरनाळा व माणीकदुर्ग हे तीन किल्ले घेतले. यानंतर मोंगलाचें लष्कर पुण्याकडे चाललें अशी खबर ऐकून गंगा व गोदावरीचे दरम्यानचे मोंगलाकडील मुलुखांत खंडणी घेऊन भोंसले यांणीं जागोजाग आपलीं ठाणीं बसविलीं. दमाजी गायकवाड मुक्त करतेवेळेस त्याजकडून पंधरा लक्ष रुपये पहिले खंडणीबद्दल त्यानें द्यावे, नंतर निम्मे गुजराथचा भाग द्यावा, व नवीन मुलूख सुटले त्यांतही निम्मे भाग द्यावा, व जे समयीं स्वारी होईल तेव्हां दहा हजार फौज चाकरीस पाठवावी, व दाभाडे याचे मुतालकीबद्दल पांच लक्ष रुपये द्यावे, व पेशवे यांचीं ठाणीं बसविल्यास मदत करावी, शिवाय सातारकर राज्यासही खर्चास देत जावें, असें कबूल करून दादासाहेब यांजकडे पाठविला. जानोजी भोसल्यास सेनासाहेब सुभ्याचीं वस्त्रें दिलीं, त्या वेळेसही त्याजकडून सातारकर राजे ह्यांचे खर्चास दरसाल नऊ लक्ष रुपये देत जावे, व आज्ञा होईल त्या वेळेस दहा हजार फौज चाकरीस पाठवीत जावी, अशी कबूली करून घेऊन मग वस्त्रें दिलीं.

**सु॥ सल्लास खमसैन मया व अलफ, सन ११६२ फसली,**
**अवल छ २० रज्जब, २४ जून १७५२,**
**ज्येष्ठ वद्य ७ शके १६७४.**

छ १६ रमजान आषाढ वा॥ २ सह शुक्रवार ( १७ जुलै १७५२ ) श्रीमंत नानासाहेब व भाऊसाहेब व दादासाहेब मुहूर्तानें निघून सोमवार पेठेंत राहिले. दादासाहेब थेऊरास गेले. श्रीमंत नाना व भाऊसाहेब छ ७ सवाल रोजीं ( ६ आगस्ट १७५२ ) वानवडीवरून पुढें पाटसाकडून मोंगलाईंत मीडसांगवीकडे गेले. दिल्लीकडून वर्तमान अहमदशा

अब्दाली दिल्लीस असतां अफगाण बादशहा दिल्लीवर येऊं लागला तेव्हां लाहोरचा अधिकारी यानें त्यास खंडणी देऊन माघारा फिरविला. त्यासमयीं सफदरजंग वजीर दिल्ली याचे मनांत आलें कीं, रोहिले लोक मोठ्या योग्यतेस चढले असून हल्लीं ते आपआपसांत तक्ताविषयीं भांडतात यावरून त्यांस जिंकावयाची हीच संधि बरी आहे. ह्मणून त्यांवर स्वारी करून, तो रोहिल्यांचा मुलूख घेऊन, आपला हस्तक नेवलराई या नांवाचा कायत यास ठेवून आपण दिल्लीस माघारा आला. नंतर रोहिले यांनीं मिळून त्या कायतास मारून टाकिलें. त्याजवर पुनः सफदरजंग यानें स्वारी केली; परंतु त्यास जय आला नाहीं. इतक्यांत नासिरजंग मेल्यावर त्याचे जागीं दक्षिणेंत दुसरा सुभा यावा हें राजकारण करण्याविषयीं पेशवे यांनीं शिंदे, होळकर यांस लिहिलें होतें ते या वेळेस दिल्लीस होते. त्यास सुरजमल्ल जाट यांस आपले साह्यास घेऊन सफरदजंग रोहिले यावर गेला. तेव्हां रोहिल्यांचा मुलूख घेऊन या साहाय्याबद्दल शिंदे, होळकर यांसही कांहीं मुलूख दिला. अफगाण बादशहा पुन्हा दिल्लीवर आला. तेव्हां सफदरजंग वजीर दिल्लीस नसतां त्यास येण्याविषयीं बादशहानें पत्र लिहिलें; परंतु तो येण्याचे पूर्वींच बादशहानें लाहोर व मुलतान प्रांत त्या अफगाण बादशहास देऊन परत पाठविला. नंतर वजीर दिल्लीस आला तेव्हां बादशहास समजलें कीं, अफगाण बादशहास काढून टाकण्याबद्दल वजिरानें मराठ्यांस घेण्याचें ठरून साहाय्य करण्याचें ठरविलें होतें. त्या वजिराचे कामासाठीं मराठ्यांनीं रोहिल्यांपासून पन्नास लक्ष रुपये घेण्याचे बाबतींत पत्र लिहून घेऊन मुलूख सोडविला होता. तेव्हां मराठ्यांचे उपकार आपल्यावर झाले, याजबद्दल त्यांस काय बक्षीस द्यावें व काय काम सांगावें या विचारांत वजीर होता. इतक्यांत सलाबतजंग जिंकावयाकरितां शिंदे, होळकर यांस पेशवे यांनीं बोलाविलें होतें. तेव्हां सफदरजंगानें गाजुद्दीन यास दक्षिणेची सुभेदारी देऊन त्याजबरोबर शिंदे व होळकर यांस देऊन याचे कार्याविषयीं तुह्मीं उभयतां पेशवे यांचें साहाय्य करावें असें सांगून दक्षिणेंत रवाना केलें. ही बातमी फेरोजंगास कळली. त्याजवरून

सलाबतजंग व बसालतजंग व निजामअली व मोगलअली भागानगरास असतां त्यानें दिल्लीबादशहास पत्र लिहून पेशवे यांजकडे शहानवाजखान ऊर्फ सैदलष्करखान व जानोजी निंबाळकर यांस भेटण्याकरितां पाठविलें. इतक्यांत दिल्लीहून गाजुद्दीनखान यास बरोबर घेऊन देशीं येतांना होळकर यानीं मोंगलाकडील किल्ले मार्कंडा, इंद्राई, चांदवड व धोडप, कान्हेरा, राजदेहर व काळेदहर येणेंप्रमाणें सात किल्ले घेतल्याची खबर छ १९ सवाल श्रावण वा। ६ [ २९ आगष्ट १७५२ बुधवारीं ] कळली. गाजुद्दीन यासह शिंदे, होळकर छ २१ जिलकाद रोजीं भाद्रपद वा। ७ [३० सप्टेंबर १७५२] अवरंगाबादेस दाखल झाले. हे सात किल्ले घेतले त्याच वेळेस चांदवड परगणा फत्तेसिंग काळे याजकडून घेतला असावा. कारण हा परगणा सरकारांत आल्याबद्दल नवस छ २६ सवाल रोजीं [ २९ आगस्ट १७५२ ] फेडिला होता. शिंदे, होळकर उभयतां अवरंगाबादेहून श्रीमंतांस जाऊन भेटले. श्रीमंतही होळकरांचे डेऱ्यांत भेटावयास गेले होते. गाजुद्दीनखान अवरंगाबादेस आल्यावर त्याचेजवळ मसलतगार सैद हशमतखान व महंमद अनवरखान होते. त्यांनीं श्रीमंतांस सांगून पाठविलें कीं, भागानगराहून बोलण्याकरितां निंबाळकर व सैदलष्करखान आले आहेत, त्यांस निरोप न देतां आपण त्यासुद्धां शहागडावर यावें, आपले व आमचे विचारें ठरेल तसें करा. त्यावरून श्रीमंतांनीं कूच करून निंबाळकर व सैद लष्करखानसुद्धां शहागडावर गेले. गाजुद्दीनखान याचा व पेशवे याचा असा तह ठरला होता कीं, तुमची निजाम पदवी तुह्मांस देवविली असतां तुह्मीं आह्मांस वऱ्हाडचे पश्चिमेस तापीपासून गोदावरीपर्यंत मुलूख द्यावा असा ठराव झाला होता. परंतु गाजुद्दीन यास निजामअलीचे मातोश्रीनें अवरंगाबादेस जेवणास बोलावून विषप्रयोग करून मारिलें. ही खबर श्रीमंतांस कळतांच त्यांनीं बोलण्यास आलेले निंबाळकर व सैद लष्करखान यांस निरोप दिला व होळकर यास हिंदुस्थानांत पाठविलें व शिंदे देशीं राहिले. पुढें गाजुद्दीन याणें देऊं केल्याप्रमाणें गाजुद्दीन मेल्यामुळें सलाबतजंग देण्यास हरकत करूं आगला. तेव्हां पुनः

होळकर यास येण्याविषयीं पत्र पाठवून बाकीची फौज जमा करून पेशवे लढाईस सिद्ध झाले. सलाबतजंगही मोठे फौजेनिशीं पेशवे यांचे फौजेवर ग्रहणाचे दिवशीं पौर्णिमेस छापा घातला. नंतर दुसरे दिवशीं मोहरम महिन्यांत ( डिसेंबर १७५२ ) लढाई झाली. त्यांत महादजी अंबाजी व दत्ताजी व महादजी शिंदे व कोन्हेरपंत एकबोटे वगैरे असामींनीं लढाई देऊन मोंगलाशीं झुंज केलें. ही लढाई भालकी मुक्कामीं झाली. तेव्हां गाजुद्दीन यानें देऊं केल्याप्रमाणें मुलूख देण्यास सलाबतजंग सिद्ध झाला. परंतु रघोजी भोसल्यानें आमचे मुलुखांत पैनगंगा व गोदावरीचे दरम्यान ठाणीं घेतलीं आहेत तीं उठवावीं असें त्यानें बोलणें लाविलें. तेव्हां पेशवे यांनीं मान्य केलें व भोसले यांनीं ठाणीं उठविलीं. सलाबतजंगानें तहाप्रमाणें जहागीर पेशव्यास दिली. व नगर व खानदेश जिल्ह्यांतील बहुतेक जहागीर अंमल व पुणे जिल्ह्यापैकीं कांहीं भाग प्रांत जुन्नरपैकीं जहागीर पेशव्यांस आली. नंतर छ १८ मोहरम रोजीं ( २९ नोव्हेंबर १७५२ ) सलाबतजंग व पेशवे यांच्या भेटी झाल्या. पोषाग श्रीमंतानें त्यास केला, व श्रीमंतांस तिकडून पोषाग आला. होळकर यांस येण्याविषयीं पत्रें गेलीं होतीं. त्याचें उत्तर त्यांजकडून आलें कीं; रोहिले पठाण कमाउंचे पहाडांत आहेत त्यांचें निर्मूळ करावें असें होतें. परंतु स्वामीकडून एक दोन पत्रें आलीं कीं, कळेल तसा निर्गम करून तुह्मी येणें. त्याजवरून रोहिले पठाण व वजीर यांचा सल्ला करून घेऊन कूच करून भागीरथी उतरून दक्षिणतीरास आलों व वजीरही एक दोन दिवसांत येतील. मजल दरमजल येत आहेत त्यास वजिराकडून व दिल्लीकडून बातमी आली कीं, स्वामीचा व सलाबतजंगाचा तह होऊन सल्ला झाला. त्यास सल्ला झाला नसेल तर तसेंच लिहून यावें. मजल दरमजल येतों. सल्ला झाला असेल तर हिकडेही कोण आहेत. जसें वाटत असेल तशी आज्ञा केली पाहिजे. श्रीमंत मोंगलाकडील कार्यभाग आटपून परभारें कर्नाटकांत भाऊसाहेबसुद्धां गेले. प्रथम श्रीरंगपट्टणास जाऊन तेथील खंडणी घेऊन छ १४ जमादिलावल रोजीं

( २० मार्च १७५३ ) ह्मणजे फाल्गुन वद्य १ मंगळवार रोजीं तेथून कूच करून होळी हुन्नूर किल्ल्यावर मोर्चे बसवून तो किल्ला सर करून सरकारांत घेतला. त्या लढाईंत कृष्णाजी पलांडा मयत झाला. सबब याचे पुत्रास मुलुखची पाटीलकी दिली. नंतर धारवाड किल्ला सर करण्यास आले. तेथें किल्लेदार पृथ्वीसिंग मोंगलाकडील होता. त्याशीं लढाई झाली. नंतर सल्ला होऊन त्यास पस्तीस हजार रुपये देऊन छ ९ रज्जब रोजीं ( १३ मे १७५३ ) त्याजकडील अम्मलदार घासीखान याचा लेक पेशवे यानीं ओलीस आपलेकडे ठेविला. किल्ला हस्तगत झाल्यावर दुसरे दिवशीं छ १० रज्जब रोजीं ( १४ मे १७५३ ) त्यास सोडून दिलें. करवीरकर महाराज यानीं भाऊसाहेब यास पेशवाईपदाबद्दल तीन किल्ले ईहिदे खमसैनांत देऊं केलेले या सालीं भीमगड व पारगड व विभर्गी असे तीना किल्ले व त्या खालील महाल खानापूर वगैरे पेशवे यास संभाजी महाराजांनीं दिले. मोंगल व कर्नाटकसंबंधीं काम आटपून श्रीमंत पुण्यास पावसाळ्यांत आले. दादासाहेब पुण्यास कांहीं दिवस होते ते छ ३ सफर [ १० दिसंबर १७५२ ] रोजीं गुजराथचे स्वारीस निघाले ते छ ९ रबिलाखर [ १३ फेब्रूवारी १७५३ ] अमदाबादेस दाखल झाले.छ २० रबिलाखर ( २४ फेब्रूवारी १७५३ ) पासून ता० छ १० जमादिलावल ( १६ मार्च १७५३ ) शुक्रवारपर्यंत लढाई सुरू होती. धनाजी थोरात व शहाजी चौधरी सरकाराचे सरदार ठार झाले, छ १४ रबिलाखर ( १८ फेब्रूवारी १७५३ ) रविवार. जवानमर्दखान मोंगलाकडील अमदाबादेस होता. तो वेढा घालून बसला होता. त्यास पट्टण अथवा पंचराथनपुर वगैरे महाल देऊन किल्ला घेतला. या युद्धांत नारो शंकर राजेबयाद्दर यांनीं मोठा पराक्रम केला होता. अमदाबादेस पेशवे यानीं ठाणें घालून आपला मामलेदार ठेवून उत्पन्न होईल तें निम्मे गायकवाड व निम्मे पेशवे यानीं घ्यावें असें ठरलें. अमदाबाद किल्ल्याचे सर्व दरवाजांचे चौकीपाहाऱ्यांचा बंदोबस्त पेशवे यांनीं केला. एकंदर व्यवस्था गायकवाड यांजकडे असावी असें ठरलें. अमदाबादची स्वारी करून दादासाहेब दत्ताजी शिंदे यास

बरोबर घेऊन हिंदुस्थानांत परभारे गेले. यास खंडेराव होळकर मिळाले, त्यासुद्धां अजमीर प्रांतीं गेले. किल्ले कर्नाळा छ १६ रज्जब (२० मे १७५३) वैशाख व॥ ३ रोजीं सर झाल्याचें वर्तमान आलें. हडसर किल्ला सर होऊन सरकारांत आला. अमदाबाद फत्ते झाल्याची खबर श्रीमंतांस छ २० जमादिलाखरीं (२५ मे १७५३) समजली. छ १४ जमादिलावल [२० मार्च १७५३] रोजीं बाई, नानासाहेब यांची मातोश्री, वारली. भाऊसाहेबांस छ २२ जमादिलाखरीं [२७ मे १७५३] समजलें. दमाजी गायकवाड याजकडून गुजराथप्रांताचा ऐवज दाभाड्याबद्दल ५२५००० करार केला.

## सु॥ अर्बा खमसैन मया व अलफ, सन ११६३ फसली, अवलसाल छ ३ साबान, ५ जून १७५३, ज्येष्ठ शुद्ध ४ शके १६७५.

छ १ जिल्काद रोजीं [ ३० आगस्ट १७५३ ] दादासाहेब स्वारीस अवशीस चार घटका रात्रौ डेरे मुहूर्तानें बाहेर दिल्हे. थाळनेरास गेले. छ ११ जिल्काद रोजीं [ ९ सप्टेंबर १७५३ ] थाळनेराहून दहिवलें येथें गेले. दरम्यान छ २९ जिल्काद रोजीं [ २७ सप्टेंबर १७५३ ] नबाब सलाबतजंग यांजकडून सैद फतुल्ला वकीलीस आले होते. खानदेशाहून दादासाहेब हिंदुस्थानांत दत्ताजी शिंदे व मल्हारराव होळकर यांचे पुत्र खंडेराव यांस बराबर घेऊन अजमीर प्रांतीं गेले. तेथें लूट करून चौथ व सरदेशमुखी घेतली व जागोजागीं खंडणी घेऊं लागले. परंतु जाटलोक युद्धावांचून खंडणी देईनात. त्यांचा किल्ला कुंभेरी होता. त्या किल्ल्यांत ते लोक शिरून लढूं लागले. त्या लढाईंत खंडेराव होळकर मयत जाले. त्यांचे क्रियेस दहा हजार रुपये सरकारांतून दिल्हे, छ २९ जमादिलावल [ २४ मार्च १७५४ ]. पुत्र वारल्याचें वर्तमान ऐकून मल्हारराव होळकरही तेथें आले. तो किल्ला हस्तगत जाला नव्हता, सबब मल्हारराव होळकर ईर्षेस पडून चार महिने लढले. पुढें सुरजमल्ल जाटापासून शिंद्यांच्या विद्यमानें साठ लक्ष रुपये खंडणी

घेऊन खमस खमसैनांत छ १० रमजान रोजीं [ २ जुलै १७५४ ] जयाजी शिंदे मारवाडांत गेले. जयाप्पा यांजबरोबर दादासाहेबांनीं चार हजार फौज दिली होती. दिल्लींत कारभारी लोकांत एकमेकाशीं वांकडेपणा आला होता. गाजुद्दीखान मयत झाल्यावर त्याचा पुत्र मीर शाबुद्दीन यानें आपल्याविषयीं सफदरजंग वजीर यास मोह उत्पन्न करून फार लीनता दाखविली. त्यावरून त्यास दया येऊन बापाचें गाजुद्दीनपण व अधिकार—अमीर उमरावतीचा—त्यास देवविला. असा वजिरानें त्याजवर उपकार केला असतां, त्या वजिराचेच नाशाविषयीं प्रवृत्त होऊन त्याची वजिरी आपल्या आतेच्या नवऱ्यास पातशहाकडून देवविली. यामुळें पहिला वजीर सफदरजंग व बादशहा यांचें युद्ध सहा महिनेपर्यंत होत होतें. शेवटीं तो वजीर कंटाळून आपलें ठिकाण लखनौ येथें जाऊन राहिला. या युद्धांत मीर शाबुद्दीन यानें बळेंच शिरून आपले साह्याकरितां पेशवे दादासाहेब हिंदुस्थानांत आले होते त्यांस बोलाविलें. ते फौजेनिशीं शिंदे होळकरसुद्धां आले. परंतु हे दिल्लीस येण्यापूर्वींच सफदरजंग युद्ध सोडून गेला होता. मग शाबुद्दीनानें आपल्यास मदत आलेले लोकांसुद्धां या सफदरजंग वजिराचा पक्षपाती सुरजमल्ल जाट याच्या पारिपत्यास गेला. परंतु तो जाट आपल्या किल्ल्यांत शिरून युद्ध करूं लागला. त्यावेळेस शाबुद्दीनानें बादशहापाशीं युद्धाकरितां तोफा मागितल्या. तेसमयीं नवे वजिरानें बादशहास सांगितलें कीं, हा शाबुद्दीन आपल्यासच सर्व सामर्थ्य असावें असें इच्छितो, यास अनुकूल होऊं नये. त्यावरून बादशहानें तोफा दिल्या नाहींत. सुरजमल्ल जाट हाही बादशहास शरण आला होता, ह्मणून बादशहा शहाबुद्दीन व मराठे यांचे निवारणार्थ फौजेसहित निघाला. हें वर्तमान पेशव्यांस कळतांच एकदम पातशहाचे फौजेवर जाऊन पडले. तेवेळेस ते लोक बेसावध होते ह्मणून पळूं लागले. तेव्हां मराठ्यांस फार लूट मिळाली. नंतर दादासाहेब यानीं नवे वजिरास दूर करून शाबुद्दीन यास वजिराचीं वस्त्रें छ १० साबान [ २ जून १७५४ ) रोजीं संध्याकाळीं दिल्लीस दिलीं. व लागलीच पहिला बादशहा अमदशा

यास काढून दुसरा बादशहा, पूर्वी जाहांगीर बादशहा होता त्याचा नातू इजुद्दीनशा याचें नांव दुसरा अलंमगीर असें ठेवून, छ ११ साबान रोजीं ( ३ जून १७५४ ) बसविला. पहिला बादशहा अहमदशा याचे डोळे शाबुद्दीनानें काढून त्यास कैदेंत ठेविलें. पहिला वजीर सफदरजंग या संधींत मरण पावला. त्याचा पुत्र सुजाअतद्दौला बापाचे जागीं अयोध्या प्रांताचा अधिकारी जाला. याप्रमाणें हिंदुस्थान प्रांतीं हकीकत जाली. याच स्वारींत मल्हारजी होळकर यास जखम लागली होती. जखम बरी जाली ह्मणून दादासाहेब यांजकडून पत्रें श्रीमंतांकडे छ १६ जिल्हेजेस [ ४ अक्टोबर १७५४ ] आलीं. छ ९ जमादिलावल रोजीं मल्हारजी होळकर व मीर शाबुद्दीन गाजुद्दीनखान यांची भेट झाली, फाल्गुन शुद्ध १० सोमवार ( ४ मार्च १७५४ ). छ ११ जमादिलावल रोजीं [ ६ मार्च १७५४ ] बादशहा दिल्ली यांजकडून दादासाहेब यांस वस्त्रें आलीं. छ ८ जिल्हेज, आश्विन शुद्ध १० रविवार रोजीं [ ६ आक्टोबर १७५३ ] श्रीमंत नानासाहेब यांची स्वारी मुहूर्तानें पर्वती वानवडीकडे वगैरे पुण्यालगतच फिरून छ ३० मोहोरम रोजीं [ २६ नोव्हेंबर १७५३ ] परत आले. श्रीमंत माधवराव बल्लाळ यांचें लग्न छ १३ सफर, मार्गशीर्ष शुद्ध १४ रविवार रोजीं [ ९ डिसेंबर १७५३ ] पुण्यास जालें. शिवाजी बल्लाळ जोशी सोलापूरकर यांची कन्या रमाबाई. याच महिन्यांत अल्लीबहादूर यांचें लग्न झालें. हा लग्नसमारंभ झाल्यावर श्रीमंत कर्नाटकचे स्वारीस गेले, जमादिलावल महिन्यांत [ फेब्रूवारी-मार्च १७५४ ]. हरिहर व अंभी व बागलकोटवर लढाई झाली; व जमादिलाखरांत मुंडलगीवर लढाई झाली; व रजब महिन्यांत [ मे १७५४ ] मिरजेस मोर्चे लावून छ १७ रोजीं [ ११ मे १७५४ ] स्वारी पुण्यास परत आली. या स्वारींत जमखिंडी व तेरदाळ हे महाल पेशव्यांनीं घेतले. छ १८ जिल्हेज [ १६ अक्टोबर १७५३ ] रामाजी महादेव नामजाद यांजकडून किल्ले पालव फत्ते झाल्याचें वर्तमान आलें. छ ३ रबिलावल [ २९ डिसेंबर १७५३ ] व छ ११ सबान [ ३ जून १७५४ ] यमाजी शिवदेव यांनीं महीपतगड घेतल्याचें वर्तमान आलें.

छ २९ जमादिलावल ( २४ मार्च १७५४ ) भगवंतराव त्रिंबक यांजकडे खासे नगारा व निशाण दिलें. छ ८ जमादिलाखर (२ एप्रिल १७५४) कृष्णराव चासकर, काशीबाईचे बंधू, चैत्र शुद्ध ९ सोमवार रोजीं मयत झाले. छ १ रजब [ २५ एप्रिल १७५४ ] त्रिंबकराव शिवदेव यास सरदारी दिली, वैशाख शुद्ध ३ गुरुवार. छ ११ साबान [ ३ जून १७५४ ] जीवधन व निंबगिरीवर सरकारचें निशाण चढविलें. जनार्दन बल्लाळ, बाबूरावराम फडणीस व कृष्णराव पारसनीस व अन्याबा मजमदार व महीपतराव चिटणीस व कोन्हेर त्रिंबक एकबोटे यांस पालखीचीं वस्त्रें आलीं. यशवंतराव दाभाडे मयत झाले. दमाजी गायकवाड यांजकडे ऐवज करार, बा। मु॥ ५२५००० नजर नानासाहेब, २५००० भाऊसाहेब, २५००० गोपिकाबाई, २५००० रामचंद्रबाबा, एकूण ६२५००० ठरले. अमृतराव कवी विसा मोरो अवरंगाबादकर यांचे घरीं असत ते वारले. कल्याणप्रांत पूर्वीं सरकारांत आला होता. या सालीं आंग्रे यांजकडून त्यांजकडे निम्मे होता तो आला.

## सु॥ खमस खमसैन मया व अलफ, सन ११६४ फसली, अवल साल छ १३ साबान, ५ जून १७५४, ज्येष्ठ शुद्ध १५ शके १६७६.

छ २६ रमजान ( १८ जुलै १७५४ ) भाऊसाहेब नाशकास जाऊन परत आले. भाद्रपद शुद्ध २ [ २० आगष्ट ], मुक्काम किनई, जगजीवन परशराम उर्फ दादोबा प्रतिनिधि यांचा काळ जाला. भवानराव यांस प्रतिनिधिपद जालें. ते कृष्णाजी परशराम यांचे नातू. यांसच श्रीनिवास गंगाधर ह्मणत असत. छ ७ मोहोरम, कार्तिक शुद्ध ९ गुरुवार ( २४ अक्टोबर १७५४ ) नानासाहेब व भाऊसाहेब कर्नाटकचे स्वारीस जाण्याकरितां गारपिरावर डेरे दिले होते तेथें दाखल जाले. त्यांजबराबर महादाजी अंबाजी पुरंधरेही गेले होते. छ १३ रबिलाखर ( २६ जानेवारी १७५५ ) कर्नाटकचे स्वारीहून महादाजी अंबाजी यांची स्वारी वेगळी झाली. छ २७ रबिलाखरीं [ ३० जानेवारी

१७५५ ] लढाई करून, ठाणें सर करून, बिदनुरापर्यंत खंडणी घेऊन परत आले. श्रीमंतांची स्वारी कर्नाटकांत जाऊन खालीं लिहिल्या महालांची वांटणी बसविली. छ २६ रबिलाखर ( ६ फेब्रूवारी १७५५ ) विठ्ठल विश्राम यांजकडून बागेवाडी सरकारांत आल्याची खबर आली. छ ४ जमादिलाखर [ १७ एप्रिल १७५५ ] एकेरीचें ठाणें सरजाल्याची खबर आली. छ २१ जमादिलावल [ ९ मार्च १७५५ ] रोजीं ठाणें सर जालें. छ २९ जमादिलाखरीं [ १२ एप्रिल १७५५ ] कर्नाटकचे स्वारीहून श्रीमंत पुण्यास परत आले. पेशवे कर्नाटकांतून परत आल्यावर आंग्रे यांचा मुलूख घेण्याविषयीं इंग्रजांशीं कुमक मागितली. पुढें पेशवे आपली फौज घेऊन तयार जाला. संभाजी आंग्रे मयत झाल्यावर त्याचा सावत्र भाऊ तुळाजी आंग्रे बाणकोटापासून सांवतवाडीचे दरम्यानचे मुलखाची वहिवाट करीत होता. सरकारांत नेमणुकीप्रमाणें ऐवज न देतां, उद्दामपणा करून समुद्रांतही इतर लोकांस उपद्रव देत होता. त्याचे बंदोबस्ताकरितां इंग्रजांची मदत मागितली, तेव्हां असें ठरलें कीं, पेशवे यांचीं लढाऊ गलबतें इंग्रजांनीं घेऊन व इंग्रजांनींही तोफा वगैरे घेऊन आंग्रे यांजकडील समुद्रकिनारा किल्ले आहेत ते सरकारांत घ्यावे व बाणकोट इंग्रजांस द्यावें. परंतु पेशवे यांचीं गलबतें वक्तशीर न आल्यामुळें इंग्रजांकडील जेम्स नामे सरदार होता त्यानें ४ एप्रिल रोजीं सुवर्णदुर्ग किल्ला व त्यालगतचे खुष्की किल्ले त्या साहेबाचे हातीं लागले. पेशवे यांचीं गलबतें मागून येऊन दाखल जालीं. त्या जहाजावरील शिबंदीचा मुख्य नारोपंत ह्मणून होता. तो समुद्रांत युद्ध करण्यास जात असे. पर्जन्यकाळही पुढें नजीक यामुळें दुसरे किल्ले घ्यावयास वेळ राहिली नाहीं. सबब इंग्रजांनीं सुवर्णदुर्ग किल्ला रामाजी महादेवाचे स्वाधीन करून आपलीं जहाजें घेऊन माघारे मुंबईस गेले. तो सुवर्णदुर्ग किल्ला सर झाल्याविषयीं रामाजी महादेव यांजकडून पेशवे यांस छ १७ जमादिलाखर रोजीं [ २१ मार्च १७५५ ] फत्ते जाल्याविषयीं खबर कळली. त्या रामाजी महादेव यास मु॥ शिक्केकटार सरकारांतून

छ १७ रजब रोजीं [ ३० एप्रिल १७५५ ] दिल्ही. छ ६ रबिलावल पौष शु॥ ७ शनवार [ २१ डिसेंबर १७५४ ] करवीरकर संभाजी महाराजांनीं तुळाजी आंग्रे यांजकडून कार्यात मीठगावणें व पा॥ सौदन व परगणा राजापूर व खारेपाटण दूर करून सरकारांत घेतले. त्यांची कमावीस खंडोजी माणकर यास सांगितली. छ १६ सफर मार्गशीर्ष वद्य २ रविवार [ १ डिसेंबर १७५४ ] रवळा व जवळा हे किल्ले मोगलाकडून आले होते ते परत दिल्हे. तोफखाना नवा तयार करून माधवराव पानशी याजला सरदारी दिल्ही. दमाजी गायकवाड याजकडे सालबंदी ऐवज करार केला बु॥ हु॥ गु॥ ६२५००० नजर सु॥. व भीवराव यास दूर केलें सबब एक लाख. व गणेश यादव बर्वे पोतदार व कृष्णाजी नाईक कोल्हटकर एकंदर असामींब॥ ४ हजार व सांदड, विहीर, उजई, अंतापूर, मक्ता १० हजार एकूण ७५४००० करार केले. पर्वतीवर नवें घर बांधिलें त्याची वस्तू साबान महिन्यांत [ जून १७५५ ] केली. त्र्यंबकेश्वरचें काम पुरें जालें. १९ मार्च १७५५ इंग्रजाशीं तह झाला. तो आंग्रे यांजकडील मुलूख घेऊन बाणकोट देण्याब॥ असावा. खानदेशांतील अहिवंतगड किल्ला खोजे दायम याजकडून घेऊन परगणे अठेरपाळेपैकीं कळवण हा गांव दिल्हा. तुळाजी आंग्रे यास कैद केलें. हिंदुस्थान प्रकरणीं वर्तमानः—गेले सालीं कुंभेरीवरील लढाईत दत्ताजी शिंदे व त्याचा भाऊ जयाप्पा शिंदे दादासाहेब यांजबरोबर होते. येथील कार्यभाग आटोपल्यावर दादासाहेब यांनीं जयाप्पा यास मारवाडांत पाठविलें. रामसिंग व बजेसिंग या उभयतांचें तक्तासंबंधीं भांडण लागलें होतें. त्यास रामसिंगाचे मदतीकारितां पाठविलें. तेथें बजेसिंगाशीं युद्ध होतां होतां बजेसिंग पळून नागोरांत गेला. येथें जयाप्पानीं मोर्चे लावून युद्ध होत असतां तो जेर जाला. तेव्हां बजेसिंगानें मारेकरी घालून जयाप्पास मारिलें. जयाप्पाचा मुलगा जनकोजी. त्यास जयाप्पानें रामसिंगाबरोबर मेडतें येथें रवाना केलें होतें. तो जयाप्पा मेला त्या दिवशींच मेडतें सर करून तिसरे दिवशीं नागोरास आला. जयाप्पाची क्रिया त्यानें केली

जयाप्पा व संताजी शिंदे वेढ्यांत मरण पावले. त्यांच्या छत्र्या पुष्कराजवळ आहेत. पुढें दत्ता व जनकोजी आणखी नागोरास आले. बजेसिंग जेर होऊन कोट रुपये खंडणी व अजमीर, मेडतें व बिकानीर त्याजपासून घेतलें. शिंदे उज्जनीस गेले. अजमीर घेतल्याचें वर्तमान छ १९ रजब, अधिक वैशाख वद्य ७ शुक्रवारीं [ २ मे १७५५ ] पेशवे यांस कळलें. दादासाहेब हिंदुस्थानांत आहेत. छ १५ रबिलावलापासून [ ३० डिसेंबर १७५४ ] मु॥ गणमुक्तेश्वर. छ ४ रबिलाखर [ जानेवारी १७५५ ] पुष्पावतीवर. साबान अवलसाल [ ५ जून १७५५ ] मथुरा. छ ११ जमादिलावल [ २३ फेब्रूवारी १७५५ ] पुष्कर. छ २७ रबिलाखर यमुनातीर छ १२ जमादिलावल अजमीर. याप्रमाणें या सालीं हिंदुस्थानांतच राहिले.

## सु॥ सीत खमसैन मया व अलफ, सन ११६५ फसली, ५ जून १७५५, अधिक ज्येष्ठ वद्य ११ शके १६७७.

विठ्ठल शिवदेव श्रीमंत दादासाहेब यांजबरोबर कुंभेरीचे किल्ल्याचे हल्ल्यासमयीं अर्बा खमसैनांत होते. पुढें कांहीं दिवसांनीं त्यांची बायको वारली. सबब दुसरें लग्न करण्याकरितां काल्पीस वधू पाहून ठेविली होती तेथें आज्ञा घेऊन सर्व स्वारीनिशीं गेले. लग्न करून परत दिल्लीस जातांना वाटेंत ग्वाल्हेर येथें मुक्काम पडला. ते समयीं बराबरचे स्वार वगैरे लोक कही ह्मणजे दाणावैरण वगैरे जमविण्याकरितां बाहेर हिंडत असतां जाटांची गांठ पडली. त्यांनीं ते लोक कैद करून ठेविले. हें वर्तमान विठ्ठलराव यांस कळतांच त्यांनीं आपला वकील जाट राजाकडे लोक सोडविण्याकरितां पाठविला. तेव्हां जाटांचे कारभारी यांनीं त्याचा असा उपमर्द केला कीं, एक वेळ तुह्मांस कुंभेरीस जय मिळाला यामुळें फारच चढला, आणि आह्मांसारख्या शूर जाटांच्या राज्यांत शिरून हें वर्तन करता, तें तुमच्या नाशास कारण आहे. तुह्मीं ब्राह्मण, शूरत्वाचा विषय तुमचा नव्हे, आह्मीं तुह्मांस व तुमच्या

मालकास ओळखतों, तुह्मीं परवानगीविांचून आमचे राज्यांत मुक्काम केला, सबब माफी मागाल तर आमचे राजे तुह्मांस ब्राह्मण ह्मणून माफी देतील. असें भाषण ऐकून वकील परत आला. नंतर लढाईची सिद्धता करून दिल्लीहून आपली फौज व तोफखाना वगैरे सरंजाम आणून व कांहीं नवीन फौजही ठेवून लढाईस आरंभ झाला. लढाई होतां होतां अखेर निकराचें युद्ध होऊन, महादजी शितोळे, यमाजी रहाळकर, मोतीराम वाणी, ब्राह्मण व आणखी दुसरे मानकरी जाट राजाचे घोड्यापर्यंत जाऊन पोहोंचले. तेव्हां महादजी शितोळे याणें जाट राजास घोड्यावरून खालीं पाडलें. त्याच संधींत विठ्ठलराव शिवदेव याणीं त्याचे छातीवर पाय देऊन त्याचा शिरच्छेद केला. मग किल्ला सर करून त्याजवर पेशवे सरकारचें निशाण चढविलें. किल्ला घेऊन बंदोबस्त केल्यावर जाट राजाचा पुत्र, राजा गीरधर, कारभारीसुद्धां, विठ्ठल शिवदेव यांजकडे शरण आला. तेव्हां ज्या कारभाऱ्यानें पूर्वीं दुभाषणें केलीं होतीं त्यास बोलावून विचारलें कीं, आतां शूरत्व हा विषय ब्राह्मणांचा आहे कीं कसें? असें बोलतां कुंठित होऊन उगीच बसला. मग किल्ले ग्वालेर व त्याजखालील मुलूख पेशवे सरकारांत येऊन गोहद संस्थान त्या राजपुत्रास देण्याचें ठरलें. किल्ला व किल्ल्याखालील महालाची मामलत गोविंद शामराव शिरवळकर यांजकडे सांगून परत दिल्लीस दादासाहेब यांच्या स्वारींत गेले. हा किल्ला विठ्ठलराव शिवदेव यांणीं सर केल्याविषयीं छ ७ जिल्काद ( १६ आगष्ट १७५९ ) पेशवे यांस खबर कळली. किल्ला घेण्याविषयीं पेशवे यांची परवानगी न मागतां सर केला. त्यास बारा लक्ष रुपये खर्च झाला होता. तो तुह्मांस *मिळणार नाहीं असें श्रीमंतांचें बोलणें झालें. परंतु पुढें सावनूरचे स्वारींत त्याणीं मोठा पराक्रम केला, सबब बारा लक्ष रुपये बुंधेले यांजकडून विठ्ठल शिवदेव

---

* ह्यावरून स्वतंत्रपणें लढाई अगर इतर राजकारणी खटपट करण्यास सरदारांना मोकळीक नसे हें उघड आहे. लढाई, तह, वगैरे पेशव्यांच्या आज्ञेनेंच करावें लागत.

यांस देवविले. महादाजी शितोळे यांनीं मोठा पराक्रम केला. त्यांस मिरज प्रांतीं मौजे मांजरी प्रांत कागल हा गांव इनाम दिला. अप्पाजी मुळे यांसही गांव इनाम दिला. पागा सांगून पागेची सरदारी दिली. विठ्ठल शिवदेव हे दिल्लीस आल्याबरोबर हिंदुस्थानांत जनकोजी शिंदे व माळव्याचे बंदोबस्तास मल्हारजी होळकर व दत्ताजी शिंदे यांस फौजेनिशीं ठेवून, आपण व विठ्ठल शिवदेव व सखाराम भगवंतसुद्धां परत पुण्यास १ जिल्काद श्रावण शुद्ध ३ (१० आगस्ट १७५५) रोजीं दाखल झाले. चिंतो विठ्ठल बराबर होते. छ १३ माहे मोहरम सत्रा दिवस [२० आक्टोबर १७५५] भाऊसाहेब व नानासाहेब व विश्वासराव याप्रमाणें तिघे खासे सावनूरचे स्वारीस निघाले. बराबर विठ्ठल शिवदेव व नारो शंकर राजेबहादूर व भोसले, होळकर व नबाब यांजकडीलही फौज घेतली. मोठे जमावानिशीं निघाले. ही स्वारी करण्याचें कारणः--फ्रेंच लोकांचा सरदार बूसी याचे फौजेंत मुजफरखान नांमें सरदार होता. तो सन १७५०चे सुमारे पेशवे सरकारांत चाकरीस राहून कांहीं पलटणें कवायती तयार करी. पुढें यास कर्नाटकांत महादाजी अंबाजी पुरंदरे याजबरोबर पाठविला होता. त्यावेळेस कांहीं तंटा होऊन तो रुसून श्रीरंगपट्टणास गेला. तेथें कांहीं रोजगार मिळाला नाहीं. मग सावनूरकर यांचे पदरीं नोकरीस राहून कवाईत फौज तयार करून तोफा वगैरे सामान करूं लागला. हे वर्तमान पेशवे यांस कळतांच त्यांनीं त्या नबाबापासून त्यास आपलकेडे परत मागत असतां त्याणें त्यास परत दिल्हें नाहीं. मसलतीस घोरपडे गुत्तीकरही अनुकूल होते. स्वारी सावनुरास दाखल होऊन वेढा दिला. फौज पाठवून खालीं लिहिल्याप्रमाणें पेशवे यांणीं आपलीं ठाणीं बसविलीं. छ २८ रबिलावल रोजीं [१ जानेवारी १७५६] शहापूर व बेळगांव विठ्ठल विश्राम यांणीं फत्ते केल्याची खबर आली. याच महिन्यांत बागलकोटवर लढाई होऊन फत्ते झाली. महाल सरकारांत घेतला. छ २९ जमादिलावल रोजीं [१ मार्च १७५६] परगणें मिश्रीकोट घेतला. येणेंप्रमाणें महाल

घेऊन, सावनुरावर लढाई होऊन, सावनूरचा तट पाडून, किल्ल्यांत फौज शिरून, सावनूर किल्ला सर केला. त्यांत विठ्ठल शिवदेव यांनीं बहुत पराक्रम केला, सबब त्यांस चौघडा व जरीपटका व साहेबनौबत व जरीलगी अशीं राजभूषणें देऊन, पोषाख व जवाहीर वगैरे दिलें. या लढाईत विठ्ठलराव यांस तरवारीची जखम खवाट्यावर लागली होती. पुढें नवाब सावनूरकर शरण येऊन सल्ल्याचें बोलणें लाविल्यावरून एकंदर त्याचे मुलुखापैकीं निम्मे मुलूख त्याजकडे कायम ठेवून निम्मे पेशवे यांनीं खालीं लिहिल्याप्रमाणें महाल घेतले ते येणेंप्रमाणें:—१ परगणे कुंदगोळ, २ परगणे रायर हुबळी, ३ पेठ मजीदपूर, ४ परगणे मिश्रीकोट, ५ समत तडस, ६ अडती सोमापूर, ७ शेरवड सरदेशगत, ८ परगणे हुबळी, ९ समत कालघडगी, १० बेमीनीये देखील नेळीहरदी, ११ परगणे गदग, १२ सरदेसगत धारवाड, १३ परगणे लखमेश्वर, १४ परगणे मुलगुंड, १५ कसबे बेहट्टी, १६ कर्यात देवरहुबळी, १७ परगणे बागलकोट देखील ब्रीलदी, १८ उर्दीज बेटिगिरी, १९ कतीकटे देखील कटकीर, २० कसबे अमीनबाव, तळवई वगैरे, २१ तपे तडकोट, २२ कर्यात नरेंद्र, २३ तपे शिराळें, २४ तपे नवलगुंड, २५ छतीगीर मुरगोड, २६ कोयळी असोडी देखील करीकळे, २७ लुमेडी, २८ किल्ले हुळी, २९ तपे दोवळी, ३० कोळवड, ३१ परगणे अजमनगर, ३२ परगणे अजमनगर, ३३ परगणे पाच्छापूर, ३४ परगणे पाच्छापूर, ३५ परगणे संपगांव. येणेंप्रमाणें महाल आठ लक्ष रुपयांचे व शिवाय रोख आठ लक्ष रुपये खंडणी देणें ठरविली. पैकीं पांच लक्ष देऊन बाकी तीन लक्ष रुपयांस तारण किल्ला बंकापूर ठेवून पेशवे यांस सहा महिन्यांचे मुदतींत रुपये देऊं असा करार केला, परंतु रुपये आले नाहींत. किल्ला खंडणीऐवजीं सरकारांतच राहिला. याशिवाय किल्ले घेतले ते:—१ किल्ले रायद हुबळी, २ किल्ले केरूर देखील परगणा, ३ कसबे बेळगांव देखील किल्ला, याप्रमाणें पेशवे यांजकडे येऊन तह छ ५ साबान रोजीं [ ५ एप्रिल १७५६ ] जाला. नवाब सावनूरकर यांजकडे निम्मे आठ लक्षांचे महाल राहिले:—१ परगणे

कारडगी, २ समत निरबंगी, ३ परगणे हनगळ, ४ मासूर, ५ समत केरूर, ६ समत तिळवली, ७ राणेबिन्नूर, ८ कागनेळी, ९ अडाव, १० परगणे गुंतळ, ११ परगणे शिगांव, १२ परगणे हवेर, १३ बंकापूर, १४ उळपेनूर, १५ परगणे वेटहळ्ळी, १६ परगणे वेठबाव, १७ सावणी, १८ परगणें अहीरणी, १९ कसबे हनेगिरी, २० मौजे नसवी परगणे वावेली, २१ मौजे गंगोळी, २२ किल्ला परसगड देखील गांव, २३ गुडनूर परगणे भीडशिंगी, २४ परगणे मारब वगैरे गांव, २५ गोपनकोंग, परगणे रायर हुबळी, २६ कसबे इंगळहळ्ळी, २७ नागापूर, २८ मौजे हेचीजबाळ, २९ दोडवड, ३० मौजे केळनूर सोंधें. येणेंप्रमाणें नवाब यांचे वाटणीस महाल गेले. याशिवाय नवाबाकडील जहागीरदारांकडे परगणे पेटहळ्ळी व मोहोरबाळ, शिरकोळ व गुळागळे व शिरूर व किल्ला बंकापूर जहागीरदार अकरा हजारांचे नवाबाचेतर्फे आहेत, ते नवाबाचे वांटणीस आले. येणेंप्रमाणें सावनूरचे स्वारीचा शेवट होऊन स्वारी छ २० सवाल सबा खमसैनांत ( १९ जुलै १७५६ ) परत आली. ज्या मनुष्याचे निमित्तें ही स्वारी जाली तो मनुष्यही नवाब सावनूरकर यांणीं दूर केला. तो सलाबतजंगाकडे चाकरीस राहिला होता. त्या मुजफरखानानें पेशवे यांसी कबूल केलें कीं, इतःपर कृत्रिम न करितां इमानें चाकरी करीन. असें कबूल जाल्यावर पेशवे यांणीं त्यास चाकरीस ठेविला. कोंकणप्रांतीं आंग्रे यांजकडील किल्ले व मुलूख घेण्याविषयीं इंग्रेजांचें साहाय्य मागून खमसखमसैनांत सुवर्णदुर्ग घेऊन इंग्रेजानीं पेशवे यांस दिल्हा. पुढें काम तसेंच राहिलें. या सालीं परजन्य लागल्यावर इंग्रेजांनीं विलायतेहून मोठमोठीं जहाजें आणिलीं, व विजयदुर्ग घ्यावयास निघाले. मराठी फौज दुसरे कित्येक किल्ले घेऊन इंग्रेजांची वाट पहात बसली. इतक्यांत तुळाजी आंग्रे याणें बोलणें लाविलें कीं, किल्ल्यांत द्रव्य आहे, तें सर्व आपणास मिळेल, इंग्रेजांस युक्तीनें परत लावावें. हें वर्तमान इंग्रज सरदारास कळतांच त्यानें लढाई आरंभिली. पेशवे यांचे फौजेचे व किल्लेकरी यांचे दरम्यान छावणी केली. किल्ल्यास वेढा घातला. रामाजी महादेव यांणीं किल्ल्यावर जाण्याची बहुत मेहनत

केली; परंतु सिद्धीस न जातां इंग्रजांचे हातीं किल्ला गेला. दहा लक्ष रुपये सांपडले. पेशवे यांशीं वांटणी न देतां सर्व आपणच घेतले; आणि विजयदुर्ग किल्ला आपणाकडे असावा व बाणकोट पेशवे यांस द्यावें अशी तजवीज योजिली. पेशवे कर्नाटकांतून आल्यावर १२ अक्टोबर १७५६ रोजीं इंग्रेजाशीं असा तह ठरला कीं, बाणकोट व त्याखालील मुलूख इंग्रेजांनीं ध्यावा व विजयदुर्ग पेशवे यांजकडे असावा. मराठे सरदारांनीं किल्ले घेतले त्याचीं वर्तमानें:—छ ५ मोहरम [ १२ अक्टोबर १७५५ ] भवाळगड फत्ते जाल्याचें वर्तमान आलें. छ २५ रबिलावल [ २९ डिसेंबर १७५५ ] खारेपाटणची गढी फत्ते जाल्याचें वर्तमान आलें. छ १७ रबिलावल [ २१ डिसेंबर १७५५ ] अनवाळें घेतल्याची बातमी आली. छ ८ रबिलाखर [ ११ जानेवारी १७५६ ] राजापूर घेतल्याचें वर्तमान आलें. छ २१ रबिलाखर [ २४ जानेवारी १७५६ ] गोवळकोट लढाई होऊन फत्ते जाला. छ ४ जमादिलावल [ ५ फेब्रूवारी १७५६ ] गोवळकोट वगैरे महाल सरकारांत घेतल्याचें पत्र रामाजी महादेव यांजकडून आलें. छ ११ जमादिलाखर [ १३ मार्च १७५६ ] रसाळगड फत्ते झाल्याची बातमी आली. छ ३ जमादिलाखर [ ५ मार्च १७५६ ] रत्नागिरी फत्ते जाल्याची बातमी आली. छ १९ जमादिलाखर [ २१ मार्च १७५६ ] विजयदुर्ग फत्ते जाल्याचें वर्तमान आलें. कांहीं दिवस इंग्रजांकडे राहिला. छ ११ व छ २१ जमादिलावल [ १४ व २४ जानेवारी १७५६ ] रामगड घेतल्याचीं पत्रें आलीं. तुळाजी आंग्रे यास धरून विसापूर किल्ल्यावर कैदेंत ठेविलें. छ १ जिल्काद [ १० आगस्ट १७५५ ] नारायणराव जन्मले. कन्यारास, श्रावण शुद्ध ३ रविवार. जानकीबाई दादासाहेब यांची बायको बाळंत होऊन वारली. छ १३ जिल्काद श्रावण वद्य १, पुत्र जाला होता. गोपाळराव बर्वे यांची बहीण. छ ४ सफर [ ९ नोव्हेंबर १७५५ ] चाकण किल्ला फत्ते झाल्याचें वर्तमान आलें. छ १३ रबिलावल [ १७ डिसेंबर १७५५ ] गळगलें येथें दादासाहेबांचें दुसरें लग्न जालें. गाग-

शीर्ष शुद्ध १४. राघो महादेव ओक यांची कन्या नांव आनंदीबाई. छ ४ रबिलावल [ ८ डिसेंबर १७५५ ] सगुणाबाई यात्रेस गेली. पर्वतीचे तळ्यास काम लाविलें. छ २३ सफर मुतालिकीची शिकेकटार परत आली. मुर्शिदाबादचा नवाब अलीवर्दीखान मेला. त्याचा नातू-मुलीचा मुलगा-मिर्झामहमद सिराजउद्दवला गादीवर बसला. बुंदीचा राजा मेला. त्याचा मुलगा लहान, सबब पितृव्य पुत्र गादीवर बसूं देईनां, राजाच्या बायकोनें शिंद्यांची मदत मागितली. त्यांनीं प्रतिस्पर्ध्यास कैद करून, मुलास गादीवर बसविलें. पाऊण कोट रुपये खंडणी घेऊन शिंदे माघारे निघाले. श्रीगोंद्यास श्रीमंत भेटीस आले. अर्धे मारवाड काबीज केलें तें त्यांजकडे दिलें. त्यांत कोणाची वांटणी नाहीं. जनकोजीस सरदारी शिकेकटार दिली. महादाजी अंबाजी व त्र्यंबकराव सदाशिव पुरंधरे यांचे सरंजाम वांटणीविषयीं छ ११ साबान [ ११ एप्रिल १७५६ ] रोजीं सनदापत्रें झालीं.

## सु॥ सबा खमसैन मया व अलफ सन ११६६ फसली, अव्वल साल छ ५ रमजान, ४ मे १७५६, ज्येष्ठ शुद्ध ६ शके १६७८.

छ १० जमादिलाखर ( १ जानेवारी १७५७ ) श्रीमंत नानासाहेब व भाऊसाहेबसुद्धां श्रीरंगपट्टणचे स्वारीस तोफखाना वगैरे फौजेसहित निघाले. कर्नाटकांत जाऊन संस्थानिकांकडील खंडण्या किरकोळ घेणें त्या घेऊन पुढें श्रीरंगपट्टणास गेले. तेथें हैसूरचा राजा याचा दिवाण त्यावेळेस नंदीराज असतां श्रीमंतांनीं मोर्चे लावून सत्तावीस दिवस तोफांचा मार पठाणावर झाला. भाऊसाहेब मोर्चांत होते. रंगस्वामीचे देवालयाचे शिखरास गोळा घालून तोफा फुटून माणसें जाया झालीं. नंतर पठाणापासून खंडाचें बोलणें लागलें. दरम्यान महादशेट वीरकर, सरकारचे शेटे मध्यस्थ होते, त्यांचे विद्यमानें खंडणी छत्तीस लक्ष ठरली. तह होऊन त्यापैकीं पांच लक्ष रोख घेऊन बाकी ऐवज फिटेतोंपर्यंत महाल लावून घेतले होते. नंतर पेशवे यांचे मनांत आलें कीं, पूर्वीं

मराठ्यांकडे जितका मुलूख होता तितका घ्यावा. त्याप्रमाणें स्वारी करून छ ३ रज्जब रोजीं [ २४ मार्च १७५७ ] चिनापट्टण घेतलें. शिरें परगणाही घेऊन पर्जन्यकाळ जवळ आला, सबब बाकी राहिलेले परगणे हुसकोटा व बेंगरूळ व बाळापूर व कान्हेर हे परगणे घेण्याकरितां त्या प्रांतीं कांहीं फौज बळवंतराव गणपत मेहेंदळे यांजपाशीं ठेवून, छ २७ साबानास [ १६ मे १७५७ ] मुतालिकी शिक्का त्यास देऊन परत पुण्यास निघाले. तुंगा व कृष्णा नदीस पूर असतां यांनीं वाट दिली, हें कौतुक सर्वांच्या दृष्टीस पडलें. मजल दरमजल २७ दिवसांत पुण्यास आले. परत येतांना बेळगांवचा किल्ला नबाब सावनूरकर यांणीं तहांत पेशवे यांस लावून दिला होता, परंतु तो किल्ला इसुफ बेग किल्लेदार याजकडे होता तो हस्तगत करून घेण्याकरितां बेळगांवास येऊन, छ १४ साबानास ( ३ मे १७५७ ] किल्ला सर केल्याची खबर लागतांच तेथील बंदोबस्त करून किल्लेदार यास किल्ला घेतेसमयीं कांहीं गांव देण्याचें कबूल केलें होतें, त्याप्रमाणें कसबे हुकेरी हा गांव या सालीं दिला; परंतु पुढें चिकोडी मनोळी तालुके करवीरकर संभाजी राजे यांची राणी जिजाबाई साहेब यांस अर्बा सितैनांत दिले, त्यांत हुकेरी हा ठाण्याचा गांव होता तो त्याजकडे गेला, सबब त्याचे मोबदला त्याचे चिकोडी तालुक्यांतले मौजे बलतवाड व गोडवाड व मसरमुदी हीं तीन गांवें त्या हुकेरीच्या आकाराचे मानानें त्यास दिले. ते आजपर्यंत याचे वंशजांकडे चालत आहेत. बेळगांव किल्ला घेऊन पुढें मजल दरमजल स्वारी पुण्यास रमजान महिन्यांत आली. जनार्दन बल्लाळ फडणीस वृद्ध झाले, सबब त्यांचे पुत्र बाळाजी जनार्दन ऊर्फ नाना फडणीस यांजकडे फडणीशी छ ६ रबिलावल, मार्गशीर्ष शुद्ध ८ सोमवार [ २९ नोव्हेंबर १७५६ ] सांगितली. पुढें लवकरच जनार्दन बल्लाळ वारले. मुलतान व लाहोर प्रांत इराणी बादशहाकडून सन् खमस खमसैनांत परत दिल्लीचा वजीर शाबुद्दीन यांणीं घेतले. नंतर दुसरे वर्षी पुनः त्या इराणी बादशहानें परत घेऊन स्वारी करून दिल्ली शहर घेऊन नजीबउद्दवला यास तेथें ठेवून आपण माघारा आपले जागीं गेला. दिल्ली पुनः परत

घेतल्याचे कामास श्रीमंताकडे त्या वजीरानें साहाय्य मागितल्यावरून पुण्याहून सफर ( नोव्हेंबर १७५६ ) महिन्यांत दादासाहेब या लाहोरच्या स्वारीस निघाले. त्यांजबरोबर विठ्ठल शिवदेव वगैरे फौजेचे सरदार होते. तेव्हां विठ्ठल शिवदेव यांस ती कामगारी दादासाहेब यांणीं सांगितल्यावरून त्यांणीं दिल्ली शहर इराणी बादशहाकडील नजीबउद्दवल्याचे ताब्यांत होतें तें घेऊन त्याजवर हल्ला चालविला. तो पळून रोहिलखंडांत गेला. दिल्ली शहर बादशहाचे ताब्यांत आल्यावर बादशहा खुष होऊन विठ्ठल शिवदेव यास पोषाख व जवाहीर व मोर्चे वगैरे देऊन राजे उमदे उलमुलूख बहादर असा किताब देऊन शिवाय चांदवड तालुक्यापैकीं विंचूरसुद्धां पांच गांव व मनमाड परगणे पांटोदे व दहिवड परगणे वडदरी व चादार परगणे नाशिक व करंजी परगणे कुंभेरी अशीं नऊ गांवें इनाम दिलीं. यावेळेस दादासाहेबांचा तळ दिल्लीवरच सरदारासुद्धां राहिला होता. शिवनेर किल्ला पुण्यानजीक जुन्नराजवळचा महंमद अलमखान किल्लेदार मोंगलाकडील याचे ताब्यांत होता. तो हा एकच किल्ला मोंगलाकडे राहिला. तो आपल्याकडे असावा अशी बाजीराव बल्लाळ याचे वेळेपासून तजवीज चालली होती; परंतु लढून हस्तगत होण्यासारखा नाहीं. मोठा मजबूत होता. सबब किल्लेदार याशीं उद्धव वीरेश्वर चितळे याचे विद्यमानें बोलणें लावून त्यास जागीर वंशपरंपरेनें देण्याचें ठरवून किल्ला सरंजामाचे महालसुद्धां घेतला. जहागीर चाळीस हजारांची बाल्हें वगैरे गांव व नगर जिल्ह्यापैकीं कांहीं गांव असे त्यावेळेस दिले होते; परंतु त्यापैकीं बहुतेक गांव पेशवे यानीं परत घेतले. एक कसबा बाल्हें हा गांव त्याचे वंशिकांकडे चालत आहे. या सालापासून शिवनेर तालुका असा निराळाच केला. साल गु॥ शीत खमसैन सालीं नबाब सावनूरकर याजवर स्वारी झाली. तें कार्य करून या सालांत अवल सालीं छ २० सवाल रोजीं ( २० जुलै १७५६ ) पुण्यांत आल्यावर, विजयदुर्ग किल्ला इंग्रजांनीं घेतला होता, तो इंग्रजांकडून सरकारांत घेऊन, बाणकोट व त्या खालील गांव हे इंग्रजांस दिले. याची हकीकत मागील सालांत तपशीलवार लिहिली

आहे. सदाशिव रामचंद्र यांस खंत्रायतकर मोंगल याजवर पाठवून त्यानीं अमदाबाद घेतली होती ती परत घेतली. वजीर मीर शाबुद्दीन ऊर्फ गाजुदीन याचे पदरीं नजीफखान प्याद्याची जमादारी करीत असे व पुढें शिलेदार होऊन मोठा प्रसिद्ध होऊन त्यास अंतर्वेद सुभा सांगितला होता.

अहमदशाहा बादशाहाची स्त्री मलका जमानी व कन्या चंदाजमानी सिलीमगडावर अटकेंत होत्या. त्यांस अन्नवस्त्र बरोबर न मिळे. त्यांनीं कंटाळून असा विचार केला कीं, आपले भ्रताराकडे समुद्रवलयांकित पृथ्वीचें आधिपत्य होतें, असें असून आपण असें कारागृहांत राहणें ठीक नाहीं, याचा बंदोबस्त करणार पराक्रमी एक नजीबखान रोहिला आहे, त्यास आणण्याविषयीं गुप्त रीतीनें खोजास पाठवून, त्यास आणवून, त्याचे विचारें असें ठरलें कीं आपली मुलगी चंदाजनानी ही कंदाहारचा बादशहाचा पुत्र तेमुरशा हा यास देऊन त्यास येथील बादशाहा करावा व अयोध्याचा नबाब मनसूरअल्ली ऊर्फ सफदरजंग पूर्वी महंमद बादशाहाचे वेळेस वजीरी करीत होता त्याचा पुत्र सुजायतदौला यास वजीरी द्यावी, असा शपथपुरस्कर विचार ठरवून नजीबखान यानें आपला भाऊ सुलतानखान यास अबदालीकडे पाठवून त्यास आणविलें. तो येतांच दिल्लीस अंताजी माणकेश्वर गीर्दनवाईवर होता, त्याजवळ फौज थोडी होती. तो पळून गेला. मग दिल्ली शहर लुटलें. बादशहास कैद केलें. दिल्लींत कत्तल करून अठरा हजार मनुष्यें मेलीं. करारा-प्रमाणें चंदाजमानीस अबदालीचा पुत्र तेमूरशहास दिली. गाजुद्दीनखान वजीर यास कैद करून बराबर घेऊन कुरुक्षेत्रावर हल्ला केला. तें क्षेत्र लुटलें. नंतर मथुरेसही अशीच गर्दी करून गोघाटीं उतरले. तेथें गाजुद्दीनखान अटकेंत असून त्याचा डेरा यमुनेच्या कांठीं होता. नदीस पाणी फार यामुळें त्या गाजुदीनखान याजवरील पहारेकरी असावध राहिले. गाजुदीनखान स्नास पोहतां येत होतें त्यानें ती संधि पाहून यमुनेंत उडी टाकिली. पोहत पोहत सात कोस आग्रा येथें

किल्लेदार याजजवळ येऊन त्यास जीव वांचविण्याविषयीं बहुत आर्जव केल्यावरून त्यास किल्लेदार यानें किल्लयांत घेतलें. तो किल्ला अकबर बादशहाचे वेळचा किमयेच्या द्रव्यानें बांधलेला होता. त्याजवर तोफा वगैरे लढाऊ सामान बहुत होतें. गाजुद्दीन पळाला ही खबर कळतांच अबदाली व नजीबखान आग्रा शहरावर निघाले. किल्लेदार याणें आग्रा शहरचे लोकांस ताकीद करून लोक बाहेर काढिले. अबदाली व नजीबखान आग्रा येथें दाखल होतांच किल्लेदारानें चारशें तोफांची सरबत्ती चालविली. किल्ला हातीं येणें कठीण. गाजुद्दीन याजवर प्रसंग पडला याजमुळें पेशवे दादासाहेब फौजेसुद्धां व मल्हारजी होळकर इकडे येण्यास निघून नर्मदापार येत आहे अशी खबर ऐकून अबदाली वगैरे फौज तेथून परतून कुंभेरीस सुरजमल्ल जाटावर गेले. पेशवे यांची फौज येत आहे, यामुळें विशेष तसदी न देतां दहा लक्ष रुपये खंडणी घेऊन दिल्लीस आले. नजीबखान याचे विश्वासावर येथें राहणें बरोबर नाहीं, ह्मणून फक्त पांच हजार फौज नजीबखान याजपाशीं दिली. ती ठेवून पेस्तर बंदोबस्त पाहूं असें पानावर पान टाकून अबदाली सरदेस येऊन तेथें समदखान मताबखान याजपाशीं दहा हजार फौज व मलका जमानी व चंदा जमानी व तेमुरशा यांजपाशीं वीस हजार फौज ठेवून आपण कंदाहारास गेला. मागाहून दादासाहेब मोठमोठ्या मजला करीत आग्रा येथें जाऊन, गाजुद्दीन यास सोडवून घेऊन दिल्लीस गेले. नजीबखान दिल्ली किल्लयांत कोंडला. नंतर तो मल्हारजी होळकर यास शरण आला. होळकर याचे भिडेस्तव त्यास होळकर याचे जिमेस दिला. आलमशा बादशहास पुन्हा दिल्लीतक्तावर बसवून अंताजी माणकेश्वरास गीर्दनवाई सांगितली. नंतर कुरुक्षेत्रास येऊन सरदेस जाऊन समदखान यास लुटून फस्त केला. पुढें लाहोरास गेले. तैमुरशा पळून गेला. फौज लुटली. तेथील सुभा पूर्वी संदीपबेग होता. याचा पुत्र दुराणीनें मारला. स्त्री पुत्र अटकेंत होतीं. तीं सोडून त्यास चाकरीस ठेवून पांच हजार फौज देऊन त्याजकडे सुभा सांगितला. त्याचा कारभारी कायस्थ लक्ष्मीनारायण

होता. मल्हारजी होळकर यांणीं नजीबखाचें अगत्य धरून त्यास आपलेतर्फे अंतर्वेद प्रांत कुरुक्षेत्रापासून कुंजपुरादेखील चाळीस लक्षांची मामलत त्याचे स्वाधीन केली. २१ जुलई सन १७५६ सुराजउद्दवला मुर्शिदाबादेहून येऊन कलकत्ता शहर व किल्ला घेतला. गव्हरनर व कमांडर चीफ् पळून गेले. १४६ इंग्रज २० फुटांचे कोठडींत कोंडले होते. २० जून रोजीं १२३ मेले. बंगाल, बहार व ओरिसा अल्ली-वर्दीखान याजकडे होते. तो मेला. सन १७५६ त त्याचा नातू सुराजउद्दवला गादीवर बसला. १ फेब्रूवारी सन १७५७ सुराजउद्दवला व क्लैव्ह साहेब यांचा तह झाला. क्लाइव्ह साहेबानें कलकत्ता घेतला. २ जानेवारी सन १७५७. फ्रेंचांचें चंद्रनगर घेतलें, ६ फेब्रूवारी सन १७५७.

## सु॥ संमान खमसैन मया व अल्लफ, सन ११६७ फसली, अवलसाल छ १७ रमजान, ५ मे १७५७, ज्येष्ठ वद्य ३ शके १६७९.

सालगुदस्त श्रीमंत कर्नाटकाहून येतेसमयीं बळवंतराव गणपत मेहेंदळे यांस छावणीस ठेवून कांहीं मुलूख सर करण्यास सांगितलें होतें. त्यांणीं कर्नोळ व कडपेकर नबाब याशीं लढाई करून सर केले. याज-बद्दल छ ९ सफरीं [ २३ अक्टोबर १७५७ ] पत्र आलें आहे. शिवाय हुसकोट परगणाही कडपेकराकडून घेतला, व तो नबाबही त्या संधींत मयत झाला. पुढें त्याजकडील लोकांनीं मेहेंदळ्याशीं लढाई करून मुलूख त्याचे हातीं लागूं दिला नाहीं. अर्काटचा नबाब याणें चौथाई व सरदेशमुखीबद्दल दोन लक्ष रुपये रोख व अडीच लक्ष रुपये वसुली इतका मुलूख लावून दिला. त्या नबाबानें लबाडी करून पैसा न द्यावा असें कृत्य आरंभिलें; परंतु शेवटास न जातां कराराप्रमाणें देणें भाग पडलें. पेशवे यांची स्वारी सालगुदस्त परत देशीं आल्यावर मागें म्हैसूरचे दिवाण यांनीं खंडणींत जो मुलूख लावून दिला होता तो परत घेतला. हें वर्तमान पेशवे यांस कळतांच मेहेंदळे यांचे मदतीस

गोपाळराव गोविंद पटवर्धन यांस फौज देऊन कर्नाटकांत पाठविलें. त्यांनीं मंगळुरास वेढा घातला. तेव्हां मुख्य कारभारी हैदरअल्लीखान होता. त्यानें पहिल्या कराराप्रमाणें राहिले खंडणीचा पैसा रोख व सोनें देऊन बाकी रुपयांच्या हुंड्या देऊन खंडणीचा निकाल करून आपले महाल परत घेतले. त्यांची वहिवाट करूं लागला. गोपाळराव गोविंद पुढें आणखी मद्रासेकडे गेले होते; परंतु त्यांस मोंगलाईंत विश्वासराव याजबरोबर जाण्याकरितां परत बोलाविल्यावरून परत पुण्यास आले व बळवंतराव मेहेंदळेही परत आले. यांजकडील मुतालकी शिक्का छ ८ सवाल ( १९ जून १७५८ ) तिसा खमसेनांत परत आला. छ ११ जिल्हेज रोजीं ( २७ आगष्ट १७५७ ) विश्वासराव यांची स्वारी मोंगलांवर औरंगाबादेस निघाली. बरोबर जनकोजी व दत्ताजी शिंदे, मोरो बाबूराव व महादाजी अंबाजी पुरंदरे, दमाजी गायकवाड, समशेरबहाद्दर वगैरे सरदारसुद्धां गेले. तेव्हां सलाबतजंग व बसालतजंग व निजाम अल्लीखान अवरंगाबादेस होते. त्यांशीं दोन तीन महिने लढाई चालत होती. रामचंद्र जाधवराव दोन हजार फौजेनिशीं नबाब याजकडे भालकीहून येत होते. हें कळतांच विश्वासराव यांनीं दत्ताजी शिंदे यास त्याजवर पाठविलें. तेव्हां सरकारचें ठाणें सिंधखेडास होतें. शिरले. दत्ताजी शिंदे यांनीं ठाण्यास मोर्चे देऊन बसविले. तेव्हां निजामअल्ली फौजसुद्धां जाधव यास घेऊन येण्याकरितां चालले. त्याजवर खुद्द विश्वासराव चालले. डावबाव पाहून लढत होते. नबाबांनीं सिंधखेडास जाऊन खासा अंबारी सिंधखेडचे दरवाजाजवळ ठेऊन जाधव यास ठाण्यांतून काढून खासे अंबारींत घेऊन त्याची फौज बाहेर काढून माघारे फिरविले. त्या दिवशीं लढाईचें तोंड लागून दीड प्रहर मातबर लढाई झाली. या लढाईंत दत्ताजी शिंदे यास जखम लागली होती. शेवटीं नबाब शिकस्त होऊन पंचवीस लक्षांची जहागीर पेशवे यांस देऊन सल्ला केला. नळदुर्ग किल्ला पेशवे यांनीं घेतला. विश्वासराव यांजवर निजामअल्ली व विठ्ठल सुंदर चालून आले. हें वर्तमान पुण्यांत श्रीमंतांस कळतांच भाऊसाहेबसुद्धां

सफर महिन्यांत निघून नाशिकास जाऊन गंगास्नान करून नगरास फराबागेंत राहिले होते. पुढें श्रीमंत विश्वासराव यांजला कर्नाटकांत असतां छ २१ रबिलाखर रोजीं [ २ जानेवारी १७५८ ] अंबेड-नजीक भेटी होऊन त्या दिवशीं स्वारी एकत्र झाली. भगवंतराव रामखेडकर व देवजी नागनाथ वकील याचे विद्यमानें नबाब श्रीमंताचे भेटीस आले. नंतर निजाम परत आपले ठिकाणीं गेले. श्रीमंत साकरखेडल्याकडून त्र्यंबकेश्वराकडे रज्जब महिन्यांत [ एप्रिल १७५८ ] गेले. या लढाईंत प्रथम निजामाकडील व्यंकटराव निंबाळकर यांचे मेहुणे नागोजी माने म्हसवाडकर व जनकोजी शिंदे यांचे साडू ठार झाले. दत्ताजी माने यांचे पुत्र व्यंकटराव माने यांची बहीण जनकोजी शिंद्यास दिली होती. लढाई आटोपल्यावर जनकोजी शिंदे उज्जनीस गेले व दत्ताजी शिंदे चांभारगोंद्यास लग्ना-करितां गेले. जनकोजी शिंदे पुढें बुंदिवाड्यांत जाऊन हरगडास लागले. गुमानसिंग गिराशी पळून गेला. त्या युद्धांत बाळोजी शिंदा शिंद्याकडील पडला. खेचींवाडा, राजगड, पाटणा, बुंदिकोट, खंडण्या घेऊन जयनगर माधवसिंग याजपासून वीस लक्ष रुपये खंडणी घेऊन, उदेपूरचे राणोजी याचे राज्यांत शिरले. शिवपुरीचे गढीस लागले. तेथील राजास धरून उदेपूरचे राणोजी यांचें व त्यांचें एकत्र करून, वीस लक्ष रुपये खंड घेतला. लाहोराकडील वर्तमानः--- अदीनाबेग याजकडे लाहोर व मुलतानचा सुभा होता. त्यास धरावयास अबदालीचे लोक आले. तेव्हां दादासाहेब यांस अदीनाबेगानें निरोप पाठविला कीं, यासमयीं आपण माझें साहाय्य करून मुलूख आपण घ्यावा. त्याजवरून दादासाहेब यांचा तळ तेवेळेस नजीकच दिल्लीस होता, तेथून एकदम चैत्रमासीं लाहोरास येऊन, अबदालीचे लोक आले होते त्यांस हांकून देऊन, त्या अदीनाबेगाकडेच लाहोर मुलतानचा सुभा कायम करून, त्याचे रक्षणाकरितां आपली कांहीं फौज तेथें ठेविली. जनकोजी शिंद्यास रजपूत लोकांकडील खंडणी घेण्याचे कामास व लाहोर येथें ठेविलेले फौजेसही कुमक करण्यास सांगितलें. माळव्याचा

बंदोबस्त राखण्यास मल्हारजी होळकर व दत्ताजी शिंदे यांस ठेवून आपण पुण्याकडे परत निघाले. ते तिसा खमसैनांत दसऱ्याकरितां परत आले. या सालीं विश्वासराव यांचे बायकोचें गर्भादान झालें. टोळधाड आली. आश्विन व॥ ४ टोक्यास व घोमास भूमिकंप झाला. ३१ आक्टोबर, त्रिचनापल्लीस फ्रेंच यांणीं वेढा घातला होता तो इंग्रजांनीं तोडून महमदअल्लीचा पक्ष धरिला. परगणे उदेले हा महाल जवारकर राजाकडील सरकारांत येऊन वसई तालुक्याखालीं वहिवाटीस ठेविला.

## सु॥ तिसा खमसैन मया व अलफ, सन ११६८ फसली, अवलसाल छ २८ रमजान, ९ जून १७५८, वैशाख वद्य ३० शके १६८०.

दादासाहेब लाहोराहून देशीं येतांना मारवाडांत जनकोजी शिंद्याची गांठ पडली. त्यास आज्ञा केली कीं, मल्हारराव होळकर याचे भिडेनें नजीबखान याचें पारपत्य झालें नाहीं, आह्मी देशीं जातों, तुह्मीं कसेंही करून त्याचें पारपत्य करावें, मारून टाकावें. असें सांगितलेनंतर पुण्याकडे येतांना दत्ताजी शिंदे लग्न उरकून उज्जनीस जात असतां त्यांची गांठ पडली. त्यांसही सदरहूप्रमाणें पारिपत्य करण्याविषयीं आज्ञा झाली. दादासाहेब दसऱ्याकरितां पुण्यास दाखल झाले. खंडेराव हत्ती वीज–गजाबरोबर लढण्यास आणिला. दादासाहेब देशीं आल्यावर मागाहून मल्हारजी होळकर व जनकोजीचें वांकडें पडल्यामुळें त्यास भेटण्यास आले. भेटी झाल्या. मल्हारजीनें नजीबखान याचे हातें भागीरथीस पूल बांधून सुजायतउद्वला यावर जावें असें सांगितलें, तें जनकोजीस बरोबर वाटलें नाहीं. पुनः असें सांगितलें कीं, नजीबखान एक हिंदुस्थानांत आहे, त्याचें पारपत्य केल्यास पेशवे जासूदाबरोबर अटकेपर्यंत वसूल आणतील, मग आपण काय करावें? असें सांगून आपला पालक पुत्र तुकोजी याजबरोबर वीस हजार फौज देऊन, शिंद्याजवळ जाऊन, मल्हारराव देशीं आले. येतांना उज्जनीस दत्ताजी शिंद्याची गांठ पडली. त्यासही नजीबखान याचे हातें भागीरथीस पूल बांधून

सुजातद्वला यावर जावें, अशी मसलत दिली. ही त्यास मानवली. विठ्ठल शिवदेव यासही याप्रमाणें सांगितलें. तें दत्ताजीचे मनांत ठसलें. छ ६ तागायत छ ९ सवाल ज्येष्ठ शु० १० शुक्रवार [ १३–१६ जून १७५८ ] पर्वतीस विष्णूची स्थापना झाली. छ १६ तागायत छ २२ रमजान [ २४–३० मे १७५८ ] शकुन्तेश्वराची स्थापना वडगांवावर झाली. धरणीकंप शांत झाला. दादासाहेब यांची स्वारी पुळ्याच्या गणपतीस गेली होती, तीं फाल्गुनांत परत आली. रंगाचा सभारंभ मोठा केला. सदाशिव पेठेस नवीन वस्ती होत आहे. नारायणराव यांचें नांव नारायण पेठेस ठेविलें. पुण्यास चिरेबंदी कुसूं घालण्याचा कारखाना चालला आहे. छ २७ साबान ( ६ मे १७५८ ) सचिवपंत यांजकडे वसूल देत असतां तो सदाशिव रघुनाथ यांजकडे देणें ह्मणून कळलें व जमीनदारास पत्रें छ २० साबान [ २९ एप्रिल १७५८ ] बयाबाई आंबेकरीण मयत झाली, चैत्र वद्य ७ गुरुवार [ १९ एप्रिल १७५९ ]. ताई मृत्यु पावली, कार्तिक वद्य १३ रोज सोमवार [ २७ नोव्हेंबर १७५८ ]. छ २९ रबिलाखर पर्वतीवर दरवाजास तट बांधून १८ लक्ष रुपये देकार झाला. ऐशीं हजार ब्राह्मण जमले होते. छ सवाल ( १९ जून १७५८ ) नाना पुरंदरे व बळवंतराव मेहेंदळे यांजकडून मुतालिकी शिके परत आले. फ्रेंच लोकांनीं फोर्तसेंतदेवीद घेतलें ता० २८ एप्रिल ते पावलिकूपर्यंत घेतलें. ता० १७ फेब्रूवारी सन १७५९ इसवी. याच सालीं बाबाभाई राजे संस्थान परगणे हवेली नगर हमाईन वसई तालुक्यांत आला, छ २१ रज्जबचे सनदेवरून. मानाजी आंग्रे यास वजारत माआब व सरखेलपणाचीं वस्त्रें दिलीं होतीं. ते वारले. सबब राघोजी आंगे यांस वजारत माआब व सरखेची वस्त्रें दिलीं.

**सु॥ शितैन मया व अलफ, सन ११६९ फसली,**
**अव्वलसाल छ ९ सव्वाल, ५ मे १७५९,**
**ज्येष्ठ शुद्ध १० शके १६८१.**

अहमदनगरचा किल्ला मोंगलाकडून कवीजंग किल्लेदार याजकडे होता. तो पुण्यानजीक, मजबूत, सरकारांत असावा अशी खटपट बहुत दिवस

मनांत होती. परंतु हा किल्ला हातीं येणें महत्प्रयास. त्याकरितां कांहींतरी किल्लेदाराशीं राज्यकारण केल्याशिवाय किल्ला हस्तगत होणार नाहीं. हा विचार करून किल्लेदार यास किल्ला गोळी न वाजतां सरकारांत तुह्मी दिल्यास वंशपरंपरें पन्नास हजारांची जहागीर देऊं अशी कराराची यादी शपथ बेलभंडारा देऊन ठरविली. त्याजवरून कवीजंग यानीं किल्ला या सालीं सरकारांत दिला, व त्यास कराराप्रमाणें जहागीरही पेशवे यांनीं पन्नास हजारांची दिली. छ १८ रमजान रोजीं ( १६ मे १७५९ ) पा। लखमेश्वर प्रांत कर्नाटकपैकीं शिरहट्टी किल्ला व त्याखालील मुलूख लखमगौडा देसाई याजकडे होता. तो सरकारांत घेऊन देसाई व त्याचे पदरचे कारकून यांस कांहीं जमीन गांवगन्नापैकीं व नक्त नेमणूक दमगी वगैरे चार गांव असे दिले, ( ५ मे १७६० ) सोमवारीं. जंजिरेकर हपशी यानें बिघाड करून कोंकणप्रांतीं स्वार पाठवून उपद्रव करूं लागला. सबब याजवर रामाजी महादेव व शंकराजी नारायण व माणकर यांस पाठवून पारपत्य करून त्याजकडून उंदेरी किल्ला छ १० जमादिलाखर रोजीं ( २९ जानेवारी १७६० ) सरकारांत आला. या कामीं आंग्रे यांनीं बहुत कुमक केली. मानाजी आंग्रे यांनीं कुमक केली. सोमवारीं घेतला. छ ६ रबिलावल रोजीं ( २८ आक्टोबर १७५९ ) भाऊसाहेब डेऱ्यांत असतां मुजफरखान याचा जांवई यानें डेऱ्यांत शिरून भाऊसाहेब यांजवर हत्यार चालविलें. इतक्यांत जवळ लोक होते त्यांनीं त्यास धरिलें. विशेष जखम लागली नाहीं. तो हें कृत्य करण्यास मुजफरखान यानें सांगितलें ह्मणून बोलला, व त्याप्रमाणें मुजफरखान यानेंही कबूल केलें. त्या दोघांचा शिरच्छेद तेच वेळेस केला, व रामचंद्र नारायण परभु कोणी त्या मसलतींत होता त्यासही धरून आणून किल्ल्यावर टाकिलें. नगरचा किल्ला कवीजंग किल्लेदार यानें पेशवे यांस अनकूल होऊन त्यांस दिला. ही खबर सलाबतजंग व निजामअल्ली यांस समजतांच त्यांनीं फौज किल्ला परत घेण्याकरितां तयार करून धारूरास पाठविली, व आपणही मागाहून सात हजार फौजेनिशीं धारूराकडे निघाले. हें वर्तमान पेशवे

यास कळलें. श्रीमंत व भाऊसाहेब व दादासाहेबसुद्धां स्वारीस निघाले. बरोबर फौज घेऊन निघाले. सबब उदगीरनजीक गांठले. लढाई झाली. त्यांत पेशवे यांचा कांहीं मोड झाला; परंतु छ १९ जमादिलाखर रोजीं ह्मणजे ( ३ फेब्रूवारी १७६० ) उदगीर मुक्कामीं जी लढाई झाली, त्यांत नबाब अगदीं शिकस्त होऊन दहा हत्ती व चार तोफा आल्या. शेवटीं तह होऊन पेशवे यांनीं नगर किल्ला घेतला. तो त्यांजकडे कायम राहून, शिवाय दौलताबाद व शिवनेर, जुन्नर, अशीरी व विजापूर येथील किल्ले सालेर मुल्हेर हे पेशवे यांस द्यावे. बासष्ट लक्षांची जहागीर देण्याची कबूल करून नबाब परत आपले जागीं गेले. श्रीमंत नानासाहेब व दादासाहेब परत पुण्यास आले. हिंदुस्थानाकडील वर्तमान :— जनकोजी शिंदे मारवाडाकडील बंदोबस्त करून रेवडीवर जाऊन पोहोंचले. तेथें दत्ताजीही जाऊन पोहोंचले. पुढें दिल्लीस जाऊन गाजुद्दीखान वजीर याचें व त्याचें बनेना. कारण यास नजीबखानाचा पक्ष धरण्याचा होता. पुढें कांहीं तोफा दिल्लीस होत्या, त्या गाजुद्दीन याजपाशीं मागितल्या असतां देईना. लढाई होऊं लागली. तथापि शिंदे यानीं बळेंच दोन तोफा घेऊन कुरुक्षेत्रास निघाले. तोफा फार जड, त्या मध्येंच पडल्या. शतद्रूपर्यंत गेले. लाहोरचा सुभा अदीनाबेग त्याचा पुत्र भेटला. त्याचे विचारें साबाजी शिंदे व त्र्यंबक बापूजी यांस १५००० हजार फौज देऊन लाहोर, मुलतान व काश्मीर व पंजाब अटकेपर्यंत मुलुखाचे जप्तीस पाठविलें, आणि आपण कुंजपुरानजीक येऊन मुक्काम केला. तेथें गोविंदपंत बुंदेले भेटले. त्यांजकडे पूर्वी नजीबखान यानें संधान लाविलें होतें कीं, मल्हारबांनीं तुमचे हातीं आह्मांस दिलें, तुह्मीं आह्मांस साह्य करावें असें बोलणें लाविलें होतें. त्याजवरून गोविंदपंत यांनीं दत्ताजीस सांगितलें जे, नजीबखान भेटतील, भागीरथीचे पुलाचा मनसुबा त्यांचे हातीं होऊन जाईल ह्मणून बोलला. ते शिंद्यांशीं बरें आहे असें बोलले. इतक्यांत नजीबखान पांच हजार फौजेनिशीं येऊन भेटला. सर्व मंडळी व बाया वगैरे यांचे मनांत, हा अनायासें थोडे लोकांनिशीं आला. याचें निर्मूलन करण्यास संधि बरी

आहे, असें सर्वांनीं सांगितलें असतां दत्ताजीनीं न ऐकतां, भागीरथीस पूल बांधून द्यावा, पलीकडील जो मुलूख मिळेल त्यापैकीं दुहावा हिस्सा तुह्मांस देऊं असा तह ठरविला. तो कपटी, त्यानें हीं साजकरोटी ह्मणजे शफत शिंद्यांशीं केली. नंतर तो नजीबखान शुक्रताल येथें जाऊन सुजायतदौला यास सांगून पाठविलें कीं, दत्ताजी शिंदे तुह्मांवर येतात. तेव्हां त्यानें नजीबखान यास निरोप पाठविला कीं, मी तुमचा आहें, पन्नास हजार फौज तुह्मांस देतों व पैसाही लागेल तो देतों व तुमचें साह्य करितों, गनीमास नदीपार होऊं देऊं नये. असें वचन ऐकतांच अबदालीकडे नजीबखान यानें संधान लाविलें, आणि शुक्रताल भागीरथी उत्तरवाहिनी येऊन पालखीच्या दांडीसारखी वळण पडून दक्षिणेकडे गेली आहे. जेथें शुकांनीं परि-क्षिति राजास भागवत सांगितलें, ती जागा मोठी बिकट खळ्या भारी कांहीं ठिकाणीं वाट होती, तेथें तोफा व खंदक खणून फौज ठेवून असाध्य असें नजीबखान यानें केलें, आणि शिंदे यास निरोप पाठविला कीं, बरसात खलास झाल्याशिवाय पूल होत नाहीं, तुह्मीं येऊं नये, पुढें पाहूं, आह्मांस येण्यास होत नाहीं. तेव्हां दत्ताजीस त्याचें कपट उम-जलें. हस्तनापुरास येऊन तेथून वैशाख शुद्ध १० शके १६८१ रोजीं ( २१ मे १७५९ ) दोन कोस मिरापुरावर मुक्काम केला. भाद्र-पदपावेतों ( सप्टेंबर १७५९ ) गोळागोळी चालली. शिंद्याचे लष्करांत महागाई झाली. रसद येईना. भाद्रपदअखेरीस मोठी लढाई झाली. जनकोजी व दत्ताजीस जखमा लागल्या. जिवाजी हणमंतराव शिंदे पडले. नजीबखान याची फौज भागीरथीस पूल बांधिला होता त्यावरून पलीकडे गेली. पूल राखिला. नंतर कार्तिक शुद्ध १ रोजीं [ २१ आक्टोबर १७५९ ] शिंदे यांनीं गोविंदपंत बुंदेले व अंताजी माणकेश्वर याचे पुत्र तात्याजी, जिवाजी नाईक भोईटे व तुकोजी होळकर यांजबरो-बर वीस हजार फौज देऊन जेता गुजर याचे विचारें हरिद्वाराजवळ भागीरथीपलीकडे गेले. असें नजीबखान यास कळतांच सुजायतदौला यास सांगून पाठविलें. तो पन्नास हजार फौजेनिशीं आला. गोविंद-

पंत बुंदेले पळून गेले. हे मूळचे फितूरी होतेच. नंतर सुजायतदौला भागीरथीपलीकडे उतरला. इकडे अबदुलअल्ली खंदारबादशहा लाहोरास येऊन त्रिंबक बापूजीचा मोड केला. ते पळून दिल्लीस गेले. दिल्ली बादशहा यानें अबदालीस गाजुद्दीखान यास मारण्याचा संकेत ठरवून बोलाविलें. हीं संकेताचीं पत्रें गाजुद्दीन वजीर यास सांपडलीं. त्यावरून त्यानें एकदम बादशहा अलमशहाचा शिरच्छेद केला, आणि शिंदे यास लिहिलें. त्यावरून तेही कुंजपुरावर आले. मागाहून अबदाली आला. त्यास सुजायतदौला मिळाला. लढाई झाली. साबाजीचा पुत्र बयाजी शिंदा ठार पडला. मालोजी शिंदे पडले. जनकोजी शिंदे यास जबर जखम लागली. यशवंतराव जगदेव पडले. दत्ताजी गोळा लागून पडले. त्यांचा शिरच्छेद कुतुबशहानें केला. शिर नजीबखानाजवळ दिलें. त्यानें रुमालांत घालून अबदालीपाशीं नेलें. तें सुजायतदौला यानें दोन लाख रुपये देऊन मागून घेऊन दहन केलें. नंतर रूपराम कठारी जनकोजी घायाळ यास व भागीरथीबाई गरोदर होती तिजला व काशीबाई जनकोजीची स्त्री अशीं घेऊन पळाला, तों गिलचे पाठीस लागले. त्याजबरोबर गाजुद्दीन पळाला. एका दिवसांत ८० कोस कोटपुतळीस आले. मल्हारराव यास येणेंविषयीं पूर्वींच पत्र लिहिलें होतें. त्यांनीं जयनगरचा रोख सोडून शिंद्याकडे येत असतां त्यांची अशी दाणादाण होऊन कोटपुतळी येथें गांठी पडल्या. शिंद्यास डेरे, राहुट्या, पाल, पडदे वगैरे देऊन निघतात तों मागाहून लष्करचीं पळालेलीं माणसें फौज वगैरे मिळालीं. दोन फौजा एकत्र झाल्या. नंतर बायका देशीं पाठविल्या. त्या दहावे दिवशीं चमेलीस आल्या. नंतर कुवरी नदीवर मुक्काम झाला. तेरावा पौष वा। १३ भागीरथीबाई प्रसूत झाली. पुत्र झाला. नंतर बाया उज्जनीस गेल्या. शिंदे होळकर यांचे पाठीस दुराणी लागले. नंतर पळत पळत ज्येष्ठमासपर्यंत ( मे १७६० ) जात असतां दुराणी कोळजळेश्वरास राहिला. यमुनेस पाणी आलें. शिंदे होळकर केरालीचे सुमारें चमेलीवर राहिले. दत्ताजी शिंदे वारल्याची खबर देशीं आली. तेवेळेस भाऊसाहेब पड-

दुरानजीक मोंगलाईतच तांदुळज्याची लढाई आटपल्यावर होते. तेव्हां या हिंदुस्थानचे स्वारीस दादासाहेब यांसच पाठविण्याचा श्रीमंतांचा विचार होता. परंतु त्यांनीं लाहोरच्या स्वारीस खजीना वगैरे कांहीं न आणितां उलटें कर्ज ८०००००० ऐंशीं लाख करून आले होते. हें भाऊसाहेबांस बरें न वाटून मीच या स्वारींत जातों अशा आग्रहास पडले. श्रीमंतांनीं पुष्कळ रीतीनें सांगितलें. तत्राप आपणच जाण्याचा आग्रह धरिला. सबब चिरंजीव विश्वासराव यांस त्यांजबरोबर घेण्याचा विचार ठरवून छ २९ रज्जब रोजीं ( १४ मार्च १७६० ) फाल्गुन वा॥ १२ शुक्रवारीं सर्व तयारी करून चैत्र शु॥ १चे ( १८ मार्च १७६० ) मुहूर्तानें पानपतचे स्वारीस चालते झाले. श्रीमंत पुण्यास परत आले. यासालीं दुसऱ्या किरकोळ गोष्टी घडल्या त्या. छ ११ रमजान ( २८ एप्रिल १७६० ) मुलेरचा किल्ला घेतला. इंग्रजांशीं सलाबतजंग यानें तह करून मच्छली बंदर इंग्रजांस दिलें. छ ६ जिल्हेज ( ३१ जुलै १७५९ ) नानापुरंदरे यांचे घरीं मु॥ शिक्का होता तो त्र्यंबकराव मामा पेठे सातार यांस पाठविलें, त्याचे हवालीं केला. नारायणराव व्यंकटेश कर्नाटकांत पाठविला. त्यास मुतालकी शिक्का दिला. छ १२ रमजान ( २९ एप्रिल १७६० ) पुण्याचें गांवकुसूं चिरेबंदी करण्याचें काम जिवाजीपंत अण्णा खासगीवाले यांचेमार्फत चाललें होतें. सुरत अठ्ठावीस पैकीं सात महाल दमाजीपासून घेतले. दोन घटका रात्रीस तारा पडून मोठा आवाज नगाऱ्यासारखा या सालीं एके दिवशीं झाला होता. भाऊसाहेब स्वारीस निघाले. त्याजबरोबर वीस हजार स्वार, पायदळ व गारदी इब्राहिमखान तोफखानासुद्धां, दहा हजार लोक, व याखेरीज पेशवे यांनीं आज्ञा केल्यावरून मल्हारराव होळकर, जनकोजी शिंदा व दमाजी गायकवाड, यशवंतराव पवार व अप्पाजीराव आठवले व अंताजी माणकेश्वर व गोविंदपंत बुंदेले वगैरे सरदार फौजेनिशीं त्यास मिळाले, व याशिवाय रजपूत लोक आपापल्या टोळ्यांनिशीं. सदाशिवराव याजबरोबरही बळवंतराव गणपत मेहेंदळे, व समशेर बहादर नारो शंकर व विठ्ठल शिवदेव विंचूरकर व त्र्यंबकराव सदाशिव पुरंदरे

याशिवाय मराठे सिरदार आले होते, व होळकर याचे स्नेहाकरितां सुरजमल जाटही तीस हजार फौजेसहित आला. या लष्करासहित येऊन प्रथम दिल्ली घेतली. पुढें जावें तों पर्जन्यकाळ आला, ह्मणून डेरे देऊन राहिले. भाऊसाहेब यांचें लष्कर दोन लक्ष, व दोन कोट रुपये जवळ होते, ते खर्चास पुरणार नाहींत, ह्मणून दिल्ली बादशहाचा दिवाणखाना सोन्यारुप्यानें मढविलेला होता, तो होळकर व जाट सुरजमल सांगत असतां, न ऐकून मोडून सतरा लक्ष रुपये उत्पन्न केले. तो अन्याय पाहून सुरजमल व रजपुतांचें लष्कर निघून माघारें गेलें. इतक्यांत अबदाली यानें गंगेचे कांठीं डेरे देऊन सुजायतदौला आपल्याकडे करून घेतला. या सालीं भाद्रपदमासीं मोठा पाऊस पडला. पक्षाचे दक्षिणेस ब्राह्मण पर्वतीस गेले होते. ओढ्यास पाणी येऊन दोन चारशें ब्राह्मण वाहून गेले. ( १९ सप्टेंबर १७६० ).

**सु॥ इहिदे शितैन मया व अलफ, सन ११७० फसली, अव्वलसाल छ १९ सवाल, ४ मे १७६०, ज्येष्ठ वद्य ५ शके १६८२.**

पर्जन्यकाळ शांत झाल्यावर सदाशिवराव यानीं दिल्लींत अलमगीर याचे जागीं शहाअलम याचा पुत्र अलीगोर ऊर्फ मीरजमाल तक्ताधिपति करून दुसरा शाहालम असें नांव ठेविलें व सुजायतदौला यास वजिरी दिली व नारो शंकर यास राजेबहादर असा किताब देऊन त्यास तेथें बंदोबस्तास ठेविलें. नंतर कुंजपुरा कोट आहे तो तोफा लावून पाडून तें स्थान घेतलें. इतक्यांत अबदाली यमुना उतरून अलीकडे अक्टोबर सन १७६० चे २५ तारखेस आला. नंतर दुसरे दिवशीं युद्ध झालें. त्यांत मराठे मसलत करीत कीं, उद्यां एकदम मुसलमानांवर हल्ला करावा. होळकर याचें ह्मणणें असें न करितां धान्यादिकांचा तोटा करावा. त्याजवर इब्राहिम गार्दी याचें ह्मणणें तोफांचे हल्ले करावे असें पडलें. होळकर याचें ह्मणणें अमान्य केलें. इतक्या मसलतींत मराठ्यांचें लष्कर मागें हटत पानपतावर आलें. गारद्याचे मसलतीनें भाऊनीं आपलेसभोंवतीं खंदक ८ हात खोल व ३२ हात रुंद खणिला.

इतके अवसरांत अबदाली जवळ येऊन उतरला. मुसलमानांचें सैन्य ४१८०० स्वार व पायदळ ३८,००० व तोफा ७७ होत्या. मराठ्यांकडे ५५,००० स्वार व १५,००० पायदळ व शिवाय पसाराबुणगे दोन लक्ष होते. याप्रमाणें लष्कर असतां गोविंदपंत बुंदेले यास शत्रूकडील धान्यादिकांचा नाश करण्यास पाठविलें. त्यास अबदलीचे सरदारांनीं डोकें कापून घेतलें. सन १७६०चे नवंबर तारीख २९ पासून आरंभ होऊन तारीख २३ दिसेंबरपर्यंत झालें. रुपयांच्या थैल्या दिल्लीहून कितीएक स्वार येत होते, ते रात्रीची वाट चुकून अबदालीचे लष्करांत जातांच त्यांस मारून तें द्रव्य घेतलें. तारीख २४ दिसेंबर रोजीं नजीबउद्दवला व बळवंतराव गणपत यांचें युद्ध झालें. बळवंतराव मेहेंदळे गोळी लागून ठार झाले. बायको सती गेली, छ २८ रबिलाखर ( ७ डिसेंबर १७६० ). नंतर कांहीं दिवस युद्ध होत असतां भाऊसाहेब यांचे लष्करांत धान्याचा तोटा पडून पौष शुद्ध ८ रोजीं सरकारकोठींतील धान्य सर्वांस वांटून दिलें. ते पोटभर जेवले. पोष शुद्ध ८ रोजीं पुढें तोफा व जंबूरे व जेजाला व बाणदार व इब्राहिमखा पलटणीसुद्धां होते. त्यामागें दमाजी गायकवाड, त्यामागें वरकड सरदार व जनकोजी शिंदे यांचें लष्कर व उजवे बाजूस व डावीकडे इब्राहिमखान मदत सदाशिवरावभाऊ. मुसलमान यांनीं तोफा पुढें करून डावे बाजूस अफगाण लोकसुद्धां सुजायतदौला व नजीबखान व उजवे बाजूस अमेदखान बंगष व रोहिले. मध्यें शहाअल्लीखान वजीर व या सर्वांचे डाव्या बाजूस शहापसंतखान होता. इब्राहिमखान यानें आपल्यासमोर अमेदखान रोहिला होता त्याजवर चाल करून याचे ८००० लोक मारिले. भाऊसाहेब वजिरावर गेले. युद्ध मोठेंच झालें. फार लोक पडले. अडीच प्रहर सुभेदार शहापसंतखान मध्यें येऊन वजिरास कुमक केली. मोठें हातघाईचें युद्ध झालें असतां विश्वासराव यास जखम लागली. सबब भाऊसाहेब हत्तीवरून उतरून होळकर यास निरोप पाठविला कीं, तुह्मास पहिलें जें सांगितलें तें आतां करावें. असें सांगून घोड्यावर बसून गर्दींत शिरले ते दिसेनासे झाले. तो

निरोप होळकर यांस पोहोंचतांच होळकर निघाले व गायकवाडही निघाले. सर्व बायकामुलें शिपाई वगैरे जवळच पानपत गांवांत शिरले. दिवस गेला. रात्र झाली. रात्रीं अफगाणांची टोळी येऊन त्या गांवासभोंवतीं वेढा पडला. नंतर प्रातःकाळीं त्यांनीं मराठे लोकांस बाहेर काढून अफगाणांनीं बायकामुलें वांटून घेतलीं. पुरुषांच्या दावणी देऊन डोकीं उडविलीं. त्यांचे शिरांचे ढीग आपल्या डेऱ्यापुढें ठेविले. विश्वासराव याचें प्रेत सांपडलें. तें अहमदशा अब्दलीजवळ राहिलें व सुजायतदौला यानीं अर्ज करून मराठ्यांचे हातीं दिलें, तें हिंदूनीं जाळलें. जनकोजी शिंदा व इब्राहिम गार्दी जखम होऊन शत्रूहातीं लागले. तेव्हां त्यांनीं त्यांस मारून टाकिलें. यशवंतराव रणांत पडले. समशेरबहादर जखम होऊन पळत असतां कोणी गांवकरी यानीं त्यास मारिलें. विठ्ठल शिवदेव व नारो शंकर व दमाजी गायकवाड व मल्हारजी होळकर वगैरे फौज जी गेली, त्याचे चौथे हिशानें परत आली. सुरजमल्ल जाटाकडे गेली, त्यानें त्यांचा समाचार चांगले प्रकारें घेतला. इकडे श्रीमंत नानासाहेब याजकडील वर्तमान श्रीमंत छ १२ रबिलावल (१२ अक्टोबर १७६०) बुधवारीं स्वारीस निघाले. जानोजी व मुधाजी भोसले बरोबर होते, दादासाहेबसुद्धां. बरोबर सखारामबापूही होते. छ ३ रबिलाखर बाळाजी गोविंद यांनीं पठाणास बुडवून भेटी घेतल्याची बातमी आली. छ २१ रबिलाखर अशेरीचा किल्ला घेतल्याची खबर आली. छ १८ जमादिलावल नानासाहेब यांनीं आपलें दुसरें लग्न देशस्थ ब्राह्मण नारोबानाईक पैठणकर यांच्या कन्येशीं केलें. नंतर दादासाहेब यांची स्वारी छ ११ जमादिलाखर रोजीं वेगळी होऊन सखारामबापूसुद्धां निघून गुडमटकलाकडे गेले. ते अखेर सालीं गुडमटकल घेऊन छ १७ रमजानीं परत आले. श्रीमंतांची स्वारी भेलशास होती. तेथें पानपताचें वर्तमान समजलें. छ १३ साबान रोजीं रामगड पहाण्यास गोपाळराव गोविंद यास छावणीस ठेवून देशीं निघाले. छ १ जिल्काद सुमारें टोक्यास वैशाख शु॥ १३ चें बाजीरावाचें श्राद्ध करून, परत पुण्यास आले.

श्रीमंतांची स्वारी नर्मदातीरीं असतां पौष शु॥ १३ रोजीं पानपतचा काशीद सावकार लोकांचा पांचा दिवसांत औरंगाबादेस जाण्याचे करारानें निघाला तो सहावे दिवशीं श्रीमंतांस भेटला. अबदालीची व दक्षिणी फौजेची लढाई झाली, फौज बुडाली, असें सांगितलें. त्याजवळ एक कागद मिळाला त्यांत, दोन मोतीं गलत व दसत्रीस अशरफात व रुपयाको गणत नहीं, इतका मजकूर होता. कोणीं कोणास लिहिलें तें नांव वगैरे लिहिलें नव्हतें.

समाप्त.